## सामाजिक अध्ययन इयत्ता सहावी


Government of Telangana

**Department of Women Development & Child Welfare - Childline Foundation**

When abused in or out of school.

To save the children from dangers and problems.

CHILD LINE 1098 NIGHT & DAY

24 HOUR NATIONAL HELPLINE

When the children are denied school and compelled to work.

When the family members or relatives misbehave.

1098 (Ten...Nine...Eight) dial to free service facility.

IN ANY EMERGENCY DIAL 100

TELANGANA POLICE

www.tspolice.gov.in

@ Telangana State Police


तेलंगाना सरकारचे प्रकाशन

शालेय शिक्षण विभाग



तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण

सामाजिक अध्ययन इयत्ता सहावी

# सामाजिक अध्ययन

## इयत्ता सहावी

## SOCIAL STUDIES CLASS VI

(Marathi Medium)

**FREE**










तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण

SCERT TELANGANA

## मूलभूत कर्तव्ये

प्रत्येक नागरिकाने

१) राज्यघटना, राष्ट्रध्वज राष्ट्रगीत यांचा आदर राखणे.

२) स्वतंत्र लढ्यातील उदात्त आदर्शाचे जतन आणि पालन करणे.

३) भारताचे सार्वभौमत्व, एकता व एकात्मता यांचा सन्मान व संरक्षण करणे.

४) देशाचे संरक्षण करताना गरज पडल्यास देशसेवेस वाहून घेणे.

५) वर्ग रहित व भेदरहित भारत निर्माण करणे, स्त्रियांना प्रतिष्ठा प्राप्त करून देणे.

६) राष्ट्रांची संस्कृती व गौरवशाली परंपरेचे जतन करणे.

७) नैसर्गिक संपत्तीचे रक्षण,व संवर्धन करणे सजीव प्राणिमात्रावर प्रेम करणे.

८) वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवता वार,ज्ञानार्जन यांची जोपासना करणे.

९) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचारास प्रतिबंध करणे.

१०) राष्ट्राच्या उत्तरोत्तर प्रगतीसाठी व्यक्तिगत, सामुदायिक उत्कर्ष साधणे.

११) ६ ते १४ वयोगटातील प्रत्येकाला पालक तथा संरक्षकांनी प्राथमिक शिक्षण हे सक्तीने दिले पाहिजे

भारताची घटना

भाग IVA (कलम51A)

## अपेक्षित शैक्षणिक क्षमता

सामाजिक अध्ययन

वर्ग ६ वा

**विद्यार्थी श्रवण (प्रशिक्षण)**

* पृथ्वीच्या गोलाच्या साह्याने दुपार, रात्र कशी हेते याचे प्रदर्शन करुन वर्णन करतो.
* जगाच्या नकाशात खंड आणि महासागरे ओळखतो.
* जगाच्या गोल आणि नकाशात अक्षांश, रेखांश, ध्रुव प्रदेश भुमध्य रेखा यांना ओळखतो.
* भारताच्या रेखांकीत नकाशात राज्ये, केंद्रशासीत प्रदेश आणि सिमालगत देशांना ओळखतो.
* विविध प्रकारच्या पुरावस्तु गोष्टी ( लेखी पत्रे, कोरीव लेख, विविध प्रकारच्या पुरातन रचना, इतर संबंधीत वस्तु यांचा उपयोग करुन इतिहासाच्या पुनर्मितींती साठी काळानुसार विश्लेषण करतो.
* प्राचिन काळातील विकासाचे वर्णन करतो.
उदा. शिकार, शेती, शहरे, संस्कृती, खगोलविज्ञान आरोग्य शास्त्र, गणीत तर्कशास्त्र विज्ञान इत्यादी मध्ये भारतीयांचे योगदान स्पष्ट करतो.
* प्राचीन काळातील विविध धर्माचे प्राथमिक सिध्दांत मुल्ये विचारधारा यांचे विश्लेषण करतो.
* परिसरातल्या विविध प्रकारच्या मानवी वैशिष्टांचे आणि भेदाचे विश्लेषण करतो.
* विविध प्रकारातील समानत्व आणि असमानत्वामधील फरक ओळखुन त्यांना योग्य पध्दतीने दुरुस्ती करतो.
* विविध चिन्हांच्या आधाराने एका विशिष्ट प्रदेशापर्यंत पोहोचतो प्रदेशाचे वास्तव अंतर दिशा ओळखतो, गोंड आदिवासी, पंच, या विषयी माहिती देतो.
* भारताच्या नकाशात महाजनपदे आणि महत्वाची आधुनिक शहरे ओळखतो.
* मोर्य साम्राज्य सम्राट अशोकाचे मोठेपण. गुप्त राजांची महानता विशद करतो. अनेक धर्मातील मुर्त्यांची तुलना करतात. विशाद करतात.

SCERT TELANGANA

# gm_m{OH$ AÜ``Z

## इयत्ता सहावी

Social Studies Class-VI (Marathi Medium)

### संपादक

**श्री. सी.एन. सुब्रमण्यम**, एकलव्य, म.प्र.

**प्रो. आय. लक्ष्मी**, इतिहास विभाग
उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद

**प्रो.एम. कोदंडराम**, राज्यशास्त्र विभाग
पी.जी. कॉलेज, सिंकद्राबाद, हैद्राबाद

**प्रो.के. विजया बाबु** , इतिहास विभाग
काकातिया विश्वविद्यालय, वरंगल

**डॉ. एम. व्ही. श्रीनिवासन**, स. प्रो.
डीईएसएसएच, एनसीइआरटी, नवी दिल्ली

**डॉ. एम. व्ही. एस. व्ही. प्रसाद**, स.प्रो.
डीईएसएसएच, एनसीइआरटी, नवी दिल्ली

**डॉ. सी. दयाकर रेड्डी**, स. प्रो
विद्यापीठ महिला महाविद्यालय
कोटी, हैदराबाद

**प्रो. जी. ओंकारनाथ**, अर्थशास्त्र विभाग,
हैदराबाद विद्यापीठ, हैदराबाद

**प्रो. एस. पद्मजा**, भूगोल विभाग,
उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद

**प्रो. ऐ. सत्यनाराणा (निवृत्त)**इतिहास विभाग
उस्मानिया विश्वविद्यालय, हैद्राबाद

**डॉ. के.के. कैलाश**, राजशास्त्र विभाग
एचसीयु, हैद्राबाद

**डॉ. के. नारायणा रेड्डी**, भूगोल विभाग,
उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद

**श्री.राममुर्ती शर्मा**, शिक्षण विभाग
पंजाब सरकार

**श्री के. सुरेश**
मंची पुस्तकम, हैदराबाद

**श्री राममूर्ती शर्मा**
शिक्षण विभाग, पंजाब सरकार

**श्री अलेक्स एम. जॉर्ज**
एकलव्य, म.प्र.

### पाठ्यपुस्तक विकास समिती

**श्रीमती बी.शेषुकुमारी** संचालक,
एस.सी.ई.आर.टी.,
हैदराबाद

**श्री के. कृष्णा मोहन राव**, प्रोप्रेसर
एस.सी.ई.आर.टी.,
हैदराबाद

**श्री बी. सुधाकर**, संचालक,
शासकीय पुस्तक मुद्रणालय
हैदराबाद

**डॉ. श्री. एन. उपेंद्र रेड्डी**,
प्रो. सी.ॲण्ड टी विभागप्रमुख
एस.सी.ई.आर.टी., हैदराबाद

**तेलंगाना सरकारचे प्रकाशन, हैदराबाद**

कायद्याचा आदर करा
हक्क मिळवा

शैक्षणिक उन्नती साधा
प्रेमाने वागा

SCERT TELANGANA



तेलंगाना राज्य सरकार द्वारा मोफत वितरण 2020-21

© Government of Telangana, Hyderabad.

*First Published 2012*

*New Impressions 2013, 2014, 2015, 2016, 2017, 2018, 2019, 2020*

All rights reserved.

No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system, or transmitted, in any form or by any means without the prior permission in writing of the publisher, nor be otherwise circulated in any form of binding or cover other than that in which it is published and without a similar condition including this condition being imposed on the subsequent purchaser.

The copy right holder of this book is the Director of School Education, Hyderabad, Telangana.
We have used some photographs which are under creative common licence. They are acknowledged at the end of the book.

This Book has been printed on 70 G.S.M. Maplitho
Title Page 200 G.S.M. White Art Card

**तेलंगाना राज्य सरकार द्वारा मोफत वितरण**

*Printed in India*
The Telangana Govt. Text Book Press,
Mint Compound, Hyderabad,
Telangana.

SCERT TELANGANA

## लेखक

**डॉ. के. लक्ष्मारेड्डी**, वरिष्ठ प्राध्यापक, डीआयइटी, करीमनगर

**श्री. एम. नरसिंम्हा रेड्डी**, जीएचएमझेडपीएचएस, पेद्दाजंगमपल्ली, वायएसआर कडप्पा

**श्री. के. लक्ष्मीनारायणा**, प्राध्यापक, डीआयइटी, कृष्णा

**श्री. के. सुब्रह्मण्यम**, प्राध्यापक, डीआयइटी, कर्नुल

**श्री. एम. पापय्या**, प्राध्यापक, एस.सी.इ.आर.टी., आं.प्र. हैदराबाद

**श्रीमती टी. एस. मल्लेश्वरी**, प्राध्यापक, एसआयइटी, आं.प्र. हैदराबाद.

**श्री कोरीवी श्रीनिवासा राव**, एस.ए, एम.पी., यू.पी.शाळा, पी.आर.पल्ली, श्रीकाकुलम

**श्री. यू. आनंदकुमार**, एस.ए., झेड. पी. एच.एस., पथापलवंचा, खम्मम

**श्री. बी. श्रीनिवासू**, एस.ए., झेड. पी. एच.एस., सावेल, निजामाबाद

**श्री शेख रेहमतुल्ला**, एस.ए. झेड.पी.एच.एस. भाक्रापेटा, वायएसआर कडप्पा.

**श्री. सीएच. राधाकृष्णा**, एस.ए.झेड.पी.एच.एस., वेंकटापूरम, श्रीकाकुलम

**श्रीमती बी. सरला**, एस.ए.झेड.पी.एच.एस., इंदुकूरुपेट, पी.एस.आर.नेल्लूर

**श्री. बी. शंकरराव**, एस.ए.झेड.पी.एच.एस., देवुपल्ली, विझींग्राम

## समन्वयक

**श्री. मोहन रेड्डी**, एस.ए.झेड.पी.एच.एस., देवुपल्ली, विझींग्राम
**श्री. जे. राघवुलू**, प्रो. एस.सी.इ.आर.टी., आं.प्र., हैदराबाद
**श्री. एम. पापय्या**, प्राध्यापक, एस.सी.इ.आर.टी., हैदराबाद
**श्री. एस. विनायक**, समन्वयक, सी. ॲण्ड टी. विभाग, एस.सी.इ.आर.टी., हैदराबाद
**श्री. एम. नरसिम्हा रेड्डी**, जी.एच.एम., झे.पी. एच.एस., पेद्दाजंगमपल्ली, वायएसआर कडप्पा.
**श्री कोरीवी श्रीनिवासा राव**, एस.ए, एम.पी., यू.पी.शाळा, पी.आर.पल्ली, श्रीकाकुलम

## मराठी अनुवादासाठी

समन्वयक : **श्री. बी.आर.जगदीश्वर गौड**,एम.एस्सी.,एम.एड्., प्राचार्य, शासकीय अध्यापक विद्यालय,आदिलाबाद

सह समन्वयक **श्री. के. किरण कुमार**, (ईएलटीसी), शासकीय अध्यापक विद्यालय, आदिलाबाद

सह समन्वयक : **श्री. बी. राजेश्वर**, एम.ए., एम.एड., शासकीय अध्यापक विद्यालय, आदिलाबाद

अनुवादक : **श्री. शिवाजी कदम**, एस.ए., झेड.पी.एच.एस., बेला, जि. आदिलाबाद

अनुवादक : **श्री. सोनेराव सोनकांबळे**, एस.ए., झेड.पी.एच.एस., बेला, जि. आदिलाबाद

अक्षरजुळणी : **श्री. राजेश दानका**, संगणक चालक (आदित्या डि.टी.पी. सेन्टर आदिलाबाद)

## रेखाटन

**श्री. कुरेल्ला श्रीनिवास**, एस.ए. झेड.पी.एच.एस., पोचमपल्ली, नलगोंडा

**श्री. बी. किशोर कुमार**, एस.जी.टी., एम.पी.यू.पी.एस., अलवल, अनुमुला, नलगोंडा

SCERT TELANGANA



तेलंगाना राज्य सरकार द्वारा मोफत वितरण 2020-21

# विद्यार्थ्यांना पत्र

दिवसभर शेतात काबाडकष्ट करून थकून भागून घरी आलेल्या माझ्या आईजवळ जाऊन बसलो अन् माझ्या मनात विचार आला, महिलांचे जीवन किती कठीण आहे ? मी जर घराच्या बाहेर पडलो, तर मला अनेक प्रकारचे लोक भेटतील. लोक, जे अनेक भाषा बोलतात, आणि अनेक चालीरीती बाळगतात माझ्या मनात विचार येतो ते कोण असतील अन् त्यांच्यामध्ये किती विविधता आहे

आमचे शेतकरी अनंत अडचणींना तोंड देत, दुष्काळावर मात करीत, अन्नधान्य पिकविण्याचे काम करीत असतात त्यांना दु:खात निराशेत लोटण्याचे काय कारण असेल ? असा मी विचार करतो मी जेव्हा-जेव्हा रस्त्याने चालतो तेव्हा मला सुंदर इमारती, मोठा रस्ता,देऊळे,मशिदी दिसतात मला विचार येतो का,कोणी यांची निर्मिती केली असेल ? किती खर्च केला असेल ! मला झोपडपट्ट्याही दिसतात त्यांचे दुर्दैव पाहून मला वाटते की, या सुंदर इमारती यांच्यासाठी नाहीत का?

मोठी माणसं नेहमी निवडणुका आणि मतदानाविषयी चर्चा करतात आपण योग्य लोकांना निवडून दिले पाहिजे योग्य लोकांनी राज्य केले पाहिजे मला विचार पडतो आपणावर कोण व कसे राज्य करतो माझे आजी-आजोबा मला राजा-राणी तथा देव व संताच्या कथा सांगतात त्यात देवांनी ,संतांनी सामान्य लोकांबरोबर मिळून सहप्रवास केला मला वाटते हे आता खरच शक्य आहे का ?

माझ्याजवळ अनेक प्रश्न आहेत मला वाटते की कुणीतरी याची उत्तरे देईल का ? कदाचित कुणालाही याची उत्तरे माहीत नसतील किंवा कुणीही यांपैकी काही प्रश्नांची उत्तरे देऊ शकणार नाही कदाचित, मला एकट्यालाच याचा शोध घ्यावा लागेल कसा शोधणार मी ?कोण मला मदत करणार?

प्रिय मित्रांनो,

तुमच्या मनात निर्माण झालेल्या काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे सर्वांनाच हवी आहेत; परंतु या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधणे सोपे काम नाही किंवा एक निश्चित असे उत्तर नाही वास्तवत: अनेक प्रश्नोत्तरे अनेकजन अनेक पद्धतीने देतील म्हणून समस्यांचा अभ्यास केल्यावर तुमच्या स्वत:ची उत्तरेही असू शकतील सामाजिक शास्त्र आपण पाहत असलेल्या अशा सर्व प्रश्नांची उत्तरे, प्रश्न विचारून विविध पद्धतीद्वारे देतो अनेक लोक अनेक प्रश्नाची उत्तरे अनेक पद्धतीने का देतात यांचे विश्लेषणही हे शास्त्र करते उदा तुम्ही एखाद्याला विचारले की शाळेच्या तुलनेस कॉलेजात मुलींची संख्या फारच थोडी का ? तर तुम्हांला अनेकांकडून अनेक प्रकारची उत्तरे मिळतील जर का तुम्ही विचाराल की उपनगरासारख्या गलिच्छ वस्त्यांची स्वच्छता का केली जात नाही ? तर याचेही तुम्हाला पुन्हा अनेकांकडून अनेक उत्तरे मिळतील लोक प्रश्नांची उत्तरे अनेक प्रकारे का देतात! याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न सामाजिक शास्त्र करते.

सामाजिक शास्त्र एखाद्या समस्ये संबंधी निर्माण होणाऱ्या प्रश्नाच्या अनुषंगाने येणाऱ्या उत्तराचे संकलन करते त्या प्रश्नांचा अभ्यास करण्याचे कठीण कामही करते प्रश्न कसा निर्माण झाला त्यात कसे बदल झाले ? प्रश्नाचे स्वरूप सर्वत्र सारखेच आहे का ? की स्थानपरत्वे भिन्न स्वरूप आहे ? उत्तरे ही तर अनुषंगाने बदलतात भूतकाळात मुलीचे प्रमाण किती होते ? जगभरात त्याचा सद्यपरिस्थिती काय आहे ? शिक्षणापासून दूर जाण्याचे कारण काय ! मुलींना शिक्षणापासून वंचित करण्यात पालकांचा जवाब काय ! मुलीच्या शिक्षणाचे समर्थन करणाऱ्या-या पालकांचे मत काय ? मुली म्हणजे काय ? शिक्षकांचे मत काय ? समाजशास्त्रज्ञ या सर्व प्रश्नाचा एकत्रित अभ्यास करून मुख्य प्रश्नाचे उत्तर शोधतात परंतु कोणताही समाज शास्त्र या प्रश्नाचे अंतिम उत्तर देत नाही ते केवळ तुमच्यावर अवलंबून आहे की कोणते उत्तर जास्त समाधानकारक आहे

**- संपादक**

SCERT TELANGANA



तेलंगाना राज्य सरकार द्वारा मोफत वितरण 2020-21

## या पुस्तकाविषयी....

आपल्या सभोवती असलेल्या समाजाचा अभ्यास करणाऱ्या या एकंदर शास्त्राचा एक भाग म्हणजे हे पुस्तक होय. तथापि संपूर्ण अभ्यासक्रमाचा हा एक भाग आहे हे लक्षात ठेवा तुम्हाला काय माहीत आहे, याची वर्गात चर्चा करण्याचे एक साधन मात्र आहे? हे असेच का घडते? याचा शास्त्रोक्त विचार करणे गरजेचे वर्गातच नव्हे तर वर्गाबाहेर जाऊन, बाजारात ग्रामपंचायत किंवा नगरपालिका, कार्यालय, गावं, मंदिर, मशीद आदी निरीक्षण करणे तथा त्याचा चिकित्सक अभ्यास करणे, तसेच अनेक लोकांच्या भेटी घेऊन चर्चा करणे जसे, क्षेत्रफळ, दुकानदार, अधिकारी, पुजारी इत्यादी.

एखादी समस्या समजून घेऊन त्याचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्याची संधी या पुस्तकां द्वारे मिळते म्हणून या पुस्तकात प्रश्नांची उत्तरे नाहीत कदाचित हे पुस्तक परिपूर्ण नाही तुम्ही तुमचे मित्र एकत्र येऊन जेव्हा एखाद्या समस्येचा चिकित्सक अभ्यास कराल तेव्हाच या पुस्तकाचा हेतू सफल होईल या पुस्तकात व्यक्त करण्यात आलेल्या अनेक बाबीशी तुम्ही सहमत नसाल भिऊ नका, त्याची कारणे शोधा तुमचे मित्रही असहमत असतील परंतु मत भिन्नता कार्याचा विचार करा शेवटी तुमच्या स्वत:च्या निष्कर्ष प्रत या तुमचा निष्कर्ष पक्का नसेल मनाची तयारी करण्या पूर्वी अजून तुम्हांला बरेच काही शोधायचे आहे तशा परिस्थितीतील आपल्या प्रश्नांची उजळणी करा ! तुमचे मित्र, शिक्षक, ज्येष्ठ लोकांची मदत घ्या आणि उकल करण्याचा प्रयत्न करीत.

आपल्या सामाजिक जीवनाच्या विविध पैलूचा अभ्यास करण्याची एक संधी तसेच भूभाग, लोक, त्यांचे राहणीमान तशीच लोकांच्या गरजा भागवण्याच्या पद्धती, लोकांमधील असमानता, ती दूर करण्यासाठीचे प्रयत्न विविध लोकांच्या विविध उपासनापद्धती आणि शेवटी एकमेकास पूरक अशा समाजातील ऐक्यता, हेही एक महत्त्वाचे साधन होय.

या सर्व बाबींना समजून घेण्यासाठी तुम्हांला पृथ्वी, टेकड्या, पठारे, नद्या, समुद्र यांचा अभ्यास करावा लागेल. हजारो-शेकडो वर्षापूर्वी काय झाले असेल, हे समजून घ्यावे लागेल; परंतु या सर्वांपेक्षाही महत्त्वाची बाब म्हणजे तुम्हाला अधिक समाजाभिमुख व्हावे लागेल.

वर्गात या पुस्तकाचा अभ्यास करताना तुम्हाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार आहे त्यासाठी थांबू नका. शोध घ्या किंवा सुचवलेले काही प्रयोग करा. पाठ लवकर संपविणे हे महत्त्वाचे नाही तर पाठ्येतर प्रश्न व त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे.

काही पाठांच्या शेवटी विशेष प्रकल्प दिले आहेत. त्यासाठी थोडे दिवस लागतील. तसेच वर्गात काय लिहिले यापेक्षा हे प्रकल्प महत्त्वाचे आहेत.

कृपया एक गोष्ट लक्षात ठेवा की, पाठांतरापेक्षा विचार करणे आणि मतप्रदर्शन हे महत्त्वाचे आहे.

- अभ्यास आणि मुल्यमापनसाठी पाठ्यपुस्तका ऐवजी, विषयी संबंधीत नकाशे, तकते आणि आलेखांचा वापर करु शकतो.
- धड्यांच्या मध्ये आणि तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा ह्या मध्ये चर्चा, मुलाखत आयोजीत करणे, वाद-विवाद आणि प्रकल्प देण्यात आले आहेत. ह्याच्या उद्देश्य मुलांमध्ये सामाजिक जागृकता, संवेदनशीलता आणि सकारात्मक दृष्टीकोन विकसीत व्हावा. म्हणून हे मुलांकडुन करुन घेतले पाहिजे.

**श्रीमती बी. शेषुकुमारी**
संचालक,
एस. सी. इ. आर. टी., हैदराबाद

### कृतज्ञता

या पुस्तकाच्या निर्मितीसंबंधी आम्ही खालील लोकांची संस्थांची कृतज्ञता व्यक्त करू इच्छितो त्यात डॉ.के.एन.आनंदन शिक्षण तज्ज्ञ केरळ, डॉ. पी. दक्षिणामूर्ति निवृत्त उपसंचालक, तेलुगू अकादमी, श्री ए.आर.के. मूर्ति निवृत्त उपसंचालक, तेलुगू अकादमी, दीपा श्रीनिवासन्, आमच्या कार्यशाळेत सहभागी झालेल्या कृतिका विश्वनाथ ज्यांनी या पुस्तकाचा दर्जा सुधारण्यासाठी मोलाच्या सूचना केल्या. तसेच पुस्तकाची मांडणी आणि सजावटीमध्ये मार्गदर्शन आणि साह्य केले. या पुस्तकात वापरलेल्या काही प्रतिमा आणि चित्रे याबद्दल आम्ही वस्तूसंग्रहालय तथा पुरातत्व विभाग, आंध्रप्रदेश यांचेही आभार मानतो. यातील काही चित्रे तथा माहिती ही फ्लीकर आणि अन्य संकेतस्थळांवरून अंतरजाळाच्या माध्यमातून गोळा करण्यात आली आहे, ती अशी. सगळी चित्रे 28 फेब्रुवारी 2012 आधी घेतलेली आहे. आम्ही बहुसंख्य शिक्षकांद्वारे विविध शीक्षण तज्ञा द्वारे, आम्हाला मिळालेल्या अभिप्रायानुसार, आम्ही आपल्या प्रती कृतज्ञता व्यक्त करतो. ज्या मुळे पाठ्य पुस्तकाची सुधारीत आवृत्ती निर्मितीस मदत झाली. विशेषतः हॉउस्टन टेक्सास (Houston Taxas, U.S.A.) द्वारा केलेल्या भारतीय इतिहासाचे विस्तृत शोध कार्य, यामुळे आम्हला पुस्तकाची सुधारीत आवृत्ती निर्मितीस मदत झाली.

SCERT TELANGANA


तेलंगाना राज्य सरकार द्वारा मोफत वितरण 2020-21

# आपले राष्ट्रगीत

- रविंद्रनाथ टागोर

जन गण मन अधिनायक जय हे
भारत भाग्य विधाता ।
पंजाब, सिंध, गुजरात, मराठा
द्राविड उत्कल बंग ।।
विंध्य हिमाचल यमुना, गंगा
उच्छल जलधितरंग ।
तव शुभ नामे जागे ।
तव शुभ आशिष मागे ।
गाहे तव जय गाथा
जन गण मंगलदायक जय हे
भारत भाग्य विधाता ।
जय हे, जय हे, जय हे
जय जय जय जय हे ।

# प्रतिज्ञा

- **पैडिमर्री व्यंकटा सुब्बाराव**

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी, म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

SCERT TELANGANA



तेलंगाना राज्य सरकार द्वारा मोफत वितरण 2020-21

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | महिणा | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| संकल्पना – अ : पृथ्वीवरील वैविध्य | | | |
| 1. | नकाशा काढणे आणि वाचन | जून | 1 - 8 |
| 2. | ग्लोब : पृथ्वीचा आकार | जून | 9 - 14 |
| 3. | भाग – अ : भूस्वरूप | जुलै | 15 - 18 |
| | कृष्णा डेल्टा मधील एक गाव – पेनमकुरु | जुलै | 19 - 26 |
| 4. | डाकुर – पठार प्रदेशातील एक गाव | जुलै | 27 - 35 |
| 5. | पेनगुलु – डोंगरातील एक गाव | जुलै | 36 - 43 |
| | संकल्पना – ब : उत्पादन बदल आणि जीवनशैली | | |
| 6. | अन्न–धान्य मिळविण्यापासून ते उत्पादनापर्यंत – आदि मानव | ऑगस्ट | 44 - 56 |
| 7. | आजची शेती | ऑगस्ट | 57 - 64 |
| 8. | शेती उत्पन्नह्वव्यापार – भाग – अ | ऑगस्ट | 65 - 72 |
| | शेती उत्पन्न व्यापार – भाग – ब | ऑगस्ट | 73 - 79 |
| | संकल्पना – क : राजकीय व्यवस्था आणि प्रशासन | | |
| 9. | आदिवासी जमाती, सामुदायिक निर्णय | सप्टेंबर | 80 - 84 |
| 10. | राज्य आणि प्रजासत्ताकांचा उदय | सप्टेंबर | 85 - 92 |
| 11. | प्रथम साम्राज्य | सप्टेंबर | 93 - 102 |
| 12. | लोकशाही सरकार | ऑक्टोबर | 103 - 111 |
| 13. | ग्रामपंचायत | नोव्हेंबर | 112 - 119 |
| 14. | शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्था | नोव्हेंबर | 120 - 126 |
| | संकल्पना – ड : सामाजिक संस्था आणि असमानता | | |
| 15. | आपल्या समाजातील विविधता | नोव्हेंबर | 127 - 134 |
| 16. | स्त्री–पुरुष समानतेच्या दिशेने वाटचाल | डिसेंबर | 135 - 142 |
| | संकल्पना – इ : धर्म आणि समाज | | |
| 17. | प्राचीनकालीन धर्म आणि समाज | डिसेंबर | 143 - 153 |
| 18. | देवाविषयी प्रेम, भक्ती | जानेवारी | 154 - 161 |
| | संकल्पना – फ : संस्कृती आणि संपर्क | | |
| 19. | भाषा लिपी आणि महान ग्रंथ | जानेवारी | 162 - 168 |
| 20. | शिल्प आणि बांधकामे | फेब्रुवारी | 169 - 180 |
| 21. | तेलंगानातील हिरवळ | फेब्रुवारी | 181 - 184 |
| | उजळणी आणि वार्षीक परिक्षा | मार्च | |


SCERT TELANGANA

# भारतीय संविधान

## प्रस्ताविक

**आम्ही, भारताचे लोक,** भारताचे एक **सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकास:

**न्याय,** सामाजिक, आर्थिक व राजनैतिक

**स्वातंत्र्य** विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे

**समानता** निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तिची प्रतिष्ठा राखण्याचा

**बंधुता** प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून, राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी

**आमच्या संविधानसभेत** आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, 1949 रोजी याद्वारे हे संविधान **अंगीकृत आणि अधिनियमित** करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

SCERT TELANGANA

Subs. by the constitution [Forty-second Amendment] Act, 1976, Sec.2, for “Sovereign Democratic Republic” (w.e.f. 3.1.1977)

Subs. by the constitution [Forty-second Amendment] Act, 1976, Sec.2, for “Unity of the Nation” (w.e.f. 3.1.1977)

पाठ 1

# नकाशा काढणे आणि वाचन

नकाशे (मॅप्स्) आपल्याला विविध प्रदेशांच्या संबंधी अनेक विषयाची माहिती देतात. एखादा प्रदेश समुद्राच्या काठावर आहे का, पर्वतावर किंवा वाळवंटी प्रदेशात आहे का, तो उष्ण प्रदेश का, शितल प्रदेश किंवा तिकडे पाऊस किती पडतो. कशा प्रकारची झाडे वाढतात? कोणत्या जातीचे लोक जगतात, त्यांची बोलीभाषा, त्यांची वृत्ती, त्यांचे निवास व इतर माहिती नकाशावरून मिळते. तर सर्व विषय एकाच नकाशामध्ये राहत नाहीत. त्यामुळे तुम्हांला विविध प्रकारच्या नकाशांचे (भौतिक नकाशे, राजकीय नकाशे, ऐतिहासिक नकाशे इत्यादी) अध्ययन करावे लागते. ह्या पाठात नकाशाचे अध्ययन करणे, स्वत:हून नकाशा तयार करणे शिकू या.

जिल्हा नकाशा (राजकीय)

भारत देशाचा नकाशा, तेलंगानाचा नकाशा अशा कित्येक प्रकारचे नकाशे तुम्ही तुमच्या वर्गामध्ये बघत असता. आपल्या जिल्ह्याच्या नकाशाविषयी आज माहिती घेऊ या.

- वर्गामध्ये तुमच्या जिल्ह्याचा (राजकीय) नकाशा घेऊन या.
- तुमचे गाव/ शहर, जवळची गावे, शहरे, नद्या, नाले, समुद्र इत्यादीविषयी अध्ययन करा.
- रस्ते, लोहमार्गाविषयी निरीक्षण करा.
- नकाशामध्ये विविध प्रांतामध्ये वास्ताविक अंतर सांगू शकता काय?

***खेळू या***

दोन गट करून घ्या. नकाशामध्ये एक प्रांत निवडून पहिल्या गटाने गुप्तपणे एका कागदावर लिहून शिक्षकाला द्यावे.


दोन गट करुन घ्या. नकाशामध्ये एक प्रांत निवडून पहिल्या गटाने गुप्तपणे एका कागदावर लिहून शिक्षकाला द्यावे. दुसऱ्या गटाने ते नाव ओळखून सांगावे. व पहिल्या गटाने चूक की बरोबर ते सांगावे. किती वेळा प्रयत्न केला त्याची नोंद करा. नंतर दुसऱ्या गटाने एक प्रांत निवडून तो कागदावर लिहून शिक्षकास द्यावा आणि पहिल्या गटाने तो ओळखावा. जो गट (एक किंवा दोन) कमी प्रश्नात ओळखेल तो गट विजयी समजावा.

दुसऱ्या गटाने, घ्यापहिल्या गटाच्या कागदावर लिहिलेल्या गावाला ओळखावे. यासाठी काही प्रश्न विचारावे. असा प्रश्नोत्तरे करीत खेळ खेळावा. शिक्षकांनी या संपुर्ण खेळाचे निरिक्षण करावे. या खेळात जे कमी प्रश्नांची उतरे देऊन गावाची नावे ओळखतात आणि तोच गट विजयी ठरतो.

**मल्लिकाच्या घराचा रस्ता. कच्चा नकाशा**

निजामाबाद येथे पार पडलेल्या रेडक्रॉस सेवा समितीच्या कार्यक्रमात मल्लिका आणि लैला यांची ओळख झाली. अल्पावधीतच त्या जिवलग मैत्रिणी बनल्या. मल्लिका वेंकटापूर येथील रहिवासी तर लैला आदिलाबादला राहणारी. येणाऱ्या सुट्ट्यात मल्लिकाने लैलाला आपल्या घरी येण्याचे निमंत्रण दिले. तुझ्या गावच्या बसस्थानकापासून घरी जाण्याचा मार्ग नकाशाद्वारे कळविण्याची विनंती लैलाने पत्राद्वारे केली. जीवलग मैत्रिण घरी येणार हे कळाल्यामुळे मल्लिकाला खूप आनंद झाला. लगेच तिने बसस्थानक ते घर अशा आशयाचा नकाशा पत्राद्वारे लैलाला पाठविला.

SCERT TELANGANA




*चित्र 1.1 मल्लिकाच्या घराचा रस्ता दाखवणारा कच्चा नकाशा.*

- तुमच्या शाळेपासून तुमच्या घराचा रस्ता दाखाविणारा कच्चा नकाशा काढू शकाल ?
- कच्चा नकाशाआधारे बसस्थानकावरून तुम्ही मल्लिकाच्या घरी जाऊ शकता का ?
- मल्लिकाच्या घरी पोहचंण्यासाठी लैलाला किती वळणे लागली ? वळणावर खुणा आहेत का ?
- वरील कच्चा नकाशा दाखवलेल्या इमारती कोणत्या आकारमानात आहेत ? ते सांगा.
- लैला कोणत्या दिशेने चालली असावी ? सांगू शकता का ? (उत्तरेला की पूर्वेला)
- बस स्थानकावरून मल्लिकाचे घर किती अंतरावर आहे सांगू शकाल का ?

वरील कच्च्या नकाशाच्या आधारे शेवटच्या दोन प्रश्नांची उत्तरे देणे शक्य नाही. लैलाला हीच समस्या वाटली.


परंतु बसस्थानकापासून मल्लिकाचे घर किती दूर आहे याचा त्यात उल्लेख नव्हता. यामुळे लैला नकाशाच्या सहाय्याने चालत मल्लिकाच्या घरी पोहंचली. ''मल्लिका तू मला मार्ग दाखविलास पण अंतर मात्र सांगितले नाहीस मी कदाचित ॲटोरिक्षाने आले असते.'' त्यावर मल्लिका म्हणाली, ''अंतर सांगण्याचे मी विसरले पण तू केवळ वेंकटापूर एवढे म्हटलं असतं तरी घरी येऊ शकली असतीस.''

दक्षिण वेंकटपूर की उत्तर वेंकटपूर हे मला कसे कळणार ? असा प्रश्न लैलाने केला. 'हे फार सोपं आहे. आता तू या गावात दक्षिण दिशेकडून घरी आलीस यामुळे विरुद्ध बाजूला असलेली दिशा उत्तर. एखाद्या प्रदेशाला असलेल्या विविध दिशा कशा ओळखाव्या हे तुला बहुधा कळाले असेल.' असे मल्लिका म्हणाली.

SCERT TELANGANA

**दिशा**

खालील दिलेल्या आकृतीला काळजीपूर्वक पाहा.



चित्र 1.2 दिशाना ओळखणे


मधोमध उभारलेली मुलगी सूर्या कडे तोंड करुन उभी आहे. आता खालील तक्ता पूर्ण करा.

| अ.क्र. | दिशा | त्या दिशेला काय आहे? |
|---|---|---|
| 1 | पूर्व | सूर्य, डोंगरे |
| 2 | दक्षिण | |
| 3 | उत्तर | |
| 4 | पश्चिम | |

तुम्ही पूर्व दिशेला तोंड करून उभे असाल तर उजव्या हाताकडील असलेले दक्षिण. डाव्या हाताकडे असलेले उत्तर. पाठीमागे असलेले पश्चिम असे ओळखावे.

दिशाविषयी आणखी माहिती मिळवण्यासाठी मित्रासोबत मिळून एका खेळाविषयी विवरण दिले आहे. तो खेळ खेळून पाहा.

उजव्या बाजूला एका खेळाविषयीची माहिती दिली आहे.




चित्र 1.3 सापेक्ष दिशा

SCERT TELANGANA

- ललिता जॉनच्या ......
  दिशेवर आहे
- ललिता उत्तराच्या .......
  दिशेवर आहे
- नाजर शेखरच्या .....
  दिशेवर आहे.
- नाजर रामूच्या .....
  दिशेवर आहे.
- लक्ष्मण सोमूच्या .....
  दिशेवर आहे.
- लक्ष्मण शेखरच्या .....
  दिशेवर आहे.
- जानच्या .....
  दिशेवर तारा आहे.

हा खेळ खेळल्यानंतर ''अद्भूत आता मला माहीत झाले.'' म्हणून लैला म्हणाली, दिशा म्हणजे एका स्थानापासून सापेक्ष सांगतात.

आपण एका स्थानाला कोणासोबत तुलना करीत आहात ते उत्तर, दक्षिण किंवा पश्चिमेला आहे म्हणतो.

- तुमच्या वर्गातील खोलीच्या दिशांना ओळखून वरच्या नकाशासारखे उभारून कोणकाण, कुणाला कुणाला कोणत्या दिशेवर आहेत ते प्रश्न करा.

नकाशातील दिशा


साधारणत: उत्तर दिशा वर ठेवल्यासारखे. दक्षिण दिशा खाली ठेवल्यासारखे नकाशामध्ये तयार करतात. तसेच पूर्व उजव्या बाजूला, पश्चिम डाव्या बाजूला असते काही प्रत्येक संदर्भामध्ये नकाशांना दक्षिण दिशा वर ठेवल्यासारखे किंवा डाव्या हाताकडे (पश्चिम) आसल्यासारखे घडवतात. अशा संदर्भात उत्तर दिशेला बाण चिन्हानी सूचित करतात.

- तेलंगानाचा नकाशाला भिंतीवर अडकवून त्याला निरिक्षण करून खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे ओळखा.
- महबूबनगर, विकाराबादच्या कोणत्या दिशेला आहे?
- यादाद्रीपासुन हैद्राबाद कोणत्या दिशेला आहे?
- खम्मम, सूर्यापेटच्या कोणत्या दिशेला आहे?
- आदिलाबादच्या पुर्व दिशेला कोमारम भीम आहे का?
- जर तुम्हाला मंचेरियालहून पेद्दापल्लीला जायचे असल्यास कोणत्या दिशेला जावे?

अशा प्रकारे आणखी काही प्रश्न तयार करून प्रश्न विचारावे.

स्केल किंवा नकाशामधील अंतर

शांत वातावरणात सायंकाळी नदीला पाहण्यासाठी लैलाला घेऊन गेली. मलिका बंधाऱ्यावरून (ब्रिज) चालत होते. त्या बंधाऱ्यावर सहा दिपखांब समान अंतरावर आहेत. प्रत्येक दोन स्तंभातील अंतर 100 मिटर ते बंधारा पूर्ण लांबी 500 मीटर. ह्या चित्रांचे निरिक्षण करा.




*चित्र 1.4 बंधाऱ्यावर चालत असलेल्या लैला मलिका*



SCERT TELANGANA

ते दृश्य पाहून त्यांना कितीतरी आनंद झाला. घराकडे परतून आल्यानंतर लैलाने चालल्या बंधाऱ्याचा नमुना तिच्यासोबत घेऊन जाण्यासाठी बंधाऱ्याचे कच्चा नकाश काढू लागली. ते कच्चा नकाशा काढतेवेळी दिपस्तंभ समान अंतरावर काढली. तिने त्यांच्यामधील अंतराची मोजमापणी केली. एक खांब आणि दुसरा खांब यामधील अंतर 5 सें.मी. लांब आहे.



*चित्र 1.5 लैलाने काढलेले बंधाऱ्याचे चित्र*

लैलानी काढलेल्या एका खांबापासून सहाव्या खांबापर्यंतचे अंतर मोजून घ्या. प्रत्येक दोन खांबामधील अंतर .... मिटर. कच्चा नकाशामधील दोन खांबामधील वास्तव अंतर केवळ ..... से.मी. कच्चा नकाशामधील संपूर्ण अंतर ... से.मी. इतकेच आहे. दिपखांबाचे अंतर कमी जास्त असे न करता खांबाची लांबी समान ठेवली आहे असे तुमच्या लक्षात येईल.

आपण ह्याखालील दिलेल्याप्रमाणे बंधाऱ्यावर असलेले अंतर व कच्चा नकाशामधील असलेले अंतर लिहू या.

कच्चा नकाशामधील 5 से.मी. =

बंधाऱ्यावरील .... मीटर


कच्चा नकाशामधील 1 सें.मी. =

बंधाऱ्यावरील ..... मिटर

याला 'स्केल' म्हणतात. आपण स्केलच्या सहाय्याने वास्तव अंतराना कमी करून नकाशामध्ये दाखवण्याचा प्रयत्न करू या.

नकाशा कोणत्या स्केलने तयार केलेला आहे हे त्याच्यावर लिहीलेले असते.

त्याच आधाराने नकाशामधील अंतर मोजून भूमीवरील वास्तव अंतर माहिती करता येते.




वरील दिलेल्या चित्रामध्ये महबुबनगर - महबुबनगरमधील अंतर एका रेखाद्वारे दाखविले. त्या दोन स्थानामधील अंतर 50 कि.मी. आहे. दोघांना मिसळविणारे रेखाचित्राची मोजणी करा.

महबुबनगर - वनपर्ती मधील वास्तविक अंतर ....... इतके आहे.

वरील चित्रामधील महबुबनगर आणि वनपर्तीमधील अंतर ..... इतके आहे.

या चित्राचे अंतर स्केलने काढता येते का? त्या चित्रामध्ये 1 से.मी. आहे तर वास्तवमध्ये जमिनीवर किती अंतर असू शकते?

1 से.मी = . ..... कि.मी.

तुमच्या जिल्ह्याच्या नकाशाचे निरिक्षण करून स्केल किती दिले आहे लक्ष द्या.

तुमचे गाव / शहरापासून दुसरे गाव / शहरामधील अंतर मोजून वास्तव अंतर माहीत करा.


SCERT TELANGANA

चिन्हे

नकाशे लहान असतात तुम्हाला माहीत आहे. वास्तविकता जशी असेल तसेच चित्र काढू शकत नाही. उदा. तुमची शाळा, बसस्थानक, मल्लिकाचे घर जशास तसे दाखवावे म्हणजे पुष्कळ जागा पाहिजे.

त्यासाठी आपण नकाशाच्या तयारीसाठी चिन्हांचा उपयोग करत असतो. तुमच्या गावाला/ शहराला ताऱ्यांमध्ये वर्तुळ आकारामध्ये जिल्हा नकाशामध्ये दाखविलेले तुम्ही पाहिले आहे.

साधारणत: नकाशे तयार करणारे त्यांच्या आवश्यकतेनुसार पाहिजे तसे बरोबर रूप चिन्हांना देत असतात. परंतु आपण काही साधारण चिन्हांचा पुन्हा पुन्हा उपयोग करीत असतो. त्यांना सांप्रदायिक चिन्हे असे म्हणतो. खालील दिलेल्या नकाशामधील चिन्हे, पटिका, उत्तर दिशेला सुचविणारे बाणाचे चिन्हे आहेत. निरिक्षण करा.




*चित्र 1.6 चिन्हांचा उपयोग कसा करावा? याचा अभ्यास*




SCERT TELANGANA

वरील नकाशावरून खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

- चर्चच्या कोणत्या दिशेने नदी वाहत आहे?
- श्रीपूरम गावाच्या दक्षिणेला कोणत्या प्रकारचा रस्ता आहे हे नकाशावरून ओळखा.
- श्रीपूरम गावाजवळ कोणत्या प्रकारचा रेल्वेमार्ग आहे?
- रेल्वेस्टेशनच्या कोणत्या दिशेला पोलीस स्टेशन आहे?
- रेल्वेमार्गाच्या उत्तर दिशेला कोणते गाव आहे?
- वरील नकाशावरून शाळांमध्ये तुम्ही आहात

असे समजून घेतले तर कोणत्या दिशेने बाहेर येता?

**महत्त्वाचे शब्द**

कच्चा नकाश

नकाशा

दिशा

सापेक्ष दिशा

SCERT TELANGANA

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. विविध प्रकारचे नकाशे गोळा करून निरिक्षण करा. तुमच्या शंका शिक्षकांना विचारून पूर्ण करा. (AS5)
2. तुमच्या मंडल केंद्रावरून जिल्हा केंद्रामधील अंतर, नकाशामधील अंतर आणि वास्तव अंतर यात बदल करा
3. भूमीवर असलेल्या वास्तव अंतराला नकाशामध्ये कशासाठी कमी करतात? (AS1)
4. नकाशाच्या तयारीमध्ये चिन्हाची आवश्यकता वर्णन करा. (AS1)
5. जलाशय, आराधनास्थळ, प्रभुत्व कार्यालयांना नकाशामध्ये दाखवण्यासाठी चिन्हे तयार करा? (AS5)
6. तुमच्या घराचे, कच्चा नकाशा काढून, त्यांना नकाशामध्ये बदल करा? (AS5)
7. तुम्हाला नकाशामध्ये कोणकोणते अंश मुख्य आहेत असे वाटले? (AS1)
8. पान क्र. 6 वरील चिन्हांचे वाचन करुन स्पष्ट करा? (AS2)
9. नकाशातील विविध चिन्हांचा/रंगाचा अभ्यास करुन खालील तक्त्यात माहिती भरा? (AS3)

| अ.क्र. | नकाशाचे नाव | उपयोगी चिन्हे | मुख्य घटक |
|---|---|---|---|
| | | | |

10. प्रकल्प - तुमच्या वर्गाच्या नकाशाला खालील दिलेल्या सूचनांच्या आधारे तयार करा.

अ) उत्तरेकडे तोंडासमोर उभारून वर्गाच्या खोलीला चार दिशांना ओळखा.

ब) नकाशामध्ये दाखवणारे भिंती, दरवाजे, खिडकी, बेंच, आलमारी इत्यादीची नोंद तयार करावी. तुमच्या वहीमध्ये त्यांच्या चिन्हांना तयार करा.

क) वर्गातील खोलीमध्ये नकाशे, भिंती, इतर वस्तू कुठे राहावे ठेवून चित्र काढा. उत्तर दिशेने असलेल्या भिंतीला कच्चा नकाशामध्ये वरच्या बाजूने काढा.

ड) प्रत्येक भिंतींना स्केलने मोजून त्या अंतरला कच्चा नकाशामध्ये दाखवावे.

इ) योग्य त्या 'स्केल' ला निवडून नकाशा काढावा. हे एका मिटरला एका सेंटीमीटरसारखे घ्यावे. भिंतीची लांबी सात मीटर असेल तर कागदावर त्याची लांबी सात सेंटीमीटर म्हणून घ्यावी

फ) बाहेरच्या भिंतींना उतरल्यानंतर खिडकी, दरवाज्यांना योग्य त्या जागेवर दाखवावी. आलमारी, बेंच, टेबल इत्यादी चिन्हांना योग्य त्याठिकाणी ठेवावे.

ग) नकाशामध्ये तुम्ही उपयोग केल्याला चिन्हांना नोंद तयार करून ठिकाणांना तयार करा. 'स्केल' किती आहे ते लिहा.


ह) तुम्ही तयार केलेल्या नकाशांना तुमच्या मित्रांनी तयार केलेल्या नकाशासोबत पडताळून सुधारून घ्यावे.

SCERT TELANGANA

पाठ 2

# ग्लोब : पृथ्वीचा आकार

सुंदर आणि कल्पना एका दिवशी संध्याकाळी चंद्राला पाहात होते. ''मी चंद्रावर जाऊन पृथ्वीला पाहिले तर कशी दिसेल ? तिकडून मी काय पाहू शकतो? '' म्हणून सुंदरने विचारले? ''आपण इच्छिलेल्या सर्व विषयांना आंतरजाळीमध्ये (इंटरनेटमध्ये) सोयीस्कर पाहू शकतो.'' म्हणून कल्पनाने सांगितले. नंतर चंद्रावरून काढलेले पृथ्वीचे चित्र आंतरजाळीमध्ये दाखविले. ते असे आहे.



*चित्र 2.1 चंद्रावर उद्य होणारी पृथ्वी*

ह्या चित्रामध्ये पृथ्वीखालचा भाग कित्येक जणांना दिसत नाही सांगू शकता? कारण पृथ्वीचा बराचसा भाग पाण्याने आच्छादलेला आहे, यामुळे अंतराळातून पृथ्वी निळ्या रंगाची दिसते. तसेच जेवढ्या भागावर प्रकाश पडला आहे. तेवढाच भाग दिसतो.

- वरील चित्राला पाहून पृथ्वीचा आकार चंद्रासारखा आहे म्हणून सांगु शकता का?

***पृथ्वी चेंडूसारखी गोल आहे***

ही पृथ्वी आकार जमीन, पाणी, खंडे, महासमुद्र, प्रपंचाातील देशांना दाखवितो. वर्गात ग्लोब घेऊन या. हे मुलांसाठी उपलब्ध असावे. पृथ्वी निळ्या चंदामामासारखी दिसत नाही का? आपण जमिनीवर सूर्याची किरणे पडलेल्या भागांना मात्र पाहू शकतो. वरील छायाचित्रात सूर्यकिरणांनी आच्छादलेला एक भाग दाखविला आहे. वर्गात पृथ्वीचा एकगोल घेऊन या. गटवार त्यांना निरिक्षणासाठी द्या.



*चित्र 2.2 ग्लोब*

- प्रत्येक विद्यार्थ्याने ग्लोबचे काळजीपूर्वक निरिक्षण करा. भूभ्रमण कसे होते हे ग्लोबला फिरवून पाहा.
- तुमच्या शिक्षकांच्या सहाय्याने उत्तरध्रुव, दक्षिणध्रुव, भूमध्यरेखा यांना ओळखा.

ग्लोबवरती उभ्या राहतील आशा बाहुल्या विविध ठिकाणी ठेवून द्या. पृथ्वीच्या खालच्या भागावर असलेल्या मनुष्याचे डोके खाली आहे असे वाटते. तसेच मध्यंतरी भागावर असलेला मनुष्य जमिनीवर पडतो की काय असे वाटते? आपण केव्हाही पृथ्वीवर पडत नाही. कारण पृथ्वी एक शक्तीशाली लोहचुंबकासारखे काम करीत आपल्या सर्वांना तिच्याकडे आकर्षित करीत असते. खरंच आपण पृथ्वीवर पडतो पण, पृथ्वीवरून पडत नाही.

**अंडाकृती आकार**

खरे सांगता, पृथ्वी खरोखर गोलाकार मध्य नाही. पक्की वर्तुळाकार पण नाही. उत्तर, दक्षिण ध्रुवाजवळ थोडी कोचा पडून असल्यासारखी भूमध्य रेखेजवळ थोडी फुगीर असल्यासारखी असते. हा फरक खूप कमी असल्यामुळे ग्लोब व नकाशामध्ये त्यांना दाखवत नाहीत.

पृथ्वीच्या संबंधित आणखी एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे एका स्थानावरून मागे न परतता आपण प्रवास सतत चालू ठेवला तर आपण परत त्याच स्थानावर पोहंचतो.

सुमारे 400 वर्षांपूर्वी बऱ्याच जणांचे मत होते की, पृथ्वी ही उथळ आहे आणि एका दिशेने प्रवास करीत असता शेवटच्या टोकाला गेल्यानंतर तिथून आकाशामध्ये पडून जातो म्हणून त्याचा विश्वास होता.

क्रि.श. 1400 काळामधील शास्त्रज्ञ, ज्ञानी पृथ्वी चेंडूप्रमाणे गोलाकार असू शकते म्हणून कल्पना केली. त्याचमुळे इटालीदेशीय कोलंबस नावाचा जिज्ञासू क्रि.श. 1485 मध्ये युरोप प्रांताच्या पश्चिम दिशेला निघून भारत देशाला यावे असे वाटले. तो अमेरिका जवळच्या करेबीयन द्विपजवळ येऊन थांबला. आणखी पुढे प्रवास केला असता तर भारत देशात नक्कीच पोहंचू शकला असता.

- ग्लोबच्या सहाय्याने कोलंबस कसा प्रवास करून अमेरिकेला पोहंचला असावा, कसा प्रवास केला असता तर भारतात पोहंचू शकला असता ओळखा.

**महासमुद्र आणि खंड**

तुम्ही ग्लोबला पाहात असता त्यावेळी ह्या पृथ्वीच्या वरच्या टोकाकडील अधिक भाग समुद्राच्या पाण्याने भरलेला आहे पाहिलंत का?

- समुद्राविषयी एक दोन वाक्य वर्णन करा.
- तुम्ही पिणारे गोड पाणी आणि समुद्रातील खारे पाणी यातील फरक सांगा. ?

समुद्रे, महासमुद्रे शेकडो, हजारो किलोमीटर व्यापून असतात. समुद्राच्या ह्या टोकावरून त्या टोकाकडे जावे म्हणजे नौकेद्वारे कित्येक दिवस किंवा कित्येक महिने प्रवास करावा लागतो

- जगामध्ये एक महासमुद्र गोठलेला आहे त्याचे नाव ओळखा.
- ग्लोबचे निरिक्षण करून चार समुद्रांची नावे लिहा.

1. ......................
2. ......................
3. ......................
4. ......................

SCERT TELANGANA

- यातील मोठा महासमुद्र कोणता ? त्याच्या नावाखाली रेखांकित करा.

सामान्यतः आपण ह्या महासमुद्रावर उदरनिर्वाह करू शकत नाही. आपण जमिनीवर जीवन जगत असतो. ग्लोबवर मोठमोठ्या भूभागाला पाहिले आहेत हो ना ? तेच खड्डे आहेत. सात मुख्य खंड आहेत.

- खंडाचे नाव ओळखून खाली लिहा.

  1. ......................
  2. ......................
  3. ......................
  4. ......................
  5. ......................
  6. ......................
  7. ......................

- ह्या खंडामध्ये एक खंड बर्फाने आच्छादलेला आहे. त्याचे नाव, परिसर ओळखा.

भूमीवर उत्तर, दक्षिण ध्रुव बर्फाने आच्छादलेले आहेत. आश्चर्य वाटते नं ! एका ध्रुवावर बर्फाचा खडा बनून आसलेला महासमुद्र असेल तर दुसरा एक विपरीत पडलेल्या बर्फाने भरून आहे ! त्यालाच अंटार्टिका बर्फाळ प्रदेश म्हणतात.


- ग्लोबमध्ये भारत देशाला पाहा. भारत देश कोणत्या खंडामध्ये आहे सांगा ?
- त्याचप्रमाणे तुम्ही ऐकलेला देश ग्लोबवर कुठे आहे ते शोधा?

सर्व गावे, शहरे, नगर, खंडातील देशामध्ये असतात. डोंगर, दरी, शेतीची जमीन, खदान, परिसर इत्यादींकडे पाहता येते.

**ग्लोब वरील दिशा**

पहिल्या पाठात तुम्ही चार दिशांविषयी माहिती मिळवली. उत्तर, दक्षिण ध्रुवाना ओळखलं का ? उजव्या बाजूला पूर्व, डाव्या बाजूला पश्चिम म्हणून ओळखलात. पृथ्वी प्रतिरोज पूर्वेकडून पश्चिमेकडे भ्रमण करत असते. ग्लोब एका वेळेस असे फिरवले तर कसे होईल? ध्रुवाला पाहिलत का ?

ध्रुवे म्हणजे भूमीच्या दोन्ही बाजूला राहणारे दोन चक्रे आहेत. वरील चक्रावरून खालच्या चक्राला भूमीच्या मधोमध जाणाऱ्या एका रेखाला काढले असे समजले तर तिलाच 'अक्ष' असे म्हणतात. या अक्षाच्या भोवती भूमी भ्रमण करीत असते असे सांगू शकतो. ह्या अक्षाला असलेल्या दोन टोकांना ध्रुवे असे म्हणतात.




*चित्र 2.3 भ्रमण अक्ष दाखविणारा ग्लोब*

या विषयांची आणखी जास्त माहिती मिळवण्यासाठी भूमध्य रेषावरून ध्रुवाकडे विविध रंगाचे तीन किंवा चार चक्रे ठेवा. आता ग्लोबला फिरवा. कोणते चक्र का भ्रमणामध्ये जास्त अंतर कापते आणि कोणते कमी अंतर कापते ते सांगा?


एका वेळी ध्रुवावर चक्र ठेवले तर ते चक्र हलता हलत नाही म्हणजे त्याच जागेवर राहते अशी माहिती मिळते. भूमध्यरेखेवर चक्र ठेवले तर काय होते?

ग्लोबवरील रेखा

ग्लोबवर एकमेकांशी जोडणाऱ्या अनेक रेखांना पाहिलंत का? काही उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवाकडे, आणि काही पश्चिमेकडून पूर्वेकडे आहेत. हे ग्लोबवर एका प्रांतला ओळखण्यासाठी नकाशावर काढलेल्या काल्पनिक रेखा आहेत. त्यांना कसे काढतात ते पुढच्या वर्गात शिकू. आता आपण मुख्य रेखांविषयी माहिती मिळवू या.

**अक्षांश**

पश्चिमेकडून पूर्वेकडे असणाऱ्या रेखा अक्षांश होत. ह्या अक्षांश रेखांना पाहिलंत का ? त्याची लांबी बरोबर मोजा ते सर्व सारख्या लांबीमध्ये आहेत असे वाटते का?





*चित्र 2.4 अक्षांश*

ह्या अक्षांशामध्ये लांब आहे ते भूमध्यरेखा. ही ग्लोबला दोन समान भाग करीत असते. ह्या दोन अर्धभागाला अर्धगोल असे म्हणतात.

ग्लोबमध्ये भूमध्यरेखा ओळखून ती कोणत्या खंडामधून जाते ते लिहा. तशाच प्रकारे उत्तर, दक्षिण अर्धगोलाला ओळखा. कोणत्या अर्धगोलामध्ये भारत देश आहे? कोणत्या अर्धगोलामध्ये जास्त पाणी आहे?

**रेखांश**

एका ध्रुवापासून दुसऱ्या ध्रुवाला सरळ उभ मिसळवित असलेल्या रेखाना रेखांश असे म्हणतात. अक्षांशासारखे नसून हे सर्व एकाच लांबीमध्ये असतात. दोन मुख्य रेखांश आहेत. एक ग्रिनीच रेखांश. हिलाच '0' डिग्री रेखाश असे सुद्धा म्हणतात. दुसरी एक आंतरजातीय कालमान रेखा. ह्या रेखाच्या प्रामुख्याबद्दल पुढच्या वर्गात माहिती मिळवता येते.




*चित्र 2.5 रेखांश*

अक्षांश रेखांश मिळून एका जाळीसारखे पांघरून ठेवल्यामुळे एका प्रांताला ओळखण्यासाठी मदत मिळते. एका प्रांताचे अक्षांश रेखांशाची माहिती मिळाली तर त्या प्रांताना ग्लोब किंवा नकाशामध्ये सरळ ओळखू शकतो.

**महत्त्वाचे शब्द**


अक्षांश
कालमान रेखा
रेखांश
अक्ष
वाररेषा


SCERT TELANGANA


## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा


1. बाजूच्या पानावर एक जगाचा नकाशा आहे. खंड, महासमुद्र, यांची नावे त्यांच्या स्थानांवर लिहा. समुद्राचे पाणी निळ्या रंगामध्ये आणि खंड एका वेगळ्या रंगामध्ये दाखवा.
2. पृथ्वी उथळ आहे असे रमेश म्हणतो. तर तुम्ही काय म्हणता?
3. एका हातातील बांगडी रोझी टेबलावर फिरवत आहे. तुम्हाला कोणता आकार मनात वाटतो?
4. कोलंबससारख्या इतर जिज्ञासू शोधकर्त्यांना ओळखून त्यांची माहिती मिळवा.
5. एका चेंडूच्या वर अक्षांश रेखांश काढा.
6. ''सूर्य प्रत्येक दिवशी पूर्वेकडून उगवतो'' कारण माहिती करा?
7. ग्लोब / नकाशा वर काल्पनिक रेखा कशासाठी काढाव्यात?
8. खालील दिलेल्या चित्रांत काळ्या भागाला पाहून त्याचे नाव रिकाम्या जागेत लिहा?
9. पृथ्वी विषयी माहिती मिळविण्यासाठी शास्त्रज्ञांनी केलेल्या प्रयत्नाबद्दल लिहा?

10.ह्व पान क्र. 14 वरील नकाशातील खंड आणि महासांगरांना ओळखा?










SCERT TELANGANA



चित्र : 2.6 जगाचा नकाशा

SCERT TELANGANA

पाठ 3


भाग 'अ'

# तेलंगानातील भूस्वरूप

आपण राहतो ती पृथ्वी समतोल किंवा एकसारखी नाही. अनेक ठिकाणी उंच-सखल आहे. काही ठिकाणी मोठमोठे पर्वत, टेकड्या अत्याधिक पसरली आहेत तर काही ठिकाणी विशाल मैदानी प्रदेश आहेत. एका स्वतंत्र प्रांताहून दुसऱ्या स्वतंत्र प्रांताचा प्रवास केल्यानंतर त्यांच्यामधील फरक ओळखू शकतो. यालाच भूनैसर्गिकता असे म्हणतात.

मुख्यत: तीन प्रकारचे भूस्वरूप आहेत. ते असे पर्वत, पठारे आणि मैदान हे होय. तुम्ही पर्वताच्या रांगा पाहिल्या असतील. पर्वत अतिशय उंच आणि भव्य असे असतात. ते पृथ्वीच्या पृष्ठभागाचा बराचसा मोठा भाग व्यापतात. टोकाला लहानसा भाग असतो. भारत देशाच्या नकाशामध्ये हिमालय, आरवल्ली, विंध्या, सातपुड्या, पर्वतांचे निरिक्षण करा. हे आपल्या देशातील मुख्य पर्वतश्रेणी आहेत. आपल्या राष्ट्रात सुध्दा आदिलाबाद, करीमनगर, रंगोरड्डी, महबुबनगर आणि खम्मम जिल्ह्यामध्ये या पर्वतरांगा कुठे कुठे आढळुन येतात. आदिलाबाद मधील सातमाला पर्वत, महबुबनगर मधील बालाघाट पर्वत, रंगारेड्डी जिल्ह्यात मधील अनंतगिरी पर्वत, करीमनगर मधील कंधीकल आणि राखी पर्वताच्या श्रेणी नकाशात निरिक्षण करु शकता.

सापेक्षपणे सपाट पृष्ठ भाग असलेल्या परंतु काही ठिकाणी उंच भुभाग असलेल्या ठिकाणांना भुभागाला पठारे असे म्हणतात. तेलंगानाचा अधिक भुभाग पठाऱ्यांनी व्यापलेला आहे. त्यांना दख्खन पठारे असे म्हणतात. हैद्राबाद आणि सिंकद्रबाद हे नगर याच पठारी भागामध्ये वसल्याचे आढळतात. पठारे नसुन




*चित्र 3.1 टेकड्या*

SCERT TELANGANA



*चित्र 3.2 मैदाने*

सपाट व समतल असणाऱ्या विशाल प्रांताना मैदाने असे म्हणतात. हे भारत देशामध्ये पुर्व दख्खन बंगाल खाडीच्या किनाऱ्यावर आहेत.

तेलंगानातील अधिक प्रांत दख्खन पठारे भुमी असल्यामुळे या प्रांतात तेलंगाना पठारी प्रदेश असे म्हणतात.


पर्वतीय पठार भुमी ऐवढेच नसुन सपाट व समतोल अशा विशाल प्रांताना मैदान असे म्हणतात. नदीने वाहुन आनलेल्या गाळामुळे हे प्रांत तयार होतात. सिंधु आणि तीच्या उपनद्यांनी पंजाब मैदानाची निर्मीती केली, गंगा नदी उत्तरप्रदेश, बिहार, बंगाल राष्ट्राच्या सभोवती वाहुन गंगामैदानाची निर्मीती झाली. या दोन



विशाल मैदानाना मिसळुन गंगा सिंधु मैदाने म्हणुन ओळखल्या जाते. पुर्वोत्तर मैदाने भारत देशाच्या पुर्वेकडे बंगाल खाडीच्या किनाऱ्यावर विस्तरीत आहेत. तमिलनाडु, आंध्र प्रदेश, ओरीसा आणि पश्चिम बंगाल राज्यामधील अधिक प्रांत पुर्वोत्तर मैदानामध्ये मोडतो. भारत देशाच्या पश्चिमेला पश्चिमोत्तर मैदाने आहेत.

भुभागावरील असलेल्या स्वरुपांना पर्वते, मैदाने इत्यादीना नैसर्गिक लक्षणे असे म्हणतात. तेलंगाना राष्ट्र विविध नैसर्गिक स्वरुपांनी भरलेला आहे. 17 पानावर दिलेल्या नकाशा पहा. आपल्या राष्ट्राच्या पश्चिमेला तेलंगाना पठार भुमी व्यापलेली आहे. गोदावरी, कृष्णा नदी या पठार भुमीच्या पुर्वेकडुन वाहत असत. त्या दोघांमधील उरलेल्या प्रांताना उतरता तेलंगाना पठारी प्रदेश असे म्हणतात. हे पण पठार पण पुर्वेकडे झुकलेले आहे. जोड नगरे असलेल्या हैद्राबाद आणि सिंक्रदाबाद नगरे, रंगारेड्डी, महबुबनगर, नलगोंड्डा, या जिल्ह्यातील अधिकतर गावे वरील तेलंगाना पठार भुमी मध्ये असुन वरंगल, करिमनगर शहरे खालील भागातील तेलंगाना

SCERT TELANGANA




पठार भुमीत मोडतात. या भुस्वरुपाविषयी आणि तेथील लोकांच्या जिवनशैली कशा प्रकारे आहे हे येणाऱ्या पाठात पाहु शकतो.

- इथे दिलेल्या चित्राचे निरिक्षण करून तुमचा प्रांत पर्वत, प्रांत आहे काय, पठार आहे काय, किंवा मैदान प्रांत आहे काय यातील कोणता भूभाग आहे याची माहिती मिळवून घ्या.
- तेलंगाना नकाशा पाहुन खालील दिलेल्या शहरांना कोणते वरील भुभाग आहे व कोणते खालील भुभाग आहे ते ओळखा. भुवनगिरी, बद्राचलम, सिंधीपेठ, मंथनी, मंचीरियाल, जिल्हे कोणत्या पठार प्रांतात येतात ते ओळखा.
- अनंतगिरी पर्वत, देवगिरी पर्वत, निर्मल पर्वत, सिर्नपल्ली पर्वत कोणत्या जिल्ह्यात आहेत.

**डेल्टा -त्रिभूज प्रदेश**


नदीच्या मुखाजवळ नद्यांच्या अनेक उपनद्या बनतात. या भागामध्ये रेती, गाळ, जमतो. यालाच डेल्टा त्रिभूज प्रदेश असे म्हणतात. या सुपीक जमावाच्या त्रिकोणी आकारात निर्माण होणाऱ्या भागाला त्रिभुज असे म्हणतात. प्रत्येक वर्षी येणाऱ्या पुरामध्ये वाहत आलेले (ह्यूमस, पाने, झाडे इत्यादीच्या सडण्याने तयार झालेले) थरांच्या रूपात तयार होतात. त्यामुळे इकडील जमीन कितीतरी सुपीक असते. पश्चिम खोऱ्यातील महाबळेश्वर इथे कृष्णानदी उगम पावली आहे. ही नदी किती तरी छोट्या नद्यांना मिसळून बंगालच्या खाडीमध्ये मिळते.

SCERT TELANGANA

- बांध, डेल्टा प्रांत जमिनी कोणत्या प्रकारे प्रभावित करीत आहे विचार करा.
- कृष्णा, गोदावरी, डेल्टा प्रांतामध्ये कोणकोणते जिल्हे आहेत. ओळखा.
- कृष्णा नदीमध्ये मिसळणाऱ्या दोन उपनद्यांना ओळखा.
- कृष्णा नदीवर निर्माण केलेल्या दोन मोठे बांध ओळखा.
- मेदक जिल्ह्यात सर्वात मोठा बांध का निर्माण होऊ शकत नाही ?




*चित्र 3.4*




*दक्षिण भारतातील प्रमुख भूस्वरूपे*

SCERT TELANGANA

पाठ 3

भाग 'ब'

# कृष्णा डेल्टामधील एक गाव - पेनमकुरू

आम्ही कृष्णा डेल्टामधील एका गावाला पाहण्यासाठी विजयवाड्यावरून निघून उय्यारू शहरात पोहोचलो. आम्ही प्रवास केलेला सर्व भाग समतोल आहे. कुठेही पर्वते, चढउतार दिसले नाहीत. कितीतरी लहान लहान कालव्यांना पार करून प्रवास केला आहे. कालव्यांच्या दोन्ही बाजूस हिरवीगार झाडे दिसत होती.

**बंदर कालवा**

आम्ही उयारूवरून तीन कि.मी. प्रवास केल्यानंतर बंदर कालवा पार करून पेनमकुर गावात पोहंचलो. बंदर कालवा कृष्णा नदीवर विजयवाड्याजवळ असलेल्या प्रकाशाम बॅरेजवरून वाहत असतो. या गावाच्या उत्तर-पश्चिम दिशेकडुन दक्षिण-पुर्व दिशेला हा कालवा वाहत असतो. गावामध्ये सुपीक जमिनींना लहान लहान कालव्याद्वारे बंदर कालव्याचे पाणी पुरवठा करतात. पेनमकुरू बंदर कालवा कृष्णा नदीच्या मध्ये आहे.



*चित्र 3.1 पेनमकुर मैदान भूभागाला दाखविणारे चित्र*



*चित्र 3.2 बंदर कालव्याला चिटकून असलेले झोपडे*

प्रकाशम बॅरेज

कृष्णा तिरावर विजयवाडा नगर वसलेले आहे. या नदीवर 1853 मध्ये ब्रिटीशांनी विजयवाड्याजवळ धरण बांधले. त्यालाच आपण प्रकाशम ब्यारेज म्हणून ओळखतो. या ब्यारेजमधून कालव्याद्वारे फिरवलेल्या पाण्यामुळे 12 लक्ष एकर जमीन सिंचन होत आहे.

SCERT TELANGANA

***जमीन***

पेनमकुरूची जमीन कितीतरी सुपिक आणि गाळ असलेली काळीभोर जमीन आहे. नदीतून वाहत आलेली माती जी एका जागी साठवली जाते. त्यास गाळ असे म्हणतात. अशी जमीन सुपीक असून जास्त पाणी शोषण करू शकतात. अशा जमिनीत पिके जास्त पिकतात असे तुम्हाला वाटते काय?


इथे 15 फूट खोलपर्यंत आपल्याला काळी माती दिसते. या जमिनी वर्षाकाळात कितीतरी ओलसर असून पुष्कळ काळपर्यंत ओलसरपणा टिकवून ठेवू शकते. हे सुकतेवेळेस जमिनीच्या वरच्या भागावर भेगा पडतात. या भेगामुळे वरच्या भागातील माती खाली जमिनीत मिसळते. त्यालाच स्वयंमातीचा बदल (सेल्फ प्लेविंग) असे म्हणतात. या प्रांतातील भूमी केव्हाही सुपीक राहण्यासाठी हे एक मुख्य कारण आहे.

- जमिनीतील ओलसरपणाचा पिके पिकवण्यासाठीचा काय संबंध आहे?
- पेनमकुरु गावाच्या नकाशामध्ये कालवा, रस्ते, गावाच्या मध्यभागी असलेल्या झोपड्या लक्षपूर्वक पाहा.
- गावच्या नकाशामध्ये बंदर कालव्यापासून जमिनीला पाणी सोडणाऱ्या छोट्या कालव्यांना पाहा. त्यातील पाणी कोणत्या दिशेने वाहत आहे?
- गावाच्या नकाशातील कालव्यापासून शेती करणाऱ्या जमिनीस हळूवारपणे छायापूर्ण (सेड) करा.

***वर्षापात, जलसिंचन***

या प्रांतात जूनपासून ऑक्टोबरपर्यंत नैऋत्य ऋतुपवनामुळे जास्त पावसाची नोंद होत असते. नोव्हेंबरपासून मेपर्यंत थोडा पाऊस पडतो. अनुकूल असलेल्या उष्णतेमुळे वर्षभर पिक पिकवू शकतो. ऑक्टोबरच्या नंतर पाऊस कमी असल्यामुळे विहीर किंवा बोरविहीर यांचे पाणी उपयोगात आणतात.

गावाच्या पूर्वेस असणाऱ्या सपाट जमिनीस छोट्या कालव्याद्वारे पाणी पुरवठा करता येतो. पश्चिम उत्तर बाजूस असणारी जमीन चढउतार असल्यामुळे कालव्याद्वारे व्यवसाय करणे शक्य नाही. त्यासाठी बोअर विहीरीचे पाणी त्यांना आधार आहे. पेनमकुरु हे गाव कृष्णा नदी जवळ असल्यामुळे 15 किंवा 25 फूट खोदले की भरपूर पाणी मिळत असते.




*चित्र 3.3 पेनमकुरु चित्र*

SCERT TELANGANA

त्यासाठी पर्वत जमीन, पठारे त्यांच्याशी तुलना केली तर इकडे बोरविहीर खोदण्यासाठी कमी खर्च लागतो. या प्रांतात सगळीकडे विद्युतीकरण होऊन पुष्कळ विहीरी पाण्याने भरून असून जलांतर्गत मोटारीने (सबमर्सिबल) काम करीत आहेत.



*चित्र 3.4 बोअरच्या पाण्याद्वारे साळी, ऊसाची शेती.*

या किनार मैदान प्रांतात जास्त पाणी असते , पाच महिने पाऊस पडत असतो. ब्यारेजवरून कालव्याद्वारे पाणी पुरवठा अवकाश असल्यामुळे पिके जास्त पिकतात. यामध्ये काळातील बोर विहीरीद्वारे या प्रांतातील जास्त भुगर्भ पाण्यांना सुपिक जमीनीस व्यावसायिक जमिनीस पाणीपुरवठा करीत आहेत अशा जमिनीस कालव्याद्वारे पाणी पुरवठा करणे अधिक कठीण आहे.

- तुमच्या प्रांतात जूनपासून ऑक्टोबरपर्यंत पाऊस पडतो काय?
- तुमच्या प्रांतात पडणारा पाऊस तिथल्या व्यावसायिक जमीनीस पुरेसा आहे काय?
- तुमच्या प्रांतातील आणि कृष्णा डेल्टा प्रांतातील पाणीपुरवठ्यांमधील फरक सांगा?

**वादळे आणि पूर**

आंध्रप्रदेशमध्ये सतत पूर येत असलेला जिल्हा म्हणजे कृष्णा जिल्हा एक आहे. पुराच्या पाण्यामुळे नदीवर असलेले मोठे धरण पूर्ती स्थाईमध्ये भरून गेल्यानंतर त्या पाण्याला उतार भागास सोडून देतात. पुराचे पाणी जेवढे विनाशकारी तेवढेच शेतीसाठी उपयुक्त ठरते. वादळामुळे सुद्धा जास्त पाऊस पडून नद्यांना पूर येतो. वादळामुळे मोठमोठी झाडे, घरे उद्ध्वस्त होऊन पुरामध्ये वाहत येतात. पेनमकुरु गावात खोल प्रांत नसल्यामुळे पूराच्या प्रवाहापासून हानी होत नाही. 1997, 2006, 2009 वर्षी कृष्णा नदीला पूर आला तरीही या गावाचे नुकसान झाले नाही.

- नदीला येणारे पूर विनाशकारी की उत्पत्तीकारक असतात याचा विचार करा.
- तुमच्या वडीलधाऱ्या माणसांना विचारा. अगोदर आलेले पूर, त्यांचे परिणामाविषयी माहिती मिळवा.
- वादळामुळे, पूरामुळे झालेले कोणत्या प्रकारे कमी करू शकतो.

पिके

किनारपट्टी मैदान विशेषतः कृष्णा जिल्ह्यामध्ये साळीचे पीक जास्त प्रमाणात पिकवतात. मुख्यतः उथळ जमिनीमध्ये साळीची लागवड करीत असतात. पाऊसकाळी म्हणजे जून, जुलै, महिन्यामध्ये साळीचे रोप लावतात. त्यानंतर त्याला शेतात लावतात. त्यालाच साल्वा म्हणतात, तिकडे साळीचे पीक देणारे बियाणे म्हणजे 2716, स्वर्ना, बी.पी.टी., एम.टी.यू. इत्यादी आहेत.

SCERT TELANGANA



*चित्र 3.5 हळद, ऊस केळीचे मळे*

### भाजीपाला

या गावामध्ये सुपीक जमीन किंवा रेताळ (रेती मिसळलेली) जमीन भाजीपाला उगविण्यासाठी कितीतरी उपयुक्त ठरत आहे. उथळ जमिनीत दुसरे पिकासाठी कालव्याद्वारे पाणी समृद्ध येत नसेल तेव्हा इकडील शेतकरी साळी पिकाच्या बदल्यात भाजीपाला उगवित आहेत. साधारणत: वांगे, भेंडी, तोंडले, दोडके, गोबीसारखे पीके पिकवून जवळच्या उयारी रैतुबाजारमध्ये विकतात. उन्हाळ्यात काही जण व्यवसाय करणारे त्यांच्या शेतीमध्ये बोरूसारखे टाकतात. या पिकामुळे जमीनीतील नत्रजणीचे प्रमाण वाढते. हे उन्हाळ्यात 30-40 दिवसानंतर या झाडांना जमीनीत मिसळून नांगरणी करतात. हे पिकांना खताप्रमाणे उपयोगात पडते.

व्यावसायिक संबंधित सर्व प्रकारच्या कामाला म्हणजे नांगरण्यासाठी, पाळी मारण्यासाठी, दळणवळणांसाठी ट्रॅक्टरचा उपयोग करतात. तांदळाच्या रोपाचे काम स्त्रीया करतात. पिक कापण्याचे काम दोघेही स्त्री व पुरुष मिळुन करतात. साळी लावण्यासाठी, साळी कापण्यासाठी श्रमिक शक्ती उपयोग करतात. हे पीक ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात हातात येते. डिसेंबर महिन्यात लावलेल्या साळीच्या पीकाला शितकालीन पीक असे म्हणतात.

ऊसाला कापल्यानंतर दुसरे पीक घेऊ शकतो. ऊसाच्या पिकाला वर्षभर काम असते. या कामांना मुख्यत: पुरुष करतात.

प्रस्तुत इकडील गाववाले हळद, कंदमुळे, केळी पिकवण्यासाठी लक्ष लावीत आहेत. या पिकांना पाऊसकाळ प्रारंभामध्ये लावले तर फेब्रुवारी, मार्च, महिन्यात कापण्यासाठी येतात. त्यांना व्यापारीक पिके म्हणून बाजारपेठेत विकतात.

या पिकांना पाणी तेवढे जास्त लागत नाही. परंतु प्रस्तुत काळामध्ये कालव्याची अभिवृद्धी झाल्यामुळे या पिकांच्या बदल्यात ऊस, भाजीपाला पिकवित आहेत.

### फळांचे बगीचे

कृष्णा नदीच्या दोन्ही बाजूस पेनमकुरु सुपीक जमीनीत आपणास विविध प्रकारचे फळांचे बगीचे दिसतात. जांब, सपोटा, पपईसारखे झाडे दिसतात. नदीकाठची जमीन अधिक भाग रेतीमिश्रीत माती असते. या मातीला ओलसरपणा टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य कमी असते. या जमीनीत साळीसारखे पीक घेऊ शकत नाही म्हणून इकडील शेतकरी सांगत आहेत. या जमीनीत फळांचे झाड त्यांच्या मुळांपर्यंत खोलवर जाऊन तिथले पाणी पिऊन जास्त वाढतात. त्यामुळे नदीच्या काठावर असलेल्या जमीनीत फळांची झाडे जास्त वाढत असतात.

SCERT TELANGANA

**सिंचन, बाजारपेठ, पिकांची अदलाबदल**

आजच्या काळात आहारधान्य उत्पत्तीपासून ऊस, भाजीपाला, फळे, हळदीसारख्या पिकांकडे इकडील शेतकरी लक्ष देत आहेत. पाणीपुरवठा भरपूर असल्याने व बाजारपेठेची सोय असल्यामुळे खत, बियाणे यांना बँकेद्वारे कर्ज मिळणे हेच त्याला मुख्य कारण आहे.

- हा बदल कशामुळे झाला असेल तुम्हाला वाटते?
- अशा प्रकारचा बदल शेतकऱ्यांना कितपत उपयोगी आहे असे तुम्हाला वाटते?
- असा बदल समस्यांना निर्माण करतो काय ?

**जमिनीचा मालक, बटाई विधान - तहसील**

गावामध्ये 750 कुटुंब असून त्यातील 10 कुटुंबांना 10 एकरपेक्षा जास्त जमीन आहे. सुमारे 150 कुटुंबाना 5 एकरपेक्षा कमी जमीन आहे. उरलेल्यांना कोणत्याही प्रकारची जमीन नाही. हे जमीनींना ठेक्याने घेऊन शेतमजुरी काम करीत करीत जगत असतात.

- पेनमकुरु मधील जमीन कोणत्या प्रकारची आहे. ♦ रेती /दगड ♦ रेती / चिकट माती ♦ काळी माती / रेती
- खालील दिलेले सत्यवचन ओळखा?
- रेताळ जमीन जास्त काळ ओली राहते.
- काळ्या मातीची जमीन जास्त काळ ओलसरपणा टिकवून ठेवते.
- काळी माती / रेताळ जमीन ओली राहते
- पेनमकुरु गावामध्ये शेतकरी.... जमीनीत साळ पिकवतात.
- कृष्णाकाठावर फळांची झाडे वाढवण्यासाठी कारण ....
- तुमच्या प्रांतात बोअरविहीर किती खोल असते? बोअर विहीर खोदतेवेळेस कोणत्या जमीनीचे प्रकार आढळतात.



चित्र 3.6 शेतातील शेतमजूर

**घरे**

या गावात अनेक जाती, धर्म, वृत्तीवाले निवास करीत आहेत. गावाच्या मध्यभागी चौधरी, गौड, कापू यादव, रजक जाती राहात. गावाच्या मध्यभागी लहान किराणा दुकान, औषधीचे दुकान, लहान हॉटेल्स, आर.एम.पी. डॉक्टर, लोखंडी वेल्डींग दुकाने आम्हाला दिसली आहेत.

SCERT TELANGANA

खालील दिलेल्या चित्रांना पाहा. हे गावातील घरे, इमारती संबंधित फोटो आहेत. त्यांचे छत, भिंती आणि घरा बाहेरील भिंती यातील फरक आणि समानता ओळखा.



*चित्र 3.7 शेतकऱ्यांची घरे*



*चित्र 3.8 झोपडी*



*चित्र 3.9 लहान शेतकऱ्यांचे घरे*



*चित्र 3.10 रोड घरे*

**प्राण्यांना पाळणे**

या गावातील सर्व जमीनीत शेती असल्यामुळे प्राण्यांना चारण्यासाठी जमीन कमी आहे. त्यासाठी काही बैल, गाय, म्हैस, मेंढी यांना इतर कामासाठी, दूधासाठीच पाळतात. इकडील माणसे प्राण्यांना कोणत्या प्रकारे चारा टाकीत असतील त्याचा विचार करा.

**टोपली विणणे, डुक्करपालन, मासे पकडणे.**

बंदर कालव्याच्या दोन्ही बाजूस टोपली करणाऱ्यांचे 15-20 घरे निवास करीत आहेत. हे दुसऱ्या गावावरून कामाच्या निमित्ताने इकडे आलेले आहेत. त्यांची प्रधानवृत्ती, दुरडी विणणे, डुकरे पाळणे हे होय. जगन्नाथ नामस्मरण करणे, इकडे 30 वर्षांपूर्वी येऊन स्थिर निवासी झाले आहेत. इकडील कालव्याच्या दोन्ही बाजूस वाढलेले ताडीची झाडे, शिंदीची झाडे त्यांच्या पानापासून दुरडी बनवितात. एक माणूस आणि त्याची पत्नी एका दिवशी 5-6 दुरड्या विणून बाजूच्या गावामध्येही विकतात. यांच्या बाजूला असलेला शिवया नावाचा माणूस मासोळी पकडून बाजूच्या गावामध्ये विकतो.

SCERT TELANGANA

**कुक्कुटपालन**

या गावात पूर्णपणे आधुनिक स्वरूपाचे कुक्कुटपालन फार्म आहे. प्राण्यांना निप्पल्सद्वारे, अहारांना कन्वेयर्स बेल्टद्वारे पुरवतात. त्यात 80 हजार कोंबड्या आहेत. त्या रोज 50 हजार अंडी देतात. या अंड्यांना विजयवाडा, आसाम, बिहार राष्ट्रांना दलालाद्वारे पाठवितात. कोंबडीची विष्ठा मासोळ्यांना आहार म्हणून उपयोगात आणतात.

**साळ गिरणी**

या गावात साळीमधून तांदूळ काढणारी एक गिरणी (राईस मिल) पण आहे. या मिलचे मालक शेतकऱ्यांपासून धान्य विकत घेऊन त्याला गिरणीमध्ये कांडून त्याचे तांदूळ करून इतर प्रांतांना विकत असतात.

इकडे कुक्कुटपालन, तांदळाचा व्यवसाय व त्या आधारीत परिश्रम असतात. हे सारे परिश्रम शेतीवर आधारीत असतात या भागातील शेतकरी मुख्यत्वे करून साळ आणि इतर मौसमी पिकांवर अवलंबून आहेत. मैदान प्रांतामध्ये अशाच प्रकारचे परिश्रम दिसतात. रवाना व्यवस्था असल्यामुळे इकडील लोक आवश्यकता असलेले सामान विकत घेऊन त्याच्यापासून तयार झालेल्या वस्तूंना नजिकच्या बाजारात किंवा शहरात विकतात.



*चित्र 3.11 कुक्कूट पालन*



*चित्र 3.12 साळीची गिरणी*



*चित्र 3.13 टोपली विणणे*

SCERT TELANGANA

**दळणवळण, बाजारपेठ व्यवस्था**

या प्रांतातून विविध नगरांना, शहरांना रस्त्याची व्यवस्था अभिवृद्धी झालेली आहे. ही त्यांच्या उत्पत्तींना सरळ विकण्यासाठी उपयुक्त पडतात.

इकडील शेतकरी ऊसाच्या पिकांना उयारूच्या जवळ साखर मिलला विकतात. त्यांनी पिकविलेला भाजीपाला, केळी, उय्यारू किंवा विजयवाडा रैतु बाजाराला पुरवठा करतात. साळींना मात्र शेतामधेच दलालांना विकतात.



*चित्र 3.14 रैतु बाजारला भाजीपाला पाठविणे*

| महत्त्वाचे शब्द |
|---|
| पर्वत |
| पठारे |
| मैदाने |
| किनारा |
| वादळे |
| पूर |
| मळे |

**मजुरांची उपलब्धता**

या गावात असलेल्या जास्तीत जास्त लोकांना तिथेच काम मिळते. काही शेतकरी मजूर बाजूच्या गावावरून सुद्धा येतात. थोडे फार शिक्षण घेतलेले म्हणजे 10 वा वर्ग शिकलेले ॲटो ड्रायव्हर, मेकॅनिकल, इलेक्ट्रीशयन अशी कामे करतात.

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. पेनमकुरु गावामध्ये कोणकोणत्या प्रकारचे बदल घडत आहेत?
2. मैदान प्रांतातील गरीब आणि जमीन नसणारे व्यक्ती कोणत्या प्रकारे रोजगार मिळवित आहेत?
3. पेनमकुरू सारख्या मैदान प्रांतातीत गावात व्यवसाय करण्यासाठी कोणत्या अडचणी आहेत ते सांगा?
4. गावातील सर्व शेतकरी ऊस किंवा हळदीचे पिके मात्र पिकवितात. हा चांगला विचार म्हणून तुम्हाला काय वाटते/ चर्चा करा.
5. या धड्याला तुम्ही वाचलात होय ना ! मैदान प्रांतात मुख्यत: कृष्णा डेल्टा प्रांतात लोक संख्येची घनता जास्त आहे. त्याचे कारण काय याचे वर्णन करू शकता काय?
6. तेलंगाना आणि आंध्र प्रदेशातील विविध भुस्वरुपांना ओळखुन खाली रंग भरा.
   अ. मैदान - हिरवा ब) पठार - पिवळा क) पर्वते- तपकिरी
7. हस्तकला उत्पादकांना सरकार कोणकोणत्या सवलती/मदत देते?
8. तेलंगानातील स्वाभाविक वैशिष्ट्ये कोणती? विचार करा आाणि लिहा?

SCERT TELANGANA

पाठ 4

# डोकुर - पठारी प्रदेशातील एक गाव

पुर्वीच्या पाठात आपण सुपिक आणि सपाट जमीन, पाणी वस्ती असलेल्या कृष्णा डेल्टा प्रांतातील एका गावाविषयी माहिती मिळविलेली आहे. कमी पाऊस, सुपिक जमीन नसलेल्या प्रांतातील लोकांची जिवनपध्दत कशी असु शकते याबद्दल वर्गात चर्चा करा.

## दख्खन पठार (Deccan Plateau)

तिसऱ्या पाठात चित्र 1 मध्ये तेलंगाना राज्याला पाहा. तेलंगाना राज्य प्रधानत: पठारी भुमी म्हणुन ओळखला जातो. तिसऱ्या पाठातील चित्र 2 शी तुलना करा. हा प्रांत सर्व विस्तृत दख्खन पठारी भुमी चा भाग म्हणुन ओळखला जातो. दख्खन पठारी प्रदेशाच्या एका बाजुला पश्चिम पठारी भाग आहे. तर दुसऱ्या बाजुला पुर्वी पठारी भाग आहे. दोन्ही बाजुने असलेल्या समुद्र मैदानांची तुलना केली तर दख्खन पठारी प्रदेश उच्च आहे. या पठारी भुभागाच्या पश्चिमेकडुन पुर्वीकडे उत्तरता भुभाग आहे. या प्रांताला समजुन घेण्यासाठी महाराष्ट्र, तेलंगाना, आंध्र प्रदेश राष्ट्रामध्ये वाहत असलेल्या गोदावरी नदीच्या मार्गाना पाहु शकता.


कृष्णा डेल्टा प्रांतासारखाच सपाट नसुन पठारी भुभागात लहान डोंगरे, पर्वतश्रेणी, टेकड्या असुन त्यामध्ये सपाट भुमी आहे. त्यामुळे निवास प्रांतातील वाहिती जमीन लहान लहान भागात दिसते. हा प्रदेश दगडाने भरुन असुन माती थोडी कमी प्रमाणात असते. पठारी भुमीमध्ये आणखी एक मुख्य म्हणजे पाऊस काळ कमी प्रमाणात असते. अशा कठिण प्रदेशात लोक कसे राहतात त्याच्या विषयी माहिती मिळवावी म्हणुन आम्ही शोध घेतला आहे. तेलंगाना पठारी प्रदेशातील महबुबनगर जिल्ह्यातील डोकुर गावाला भेट देऊन त्या गावाविषयी अध्ययन केलो आहोत.

## डोकुर गाव (Dokur Village)

डोकुर गाव हे देवरकद्रा मंडल मध्ये आहे. हे महबुबनगर शहरापासुन सुमारे 25 कि.मी. अंतरावर आहे. या गावाचे जुने नाव डाकुर आहे. डाकुर या शब्दाचा अर्थ चोरी करणारा हा होय. डाकु या शब्दापासुन डाकुर असे पडले आहे. ऐका काळी या गावाच्या सभोवताली दाट जंगल असायचे. चोरी करणाऱ्या चोरासाठी लपण्यासाठी जागा मिळायची म्हणुन चोर येथे लपुन राहत होते. प्रस्तुत या गावाला डोकुर असे म्हणतात.


चित्र 4.1

SCERT TELANGANA




नकाशा 1 - डोकुर गावाचा नकाशा

- डोकुर गावाचा रुपरेखाचा नकाशा पाहा. त्या आधारे दळणवळणा विषयी वर्णन करा? व तुमच्या गावाशी किंवा तुम्हाला माहित असलेल्या गावाशी तुलना करा?
- आम्ही गावाला गेलो तेव्हा तळे आटलेले होते. तरी पण त्याला निळ्या रंगात दाखवले आहे? तळे आटण्यासाठीचे कारणे सांगा?




SCERT TELANGANA

### वातावरण आणि पाऊस (Climate and Rainfall)

फेब्रुवारी पासुन जुन पर्यत उन्हळ्यात उष्णता $40^0$ सेल्सीयस पर्यंत असते. परंतु नोव्हेंबर पासुन जानेवारी पर्यंत हिवाळ्यात दुपारी उष्णता $20^0$ ते $30^0$ सेल्सीयस पर्यंत असते. जुन आखरी पासुन ऑक्टोंबर पर्यंत या प्रदेशात पावसाळा असतो. या प्रदेशात पाऊस फार कमी प्रमाणात पडत असतो. एका वर्षापासुन दुसऱ्या वर्षापर्यंत पावसात फरक आढळुन येतो. त्यासाठी पावसांचा अंदाज लावता येत नाही. वर्षाअभावी परिस्थितीत त्या वर्षी दुष्काळ होत असतो. पिके वाळुन जातात कमी पाऊसमान असल्यामुळे तळे भरत नाहीत. भुगर्भ जल खोलवर जात असतो. मनुष्यांना व पशुंना पिण्याच्या पाण्याची सोय होत नाही. पाणी पुरवठा नसल्या कारणाने शेती करणे फार कठिण होत चालले आहे. अशा कठिण काळात लोकांना इतर नौकरी शोधणे कठीण होते. अशाप्रकारे पुन्हा-पुन्हा कमी पाऊस होत गेल्यामुळे त्या प्रदेशांना दुष्काळी प्रदेश म्हणतात.

- या प्रदेशातील आणि कृष्णा त्रिभुज प्रदेशातील फरक सांगा?
- तुमच्या प्रदेशात गत दहा वर्षापासुन पाऊसमान कसा आहे? पावसाळा कमी असलेल्या वर्षाचे वर्णन तुमच्या वडीलधाऱ्या मानसांना विचारुन माहिती मिळवा?

## माती (Soils)

या गावातील शेतीची आर्धी जमीन लाल आहे. ही जमीन खोल नाही, सुपिक नाही, पिक वाढीसाठी आवश्यक पोषकतत्व या जमीनीत कमी प्रमाणात आहेत. यात रेतीचे प्रमाण जास्त प्रमाणात असल्यामुळे पाण्याला जास्त टिकवुन ठेऊ शकत नाही. त्यामुळे पिकांच्या मुळ मजबुत होत नाही आणि वाढत नाही. एक पीक घेतल्या नंतर ही जमीन त्यातील पोषक तत्व येण्यासाठी एक वर्ष लागतो. एक वर्ष पिक न घेता जमीन पडीत ठेवावी लागते.

काळी माती या प्रातांत 60 से.मी. खोलवर दिसत असते. या गावात सुपीक काळी जमीन फार कमी प्रमाणात आहे. पठारी प्रदेशातील काही प्रांतामध्ये असलेली सुपीक जमीन तेवढी सुपीक नसली तरीही ही काळी माती पिकांना अनुकुल आहे. ही काळी माती सुपीक आहे. पाणी जास्त वेळ साठवुन ठेऊ शकते. त्यासाठी पिके जास्त काळ टिकत असतात. ही जमीन भिजुन असल्यास चिकट असते आणि वाळल्यानंतर घट्ट होऊन बसते. ही काळीमाती जास्त उत्पादक आहे. खडकाळ जमीन आणि रेताळ जमीन जास्तीत जास्त प्रमाणात आढळते. अशी जमीन त्या गावातील 30% जागा व्यापते. यात दगड असुन व्यवसायासाठी अनुकुल नाही.

### पाण्याचे स्त्रोत - तळे, कुंटे

डोकुर गावामध्ये मुख्य पाण्याचे स्त्रोत मोठे तळे आहे. डोकुर गावाच्या 5 कि.मी. अंतरावर असलेले देवराकर्दा तळे भरले तर या तळ्याला पाणी येते. डोकुर मधील मोठे तळे भरल्यानंतर याच्या जवळ असलेल्यास चाकरी कोई कुंटा, वाणी वंपु, बंडी बंपु या सारख्या लहान तळ्याला पाणी भरते. त्यामुळे माळेतील मोती सारख्या साखळीला साखळी जोडल्या सारखे तळे आहेत.

पाऊस झाल्यानंतर पावसाच्या पाण्याचा उपयोग करण्यासाठी एका पध्दती प्रमाणे या तळ्यांना अनेक वर्षाखाली निर्माण झाले आहे. कमी पाऊस काळ असल्यामुळे जास्तीत जास्त पावसाचे पाणी साठवण्यासाठी या साखळी सारखे असलेल्या तळ्याचे निर्माण झाले. या तळ्यामुळे जवळपास असलेल्या विहिरी मध्यें पाणी असते.

संपुर्ण तेलंगानावर अशा तळ्यांना पाहु शकतो. अशा निर्माणांना पठारी प्रदेश कशा प्रकारे अनुकुल असतो? वर्गात चर्चा करा?



*चित्र. 4.2: दगडाने भरुन असलेली जमीन आणि आजुबाजुचे डोगरे*



*चित्र.4.3:पाण्याने भरुन असलेले तळे त्यातील झाडे पाहा.*

गावातील वृध्द शेतकरी वेंकटरेड्डी पुर्वी काळाचे आशा प्रकारे वर्णन केले. पुर्वी लोक प्रत्येक कुंटुंबातुन एक व्यक्ती येऊन तळे खोदने व झाडे झुडपे काढणे या सारखे कामे करत होते. हे सर्व मिळुन तळ्यात मासे धरत होते. अशा पकडलेल्या मासोळ्यांना गावात आणुन ढिग लावुन सर्वजन वाटणी करुन घेत होते.

आज साळीचे पीक तळ्यातील पाण्यापासुन नसुन त्याच्या खाली बोरवेल टाकलेल्या पाण्याआधारे साळीचे पिक घेत आहेत. एका वेळेस या तळ्यामुळे 400 एकर जमीन पिकत होती. जवळ जवळ सर्व समाजातील लोकांना तळे उपयोगात पडत होते. सध्या व्यवसाय बोरवेल वर आधिक आधारीत आहे.

- पुर्वीच्या तळ्यांची व्यवस्था कशी काम करत असते? पाण्याचे साठवण केल्यामुळे भुगर्भजल आणि शेतीतील करण्यासाठी तळे कसे उपयोगी पडत होते?
- ही माळेच्या माण्यासारखी तळ्याची व्यवस्था उपयोग का पडत नाही?

## विहिरी -बोरवेल

गावामध्ये 40-60 फीटवर पाणी असलेल्या विहिरी राहत होत्या. तर त्या विहिरी आता आटुन गेल्या आहेत. कमी पाऊसमान असल्यामुळे कारणाने तळे जागो जागी फुटुन गेल्यामुळे तळ्यातील पाणी राहत नाही त्यामुळे विहिरी मध्ये पाणी राहत नाही. आता लोक विहिरी खोदत नाहीत.

पठारी प्रदेशात जास्त खोल प्रमाणात भुगर्भजल राहत नाही. त्यामुळे आज सर्व लोक बोरवेल राहावे असे म्हणत आहेत. काही बोरवेल मध्ये पाणी लागत असल्यामुळे पाण्यासाठी स्पर्धा वाढली आहे. प्रत्येक जन बोरवेल टाकत असल्यामुळे भुगर्भजल आणखी खोलवर जात आहे. एकावेळी 100 ते 150 फिटवर पाणी असायचे पण आता काही प्रदेशात 200 फिट आणखी काही प्रदेशात 500 फिट खोदावे लागत आहे. बोरवेलचे खोदने जास्त खर्चिक बाब असल्यामुळे किंवा विफल होत असल्यामुळे खालील उदहारणे माहिती देतात.

मोगलन्ना नावाचा लहान शेतकरी एक बोरवेल टाकण्यासाठी एक लाख रुपये खर्च येतो म्हणुन सांगीतले. त्याने चार बोरवेल टाकले परंतु एकाच बोरवेल ला पाणी लागले असे सांगीतले. एक एकर जमीन ओलीत होत असते. त्याच प्रमाणे गावातील मोठा शेतकरी नरेंद्ररेड्डी त्याच्या 20 एकड जमीनमध्ये 15 बोरवेल टाकले म्हणुन सांगीतले. त्यातील फक्त दोन बोरवेल मध्येच पाणी लागले.



*Fig. 4.4: Irrigation with bore well*

SCERT TELANGANA

बोरवेल खर्चाची बाब आहे आणि विफल होत आहेत तरी पण शेतकरी सर्व बोरवेल पध्दतीवरच अवलंबुन आहेत. पुर्वी तळ्याची व्यवस्था छान असल्यामुळे तळ्या खालील शेतात आणि विहिरीने लहान शेतकऱ्यांना चांगले लाभ होत होते. आता खर्च जास्त करुन खोल असलेल्या भुगर्भ जलाव्दारे मोठे शेतकरी मात्र प्रयोजन मिळवुन घेत आहेत.

- या डोकुर गावातील शेतीसाठी पाणी पुरवठा या विषयी चर्चा करा?
- मैदान प्रदेशातील गावातील शेतींना पाणी पुरवठ्याची सोय आणि पठारी भागातील पाणी पुरवठ्याची सोय कशी होती याची तुलना करा?
- या गावातील ओलीत सोय आणि तुमच्या गावातील ओलीत सोय याची तुलना करा?

## पिके आणि शेती व्यवसाय

डोकुर गावातील शेतकरी कापुस, भुईमुग, एरंडी, साळी, बाजरी, तुरी सारखे पिके घेत असतात. पुर्वी लोक आहार पिके प्रमुखत: कडधान्याचे पिक घेत असत. काळ्या मातीत कापसाचे पिक घेत होते लाल मातीत भुईमुगांचे पिक आणि एरंडीचे पिक

**खोल जात असलेला भुगर्भजल - तिव्र होत असलेली समस्या**

हा पठारी प्रदेश संपुर्ण शेतकरी वाणिज्य पिके पिकविण्यासाठी जास्त प्रमाणात बोरवेल खोदत आहेत. या बोरवेल मध्ये पावसामुळे पाणी येणाऱ्या पाण्यापेक्षा जास्त पाणी वापरण्यात येत आहे. त्यामुळे दरवर्षी थोडा उपयोग झाला की, बोरवेल मधील पाणी आटुन जात आहे. यांची कारणे माहित करुन चर्चा करा व समस्याचे समाधान शोधा.

पिकवित होते. रान डुकराच्या भिंतीने भुईमुंगाचे पिक कमी होत चालले आहे. सजगुरे याचे पिक घेत होते. तुरी सारख्या पिकांना इतर बियांनासोबत मिसळुन करुन तुरी सारखे पिक घेत होते.

मोठे तळे, संपेगा नदीतील पाण्याने साळीचे पिक घेतात. नदीत खड्डे करुन मोटारच्या सहाय्याने पाणी पुरवठा करीत असतात. नदीतील पाणी आटले तर साळीचे पिक पण वाळुन जाते.

आक्टोंबर - जानेवारी महिण्यात रब्बी पिक घेण्यासाठी बोरवेल वर आधारीत साळी, भुईमुंग सारखे पिक पिकवितात. साळी चे पिक एकरी 20-30 क्विंटल उत्पान्न घेऊ शकतो असे शेतकरी सांगत आहेत. रसायनिक खत, किटकनाशक औषधांची किंमती वाढल्यामुळे, हारवेस्टर (पिक काढणारी मशीनमुळे गेल्या काही वर्षापासुन व्यवसाय खर्च वाढत आहे. सांपदायिक उपयोगात येणारा शेणखत, मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे.

- या गावातील पाऊसकाळ नसेल तर खरिप, रब्बी पिकांना ओळखा?
- भुईमुंग पिकविण्यासाठी येत असलेल्या शेतकऱ्यांना कोण कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते? या वर वर्गात चर्चा करा?

## फळ बाग (Fruit orchards)

डोकुर गावामधील काही लोकांना आंब्याचे व संत्र्याचे फळबाग आहेत. या पिंकाना साळी पेक्षा कमी पाणी लागते. भुईमुंगला सुपिक जमीनीमध्ये पिकवावे लागते. या फळ झाडांमध्ये रबी काळात अंतर पिक म्हणुन भुईमुंगाचे पिक घेत असतात. या प्रांतातील मोठे शेतकरी पाणी पुरवठासाठी सिंचन (sprinklers) चा वापर करतात.

SCERT TELANGANA



*Fig. 4.5: Mosambi (chini) orchard with drip irrigation*

## डोकुर मधील जमीनीचा उपयोग सुस्थिर आहे काय?

आपली जमीन येणाऱ्या पिढीसाठी सुपीक राहावी म्हणुन आपल्या जमीणीचा उपयोग व्हावा म्हणुन पर्यावरण संस्था विश्वास करीत आहेत. यासाठी आपण सुस्थीर उपयोग विधानाचे पालन करावे. म्हणजे भुमीचे स्वरक्षण करावे. भुगर्भजलांचा पुर्ण जन्म व्हावा. जंगलीय जमीन आणि गवताळ जमीन, सुपीक जमीनीमध्ये समतुल्य असावे.

- जमीनचे किंवा भुसंरक्षण कसे करु शकता यावर चर्चा करा?
- गावातील पिकांच्या पध्दती शेतकरी मिळुन निर्णय घेणे साध्य आहे काय?
- गवताळ जमीन आणि जंगलातील उत्पतीचा कसा उपयोग घेतात?

## इतर जिवनपद्धती (Other livelihoods)

फक्त सहा महिने व्यवसाय कामे मिळतात. त्यासाठी लहान शेतकरी व्यवसाय मजुरदार उपाधीसाठी शहरांकडे किंवा नगरांकडे स्थानंतर होत आहेत. हैद्रबादकडेच नसुन इतर राष्ट्राकडे गोवा, महाराष्ट्रातील पुणे सारख्या प्रातात स्थलातंर होत असतात. जुन महिण्यात परत आपल्या गावी येतात. व्यवसाय करुन पुर्ण पणे फायदा मिळत नसल्यामुळे या गावातील लोक व्यवसाय व्यक्तीरिक्त जिवन उपाधीसाठी अनेक कामे करीत आहेत.

## पशु पालन (Cattle rearing)

डोकुर मधील काही शेतकरी पाळीव जनावरांच्या पालन पोषण करीत आहेत. सरकारी संस्थाना दुध विकत आहेत. दुधातील लोण्याचे प्रमाण पाहुन दुधाची किंमत ठरवितात. 1 लिटर दुधाची किंमत 35-40 रुपयांचे मध्ये मिळत असते. म्हणुन त्या शेतकऱ्यांनी सांगीतले. दुधासाठी म्हशीच्या जास्त वापर करीत असतात.

डोकुर मध्ये कमी जमीन असलेले 20 कुंटुंब जिवन उपाधीसाठी शेळ्या मेढयाचे पालन पोषणावर आधारीत आहेत. पावसाळ्यात मेढ्या गावातील

### वेगळ्या प्रकारची शेती (A Different kind of farming)

या प्रांतातील जमीनी सुपीक नसल्यामुळे तेथील पाऊसमान कमी प्रमाणात असतो. यावर आधारीत राहु शकत नाही, हे त्यांनी पाहिले. म्हणजे प्रत्येक वर्षी भुईमुंग चे पिक घ्यावे म्हणजे शेतकऱ्यांनी रसायन खताचा वापर करावा लागतो. बोरवेल वर आधारीत असावे लागते. तिसरी समस्या पण आहे, ती म्हणजे क्रिमी किंटकांची आणि आळीची समस्या आहे. यांच्या निरंतर करण्यासाठी शेतकरी किटकनाशक औषधी चा वापर करीत आहेत. या पध्दतीला मोडण्यासाठी गत काही वर्षापासुन शेतकरी विचार करीत आहेत. समतल बंधारे बांधण्याचे, शेणाच्या खताचा वापर करणे, या सारख्या पासुन जमीनीतील क्षार वाढवु शकतो म्हणुन ते शेतकरी अंदाज लावत आहेत. वाणिज्य पिक असलेल्या भुईमुंग पिकांना एक पिक म्हणुन पिकवित नसुन काही आहार पिक घ्यावी असे म्हणत आहेत. जुन्या तळ्यांना पाणी येणाऱ्या कालव्याना चांगले केल्यामुळे जमीनीला पाणी पुरवठा होतो त्याकडे लक्ष देत आहेत. किटकनाशकांसाठी कडुलिंबा सारखा सेंद्रीय पध्दतीचा उपयोग करीत आहेत. या विषयी तुमच्या अभिप्राय तुमचा आई वडीलांचे मत काय आहे? या विषयी घरात किंवा वर्गात चर्चा करा?

SCERT TELANGANA



*Fig. 4.6: Grazing Sheep*

पडीत जमीनीत पाळतात. मेढ्या राखणारा नागराजने असे सांगीतले, गावाच्या सभोवताली असणारी मालकी हक्काची जमीनी मध्ये जवळील माण्यम डोंगरात मेढ्याचे पालन पोषण करीत असतो.उन्हाळ्यात मेढ्यां सोबत नल्लगोंडा, कर्नुल जिल्ह्याकडे जाऊन तीकडे त्यांना चारत असतो. आम्हाला वर्षाकाठी एक लाख रुपयांचा फायदा जवळपास मिळत असतो.

## इतर कामे (Other activities )

डोकुर मध्ये व्यवसाय व्यतिरिक्त सुतारी, लोहारी कामे आहेत. तादंळाचे मील पण आहे. सुतारी काम करणारे दोन कुंटुंब या गावात आहेत. घर बांधण्यासाठी दरवाजे, खिडक्या, स्टुल, टेबल बनविणे या सारखे कामे हे करीत असतात. प्रस्तुत हे लोक अनेक कामासाठी विद्युत उपकरांचा वापर करीत आहेत. गावात सुतारी काम करीत असलेल्या प्रभाकर चारी त्यांला महिण्याला 3000 रुपयांचा फायदा होतो म्हणुन सांगीतले.

कुभांर कामे करणारे या गावात 2 -3 कुंटुबे आहेत. व्यवसाय परिकरा सोबत हे लोक वेल्डींगचे काम सुध्दा करीत असतात. ऐवढेच नसुन या गावात तांदुळ मिल आहे. उद्योग, सरकारी नौकरी करणारे 20 कुंटुंब आहेत. ड्रायवर काम करणारे, वाहने असुन काही जन किरायांने वाहने चालवित असणारे सुध्दा आहेत.

## बाजारपेठ आणि दळण वळण

पिकविलेल्या साळींना देवरकर्दा मधील व्यवसाय मार्केट मध्ये विकतात. कापुस जडर्चलातील मदनापुर (वनपर्ती रोड) येथे विकतात. गावातील काही काटे (तराजु) आहेत. बाजार पेठेतील काटे बरोबर नाहीत म्हणुन येथुनच वजन करुन घेऊन जातात. व्यापारी त्यांच्या इच्छेनुसार भावाचा निर्णय करणे शेतकऱ्यांची मोठी समस्या आहे. बियाने, रसायनिक खत, किटकनाशके विकत घेण्यासाठी जास्तीत जास्त शेतकरी व्यापारावर आधारीत आहेत. त्यामुळे त्यांनी निर्णय केलेल्या किंमतीवरच त्यांना विकावेच लागते. पिके बरोबर पिकले नसल्यावर्षी बाकी परतफेड होत नसल्यामुळे व्यापारांना शेतकरी कर्ज बाकी राहात आहेत. काही जन त्यांच्या जमीनींना विवकत आहेत.

- व्यापारांवर शेतकरी कशासाठी आधारीत आहे? कशा प्रकारची बाजारपेठ शेतकऱ्यांना न्याय देऊ शकते? चर्चा करा?
- गावातील व्यवसाय व्यतिरिक्त काही कामे कोणत्य प्रकारे जास्त वाढविता येतात?
- तुमच्या गावात सरकारी नौकरी हामी योजना आहे का? यामुळे कोणत्या. कुंटुंबाना जास्त फायदा मिळत आहे?

*चित्र 4.7, 4.8 & 4.9 : खालील व्यक्ती करीत असलेल्या कामाला ओळखुन त्या विषयी विविरण करा*



*Fig.4.7*



*Fig.4.8*



*Fig.4.9*

SCERT TELANGANA



## ग्राम निवास प्रांत (Village Settlement)

2011 च्या जगणनेनुसार या गावात 570 कुंटुंब आहेत. संपुर्ण जनसंख्या 3400 आहे. यात विविध जातीतील 350 कुंटुंबाना गावात जमीन आहे. उरलेल्या 220 कुंटुंबाना या गावात किंवा जवळपास गावात मजुर कामावर आधारीत आहेत. यांना आर्ध्या एकर वरुन कमी भुमी आहे. हे सर्व व्यवसाय मजुरदार आहेत. हे लोक स्थलांतर सुध्दा होत असतात हे आपण अगोदरच पाहिले आहे. जमीन असलेले 350 कुंटुंबामध्ये 30 एकर जमीन असणारे मोठे शेतकरी तीन किंवा चार आहेत. अधिकतर शेतकऱ्यांना अर्ध्या एकर पासुन पाच एकर पर्यंत जमीन आहे. म्हणजे शेतकऱ्यांमध्ये अधिक टक्के शेतकरी लहान शेतकरी होत आहेत.

पुर्वी घरे मातीच्या भितीने, खापरातील झाकुन आसायचे. घराला लाकुड तेवढे जास्त प्रमाणात वापर नव्हते. नविन बांधणाऱ्या घरामध्ये विटा, लोखंड कांकरेट चा उपयोग करीत आहेत. जवळील भागा मध्ये रेती मिळत असते. गरीबांचे घरे गवतांनी, टिणांनी (पतर) झाकुन असतात. गावातील अनेक घरी विद्युत सोय आहे.

पुर्वी डोकुर गावातील लोक पिण्याच्या पाण्यासाठी विहिरीवर आवलंबुन राहत होते. प्रस्तुत बोरपंपासुन पाणी टॅक मध्ये चढवुन पिण्याच्या पाण्याची सोय पंपाव्दारे पाणी पुरवठा करीत आहेत. दोन दिवसाला एकदा पिण्याचे पाणी पुरवठा केला जाते. सरकारी संस्था योजने व्दारे निर्मीत केलेले नळे सगळ्या घरी आहेत.

## रस्ते आणि बाजार Roads and Markets

किराणा दुकान, चिकन सेन्टर, भाजीपाला, पानशॉप इत्यादी विकणारे काही बाजार गावात आहेत. महबुबनगर वरुन डोकुर बसची सोय आहे. NH-44.ला मिळविणारा देवरकर्दा वरुन वनपर्ती जाणाऱ्या काही बस डोकुर गावावरुन जातात. गावातील लोक जास्तीत जास्त आटोनी प्रवास करीत असतात. गावाच्या उत्तर दिशेला एक रेल्वे स्टेशन आहे. तिथे तीन पॅसेजर रेल्वे दररोज ये जा करतात.



Fig.4.10



Fig.4.11



Fig.4.12

*चित्र. 4.10, 4.11 & 4.12 : बाजारातील काही दृष्य*

SCERT TELANGANA



Fig.4.13




Fig.4.14

*चित्र. 4.13 & 4.14 : डोकुर जाण्यासाठी दळणवळणाची साधणे तुम्हाला उपयोगी पडतात.*

**महत्वाचे शब्द**

पठारे | तळे | भुगर्भजल | जमीनीचे प्रकार | पुशपालन

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. कृष्णा त्रिभुज प्रदेशातील पठारी प्रदेशातील बोरवेल मधील फरक सांगा? ($AS_1$)
2. पेनमकुरु, डोकुर मधील पिकांच्या पध्दतीबद्दल, त्यांच्या मध्ये समानत्व व फरक विषयी सांगा? ($AS_1$)
3. डोकुर सारख्या भागातील व्यवसाय लाभदायक आहे का? ($AS_4$)
4. या प्रांतात पाऊस भरपुर पडलतर गावात कशा प्रकारचा बदल होऊ शकतो ते सांगा? ($AS_4$)
5. तुमच्या गावात व्यवसाय व्यक्तिरीक्त कोण कोणती कामे आहेत? एका कामाविषयी माहिती गोळा करा? आणि ते स्पष्ट करा? ($AS_4$)
6. या खालील दिलेल्या शब्दाचा वाक्यात उपयोग करा? ($AS_1$)
7. डोकूरमधील जमिनीचा सुस्थिर उपयोग आहे का? हा परिच्छदे वाचुन तुमचे मच सांगा?

| अ.क्र. | विषय | डोकुर |
|---|---|---|
| 1. | जमीन | |
| 2. | पाणी | |
| 3. | पिके | |
| 4. | बाजारपेठ | |
| 5. | उद्योग धंदे | |

**प्रकल्प :**

तुम्ही पठारी प्रदेशात राहत असालच. जमीनीला दोन प्रकारे विभागले जाते. कोरडवाहु, ओलीत जमीणीत साळीचे पिक घेतात. कोरडवाहु जमीनीत पाणी पुरवठा नसलातरी पावसाआधारे साळीचे पिक पिकविल्या जाते. तुम्ही गावामध्ये राहत असाल तर तुमच्या गावातील जमीनीचे प्रकार माहिती करा. त्याला तुमच्या गावात काय म्हणतात? त्याचे विवरण कसे करतात? तुमच्या भाषेत जमीनीला कसे विवरण करतात. एक सुची तयार करा. वरील गावातील विविध प्रकारची जमीन या अंशामध्ये कसे राहते त्यात माहिती द्या. पाण्याला ग्रहन करणारे गुण (कमी जास्त) पाण्याला धरुन राहणारे गुण (कमी, जास्त) रेताळ (कमी, जास्त) जमीनीचा रंग डोकुर मधील विविध प्रकारच्या जमीनीमधील फरक ओळखुन त्याला तुमच्या गावातील जमीनीशी तुलना करा?



SCERT TELANGANA

पाठ 5

# पेनुगोलु - डोंगरातील एक गाव

**मागील दोन पाठात आपण कृष्णा त्रिभुज प्रदेशातील पठारी भागातील गावाविषयी माहिती पाहिली. या पाठात आणखी एका भिन्न प्रांतातील - डोंगरातील खेड्या विषयी माहिती घेऊ या. तुम्ही डोंगर-दऱ्या पाहिल्या असतीलच तेथे राहणाऱ्या लोकांची माहिती तुम्हाला असेलच. तेथील लोक जिवन कसे असेल या विषयीची माहिती या पाठात पाहु या.**

SCERT TELANGANA




*चित्र 5.1: पेनुगोलु गावाभोवतीच्या टेकड्या*

## पुर्व टेकड्या (घाट) (Eastern Ghats)

दख्खनच्या पठारातील तेलंगाना हा एक भाग या पठाराच्या एका बाजुला पुर्व घाट आहे. या टेकड्या पुर्व भागातील होत. पुर्व घाटातील जयशंकर जिल्ह्यातील टेकड्या ह्या पश्चिम घाटाचा भाग होय. तेलंगाना जिल्ह्याच्या नकाशात हा भाग ओळखा? या टेकड्या स्पष्टपणे नकाशात ओळखता येतील का ते शोधा? या टेकड्या छत्तीसगड, आंध्रप्रदेश, ओरीसा या राज्यातही विस्तारलेले आहेत.

टेकड्यामधुन राहणारे लोक अनेक आदिम-आदिवासी जाती जमातीच्या आहेत. त्यांना कोंडादोरा, गदब, गोंड, मन्यादोरा, मुखदोरा, कोया, या नावाने ओळखले जाते. येथील स्थानिक प्रजेला आपली एक स्वतंत्र अशी एक संस्कृती आहे. जंगलातील विविध वस्तु गोळा करुन, शिकारी करुन या जमाती आपले जिवन जगत असतात. यांचे बहुतांशी जिवनमान परिसरातील जंगलावर आधारीत आहे. या लोंकांना परिसराच्या जंगलांची खडा न खडा माहिती असते. जंगलातील प्रचंड प्रमाणातील वनसंपदा, खनिजसंपदा आदि विषयी




नकाशा-1 खम्मम जिल्ह्यातील पेनुगोलु गाव


त्यांच्याकडे ज्ञान परंपरागत पध्दतीने येते. जिवनातील अनेक कठिण प्रसंगात हे लोक जंगलावर आधारुन असतात. यापैकी काही प्रसंग आपण पाहु या.

पेनुगोलु गावाविषयी सर्व प्रथम माहिति घेऊ या. या गावातील लोकांशी भेटुन, बोलुन परिसरातील अनेक घडामोडींची नोंद घेऊ या.

गोदावरी नदीच्या तिरावरील वाजेडु मंडळ मधील पेनुगोलु हे एक गाव परिसर टेकड्यांनी व्यापलेला. नकाशा एक पाहा. या भागात कोया जमातीशी संबंधीत लोक राहतात. कोया या शब्दाचा अर्थ म्हणजे 'डोंगरात राहणारी चांगली माणसे' हे लोक कोया भाषा बोलतात. हे लोक बाजुच्या म्हणजेच ओरिसा, छत्तीसगड आणि आंध्र प्रदेश या राज्यातही वस्तीकरुन लगतच्या डोंगराळ भागात समुहा समुहाने राहतात. तथापी अनेक लोक स्थलांतरण करुन आदिलाबाद, करीमनगर, वरंगल, पुर्व गोदावरी या जिल्ह्यात राहत आहेत. शहरामध्ये राहत असल्यामुळे हे लोक आपली मुलची कोया भाषा बाजुला ठेऊन तेलुगु भाषा बोली भाषा म्हणु न तसेच व्यवहाराची भाषा म्हणुन वापरु लागले आहेत.

या गावाच्या आजुबाजुला टेकड्या आहेत. उत्तरेला छत्तीसगड मधील कर्रे टेकड्या किंवा काळा डोंगर दक्षिणेला वंकामामीडी गुट्टा, पुर्वेला कल्लु कुंटला गुट्टा तर पश्चिमेला चिन्नकुमरी लंका, पेद्दा कुम्मरीलंका आहेत. बाजुच्या नकाशात हे सर्व भाग पाहता येतील.

वाजेडु मंडलाच्या उत्तरेस काळ्या डोंगरापासुन नल्लम देवी नदी वाहते. ती पुढे गोदावरी नदीला मिळते. आम्ही वाजेडु टेकड्या उतरुन सर्व प्रथम गुम्मडी दोट्टे या गावी पोहचलो. येथुन पायी पायी पुन्हा टेकड्यावर गेलो. हा रस्ता काही ठिकाणी अतिशय लहान तर काही ठिकाणी अतिशय धोकादायक आहे. मोठी घसरण काही आढळली थोडा जरी तोल गेला तरी चालणारा वाटसरु दरीत पडतो. रस्त्यात चिकुपल्ली गावाजवळ प्रसिध्द असा बोगथा धबधबा आहे. हा धबधबा अतियश सुंदर आहे. टेकड्यावर चढतांना आजुबाजुला धनदाट जंगल, अतिशय दाट झाडे झुडपे दिसतात. काही ठिकाणी जंगल साफ करुन निर्माण केलेली शेती दिसते. अशा प्रकारची शेती तुरळक प्रमाणात आहे. या शेतीची माती काहींशी लालसर रंगाची दिसली.


*चित्र. 5.2: बोगथा धबधबा*

SCERT TELANGANA

ही जमीन फारशी सकस नव्हे. जमीनीत लाल मोठे दगड आढळुन आले. आम्हचा प्रवास साधारणत: 6 ते 7 तास चालला शेवटी आम्ही पेनुगोलु येथे पोहचलो. वाजेडु येथुन हे गाव साधारणत: 20 कि.मी. अंतरावर आहे.



*Fig 5.3: A field near the forest*

## पोडु (Podu)

कोया जमातीचे लोक विशिष्ट पध्दतीने शेती करतात या पध्दतीलाच पोडु असे म्हणतात. डोंगराळ भागात शेती करण्याची ही एक विशिष्ट अशी पध्दत यालाच बदलती शेती (shifting agriculture or jhum cultivation) किंवा झुम असे म्हणतात. कोंडारेड्डी इतर काही आदिम जमाती याच प्रकारची शेती ची पध्दत वापरतात. आंध्र प्रदेश, छत्तीसगड आणि अरुणाचल प्रदेश या राज्यातही ही पध्दत प्रचलीत आहे.

प्रत्येक गावातील लोक शेती साठी उपयोगात आणल्याजाणाऱ्या जमीनीचे योग्य प्रमाणात वाटप करतात. शेतीसाठी काही प्रमाणात जंगल तोडुन साफसफाई केली जाते. या नंतर काही वर्ष येथे शेती केली जाते. नंतर ती जमीन सोडुन देऊन नविन ठिकाणी पुन्हा नव्याने जंगलांची साफसफाई करुन शेती केली जाते. सोडुन दिलेल्या जमीनीत कलांतराने जंगलांची वाढ होते. यामुळे शेतीची जमीन ठराविक कलानंतर बदलत जाते. अनेक वर्षानंतर पुन्हा मुळ ठिकाणी परत येतात.

डोंगर टेकड्यात नोव्हेंबर महिण्यात पावसाळा थांबतो. त्यापुढच्या म्हणजे डिसेंबर महिण्यापासुन कोया जमातीचे लोक कुऱ्हाडीने झाडे तोडतात. तोडलेली झाडे खंब्या एप्रिल मे महिण्या पर्यंत तशीच वाडवली जातात. मे महिण्याच्या शेवटी वाळलेली झाडे पाने, झुडपे जाळुन टाकली जातात. संपुर्ण जमीनवर झाडांची राख पसरलेली असते. जुन महिण्यात लाकड्यांच्या सहाय्याने टोचुन जमीनीमध्ये बियांची लागवड केली जाते. या पध्दतीने अनेक प्रकारची पिके हे लोक घेतात. या लोकांना नांगराचा किंवा वखराचा वापर कसा करावा हे माहित नाही तसेच विविध रासायनिक खतांची माहिती नाही.

जमीन नांगरलीतर पावसामुळे वरची सुपिक माती वाहुन जाते म्हणुन जमीन नांगरली जात नाही. जर नांगरली तर सुपिक माती ऐवजी दगड धोडच उरतील



*Fig. 5.4: Dibbling seeds with a digging stick, a photograph from 1940*

SCERT TELANGANA

त्यामुळे पिके येणार नाहीत. राख आणि पाने, फुले जमीनीत सडल्याने त्यापासुन आपोआप सेंद्रीय खत तयार होते त्याचा परिणाम म्हणुन उत्तम प्रकारचे पिक येते. पावसामुळे माती वाहुन जाऊन जमीनीची सकसता कमी होऊ नये यासाठी हे शेतकरी प्रचंड मेहनत घेतात. ज्वारी, मक्का, बटाटे, तिळ, तुर, मुग या शिवाय वांगी, मिर्ची, अंबाडी आदि धान्य या जमीनीत पिकविले जातात. कोणत्याही प्रकारची पाटबंधारे व्यवस्था नसतां हे लोक विविध प्रकारची पिके पिकवितात. मिळालेले उत्पन्न साधारणत: 6 महिणे ऐवढ्या कालावधी साठी पुरेसे असते.

या जमीनी जंगलाच्या बाजुला असल्यामुळे जंगलातील पशु पक्षी पिकांवर हल्ले करतात. या हल्ल्यापासुन रक्षण करण्यासाठी कोया जमातीचे लोक विविध प्रकारच्या योजना आखतात. यापैकी एक म्हणजे शेतामध्ये मचानी बांधुन पिंकाचे रक्षण करणे होय.

काही काळासाठी एका ठिकाणी शेती करुन नंतर दुसऱ्या ठिकाणी जाण्याची पध्दत आपण पाहिली. गत काळात एक कुंटुंब सरासरी दोन ते अडीच एकर एवढी बदलती शेती करीत असे. या प्रकारच्या शेतीत सरासरी अडीच क्वींटल ऐवढे उत्पादन येत असे. या अर्थ असा की, एका कुंटुंबाला सरासरी 6 क्विंटल ज्वारी, दीड ते दोन क्विंटल इतर धान्य शेतीतुन मिळत असे. गत काळात डोंगरामध्ये जमीनीची उपलब्धता मोठ्या प्रमाणात होते. परंतु आताच्या काळात एका कुंटुंबाला सरासरी एक ते दीड एकर ऐवढीच जमीन उपलब्ध आहे. याचा परिणाम प्रती कुंटुंबाला मिळणाऱ्या उत्पादनावर होत आहे. त्याच्या गरजा या उत्पादनातुन भागत नाहीत. तसेच हळुहळु जंगलाचे क्षेत्रफळ कमी कमी होत असल्यामुळे अतिशय अल्प काळात पुन्हा मुळ ठिकाणी परत यावे लागत आहे. याचा परिणाम म्हणुन जमीनीची सकसता होऊन उत्पादनात घट होत आहेत.

- आलीकडच्या काळात बदलत्या शेतीचे क्षेत्रफळ का घटत आहे?
- डोंगराळ भागात शेत करण्याच्या काही पध्दती तुम्हाला माहित आहेत का?
- पिकांच्या वाढीसाठी राख कशा प्रकारे उपयोगी पडते?
- तुमच्या भागातही शेतीवर जंगलातील पशु पक्षी हल्ला करतात का? त्या वेळेस तुम्ही पिंकाचे संरक्षण कसे करता?
- कोया जमातीचे लोक नांगराचे वापर का करीत नाहीत?

## परसबागेतील भाजीपाला

या गावातील घरांना विशिष्ट प्रकारच्या तंट्यांनी आवार बांधलेला आम्हाला आढळला. शेती योग्य जमीन दगड गोट्यांनी भरलेली आहे परंतु घराच्या परसात (आवारात) असलेली जमीन मात्र अतिशय कसदार आणि दगड-गोटे नसलेली आम्हाला आढळुन आली. घराभोवतीच्या मोकळ्या भागात हे लोक अनेक प्रकारच्या फळभाज्या, पालेभाज्या पिकवितात. कमीत कमी जागेत वाल्याच्या शेंगा (आवरा) दोडके, कारली, या सारखी फळे तर मिर्ची, कोंथबिर आणि अन्य पालेभाज्या पिकविल्या जातात. काही लोक याच परसबागेत कुक्कुटपालन, शेळीपालन, मेंढीपालन, कुत्रे पालन आदी कामे करतात.



*Fig. 5.5: Kitchen garden fence and the houses*

SCERT TELANGANA



*Fig. 5.6: Taking cattle to graze*

काम प्रामुख्याने महिला करतात. बांबुच्या विशिष्ट प्रकारच्या बिया त्यावरील अवरण काढुन खाण्यासाठी वापरले जाते. हे अतिशय चवदार असे अन्न होय. विशेषता उन्हाळ्यात संपुर्ण कुंटुंब ताटीचा मनमुराद अस्वाद घेते. ताडीच्या सेवनामुळे या लोकांचे आरोग्य वर्षभर खनखनीत राहते असा या मागे समज आहे.

शेती, शिकार, वनात्पादने गोळा करणे, पशुपालनश आणि अन्य कामामध्ये कुंटुबातील सर्व जन सहभागी होतात. विशेषता वन उत्पादने, बांबुची उत्पादने हे मात्र महिला प्रामुख्याने करतात. कामामध्ये मुलामुलींचा सहभाग ही महत्वाचा असतो.

काही वन उत्पादने आठवडी बाजारात विकली जातात. यात मोहाची फुले ही प्रमुख होय. तसेच बांबुची उत्पादने ही विकुन अन्य वस्तुंची खरेदी केली जाते.

## दुय्यम दर्जाची वन उत्पादने

आम्ही जेव्हा गावातील लोकांशी बोललो तेव्हा शेतीतील उत्पन्न बारमाही पुरेसे नाही हे आम्हाला कळाले. जिवन जगण्यासाठी आवश्यक असलेले अनेक जिन्नास आम्ही जंगलातुन मिळवितो. कधी कधी शिकारीवर ही जगावे लागते असे आम्हाला त्याच्या कडुन कळाले. आजु बाजुला असलेल्या जंगलावर हे लोक अंशात: अवलंबुन आहेत. त्यांच्या आणि जंगलाचे अतुट असे नाते आहेत. जंगलातुन विविध प्रकारची फळे फुले, कंदमुळे हे लोक गोळा करतात. यांचा उपयोग वर्ष भर आहारासाठी करतात. आदिम आदिवासी दिनदर्शिके प्रमाणे फळे, फुले, कंदमुळे आदि कोणकोणत्या ऋतुत येतात. तसेच शिकारीसाठी कोणती वेळ योग्य आहे हे त्यांना माहितच असते. त्यानुसार हे लोक त्या त्या ऋतुत अन्न धान्यासह काही औषधी वनस्पतीही गोळा करुन घरात बांधुन ठेवतात. त्यातुन अनेक रोंगाची चिकित्सता होते.

हंगामाच्या काही महिण्याआगोदर आणि काही महिण्यानंतर हा काळ सर्वसाधारणपणे आदिम आदिवासी महिला जंगलातील विविध संसारोपयोगी वस्तु गोळा करण्यात घालवता. या मध्ये मुख्यतवे मध आणि तत्सम वस्तुचां समावेश असतो. बांबु हा ही याचा जिवनाचा एक अविभाज्य घटक होय. बांबु पासुन तया केलेल्या शिडीच्या साहाय्याने उंच झाडावर चढुन आहार योग्य फळे-फुले गोळा करण्याचे

- तुम्ही कोणकोणती वन उत्पादने वापरता ? याची एक यादी तयार करा ?
- तुम्ही जंगलात कधीतरी काही आहार पदार्थ गोळा केलात का ?केला असेल तर तुमचे अनुभव सांगा ?

## पिण्याचे पाणी (Drinking water)

या गावातील लोकांसाठी पिण्याचे पाण्याचे अनेक स्त्रोंत उपलब्ध आहेत. याशिवाय टेक़ड्या वरुन वाहणारे झरे तसेच शबरी आणि गोदावरी नदीत मिळणाऱ्या अनेक उपनद्या यांचे पाणी उपलब्ध असते. डोंगरामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी खोदणे अत्यंत कष्टदायक काम आहे. त्यामुळे वर्षभर

SCERT TELANGANA

सहजपणे उपलब्ध होणाऱ्या झऱ्यांचे पाणी हे लोक वापरतात. कधी कधी उन्हाळ्यामुळे काही झरे आटुन जातात. गावकरी लोक पावसाळ्यानंतर कधी तरी एखाद्या किलो मिटर अंतरावरुन पिण्याचे पाणी आणतात.



*Fig. 5.7: Carrying water from the spring*

## बांबु (Bamboo)

जंगलात बांबु मोठ्या प्रमाणात आढळतो. या भागातील लोकांच्या जिवन शैलीचा बांबु हा एक महत्वाचा घटक होय. आहारासाठी नव्हे तर घरे, संसार उपयोगी वस्तु, घरांना आडोसा देण्यासाठी तट्टयांचा वापर आदि हे लोक बांबु पासुन करतात. या शिवाय कुक्कुटपालनात बांबुचा उपयोग अतिशय महत्वाचा असतो. आठवडी बाजारात बांबुच्या वस्तुंना मोठी मागणी असते. जंगलातुन बांबु गोळा करण्याचे अधिकार कागद कारखाण्या देण्यात आले आहे. यामुळे या लोकांना बांबु गोळा करण्यासाठी काही प्रमाणात मजुरीही मिळते. आताच्या काळात मजुरीचे प्रमाण वाढले आहे. साधारणत: शेतीचा हंगाम संपल्यानंतर बांबु गोळा करण्याचे काम केले जाते. या बरोबरच इतर वस्तुही जंगलातुन गोळा केल्या जातात. साधारणत: 150 रुपये ऐवढी मजुरी मिळते.

- कागद कारखाने आणि आदिम आदिवासी बांबुचा वापर कसा करतात यातील फरक स्पष्ट करा ?

## घरे आणि वस्ती (Houses and habitation)

पेनुगोलु गावातील बहुतांश घरे ही बांबु, माती आणि ताडीच्या फांद्या वापरुन बांधल्याची आम्हाला आढळुन आली. प्रत्येकाच्या घराभोवती पशु पालन आणि परसबागेसाठी काही ठराविक जागा राखुन ठेवली आहे. संपुर्ण परिसराला बांबु आणि ताडीच्या फांद्यापासुन भिंतीसारखे संरक्षण देण्यात आले. घर आणि गोठा यामध्ये ठळक अंतर ठेवले जाते.

पेनुगोलु गावात घरे ही टेकड्यावर आहेत. या गावात एकंदर 32 कुंटुंबे आहेत. गावाची लोकसंख्या एकुण 124 एवढी आहे. हे गावठान या लोकांचे कायमचे निवासस्थान नव्हे. काही संकट उदभवले तर जसे साथीचे रोग, इतर रोगराई,अतिसार अशा वेळी हे लोक ही जागा सोडुन दुसरी कडे राहतात.

- तुमच्या मते डोंगराळ भागात आणि पठारी प्रदेशातील राहणीमानातील काय साम्य आणि फरक आहे ?

## चालीरिती (Customs )

गावातील लोक निसर्ग पुजक. निसर्गातील प्रत्येक वृक्षाची, वस्तुची पुजा करतात. बदलत्या ऋतुनुसार सणवार साजरे करतात. चिंचेच्या झाडाखाली असणारे मुत्यालम्मा देवीची ते मनोभावे पुजा करतात. तसेच हंगामापुर्वी जमीनीची पुजा, डोंगरदेवतेची पुजा त्या

*Fig 5.8 : Hut made of bamboo and thatch*



SCERT TELANGANA

सोबतच मोहाच्या फुलांची पुजा इत्यादी सन साजरजे केले जातात. सप्टेंबर महिण्यात डोंगर देवतेची पुजा केली जाते. हा सन या लोकांसाठी सर्वात महत्वाचा असतो. विविध प्रकारच्या फळे आणि पालेभाज्या करुन त्या डोंगरदेवतेले नैवेद्य म्हणुन अर्पण केले जाते. त्यानंतर सर्व जन त्याचा अस्वाद घेतात. या सनानंतरच जंगलामध्ये अधिकृत पणे वस्तु गोळा करणे झाडांची तोडणी करणे आणि अन्य कामे केली जातात. या सणांच्या निमित्ताने इतर भागात असलेले या जमातीचे लोक एकत्र येतात.



*Fig 5.9 : Gamanu - place of worship*

## कोया जमातीचे भवितव्य (The Future of Koyas)

कोया जमातीचे लोक अत्यंत अल्प प्रमाणात आहेत. पुरातन काळापासुन आपले विशिष्ट जिवनमान जपुन आहे. त्यांची जिवनशैली जपण्याचा अधिकार त्यांना आहे. आधुनिक शेती व्यवसायाप्रमाणे निसर्गाचा नाश ते लोक करत नाहीत. शेती साठी जंगलतोड केली तरीही काही वर्षानंतर ते जंगल पुन्हा कसे वाढेल याची ते खबरदारी घेतात. तथापी सध्याच्या काळात जंगलाच्या क्षेत्रफळ अतिशय अल्प प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे त्यांचे परंपरागत जिवनमान धोक्यात आले आहे. अनेक ठिकाणी त्यांचा जंगलावरचा हक्क रद्द करण्याचे प्रयत्न होत आहे. जंगलांचा प्रचंड प्रमाणात नाश होत असल्यामुळे आणि मोठ्या प्रमाणात होत असलेल्या औद्योगिकरणामुळे त्यांचे निवासस्थानच धोक्यात आले आहे. विशेषत: कागदाचा प्रचंड वापर वाढल्यामुळे दिवसेनदिवस झांडाचा प्रचंड प्रमाणात नाश होत आहे. जिवनाचा आधार असलेला बांबु नष्ट होत आहे. या सर्व प्रकारामुळे त्याचे परंपरागत जिवनमान नष्ट होण्याच्या मार्गवर आहे.

- पठारी प्रदेशातील शेतीविषयाची माहिती आपण घेतली. या तिन्हीही गावातील लोकांचे जिवनमान, स्थिरत्व आणि दैनंदिन जिवनमानाची तुलनात्मक तुलना करुन पाहा?
- कोया जमातीच्या परंपरागत जिवनमानाच्या संरक्षणासाठी काय उपाय करावे असे तुम्हास वाटते?

आदिम आदिवासी लोकांना जंगलातील फळे-फुले आणि पर्यावरणाचे प्रचंड ज्ञान असते. त्यांच्या गरजा अतिशय कमी असतात. ते राहत असलेले जंगले प्रचंड प्रकारच्या अनेक संपदांनी भरलेली आहे. त्यांनी पर्यावरणाच्या संरक्षणासाठी केलेले किंबहुना करत असलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे. हे लोक खऱ्या अर्थाने निसर्गाशी सुसंगत जिवनमान जगत आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या पध्दतीने जंगण्याचा हक्क असु नये का?

या गावामध्ये आधुनिक समाजातील अनेक सुविधा जसे शाळा, प्राथमिक गरजा पुरविणे आवश्यक आहे. इकडे फक्त एक आदिवासी आश्रम शाळा आहे. माध्यमिक शिक्षणासाठी त्यांना वाझेडू म्हणजेच 20 कि.मी. दुरवर असलेल्या मंडळ च्या गावी जावे लागते. हे योग्य आहे का?

SCERT TELANGANA



*चित्र 5.10 : पेनुगोलु गावीजाण्यासाठी रस्ता*

**महत्वाचे शब्द**

बदलते शेती    जमात    बांबु    परसबाग    वनोत्पादने

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. सभोवतालच्या जंगलात कोया जमात कशा प्रकारे आधारीत आहे? ($AS_1$)
2. टेकड्यावरील विविध जिवनशैली स्पष्ट करा? ($AS_3$)
3. शेतीसाठी एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी का जातात? ($AS_1$)
4. तुम्ही अभ्यासलेल्या तिन्हीही गावाच्या जमीनीतील साम्य आणि फरक स्पष्ट करा? ($AS_1$)
5. मागील तिन पाठातील उपशिर्षक पहा त्यातील विविध अंश तपासा. या सर्व माहिती ची एकत्रीकरण करुन खालील तक्त्यात भरा? ($AS_3$)

| शिर्षक/उपशिर्षक | टेकड्यावरील गाव | पठारावरील गाव | नदीतीरावरील गाव |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

6. तुमचे गाव किंवा शहर ------ प्रकारच्या भुस्वरुपावर आहे. या पेक्षा भिन्न प्रकारच्या स्वरुपावर असल्याची कल्पना करुन त्याविषयी माहिती लिहा. ($AS_4$)

**चर्चा :** जर झाडे नसली तर काय होईल? त्याचा प्रभाव कसा असेल? आपली जबाबदारी काय असेल?

SCERT TELANGANA

पाठ 6

# आहार गोळा करण्यापासून उत्पत्तीपर्यंत - आदिमानव

तुमच्या कुटुंबाचा आहार कसा आहे हे तुम्हाला माहीत आहे का? आहार उत्पत्ती कशी होते. त्यासाठी कशा प्रकारच्या अवजारांचा उपयोग करतात. त्या अवजारांचा शोध कोणी लावला माहीत आहे का?म

कोणत्याही प्रकारचे आहार पीक पिकवताना फक्त प्रकृतीमध्ये मिळत असलेल्या आहाराचे सेवन करून जगत असलेल्या प्रजेच्या उपजिविकेची तुम्ही कल्पना करू शकता का?

काही हजार वर्षांच्या पूर्वी जंगलात जगत असलेल्या माणसाच्या उपजिविकेची माहिती मिळवण्यासाठी ह्या खालील दिलेल्या चित्रांचे निरिक्षण करा.



*चित्र 6.1 आदिमानवाचे जिवनमान*

SCERT TELANGANA



*चित्र 6.2 आदिमानवाचे आहार गोळा करणे*

- वरील चित्रामध्ये मानव आहार कसा मिळवित आहे?
- त्यांनी कशा प्रकारचे वस्त्र घाातले आहेत?
- वरील चित्रामध्ये पाच किंवा सहा प्रकारचे अवजार आहेत त्यांना ओळखू शकता?
- दुसऱ्या चित्रामध्ये स्त्री, पुरुष काय आणत आहेत पाहून सांगा?
- ते कोणत्या प्रकारचे काम करत आहेत? वर्णन करा.

आहार गोळा करणे आणि शिकार -

काही हजारो वर्षांखाली मानव जंगलातील प्रकृतीकडून मिळालेली फळे, फुले, जंगली धान्य स्वीकृत करत असत.

त्यासोबत पक्ष्यांना, प्राणींना शिकार करून जीवन जगत होते. त्यांना पिकांची उत्पत्ती, प्राण्यांना पाळीव प्राणी करून घेणे त्यांना माहीत नव्हते.


- तुमच्या आहारामध्ये जंगलातील प्रकृतीपासून मिळणाऱ्या अन्नाची नोंद करून ठेवा?
- खाण्याच्या उपयोगात आणण्यासाठी त्यांना कसे तयार करतात?

तुम्ही जर जंगलात गेलात तिथे खाण्याच्या आहाराना कोणत्या प्रकारे ओळखू शकता? याविषयांची माहिती होण्यासाठी कोणते फळ खाऊ शकतो. ते कोणत्या मोसमात पिकतात तुम्हाला माहीत असावे. त्यांना कसे खावे ? कच्चे खावे ? उकडून खावे ? कूट करून खावे? नसेल तर काही पदार्थांमध्ये मिसळून कूट करून खावे? पाण्यात भिजवून खावे? सर्व विषयांची माहिती तुम्ही मिळवावी. शिकार करण्याच्या अगोदर शिकारी त्या प्रांतातील राहणाऱ्या प्राणींची सवय, जीवनशैलीविषयी माहिती मिळवत, पाण्यासाठी प्राणी कोणत्या प्रांतात येतात? त्यांच्या शरीरभागाचे उपयोग माहिती असणारे आदिमानव आपल्या पूर्वजांच्याद्वारे माहिती मिळवून त्यांच्या संततीला सांगत होते.

- आजच्या मानवात आणि आदिमानवातील आहारातील फरके, समानत्व कल्याणाच्या आधारे स्पष्ट लिहा.
- आदिमानव कोणते वस्त्र परिधान करीत होते तुम्हाला माहीत आहे काय? तुम्ही आता कपडे घालता तशाच प्रकारचे कपडे घालत होते काय?


**दगडी हत्यारे**

आज आपण यंत्राचा वापर करीत आहोत. 341 ट्रॅक्टर, कारागीर परिश्रम, यंत्रे उपयोगात आणत आहेत. आदिमानव दगडे, हाडे, लाकडे यापासून बनवलेल्या हत्यारांचा वापर करीत असत. मोठ्या दगडांना दुसऱ्या एका दगडाच्या साहाय्याने मारून मारून तीक्ष्ण अवजार बनवित होते. या अवजाराचा वापर मांस कापण्यासाठी, जमिनीतील खाद्यपदार्थ खोदून काढणसाठी, प्राणीच्या शिकारीसाठी अधिक उपयुक्त ठरत असत.



*चित्र 6.3 दगडी हत्यारे कसे बनविले असतील वर्णन करणारे चित्र.*

कित्येक हजारो वर्षांच्या नंतर ते दगडापासून छोटे हत्यारे व अती तीक्ष्ण हत्यार बनवण्याला सुरुवात केली. अशा हत्यारांना सूक्ष्म दगडी परिकर असे म्हणत असत. यांना लाकडांची किंवा हडीची मूठ लावून तलवार, बाण, विळे यासारखा उपयोग करीत होते.हे परिकर जमिनी खोदकामासाठी झाडांना तोडण्यासाठी, काढण्यासाठी जंतूचे चमडे काढण्यासाठी त्यांना स्वच्छ करून कपड्याचा वापर करण्यासाठी वापरत.



*चित्र 6.8 सूक्ष्म दगडी परिकराचा उपयोग*




*चित्र 6.4 (अ) महेबूब नगर जिल्हा अम्राबादमध्ये मोठ्या प्रमाणात असलेली पुरातन मोठी दगडी शस्त्रे. चित्र (ब) पोट्टी श्रिरामुलु नेलुर जिल्हा कामाकुरुमध्ये असलेली पुरातन दगडी कुऱ्हाड*



चित्र 6.5 महेबूबनगर जिल्हा अम्राबादमध्ये बाहेर पडलेला दगड



*चित्र 6.6 नलगोंडा जिल्हा एलेश्वरमतील बाहेर पडलेल्या दगडी कोरीव पाती (ब्लेड) शस्त्र*



*चित्र 6.7 घनपूर, आदिलाबाद जिल्हा येथे सापडलेले सूक्ष्म दगडी शस्त्रे*

SCERT TELANGANA

त्या काळातील दगडी अवजारे मिळालेल्या प्रांताद्वारे आदिमानव जीवनपद्धती त्यांनी जीवन जगलेल्या प्रदेशाबद्दल माहिती मिळवू शकतो.

- कोणकोणत्या कामासाठी आजचे लोक दगडाचा वापर करत आहेत?

**अग्नी**

अग्नीचा शोध व त्याच्या उपयोगामुळे आदिमानवाच्या जीवनात फार मोठा बदल घडून आला. बहुधा त्यांनी दगडावर दगड घासून अग्नीचा शोध लावला असावा. ते अग्नीचा वापर कच्चा मांसाला भाजून खाण्यासाठी करू लागले. अग्नीला अनेक प्रकारे उपयोगात आणू लागले होते. क्रूर प्राण्यांपासून बचाव करणसाठी व त्यांना पळवून लावण्यासाठी अग्नीचा उपयोग करू लागले होते.

- आज अग्नीचा कशासाठी वापर करीत आहोत?
- गारगोटीचा उपयोग करून एकमेकांवर घासून त्याच्याखाली कापूस किंवा वाळलेली पाने ठेवून जाळ लावा ?

**संचार जीवन**

आदिमानव लहान लहान समूह बनून गुहामध्ये झाडे किंवा दगडाच्या सावलीत निवारा करीत होते. घरे निर्माण करीत नव्हते. का प्रांतावरून दुसऱ्या प्रांतावर संचार जीवन उदरनिर्वाह करीत होते. एका प्रांताहून दुसऱ्या प्रांताला निरंतर प्रवास करणाऱ्यांना संचारजिवी असे म्हणतात.

पुरातन काळातील लोक लहान गटांमध्ये गुफा, मोठी दगडे किंवा झाडांखाली राहत होते. कारण त्यांचे जीवन भटके असायचे ते कधीचे एक ठिकाणी स्थीर आवास करीत नव्हते. म्हणुन यांचे जीवन भटके होते. यालाच भटके जीवन असे म्हणतात.

- ◆ कोणत्या कारणामुळे आदिमानव एका प्रांताकडून दुसऱ्या प्रांताला संचार करीत होते तुम्ही कल्पना करू शकता काय?
- ◆ एका समूहातील लोक एका प्रांतातील फळांचा, प्राण्यांचा संपूर्ण उपयोग केला तर काय होईल?
- ◆ प्राणी एकाच प्रांतात निवास करतात का? किंवा ते संचार जीवन का जगतात ते सांगा?
- ◆ संपूर्ण वर्षभर एकाच प्रांतात पाणी मिळू शकते?
- ◆ आता पण पुष्कळ लोक एका प्रांताहून दुसऱ्या प्रांताला बदलत आहेत असे बदलत असतेवेळेस ते आपल्यासोबत कोणकोणत्या वस्तू घेऊन जातात?
- ◆ आदिमानव एका प्रांताहून दुसऱ्या प्रांताना उदरनिर्वाहासाठी जातेवेळेस त्यांच्यासोबत कोणत्या वस्तू घेऊन जात होते?
- ◆ आजचा मानव संचार जिवन न जगता घरे बांधून तिथेच स्थायिक राहतात त्याचे कारणे सांगा?



*चित्र 6.9 पांडवूला गुट्टामधील गूफा चित्र (रेगोंडा, जयशंकर जिल्ह्य)*

SCERT TELANGANA

**चित्रकला**

विविध प्रांतातील गुहाच्या भिंतीवर, दगडी स्थावरावर आदिमानव जीवजंतूंना, त्यांच्या शिकारीच्या घटनांना चित्रीत करीत होते. ते काही प्रकारच्या दगडाचे पीठ करून त्यात प्राण्यांची चरबी मिसळून चित्रे काढण्यासाठी पाहिजे ते रंग तयार करीत होते चित्रे काढण्यासाठी उपयोग करीत होते. बहुधा असे चित्रीकरण करण्यासाठी जातीची काही प्रमुखता असू शकते.

- तुमच्या प्रांतातील लोक विविध सण व त्यांची प्रामुख्यता चित्राद्वारे, रांगोळीद्वारे दाखवतात काय?

**तेलंगानातील पाषाण युग**

प्राचीन ऐतिहासिक काळातील लोक राज्याच्या विविध भागात राहणारे यांच्याकडे दगडाचे हत्यारे सापडली. यापैकी कांही म्हणजे जयशंकर जिल्ह्यातील, एककला, नागरकर्नुल जिल्ह्यातील अमराबाद, नलगोंडा जिल्ह्यातील इलेश्वरम, पेद्दापल्ली जिल्ह्यातील रामगुंडम, आदिलाबाद जिल्हयातील उटनूर, निजामाबाद जिल्हयातील आरमूर, रंगारेड्डी जिल्ह्यातील मंजिरा दरी, बद्राद्री जिल्ह्यातील चिराला.


- तुमच्या शिक्षकांकडून तुमच्या जिल्ह्यातील जवळपास असलेल्या अशा ठिकाणांना भेट द्या. जवळपास असलेल्या संग्राहालयात अशी दगडी हत्यारे पहा.

**माइक्रोलीथीक आणि दगडावरील कोरीव चित्रे**

तेलंगानातील ऐतिहासिक काळातील लोकांनी मोठ्या प्रमाणात चित्रे आणि माइक्रोलिथ केलेले आजही सापडतात.

वरंगल जिल्ह्यातील पांडवूला गुट्टा जवळ तिरुमलगीरी जवळ पहाडाच्या भिंतीवर काढलेली अशी चित्रे सापडतात. जगाच्या खडकावरील कला भागात तेलंगाना राज्य एक आहे. पुर्व ऐतिहासिक काळापासुन ते काकतिय किंवा विजयनगर साम्राज्यापर्यंत जवळजवळ 12000 ते 500 वर्षांपुर्वी.

चित्र. 6.10 हे पांडवूला गुट्टा येथील खडकावर काढलेले चित्र आहे. तुम्हाला काय दिसते? त्याचे वर्णन करा. अलीकडच्या काळात तुम्ही अशी चित्रे पाहिलात का? तुम्ही विचार करा की, पुरातन चित्रांवरुन आता चित्रे का काढतात?




*चित्र 6.10 निलाद्री टेकड्या, रामचंद्रापूरम येथील पेनु बल्ली मंडळ, खम्मम पाषाण युगातील गुफेच्या भिंतीवरील चित्रे*

SCERT TELANGANA

- चित्राचा रंग कोणता आहे? तुम्ही सांगू शकता का त्यांनी त्यात कोणते रंग आणि ब्रश वापरले आहेत?
- खालील नकाशा पाहुन तुमच्या जिल्ह्यात दगडावरील कोरीव चित्रे आहेत का ओळखा?

दगडावरील कोरीव चित्रांमध्ये शिकारी, युद्धांची चित्रे, मध गोळा करणे, नृत्य, गायन इ. दिसून येतात. या चित्रांतील प्राणी बिसोन, म्हैस, काळवीट, हरिण, हत्ती, जंगली शेळी, वाघ, मगर, विंचू, साळींदर मासे (पर्कुपाइन), खेकडा, बेंडूक, सरपटणारे किटक, मासा, कासव, पाल, माकड, अस्वल आणि कुत्रा. याचित्रांमध्ये पक्षी जसे, घार, गिधाड, बगळा, मोर, कावळा, मधमाशी, फुलपाखरु हे सुद्धा आढळतात. त्याच बरोबर भूमीतीय चित्रे आणि मानवाच्या आकृत्या सुद्धा दिसतात. हत्यारांमध्ये धनुष्य-बाण, तलवार, भालासुद्धा आढळतात.

SCERT TELANGANA




*नकाशा-1 तेलंगानातील प्रमुख शिल्प स्थळे दर्शविणारा नकाशा*

**आजच्या काळाचे शिकारी**

आज सुद्धा जगामध्ये काही समूहाचे मानव शिकार करणे किंवा आहार गोळा करणेद्वारे जीवन जगत आहेत आपल्या राष्ट्रामध्ये काहीजण फासी पारधे व भटक्या विमुक्त जाती अशा प्रकारचे जीवन आजही जगत आहेत. त्यांची जीवनपद्धतीविषयी माहिती करण्यासाठी आजही काही संशोधक त्यांच्यासोबत जीवन जगत. त्यांच्याविषयी अध्ययन करीत आहेत. कित्येक वर्षांच्या पूर्वी आदिमानव कशा प्रकारे जीवन जगत होते त्यांच्याविषयी माहिती मिळवण्यासाठी उपयोगी पडत आहे.



*चित्र 6.11 अ*



*चित्र 6.11 ब*



*चित्र 6.11 अ, ब, क चेंचू शिकारी*
*80 वर्षांपूर्वीचे चित्र*


**समान जीवन**

आदिमानव छोटे छोटे समूह बनवून संचार जीवन जगत होते म्हणून हे तुम्हाला माहिती आहे. तेव्हा स्त्रीपुरुष मिळून मिसळून शिकार करून आहार मिळवित होते. आहार मिळवण्यासाठी स्त्रिया, मुले फार उत्साहाने भाग घेऊन लहान जीवजंतूंना शिकार करून आहाराला मिळवित होते. मोठ्या प्राण्यांना शिकार करण्यासाठी पुरुष कित्येक दिवस योजनाद्वारे पकडत होते.

त्या काळातील शिकारी केलेल्या शिकारीना त्यांच्या समूहातील सर्वजण लोकांना वाटत होते. मांस, मासोळी, फळे, पाने, जमिनीतील मुळी, गडे आणखी जंगलातील अन्नधान्य साठवून ठेवण्यासाठी त्यांच्याकडे

वस्तू नव्हत्या. परंतु आजच काळात आपण खाणारे अन्नधान्य, दाळी लवकर खराब होत नाहीत. कारण त्यांना कित्येक महिने खराब होऊ नये म्हणून भरणी, डबे, मिळत आहेत. परंतु आदिमानवांना अशा प्रकारची वस्तू मिळत नव्हती. अशा शिकारींना किंवा जंगलात मिळणाऱ्या आहारांना एकमेकांशी वाटणी असल्यामुळे त्यांच्यामध्ये धनवान, गरीब असे भेदभाव राहत नसत एकमेकांशी समान राहत होते. सर्वजण मिळून मिसळून काही मुख्य निर्णय घेत होते.

आदिमानव जंगलातील प्राण्यांना शिकार करतेवेळेस जंगलातील वृक्षे, प्राणी, नदी, पर्वतावर अपार गौरव करीत होते. त्यांना पुरेसा आहार मिळवण्यासाठी याची दररोज पूजा करीत होते.



*चित्र 6.12 शिकार केलेल्या हरिणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत असलेले आदिमानव*

आहारासाठी शिकार करणे किंवा गोळा करणेद्वारे जीवन जगत असलेल्या प्रस्तुत लोकांना पाहून आदिमानवाच्या जीवनपद्धतींची आपणास माहिती मिळविता येते.

- आदिमानव कशामुळे आहारांना जास्त काळ टिकवून ठेवू शकला नाही ?

- त्या काळातील शिकारी आहाराची वाटणी केली नसती तर काय होत होते कल्पना करू शकता काय ?
- त्यांच्यात गरीब कोणीच नाही कारण सांगू शकता काय ?
- आदिमानवाने केलेल्या शिकारींना, पिकविलेल्या पिकांना आजचा मानव कृतज्ञता सांगण्यामध्ये काही समानत्व आहे काय ?

**आहार गोळा करण्यामधून आहार उत्पत्ती**

कित्येक हजारो वर्षांपर्यंत मानव शिकार आणि गोळा करणेद्वारे आहार मिळवित होते. म्हणून माहिती मिळवली आहे. त्यानंतर केवळ 12,000 वर्षांपासून मात्र मानव आहारांना पिक पिकविण्याद्वारे संपादन करीत आहेत. त्याचे जीवन कसे बदलेल माहिती मिळवून घेऊ या.

जवळ जवळ 12000 वर्षांपूर्वी जगातील वातावरणात मोठा फरक आढळून आला आहे. उष्णता विपरीत वाढून गेली. त्यामुळे काही जंगलातील भाग, गवताळ जमिनी बनून गेल्या आहेत. ह्या गवताळ जमिनीतून जनावरांना, शेळ्यांना, मेंढ्यांना आवश्यकतेनुसार चारा मिळतो आहे.

**पिके पिकविणे - प्राण्यांचे पोषण**

क्रमाने आदिमानवातील पुरुष, स्त्री, मुले कोणत्या प्रांतात सुपीक जमीन आहे ? चांगल्यापैकी पिके पिकवू शकतो. बियांपासून नविन झाडे कसे उत्पन्न होतात असा शोध घेऊ लागले. त्यासाठी झाडांना पशु, पक्षी व प्राण्यांपासून जपत होते. त्यामुळे झाडे व झुडपे वाढून पिक पिकविले जात होते.

विशिष्ठ प्रांतामध्ये आहार पिकविण्यासाठी जमीन उपयुक्त पडेल अशा ठिकाणी लोक वस्ती करू लागले.

SCERT TELANGANA

अशा भूमीवर विविध प्रांतात पिके पिकविणारे विविध समूहांना शेतकरी समूह म्हणून ओळखू लागले.

विविध प्रांतातील लोक तांदूळ, गहू, बाजरी, ज्वारी, दाळी, तृणधान्ये जमिनीतील मुळे, कंदमुळे, तरकारी पिकविणे शिकून घेतले होते. अनेक प्रकारचे पीक व भाजीपाला कसा पिकवावा हे एकमेकांपासून माहीत करून घेत होते. अशा प्रकारे त्यांनी खाऊन उरलेल्या आहाराला, त्यांच्या राहत्या ठिकाणाजवळ वाढलेल्या गवताला, शाकाहारी प्राण्यांना चारून त्यांना पाळीव प्राणी करणे सुरू झाले. त्याच प्रकारे पाळीव प्राण्यांचे क्रूर प्राण्यांपासून रक्षण करीत होते. यामुळे प्राण्यांचे पालनपोषण केल्यामुळे त्यांना मांस, प्राण्यांचे कातडे, दूध इत्यादी मिळत होते. त्यांनी क्रमाने बैलांचा, गाढवांचा शेतीत ओझे उचलण्यासाठी वापर करीत होते.

**पालनपोषण करणे**

आदिमानव निरोगी प्राणी, झाडांची निवड करून त्याद्वारे लाभ मिळवित होते. ते येणाऱ्या ऋतुमध्ये पेरण्यासाठी उपयुक्त बियांना निवड करीत होते. अशा प्रकारे पाळीव प्राणी आणि पिके जंगली झाडे व जंगली प्राणी यांच्यात फरक राहात होता. निवडलेल्या बियापासून पीक पिकविणेपर्यंत झाडाचे संरक्षण करीत होते. अशा प्रकारे त्यांना उपयोगात पडणाऱ्या प्राण्यांचा उपयोग करीत होते.

या पद्धतींना पोषण पद्धत असे म्हणतात. अशा प्रकारे प्रत्येक पिढीमध्ये कित्येक शेकडो वर्षे लोक त्यांना उपयोगात पडणाऱ्या झाडांना, प्राण्यांना पालन पोषण करीत होते. येणाऱ्या ऋतुपवनात मृग नक्षत्रात पिके पिकवण्यासाठी अनुकूल आजचा शेतकरी सुद्धा आदिमानवासारखे बियाणे निवडत आहे हे तुम्हाला माही आहे ना?

- आजचा शेतकरी पिकांचे कसे संरक्षण करीत आहे तुम्हाला माहीत आहे काय?
- लोक त्यांच्या पाळीव प्राण्यांचे कसे संरक्षण करीत आहेत?
- आदिमानवाप्रमाणेच आजचा शेतकरी बिज प्रक्रिया करीत आहे काय?

परंतु त्या काळातील लोकांना सर्व प्रदेशात पिके पिकविणे, प्राण्यांना पाळीव प्राणी करून घेणे हे करता आले नाही. पुष्कळ लोक जंगलातील प्राणी त्यांची शिकार करून आहार मिळवित होते. शेतीसुद्धा सर्वजण करीत नव्हते. काही जागी जंगली प्रदेशात शेती व्यवसाय आणि प्राण्यांना शिकार करणे, पिके पिकवणे सुद्धा होत होते. त्यांच्यातील काही जण जमिनीला नांगरून खत उपयोगाद्वारे सुपीक जमीन बनवू शकतो. यामुळे प्रत्येक वर्षी सुपीक जमिनीसाठी दूर प्रांतांना जाण्याची गरज नाही हे ओळखून घेतले होते. यामुळे ते व्यवसायामध्ये प्राण्यांना जमीन नांगरण्यासाठी पिकांचे दळणवळण करण्यासाठी उपयोगात आणू लागले. त्यामुळे सामूहिक व्यवसाय अंमलात आला होता.

***स्थिर जीवन***

पिकांना पाणी देण्यासाठी, प्राणी आणि पक्षी यांचे संरक्षण करण्यासाठी, व जिथे सुपीक जमीन आहे तिथेच लोक वस्ती करून कायमचे राहू लागले. पिक कापण्यासाठी आल्यानंतर आपण हे सर्व एकाच दिवशी खाऊ शकत नाही म्हणून त्याची साठवण करण्यास सुरुवात करू लागले. पिकवलेल्या धान्यांना सहा महिने किंवा वर्षभर एकाच ठिकाणी ठेवून खराब होऊ नये याची काळजी घेऊ लागले.

SCERT TELANGANA

एकाच ठिकाणी घर बांधून धान्याची साठवण करू शकतो. या पिरिस्थितीत स्थिर जीवनासाठी मार्ग मिळाला.

स्थिर जीवनामुळे ते दगडांनी, लाकडांनी किंवा मातीने घरे निर्माण करण्यास सुरुवात झाली. दूध, पाणी साठवण करण्यासाठी स्वयंपाकासाठी भांड्याची गरज भासू लागली. त्यामुळे विविध प्रकारे मडके बनविण्यासाठी मार्ग मिळाला. भांड्यांवर सुंदर चित्रे काढू लागले. स्वयंपाकासाठी चूल, धान्यांना कूट करण्यासाठी मुसळाची आवश्यकता भासू लागली.



*चित्र 6.13 पुरातन मडके - यामध्ये काय ठेवलं असावं असं तुम्हाला वाटतं ?*



*चित्र 6.14 12000 वर्षांपूर्वी साठवण केलेल्या आहारांचा पुरातन शास्त्रज्ञांनी शोध लावलेले अन्न.*

त्या काळातील शेतकरी झाडांना, फाट्यांना तोडण्यासाठी आवश्यकतेनुसार हत्यारे तयार करू लागले होते. त्यांना नविन दगडी परिकरे, पुरातन वस्तू याबद्दल शास्त्रज्ञांनी सांगितले.

त्या काळातील शेतकरी एका दगडापासून दुसऱ्या दगडाच्या सहाय्याने अवजारे बनविणे व त्याला तीक्ष्ण करू लागले. अशा तीक्ष्ण केलेल्या कुऱ्हाडींना लाकडीचा दांडा बसवू लागले. अशा नवीन अवजाराने शेती केल्यामुळे त्यांच्या जीवनपद्धतीत फार मोठी क्रांती घडून आली होती. या नवीन दगडी अवजाराने शेती केलेल्या काळाला नविन शिलायुग किंवा नविन रातीयुग असे म्हणतात.



*चित्र 6.15 मेहबूब नगर जिल्हा अम्राबादमध्ये सापडलेल्या लाकडांची दांडा बसवलेली कुऱ्हाड*



*चित्र 6.19 महबूब नगर सेरूपली मध्ये सापडलेल्या नवीन शिलायुगकाळातील दगडी अवजारे अधार : आंध्र प्रदेश राष्ट्र पुरातन संग्रहालय (म्युझियम) हैद्राबाद*

SCERT TELANGANA

- आदिमानव धान्य साठवण करण्यासाठी काय काय करीत होते?
- पिक पिकविणारे लोक त्याच प्रदेशात कशासाठी निवास करीत होते.
- आदिमानव निवास करीत असलेल्या झोपडीचे चित्र कल्पना करून रेखाटा. तुम्ही आता राहता ते घर आणि त्यांची झोपडी यातील फरक क्रमाने लिहा?

भारत देशामध्ये आदिमानव प्रारंभ व्यवसाय निशाणी सुमारे 10000 वर्षांपूर्वी सापडले. बलुचिस्थानामध्ये सुमारे 5000 वर्षांपूर्वीची सापडते. काश्मीरमध्ये 4000 किंवा 5000 वर्षांपूर्वी बिहारमध्ये बाहेर पडलेल्या निशाणी आपणास सापडतात.

आदिमानव प्राण्यांचे पालनपोषण करण्याचे निशान दक्कन पठार आंध्रप्रदेश, कर्नाटक राष्ट्रांच्या सरहद्दीमध्ये सापडते. या राष्ट्रामध्ये अनेक प्रदेशात मोठ्या प्रमाणात राखेच्या ढिगांचा शोध लावला.

पुरातन शास्त्रज्ञांच्या मते 5000 वर्षांपूर्वी आदिमानवाने या प्रांतामध्ये प्राण्याचे पालनपोषण केल्याची माहिती मिळते. ते काही प्रत्येक प्रदेशात कुंपण करून जनावरांना ठेवत होते. त्यांचे शेण वाळवून उकंडे बनवित होते. नंतर या उकंड्यांना सणाच्या दिवशी जाळून राख करीत होते. अशा प्रकारे ज्या काळी निर्माण झालेल्या राखेचे ढीग सध्या महबूब नगर, कर्नुल, अनंतापूर पालवायीमध्ये बाहेर पडले आहेत. या राखेसोबत नविन पाषाण युगाच्या संबंधित दगडी कुऱ्हाड, दगडी टोपले, मडके, तुकडे इत्यादींचा शोध लागला आहे. याप्रकारे आदिमानवांनी पिक पिकविणे, स्थिर निवास, ग्राम समुदाय निर्माण करण्यासाठी त्यांना शेकडो वर्षे लागले असावेत.

### *तेलंगानातील पाषाण युग*

अनेक पाषाण युगातील भूभाग वरंगलच्या खेड्यात आणि शहरात जनागाव, जयशंकर, सिद्दीपेट, नागरकर्नुल, करीमनगर आणि आदिलाबाद जिल्ह्यात जमिनीच्या खडक सापडले.

वरंगल जिल्ह्यातील पालकोंडा येथे उत्खनन मातीची भांडी, मॉक्रोलीथस, धान्य साठवण करण्याचे वस्तु सापडले जवळजवळ 3300 वर्षापासुन लोक राहत आहे, असा अंदाज आहे.

महत्त्वाचे शब्द

आदिमानव

दगडी अवजारे

सूक्ष्म दगडी अवजारे

भटके जीव

समान जीवन

पाळीव करून घेणे

पशुपालक

तत्कालीन व्यवसाय

स्थिर जीवन

नविन शिलायुग

पुरातन शास्त्रज्ञ


SCERT TELANGANA

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. आदिमानवांनी कपडे कशासाठी घातले नाहीत?
2. फळे कापण्यासाठी तुम्ही प्रस्तुत कोणत्या प्रकारचे उपकरण उपयोग करीत आहात? ते उपकरण नसेल तर तुम्ही काय करता?
3. आदिमानवाने वापरलेली अवजारे व नवीन युगातील अवजारे यातील फरक सांगा?
4. आदिमानव एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात कशासाठी भटकत होता? प्रस्तुत मानव संचार जीवन - आदिमानव संचार जीवन मधील फरक /समानत्व सांगा?
5. खाली दिलेल्या दगडी चित्रकला स्थळांना आंध्रप्रदेश नकाशात दाखवा?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ) | आसिफाबाद | ब) | पांडवूला गुट्टा | क) | कोकापेट |
| ड) | दुर्गम | इ) | रेकोंडा | फ) | रामचंद्रापूरम |


6. नविन शिलायुग व्यवसाय करणारे, पशुपोषक प्रस्तुत आधुनिक व्यवसाय करणारे पशुपोषक मधील फरक सांगा?
7. आदिमानवांचे पाळीव प्राणी, व्यवसाय उत्पत्तीची नोंद तयार करून त्यांच्याविषयी काही वाक्ये लिहा?
8. स्वयंपाकासाठी चूल, उखळ, मुसळ नसेल तर आपण खाणाऱ्या अन्नावर कशाप्रकारे प्रभाव पडेल सांगा?
9. पुरातनवास्तू शास्त्रज्ञांना विचारण्यासाठी पाच प्रश्न तयार करा?
10. या खाली दिलेल्या चित्रांत अनेक दृश्य आहेत. यातील शिकारीवर आधारीत समाजाचे आहे. तसेच शिकारी समाज किंवा व्यवसाय समाज असलेल्या संयुक्त संज्ञांना ओळखा. त्यांना बरोबर संज्ञा लावून विभाजन करा?



11. आदिमावांना पशुपालन करणे सहज सोपे होते हे तुम्ही कसे सांगु शकाल?
12. पान क्र.12 ते 19 व्या पानावरील पहिला परिच्छेद वाचुन स्पष्टीकरण करा?

**कृत्य**

खालील उभे-आडवे शब्द कोडे पाहून डब्यात भरा.




***सुचनाः***

**आडवे शब्द**

1. प्राचीन काळातील लोकांचे निवासाचे ठिकाण आहे. (5)
2. हे लोक नेहमी एका जागेहून दुसऱ्या जागी भटकतात. (6)
3. बदलती शेती (4)
4. प्राचीन काळातील लोकांनी तयार केलेले दगडी हत्यार (7)
5. प्राचीन काळातील लोकांनी त्यांची हत्यारे बनविण्यासाठी याचा वापर केला (4)

**उभे शब्द**

1. आजच्या काळात या लोकांना शिकार गोळा करणे म्हणतात. (8)
2. कठिण दगडापासुन तयार केलेले लहान औजार (9)
3. हे प्राणी जड ओझी आणि शेतातील औजारे वाहुन नेतात. (7)
4. प्राचीन काळातील लोक खाण्यासाठी हे गोळा करत. (5)
5. प्राण्यांचे मांस याच्या सोबत भाजून खात (4)

## ***प्रकल्प कार्य***

तुमच्याजवळ असलेल्या दगडी चित्रकला स्थळांची माहिती मिळवून तुमच्या वर्गातील विद्यार्थीसोबत पाहून त्या विषयीचा एक अहवाल तयार करा.

SCERT TELANGANA

पाठ 7

# आजची शेती

वेंकटापूर गावातील भुईमुगाचे पीक काढणीस आले नोव्हेंबर अखेर सदर पिकाची पेरणी करण्यात येते. तथा फेब्रुवारी अखेर पिकं काढली जातात. आम्ही वेंकटापूर गावाला मुख्य रस्त्याने जाताना वाटेत आम्हाला तिघी महिला भेटल्या. रमा, लक्ष्मम्मा आणि पद्मा अशी त्यांची नावे. बाजूच्या शेतात त्या न्याहारी करीत होत्या. आम्ही त्यांच्याशी चर्चा केली.

## वेंकटापूर – भुईमुगाच्या शेतातील कामगार

भर दुपारच्या तळपत्या उन्हात बसून झाडापासून शेंगा तोडण्याचे काम फारच जिकीरीचे आहे. आमच्या शेतमालकाचे नाव रवी. सायंकाळपर्यंत तोडलेल्या शेंगाच्या ढिगावरून आम्हाला मजुरी मिळते. आम्हाला कामाचा वेग वाढवावा लागणार आहे. अन्यथा दिवसभर काम करून पन्नास ते साठ रूपये मजूरी सुद्धा मिळणार नाही. असे लक्ष्मम्मा बोलताना म्हणाली.



*चित्र 7.1 भुईमुगाच्या शेंगाची काढणी*

सध्या तुम्हाला अविश्रांत काम असल्याचे दिसते, मी म्हणालो. होय. पण अशा प्रकारचे काम शेतात काही थोडे दिवसच असते. नंतरच्या काळात आम्ही सरकारी कामे किंवा काहीच नसेल तर घरी राहतो. असे पद्मानं सागिंतले. दैनंदिन जीवनातील वस्तू, पुस्तके, मुलांची शाळेची फीस इत्यादी सर्वच मोठ्या प्रमाणात वाढत असताना आमची मजूरी मात्र वाढत नाही असे लक्ष्मम्मा भोळे पणाने म्हणाली.

साधारणत: महिला मजूर दररोज सत्तर ते ऐंशी रूपये तर पुरुष मजूर 120 रूपये मजूरी मिळवतो. पेरणी, निंदणी, खुरपणी, पिकांची कापणी अशावेळी हीच मजूरी महिलांना 120 ते 150 पर्यंत मिळते तर पुरुषाला 150 ते 200 रूपयापर्यंत मिळते.

सरकारी योजनेत काम करणाऱ्या मजूरांना महिला-पुरुषांना समान म्हणजेच 120 रू. मजूरी मिळते. सरकारेत्तर कामे, जशी वाळू भरणे, विट भरणे किंवा ट्रॅक्टरमधून

SCERT TELANGANA

विट उतरवणे, यात जादा मजूरी मिळते. पुरुषांना 200 ते 250 रूपये तर महिलांना 200 रू. पर्यं मजूरी मिळते परंतु अशा प्रकारची कामे अत्यल्प असतात

शेतीशिवाय कामे मिळणे कठीण असते. बांधकाम क्षेत्रात काम करावयाचे तर शहरात जावे लागते. असे पद्मा विचार करीत बोलली.

आमच्या शेजारी गावात काही शेतकरी फळं, फुलांची शेती करतात. तेथे दररोज कामावर जाणाऱ्यांना थोडी जादा मजूरी मिळते. एखाद्या दिवशी अचानक कामावर गेल्यास ते कशी मजूरी देणार? वर्षातले काही दिवसच चांगली रक्कम मजूरीच्या रूपात मिळते. तरूण मुलींना मळ्यात काम देत नाहीत. मुलींना सोडून मला कसे जाता येईल असे लक्ष्मम्मा म्हणाली.

कोणत्याही प्रकारचे कौशल्य नसणारी सरकारी कामे आम्ही करतो. असे रमा म्हणाली. रमा, पद्मा, लक्ष्मम्मा सारखे अनेक गरीब मजूर कुटुंबाच्या पालन पोषणासाठी संघर्ष करीत आहेत. बाहेरच्या अनेक कामासोबतच घरची कामे जसे स्वयंपाक करणे, पिण्याचे पाणी आणणे, सरपण आदिंसह मुलांना शाळेत पाठवण्याची तयारी करणे हे कामंही महिलांनाच करावी लागतात. आंध्र प्रदेशत सुमारे 2/3 ग्रामीण कुटुंबे शेतमजूर म्हणून काम करतात. यातील अनेकांना फार थोडी स्वत:ची शेतजमीन आहे. उरलेल्यांना शेती नाही. शेतीत्तर कामातून जादा उत्पन्न झाले तरी तशी कामे ग्रामीण भागात मिळणे शक्य नसते. म्हणूनच वेंकटपूरमधील अनेक कुटुंबे शहराकडे स्थलांतरीत झाली.

- वेंकटापूर गावातील मजूर कोणकोणती कामे करतात?
- वर्षभरात मजूरांना कोणकोणती कामे मिळतात?
- विविध कामासंदर्भात स्त्री-पुरुषांच्या मजूरीत फरक का आला याबद्दल विचार करा?

**वेंकटापुराम गावातील छोटे शेतकरी** - वेंकटापूर - आम्ही शेतमजूरांची चर्चा करतांना पाहून शेतमालक रवी आमच्याशी बोलण्यास आला. त्याच्या शेतातील पिकांच्या कापणीसाठी तो दोन पुरुष मजूर तथा अनेक महिला मजूरांची नेमणुक करतो. ''भुईशेंगा तोडण्याच्या कामासाठी मी मजूरांचा वापर करतो. परंतु शेतीतील इतर कामे मात्र कुटुंबातील व्यक्तीच करतात. कधी कधी शेजाऱ्यांची मदत घेतो. असे रवी म्हणाला.

रवीची मुलगीही शेतात काम करीत होती. रवीला मुलीच्या महाविद्यालयीन शिक्षणाचा खर्च झेपावणारा नव्हता. म्हणूनच ती सध्या शेतात कामाला आली होती.

रवीला कुपनलिका आहे. त्याचा फायदा चार एकर जमीनीला होतो. पूर्वी त्याच्या शेताला तळ्याचे पाणी मिळत होते पण आता ते बंद झाले आहे. 75,000 रूपये खर्चून त्याने शेतात सुमारे पाच वर्षांपूर्वी कुपनलिका टाकली होती. त्यानंतर दोनतीन वर्षे त्याने वर्षाकाठी दोन पिके घेतली. गत दोन वर्षांपासून कुपनलिकाद्वारे पुरेसे पाणी मिळेनासे झाले. त्यामुळे तो आता वर्षाकाठी एकच पिक घेत आहे.


''खते आणि बियाणे खरेदीसाठी गावातील मध्यस्थांच्या मार्फत मी कर्ज घेतले आहे. ते कर्ज

SCERT TELANGANA

फेडण्यासाठी मी हे पीक बाजार भावापेक्षा कमी रकमेत त्यांना विकणे गरजेचे आहे. बाजारभाव जास्त असतो. शेंगाचे पिक त्यालाच द्यावे असे मध्यस्थाने अगोदरच दूरध्वनीद्वारे सांगितले'' असे तो म्हणाला. ''तुम्ही बँकेकडून कर्ज का घेत नाही'' असे मी विचारले.

बँक आम्हाला कर्ज देण्यास तयार नाही. गरज आहे तेव्हा आम्हास पैसा देत नाहीत. यामुळे आम्हाला दलालांवर आधारून रहावे लागते, असे रवी म्हणाला.

रवीसारख्या अनेक शेतकऱ्यांना खते, बि-बियाणे खरेदी करण्यासाठी कर्जाची आवश्यकता असते. बियाणे दर्जेदार नसणे, खते आणि किटकनाशके दर्जेदार नसतील तर त्याचा परिणाम उत्पादनावर होतो. उत्पादन घटल्याने शेतकरी कालावधीत कर्जाची परतफेड करू शकत नाहीत. कर्ज घेतलेल्या मध्यस्थाला किंवा सावकाराला शेतातील पिक कमी दराने विकावयाचा दबाव शेतकऱ्यांवर असतो. कर्जदार शेतकऱ्याच्या



*चित्र 7.2 खत शिंपतांना शेतकरी*

मालाचा भाव अगोदरच ठरविलेला असतो. यामुळे कुटुंबाच्या पालन पोषणसाठी आणखी खर्च करावा लागतो. यामुळे कर्जाचा भार वाढत जातो. कधी कधी पिकांचे उत्पादनही घटते. यामुळे शेतकऱ्यांच्या कष्टात मोठी वाढ होते.

### कंत्राटी शेती - (तहसील शेती)

काही शेतकरी मोठ्या उत्पन्नाच्या अपेक्षेने व शेतीतील समस्येतून बाहेर पडण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या पिकाची उत्पादने करतात. त्यासाठी विविध कंपन्याबरोबर करार करतात. ही पद्धती फारशी प्रचलित झाली नसली तरी आताशा आंध्र प्रदेशात काही कंपन्या भात, काकडी, ज्वारी, भुईशेंगा, कापूस, सोयाबीन, पामाईल, मिरची आदी पिकासाठी शेतकऱ्यांबरोबर करार करीत आहेत. अशा प्रकारच्या कंत्राटी शेती व्यवसायात शेतकऱ्यांना काही अटींचें पालन करावे लागते. सर्व प्रकारच्या सहाय्याबरोबरच आर्थिक सहाय्यही कंपनी देते. अगोदरच ठरलेल्या दराने त्या पिकाची खरेदी कंपनीमार्फत केली जाते. विक्रीतून आलेल्या रकमेतून भांडवल बाजूला काढून उत्पादनाचे वाटप केले जाते. या कृषी उत्पादनावर प्रक्रिया करून (चिप्स, टोमॅटो सॉस, औषधे इ.) कच्चा माल म्हणून वापरून त्याची निर्यात इतर देशांना केली जाते.

### कंत्राटी शेती

कंत्राटी शेतीचे दिवसेंदिवस प्रचलित वाढत आहे. नुकसान, कमी उत्पादन, सहन करण्याची तयारी शेतकऱ्यांची आहे. कंत्राटी पद्धतीत कृषी उत्पादन दर्जेदार नसेल तर कंपन्या त्या मालाची खरेदी करण्यास नकार देत आहेत. यामुळे दर्जेदार, पिकांच्या उत्पादनासाठी शेतकरी, मोठ्या प्रमाणत खते, रसायने,

SCERT TELANGANA

औषधे वापरत आहे. यामुळे दिवसेंदिवस भूगर्भ जलपातळी खाली जात आहे. याचा परिणाम भावी काळात होण्याची शक्यता जास्त आहे. अतिरेकी किटकनाशकांच्या वापरामुळे जमीनीचा कस कमी होणे, यासारख्या परिणमांनी अन्नधान्ये विषारी होत आहेत.

- लहान / छोटे शेतकरी पिक कापणीच्या वेळी मजूर बनण्याचे कारण काय?
- शेती उत्पन्नाद्वारे कुटुंबाच्या गरजा भागवण्याइतपत उत्पन्न छोटे शेतकरी करत आहेत का?
- लहान शेतकरी / मजूर मिळणारी मजूरी धान्याच्या स्वरूपात घेण्याऐवजी रोखीने लागत आहेत का?
- तुमच्या भागात कंत्राटी शेती असेल तर त्या शेतकऱ्याचे मनोगत जाणून घ्या.

## वेंकटापूर - छोटे शेतकरी शेतमजूर

भुई शेंगानी भरलेले एक ट्रॅक्टर एका झोपडीसमोर उभे होते. त्या घरातील रामूशी आम्ही बोललो. तो ही रवीसारखाच लहान शेतकरी होता.

''शेतीविषयी बोलायचे असल्यास मोठ्या शेतकऱ्यांडे जा'' असे त्याने सांगितले. ''तुम्हाला ट्रॅक्टर आहे म्हणून तुमच्याकडे बोलण्यासाठी आलो असे आम्ही म्हटले. ''हे ट्रॅक्टर माझे नाही. या गावातील विजयकुमार यांच्याकडे काम कररतो. ते आमच्या शेताना पाणीपुरवठा करतात. पैशाची गरज भासली तेव्हा त्यांच्याकडून कर्ज घेतो.'' असे तो म्हणाला.

गावातील तळ्यावर आधारीत असलेली 2 एकर शेती रामूकडे आहे. तळ्यातले पाणी अगोदर मोठे शेतकरी आपल्या शेतात वळवून घेतात. रामासारख्या शेतकऱ्यांना पाणी कोठून मिळणार ? विजयकुमारजवळ कर्जाऊ रक्कम घेऊन एक कूपनलिका घेतली. 500 फूट जमीनीत छिद्र पाडले तरी पाण्याचा पत्ता नाही. यामुळे त्याच्या स्वप्नांचा चक्काचूर झाला. त्याला आता कर्जाची रक्कम परत करावयाची आहे.

कुटुंबातील साऱ्या सदस्यांच्या साहाय्याने शेतात काम करतात. केवळ एकच पिक येते. रवीप्रमाणेच रामूसुद्धा कापणीच्या वेळेस काही मजूरांचे सहाय्य घेतो. गत काही वर्षांपासून कुटुंबाच्या पोषणासाठी लागणारे उत्पन्न शेतातून मिळत नाही. त्याच्या शेतातील उत्पन्न केवळ तीन महिनेच पुरते. अशा परिस्थितीत तो विजयकुमारकडे नोकरी करतो. याशिवाय शेतातील इतर अनेक कामाबरोबर तो ट्रॅक्टर चालकाचे कामही करतो. शेतमाल बाजारात विकणे, जमीनीची नांगरट करणे इत्यादी कामेही त्याला करावी लागतात.

## तेलंगानातील लहान शेतकरी

आपल्या राज्यात प्रती पाच शेतकऱ्याच्या मागे चार जण लहान शेतकऱ्यात मोडतात.

त्यांना स्वत:ची जमीन फारच कमी असते. जलसिंचनाच्या सुविधा नसतात. त्यांचे जीवन कर्जावरच चालते.

मोठे शेतकरी, बँक, मध्यस्थापैकी कोणा एकाकडे ही कर्जे घेतात. यामुळे शेतातील उत्पादन कमी दराने विकण्याचा दबाव असतो.

SCERT TELANGANA

आर्थिक बाबीच्या पुर्ततेसाठी कधी कधी शेतमजूर म्हणूनही कामे करावी लागतात.


- वर्षातून दोन किंवा तीन पिके घेणे रामूला का शक्य नाही.
- मोठ्या शेतकऱ्यांवर लहान शेतकरी कसे अवलबून असतात याचे उदाहरण रामच्या रूपात द्या.
- लहान शेतकऱ्यांनी बँकेकडून कर्ज घेण्यासाठी काय करावे ?
- एकमेकांच्या परिस्थितीच्या आधारे राम आणि रवी यांच्यातील साम्य तथा फरक स्पष्ट करा.

## मोठ्या शेतकऱ्यांशी चर्चा

राम आम्हाला त्याच्या मालकाकडे, वियजकुमारकडे घेऊन गेला. विजयकुमारचे घर मोठे होते. घराला मोठी आवारभिंत होती. घरातल्या रिकाम्या जागेत भातकापणीचे यंत्र, एक ट्रॅक्टर उभे होते. काही मजूर ट्रॅक्टरमधून शेंगाची झाडे उतरवून घेत होती. बाजूच्याच शेडमध्ये दहा ते पंधरा महिला शेंगा आणि झाडे वेगळे करण्याचे काम करीत होत्या. यावर्षी शेंगाचे उत्पादन चांगले झाल्याचे विजयकुमारने आम्हाला सांगितले.

''तुम्ही शेतमालाची विक्री केव्हा करता'' असे विचारले असता ''आताच नाही, काही दिवस पीक वाळविल्यानंतर मी मालाची विक्री करतो'' असे तो म्हणाला.

विजयकुमारला काँक्रीटने बांधलेले धान्य साठविण्याचे मोठे गोदाम होते. वाळवून विक्रीसाठी तयार असलेले भाताचे पीक तेथे सुरक्षित ठेवले होते. याशिवाय शेतीसाठी लागणारे खते, किटकनाशके



*चित्र 7.3 विजयकुमारचे घर*


SCERT TELANGANA

आणि काही छोटी यंत्रेही तेथे ठेवली होती. भुईशेंगा चांगल्या वाळल्यानंतर त्याची विक्री तो करतो. असे आम्हाला सांगण्यात आले. पिकाची कापणी झाल्याबरोबर विक्रीसाठी नेले तर दर कमी मिळतो. साधारणत: व्यापारीही वाळलेल्या शेंगांना चांगला भाव देतात.

विजयकुमारला एकंदर 25 एकर शेती असून तीत तीन कुपनलिका आहेत. त्यांचे भाताचे शेत तळ्याच्या काठाशी आहे. त्यांनी 25 लाखाचे कर्ज घेऊन एक भातकापणी यंत्र आणि एक मळणीयंत्र खरेदी केले ही यंत्रे ते इतरांना भाड्याने देतात. एकट्या वेंकटापूरचेच शेतकरी नव्हे तर परिसरातील अनेक गावातील शेतकरी याचा फायदा घेतात. त्याच्या घराजवळ असलेल्या भातशेती, ऊसाची शेती आम्ही पाहिली. अधिकच्या उत्पन्नामुळे त्यांनी अजून काही यंत्रे खरेदी केली. शेतात कुपनलिका टाकल्या. शेतकऱ्यांच्या जमिनी ते कंत्राटी पद्धतीने करतात. त्यांच्याकडे वीस पेक्षा जास्त संकरीत म्हशी आहेत. त्यामुळे त्यांचा दूधाचाही व्यवसाय आहे. गावातच त्यांचे एक खताचे दुकानही आहे. गावातील लहान शेतकरी शेतमजूरांना वेळेवर मदत करतात. त्या बदल्यात त्यांच्याकडून शेतात कामे करून घेतात. नजिकच्या शहरात त्यांना एक घर असून तेथे त्यांचे कुटुंब राहते.

विजयकुमारच्या वडीलांचे वय 75 वर्षे आहे. ते आमच्याशी बोलले. ''आताच्या काळात शेती करणे फार कठीण झाले आहे. असे ते म्हणाले. जुन्या काळात रासायनिक खतांचा वापर कमी होता. तरीही उत्पन्न जास्त होते. आता मात्र परिस्थिती उलटी आहे. रासायनिक खतांचा किटकनाशकांचा वापर जास्त होऊनही उत्पन्न मात्र घटत आहे. तसेच भूगर्भजलपातळी दिवसेंदिवस घटत आहे. यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतीची मशागत होत आहे. दर्जेदार खते, बियाणे वापरली तरीही पिकाचे उत्पादन मात्र समाधानकारक होत नाही'' असे ते म्हणाले. या प्रकारामुळे अनेक शेतकरी चिंताक्रांत झाल्याचे ते म्हणाले.

*चित्र 7.1*



- विजयकुमार जास्त किंमत येईपर्यंत कसा वाट पाहतो? तसेच लहान शेतकरी कमी किमतीत कशासाठी विकतात?
- विजयकुमारजवळ असलेल्या व्यवसाय अवजारे याची पट्टिका तयार करा. ही अवजारे कोणत्या प्रकारच्या शेतकऱ्याजवळ असतात?
- विजयकुमारला असलेले उत्पन्नाचे मार्ग सांगा?
- सध्याच्या व्यवसायापेक्षा पूर्व काळ व्यवसाय चांगला असे विजयकुमारच्या वडिलांच्या विचारास तुम्ही सहमत आहात काय? तक्रार करता काय? चार कारणे लिहा?
- तुमच्या शिक्षकांच्या सहाय्याने एका लहान शेतकऱ्यांची आणि मोठ्या शेतकऱ्यांची मुलाखत घ्या. व्यवसाय पद्धती, सिंचन जमीन पिकविण्याची पद्धत पिक कसे विकतात, कशा प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. अशा विषयांची तुलना करून पूर्ण माहिती तयार करा. या विषयांची वेंकटपूर गावातील विषयांशी तुलना करा.
- तुमची शाळा मोठ्या शहरात असेल तर तुमच्या कॉलनीमध्ये राहणाऱ्या वृत्तीची पटिका तयार करा. त्या वृत्तींना स्वावलंबन, तत्कालीक उद्योगी, शाश्वत उद्योगी असे तीन प्रकारचे वर्गीकरण करा. त्यांच्याविषयी तुमच्या वर्गात विस्तृतपणे चर्चा करा.

SCERT TELANGANA

## तेलंगानातील व्यवसाय

जसा जसा काळ जात आहे तस तसे तेलंगानातील शेतीमध्ये बदल घडत आहे. तरी पण साळ प्रथम पीक होय. आहारपीके, रागी, ज्वारी, मका, स्थानीय व्यापारी पीके, ऊस, कापूस, भुईमूग अशा प्रकारचे पिके पिकविणे प्रारंभ झाली आहे. या पिकांना बियाणे विकत घेणे, पाणीपुरवठा, औषधी खत, या सर्वांना मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता आहे. त्यासाठी शेतकरी कर्ज घेत आहेत.

अनेक दशकापूर्वी शेतकरी तळे, कालव्यावर आधारीत पाण्याचे स्त्रोत उपयोगात आणत होते. सध्या आंध्र प्रदेशातील अध्यिपेक्षा जास्त शेतकरी बोअरवेलवर आधारीत आहेत. त्या कारणामुळे भूगर्भ पाण्याची पातळी खाली जात आहे. पावसावर आधारीत शेतकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे.

हे सर्व लहान शेतकऱ्यांना पिकांचा नाश करण्यासारखे आहे. अशा कर्जांना पुन्हा परतफेड करण्याच्या स्थितीमध्ये नाहीत. पुष्कळ शेतकरी आपल्या जमिनी विकून मोलमजुरीसाठी मोठ्या शहरात स्थलांतर होत आहेत. सध्या पाच जणांपैकी चार जण लहान शेतकरी आहेत. एका वेळी मोठे शेतकरी नवीन अवजारे, त्यांच्या मदतीने लाभ मिळवित आहेत. ते त्यांच्या भांडवलांना दूध व्यवसाय, कुक्कुटपालन, दुकान, शाळा, व्याजबट्टासाठी उपयोगात आणत आहेत.

मजूरांना व्यवसायात काम मिळत नाही आणि त्यांचा पगार पण वाढत नाही. सरकारी योजना थोडे सहाय्य करीत आहेत. ते वर्षातून पुष्कळ दिवस रोजगार मिळवून देत आहेत. मजूरांचे कुटुंबे इतर मार्गाची वाट पहात बाजूच्या गावांना किंवा शहरांना जात आहेत.

महत्त्वाचे शब्द :- शेत मजूर, छोटे शेतकरी, सावकार, स्थलांतर, व्यवसाय, तहसील पद्धत, व्यापारी पीके, खरिप, साळ कापणी , यंत्र, मजूरी, व्याज व्यापारी, किटकनाशक

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. व्यंकटापूरम गावातील स्थलांतर निर्मूलनासाठी, शेतकऱ्यांना सरकार कशा प्रकारची मदत करत आहे असे तुम्हाला वाटते?
2. खालील तक्ता पूर्ण करा.

| व्यक्ती | पगार | हंगामी मजुरी | हंगामेतर मजुरी | कृषी, इतर कामे आणि सरकारी योजनात दिली जाणारी मजुरी |
|---|---|---|---|---|
| पुरुष | | | | |
| स्त्री | | | | |

SCERT TELANGANA

3. तुमच्या गावातील मोठ्या शेतकऱ्यांची परिस्थिती आणि व्यंकटपुरातील मोठा शेतकरी विजयकुमारच्या परिस्थितीशी तुलना करा?

4. व्यंकटपुरामध्ये बँकेकडून कर्ज कोणी घेतले? कशासाठी घेतले?

5. सावकार, बँका कर्ज कशा देतात. सावकाराकडून कर्ज घेणे फायद्याचे आहे असे तुम्हास वाटते का? याशिवाय अन्य कोणते मार्ग उपलब्ध आहेत?

6. आंध्र प्रदेशातील शेतकऱ्यांची परिस्थिती उंचावण्यासाठी काय करता येईल?

7. खालील तक्त्याआधारे वेंकटापूरमधील तीन शेतकऱ्यांची तुलना करा.

| अ.क्र. | विषय | रवी | राम | विजयकुमार |
|---|---|---|---|---|
| 1 | शेती/ आकारमान (एकरमध्ये) | | | |
| 2 | जलसिंचन | | | |
| 3 | शेती उपयोगी अवजारे | | | |
| 4 | खतांचा वापर | | | |
| 5 | भुईशेंगा विक्री पद्धत | | | |
| 6 | इतर कामे | | | |

8. लहान शेतकऱ्यांच्या समस्यांवर इतक्यातील वृत्तपत्रीय वृत्तांचे संकलन करा. या समस्या सोडविण्यासाठी सरकार काय प्रयत्न करीत आहे?

9. सद्याच्या काळात शेतकरी खाद्यान्नापेक्षा नगदी पिके पिकविण्याकडे शेतकऱ्यांचा कल दिसतो. याचे दुष्परिणाम काय काय होईल?

10. पान क्र. 62 वरील ***कंत्राटी शेती*** हा परिच्छेद वाचुन खालील प्रश्नांचे उत्तरे लिहा.

    अ) तुमच्या भागात जर कंत्राटी शेती असेल तर अशा शेतकऱ्यांचे अनुभव लिहा?

11. भारताच्या नकाशात भुईमुग पिकाचे भाग दाखवा?

प्रकल्प कार्य:

1) तुमच्या शिक्षकांच्या सहाय्याने छोट्या शेतकाऱ्यांची आणि मोठ्या शेतकऱ्यांची संभाषण करा? आणि सुधारीत पध्दतीमध्ये शेती, शेतीचा आराखडा, लागवडीची पध्दत, पिक कसे विकतात, कशा प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. अशा प्रकारच्या काही समस्यांचे तुलना करुन संपुर्ण माहिती मिळवा? या विषयांना वेंकटपुराम गावातील विषयांशी तुलना करा?

2) तुमची शाळा शहरात असेल तर तुम्ही राहत असलेल्या परिसरातील लोक काय कामे करतात त्यांचा तक्ता तयार करा त्या वृत्तीतील, स्वंयरोजगार, तत्काल उद्योगी, शाश्वत उद्योगी, अशी तीन प्रकारे वर्गीकरण करा व त्याविषयी तुमच्या वर्गात चर्चा करा?

SCERT TELANGANA

पाठ

# 8 शेती - उत्पन्न आणि व्यापार

भाग 'अ'

दररोज आपण तांदूळ, दाळ, तेल भाजीपाला, फळे, दूध, साखर, चहा, कॉफी इत्यादींचा वापर करीत असतो. यातील जास्तीत जास्त वस्तू शेतकरी पिकवित असतात. काही प्रक्रिया होत असलेल्या विविध मार्गाद्वारे आपणास मिळतात. तुमच्या घरात उपयोग करीत असलेल्या वस्तूंशी खालील दिलेला तक्ता भरा. हे सर्व आपणास कोठून मिळते?

| अ.क्र. | प्रकार | घटक | कोणाकडून मिळवित आहोत |
|---|---|---|---|
| 1. | आहार पदार्थ | | |
| 2. | दाळी | | |
| 3. | तेल | | |
| 4. | सुगंधी द्रव्ये | | |
| 5. | भाजीपाला | | |
| 6. | फळे | | |
| 7. | साखर | | |
| 8. | चहा, कॉफी | | |

लोक व्यवसाय उत्पत्तींना लहान व्यापारी, बाजार, लहान दुकानाजवळून मिळवितात. यामध्ये काळात शेतकरी सुद्धा रैतु बाजारामध्ये विकत आहेत. या पाठभागात या प्रक्रिया कशा घडतात? याची आपण माहिती मिळवू या.

### रस्त्यावर भाजीपाला विकणे

सिरपूर गावामध्ये गौरी राहत असते. ती घरोघर फिरून भाजीपाला विकत असते. ती हंगामामध्ये मिळणारा भाजीपाला जवळील शहरामधील ठोक व्यापाऱ्यांपासून विकत घेऊन, टोपलीमध्ये ठेवून फिरत फिरत रस्त्याने विकत असते. प्रत्येक घरी जाऊन, तिकडे राहणाऱ्यांना भाजीपाला पाहिजे काय? असे विचारते. त्या गावात अशाच प्रकारच्या दोन तीन शहरामध्ये जाऊन भाजीपाला ठोक व्यापाऱ्याजवळून विकत घेते. जाण्यासाठी आणि येण्यासाठी बस खर्च 25 रूपये येतो. ती साधारणत: भाजीपाला तिच्या घरात जमा करून टोपलीमध्ये भरून विकण्यासाठी जात असते. एका वेळेस भाजीपाला विकल्यानंतर घरी येऊन टोपली भरून आणखी रस्त्यावर विकत असते. या मधल्या काळात तिच्या घरात स्वयंपाकसुद्धा करीत आहे.

SCERT TELANGANA




*चित्र 8.1 भाजीपाला विकणारी गौरी*

मुलांना शाळेची तयारी करीत आहे. इतक्या कामाच्या भारामुळे ती थकून जात आहे. सतत बिमार पडत असल्यामुळे काही दिवस घरी विश्रांती घेत आहे.

ती गिऱ्हाईकांना कोणत्या भावामध्ये विकत होती? उदा. ती दहा किलो टोमॅटो शंभर रूपयाला घेऊन पंधरा रूपये किलोप्रमाणे विकत आहे. परंतु सर्व टोमॅटो एकाच भावात विकली नाही. जर का टोमॅटो जास्त पिकले असतील तर दहा रूपये किंवा पाच रूपयाला सुद्धा विकू शकते. सकाळच्या वेळी पंधरा रूपये किंवा संध्याकाळच्या वेळी आठ किंवा नऊ रूपयास विकत असते. जुमला मिळून ती दररोजी 100-150 रूपये मुनाफा मिळवते. या पैशात ती आपल्या कुटुंबातील आवश्यकता पूर्ण करते.

- ती आपल्या उत्पन्नाला वाढवण्यासाठी किलो टोमॅटो वीस रूपयाला विकत असते असे तुम्हाला वाटते काय?

गौरी तिला आलेल्या मुनाफयाला दुसऱ्या दिवशी वस्तू विकत घेण्यासाठी खर्च करीत असते. नसेल तर ती सावकाराजवळून स्यंसहाय्यक संघाकडून, ठोक व्यापाऱ्याकडून बाकी घ्यावी लागते. तिला बाकी देण्यासाठी ते केव्हाही नाही म्हणत नाहीत. परंतु नियम फार कडक असतात. जर का तिने सावकारापासून किंवा व्यापाऱ्यांकडून कर्ज 500 रूपये घ्यायचे असतील तर तिला सावकार फक्त 450 रूपये देतो. परंतु ती दुसऱ्या दिवशी तिला 500 रूपये द्यावे लागील. तिला तीव्र समस्या येऊन जर का त्या दिवशी तिने भाजीपाला विकला नाही तर तो भाजीपाला खराब होऊ लागतो आणि तिला कमी दरात विकावा लागतो.

आपल्या राष्ट्रात हजारो संचार व्यापाऱ्यांपैकी गौरी ही एक आहे. शहरामध्ये पुष्कळ माणसे शाश्वत जागेवर नगरपालिका किंवा खाजगी दुकानदाराद्वारे किरायाने घेऊन, काही जण स्वत:च्या दुकानामध्ये व्यापार करीत असतात. काही जण शहर, पंचायत किंवा नगरपालिकेला चालवणाऱ्याला थोडे पैसे देऊन व्यापार करीत आहेत.

गौरीसारख्या संचार व्यापारी अनेक समस्यांना तोंड देत आहेत. आणि कर्जबाजारी होत आहेत. ते सावकाराकडून कर्ज घेऊन त्यांना व्याज, मुद्दल देण्यासाठी उत्पन्नातील जास्त भागाला देत आहेत.

- कर्ज मिळण्यासाठी व्याज व्यापारी नियम, पद्धती कोणत्या?
- शाश्वत दुकानातील मोठ्या व्यापाऱ्यांना मात्र बँक कर्ज देत असते म्हणून तुम्ही कसे म्हणू शकता.
- गौरीसारख्या संचार व्यापाऱ्यांना सरकार कोणत्या मार्गाद्वारे सहाय्य करू शकते.

SCERT TELANGANA

- तुमच्या भागात फिरणाऱ्या भाजीपाला व्यापाऱ्यांना भेटून, त्यांच्या कामांना जीवनपद्धतींच्या समस्या माहिती करून एक निवेदिका तयार करून तुमच्या वर्गात चर्चा करा ?

## बाजार

एका प्रदेशावरून दुसऱ्या प्रदेशला बदलणाऱ्या बाजाराविषयी तुम्हाला माहीत आहे काय? बाजार म्हणजे एका प्रदेशावरून दुसऱ्या प्रदेशाला जाऊन वस्तू विकत असतात. बाजारात विकणारे व्यापारी शहरामध्ये किंवा नगरामध्ये राहणाऱ्या ठोक दुकानदारांकडून विकत घेऊन, मोठ्या प्रमाणात लोक एकत्र येतात. आपल्या देशात या प्रकारे भरणाऱ्या बाजारांची संख्या 25 हजारापर्यंत आहे. आंध्र प्रदेशातील अशाच एका फिरत्या बाजाराविषयी माहिती घेऊ.

## चौट उप्पलचा रविवारीय बाजार

यादाद्री जिल्ह्यातील चौटुप्पल. इकडे रविवारी भाजीपाला, फळे, कपडे, मांस, मासोळी, वाळलेली मासोळी, हातानी तयार केलेल्या कामाचे अवजारे, रेडिमेड चप्पल, सौंर्दप्रसाधने इत्यादी अनेक वस्तू विकतात. 200 पेक्षा जास्त व्यापारी त्यांच्या वस्तु विकतात. म्हशी, शेळी, मेंढ्यांचा व्यापार पण चांगल्या प्रकारात चालतो. जवळपास असलेली चाळीस गावातील लोक वस्तू विकत घेण्यासाठी चोटूप्पलला येतात. चोटूप्पल बाजारात शेळी व्यापारासाठी, किराणा दुकानांना, खाण्याच्या वस्तूंना विकण्यासाठी प्रत्येक स्थळ आहेत. या बाजारात पालेभाज्या कपडे सारखे विकणाऱ्या प्रत्येक व्यापाऱ्यांना स्वत:ची जागा असते. ते त्यांना राखीव जागा असतात. शेळ्या व्यापाऱ्यांना त्यांना ठेवण्यासाठी निवारा पण आहे.




*चित्र 8.2 बाजार*


SCERT TELANGANA

## इंद्रा – वाळलेल्या मिरचीचा व्यापार

इंद्राचे वय छत्तीस वर्ष आहे. ती पुष्कळ वर्षांपासून वाळलेली मिरची विकत असते. ती चोट उप्पलजवळीला पन्नास किमी अंतावर कट्टंगूर गावाची निवासी आहे. ती दहावी पर्यंत शिक्षण घेतली आहे. तिची मुलगी, मुलगा सरकारी शाळेत शिकत आहे. तिच्या अगोदर तिचे वडील हाच व्यापार करीत होते. ती तिच्या बापाकडून व्यापार शिकून घेतली होती. तिचा पती पण हाच व्यापार करीत आहे. आठवड्यात ती चार बाजार तीन मोठ्या गावाला जाऊन वाळलेली मिरची विकत असते.

ती खालील प्रदेशात बाजाराला जात असते.




इंद्रा प्रत्येक दिवशी सकाळी उठून घरचे कामे आटोपून बाजारगावास निघून जाते. तिच्या वाळलेल्या मिरचीचा व्यापार सकाळी दहा वाजलेपासून संध्याकाळी सात वाजेपर्यंत चालत असतो. तिच्यासोबत आणखी काही महिला व्यापारी ॲटो किंवा ट्रॉली घेऊन बाजार असलेल्या गावात आपले पोते घेऊन पोहंचतात. खम्ममधील ठोक व्यापाऱ्यांना फोनमध्ये बोलून, वाळलेली मिरची विकत घेत असते. ठोक व्यापारी प्रत्येक शनिवारी गावाला येऊन पेसे घेऊन जातात.

सर्व व्यापाऱ्यांसारखे इंद्रा सुद्धा जमीनीवर वाळलेली मिरची विकत बसत असते. हे पुष्कळ कष्टाचे काम आहे. आठवड्यातील वेगवेगळ्या गावांना प्रवास करीत असते. एकच दिवस मात्र तिच्या गावात बाजार असतो. त्याच दिवशी ठोक व्यापाऱ्यांना पैसे देत असते. ही रोज 200 ते 300 रूपये मिळवित असते. तर त्याला भरोसा काही नसतो. तो तिच्या झालेल्या व्यापाऱ्यावर अवलंबून असतो. ती कुठल्याही प्रकारचे निरिक्षण न करता वाळलेली मिरची बस्ता घेत असते. काही वेळा दर्जाहिन वाळलेली मिरचीपासून नफा होत नसतो.

व्यापार चालवण्यासाठी इंद्रा ती सभासद असलेल्या स्वयंसहाय्यक गटाकडून 30000 रूपये कर्ज घेत असते. ती त्या कर्जाला महिन्याला 1200 रूपये प्रमाणे परतफेड करीत असते. व्याज व्यापाऱ्यांना महिन्याला 100 ला तीन टक्के व्याज देण्याऐवजी स्वयंसहाय्यक गटांना मात्र महिन्याला 100 रूपयाला 25 पैसे व्याज भरावे लागते. सरकारी योजना ''चाराणे व्याजा'' (पावलावड्डी) मुळे हे साधू शकले आहे.

SCERT TELANGANA

एका बाजूला व्यवसाय उत्पत्त मिर्चीसोबत, दुसऱ्या बाजूस पारीश्रमिक उत्पादन झालेले कपडे, रेडिमेड वस्तू, घागरी, साधने, प्लास्टिक वस्तू इत्यादी सामान व्यापारी या बाजारात विकतात. सर्व व्यापारी ग्रामपंचायतीला दहा रूपये किराया भरतात. प्रत्येक स्थानावर मेंढी, शेळी विकतात. ते खेड्या गावातून आणून बाजारात विकत असतात. पुष्कळ माणसे विकण्यासाठी किंवा घेण्यासाठी दलालाचे सहाय्य घेतात.

बाजारात सुमारे $^3/_4$ भाग महिला असतात. पुष्कळ जणांची बाजारामध्ये सांप्रदायिक वृत्ती बनली अहे. म्हणजे ते पारंपरिक हेच व्यवसाय करीत आहेत. बाजारात काही जागा प्रत्येक व्यापाऱ्यासाठी राखीव ठेवतात. दुसरे व्यापारी त्या जागेवर सामान मांडू शकत नाही. पुष्कळ जण व्यापारी साप्ताहिक बाजार भरवतात. आठवड्यात एकावेळेस येऊन ज्याच जागेवर दुकान मांडतात. त्यांच्या सोयीप्रमाणे ते मार्ग काढीत असतात.

लहान व्यापारी व्यवसाय उत्पादन फळे, भाजीपाला, सारखे लवकर खराब होणाऱ्या वस्तू विकतात. हे पण गौरीप्रमाणे अनेक समस्यांना तोंड देतात. त्यांचे निवास बाजारापासून दूर असते. ठोक बाजारातून विकत घेऊन बाजारात विकतात. त्यांना साठवण करण्यासाठी सदुपाय नसतो. बाजार व्यापारी वस्तूंना आपल्या घरात साठवण करतात. जर का ते सायंकाळपर्यंत विकले नाही तर, वापस घेऊन जाण्यासाठी रवाना खर्च भरावा लागतो. काही वेळा त्यांनी घेतलेल्या किमतीपेक्षा कमी किमतीत विकावे लागते.

साप्तहिक बाजारात जवळपास असलेल्या गावातील शेतकरी पण आपला भाजीपाला विकत असतात.

अशा प्रकारे बाजारात पुष्कळ जण लोक गरजा पूर्ण करीत पुष्कळ जण लहान व्यापाऱ्यांना, हमालांना, रवाना करणाऱ्यांना, जीवन आधार मिळवून देत आहेत.

- शाश्वत दुकाने आणि बाजार यातील फरक सांगा?
- शाश्वत दुकाने असून सुद्धा तुम्हाला बाजाराची आवश्यकता आहे काय? कशासाठी?
- बाजार हा लहान शेतकऱ्यांचे जीवन चांगले होऊ शकते असे तुम्हाला वाटते काय?

## तेलंगानातील रैतु बाजार

व्यवसायापासून उत्पन्न झालेल्या आहार धान्यांना, कडधान्यांना ठोक व्यापारी विकत असतात. लहान व्यापारी यांना विकत घेऊन गिऱ्हाईकांना विकत असतात. त्यालाच बाजार (मार्केट) प्रकार असे म्हणतात. रैतु बाजार सुद्धा असेच मार्केट आहे.



*चित्र 8.3 शेतकरी बाजार*



SCERT TELANGANA

***तुम्ही या बाजाराकरिता केव्हापासून येत आहात?***

मी 2003 सालापासून इकडे येत आहे. माझ्या आसपास असलेले 2000 सालापासून येत आहेत.

- *केवळ तुमच्यासारखेच शेतकरी मात्र रैतु बाजारामध्ये सामान विकतात काय?*

- पहिल्यांदा सरकारी नोकर वर्ग आमच्या गावामध्ये येऊन रैतु बाजार चालवित होते. त्यानंतर आमचे नाव, पत्ता, पिकविणारे पीके, जमिनीची सविस्तर माहिती असलेले ओळख प्रमाणपत्र दिले. असा ओळखप्रमाणपत्र असलेला व्यक्ती मात्र शेतकरी बाजारात येऊन आपले सामान विकू शकतात. बाजारामध्ये जो कोणी प्रथम येईल त्याला प्रथम प्राधान्य असते. तिकडे शेतकऱ्याला मात्र प्रवेश असतो. मी दोन कारखानदार, स्वयंसहाय्यक गटामधून दोन महिलांना पाहिले आहे. त्यांना स्वत:चे दुकान आहे. कारखानदार आमच्या जवळून साळ विकत घेतात. स्वयंसहाय्यक गट आमच्या जिल्ह्यात उत्पादन झालेला भाजीपाला विकतात.

***तुम्ही उत्पादन विकण्यासाठी काही किराया भरता काय?***

नाही. कारखानदार स्वयंसहाय्यक गटवाले मात्र नियमाप्रमाणे किराया भरतात.

***रैतु बाजारला कशासाठी येत असता?***

या अगोदर उत्पादनाच्या ठोक व्यापाऱ्याकडे घेऊन जात होतो. तिकडे मला कोणत्याही संधी मिळत नव्हत्या. ठोक व्यापाऱ्यांनी निर्णय केलेल्या भावाला विकावे लागत असत. पुष्कळ वेळा माझा भाजीपाला कमी किमतीत विकला होता. कमीत कमी मी लावलेला खर्चसुद्धा निघत नव्हता. रैतुबाजार माझ्यासारख्या शेतकऱ्यांना चांगली संधी देत असतो. माझ्यासारखे शेतकरी सुमारे दहा-पंधरा गावामधून इकडे येत असल्याचे मला माहीत आहे. ठोक मार्केट आम्हाला नवीन आहे. तिकडे मुलभूत वस्तू नाहीत. मुतारी नाही. कमीत कमी आमचा भाजीपाला ठेवण्यासाठी भरपूर जागा नाही.

***तुमच्या उत्पादनाचे भाव कसे ठरविले जातात?***

रैतु बाजारात उत्पादनाची किंमत ठरवण्यासाठी समिति असते. याच्यात तीन शेतकरी, नोकरवर्ग सदस्य म्हणून असतात. ठोक किमतीपेक्षा 25 टक्के जास्त, किरकोळ किमतीपेक्षा 25 टक्के कमी दरात निर्णय करतात.

***रैतु बाजारातील गिऱ्हाईक तृप्तीदायक असेल असे तुम्हाला वाटते काय?***


होय. इकडे ते फळे, भाजीपाला मात्र नसून अधिक महत्त्वाचे तांदूळ, दाळ, चिंच, वाळलेली मिरची, तेल सुद्धा मिळत असते. मी भाजीपाला पिकवित असतो. मी भाजीपाला कसा पिकवितो मला माहिती आहे. गिऱ्हाईक मात्र माझी आतुरतेने वाट पहात असतात. तो आनंद मी शब्दात सांगू शकत नाही.

***रैतु बाजारामध्ये तुम्हाला केव्हातरी समस्या वाटली काय?***

काही वेळा समस्या वाटली. मी उशिरा आलो तर, भाजीपाला विकण्यासाठी पाहिजे ती जागा मिळत नाही. कोणत्या तरी कोपऱ्यात बसावे लागते. आमच्या वाहनांना ठेवण्यासाठी पुरेल तेवढी जागा मिळत नाही. काही निनावी शेतकरी भाजीपाला विकण्यासाठी रैतु बाजारात येत आहेत. रैतु बाजारच्या दूर असलेले शेतकरी ही सुविधा घेऊ शकत नाहीत.

SCERT TELANGANA

- रैतु बाजारामध्ये शेतकरी मात्र विक्रेते सारखे असतात काय?
- रैतु बाजारामध्ये कोण कोण फायदा घेत असतात? कशासाठी ?
- रैतु बाजारामध्ये शेतकऱ्यांना मिळणारे फायदे कोणते?
- रैतु बाजारामध्ये किमत कसे ठरवतात?



*चित्र 8.4 रैतु बाजार किमतीची पट्टिका*

**महत्त्वाचे शब्द**

थोक व्यापारी
किरकोळ व्यापारी
मार्केट
आठवडी बाजार
रैतु बाजार
पावला वड्डी
स्वयंसहायक गट

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. शेती उत्पादीत वस्तुचा व्यापार कसा केला जातो?
2. गौरी, इंद्रा आणि रैतु बाजारात असलेल्या रामगोपाल यांच्यामधील फरक खालील विषयांमध्ये माहिती करा?

| | गौरी | इंद्रा | रैतू बाजारात रामगोपाल |
|---|---|---|---|
| व्यापार करण्यासाठी पैसा कसा मिळवित आहेत? | | | |
| वस्तूंना कुठे विकत आहेत | | | |
| किंमत कशा प्रकारे ठरवित असतात | | | |

SCERT TELANGANA

3. किरकोळ व्यक्ती व्यापार करतेवेळेस येणाऱ्या समस्यांना पटिकाद्वारे लिहा.

4. किरकोळ व्यापारी व त्यांना मिळणारा फायदा वाढविण्यासाठी कोणकोणते मार्ग आहेत?

5. व्याज व्यापाऱ्यापेक्षा स्वयंसहाय्यक गटापासून कर्ज घेणे कशासाठी लाभदायक ठरते?

6. व्याज व्यापारी, बँक यातील समानत्व, भेद कोणते?

7. ठोक दुकानात विकण्यापेक्षा रैतु बाजारात विकणे चांगले कशावरून म्हणता?

8. पान क्र. 69 वरील शेवटचा परिच्छेद वाचुन त्याचे विवेचन करा?

9. तुमच्या जिल्ह्याच्या नकाशात बाजारांची गावे शिक्षकांच्या सहाय्याने शोधा?

10. रैतु बाजार म्हणजे काय? त्यातील फायदा आणि नफा कोणते?

11. चोटूप्पल व्यापाऱ्यांपासून नगरपालिका / ग्रामपंचायत पैसे कशसाठी घेत असतात?

**प्रकल्प कार्य :**

1) तुमच्या परिसरात फिरत असलेला भाजीपाला विकणाऱ्या व्यापाऱ्यांशी संपर्क साधुन त्याच्या कामाविषयी, त्याच्या जिवनपध्दती विषयी, व त्यांच्या समस्या माहिती करुन एक वृत्तांत तयार करुन तुमच्या वर्गात चर्चा करा?

2) तुमच्या परिसरात भरत असलेला बाजाराला जाऊन तिथे होत असलेल्या कामाचे निरिक्षण करा. बाजाराचे चित्र काढुन तुमच्या वर्गात चिटकवा.

SCERT TELANGANA

पाठ 8

भाग 'ब'

# शेती - उत्पन्न आणि व्यापार

विविध उत्पादने गिऱ्हाईकापर्यंत लहान व्यापारी कसे पुरवत होते हे आपण आधीच्या पाठामध्ये पाहिले आहे. किरकोळ व्यापाऱ्यांचे काही विषय पाहिलेत. या पाठात ठोक भात व्यापाऱ्यांसंबधी काही माहिती मिळवू. हे भात धान्य शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात कारखानदार, सावकार, मोठे व्यापारी विकत घेतात, हे कसे घडते ते पाहुया.

## व्यवसाय बाजार पेठ

रैतु बाजार प्रमाणे सरकार राबवीत असलेला व्यवसाय बाजारपेठेमध्ये सुद्धा शेतकरी आपल्या साळी धान्यांना विकतात तेव्हाचे तेव्हापैसे पण मिळतात

चंद्रशेखर नावाचा शेतकरी नलगोंडा जिल्हातील नरसापुर या गावचा निवासी आहे या वर्षात त्याला पिक जास्त पिकले साठ किंटल साळीचे उत्पादन झाले तो साळीचे पोते ट्रॅक्टरमध्ये भरून नेलूर व्यवसाय बाजारपेठ मध्ये घेऊन आला तो साळी धान्यांना उतरुन भाव ठरवण्याच्या श्रेणीत उभारतो.

सकाळी दहा वाजता व्यवसाय मार्केट कमिटीचे सभासद येतात शेतकऱ्यांनी आणलेल्या धान्यांच्या पोत्यावर शेतकऱ्यांचे नाव, धान्य विषयी माहिती मिळविणारी चिठ्ठी ठेवतात. सकाळी 11 वाजता ठोक व्यापारी, सावकार येऊन साळी धान्यांना निरीक्षण करतात तेव्हा कमिटीचे सभासद पहिल्यांदा शेतकऱ्यांच्या साळी कुप्याजवळ येऊन बोली बोलतात साळींना सरकारी नियमांप्रमाणे दिलेला हमी भाव क्विंटल ला 1080 रुपये कमिटिचे सभासद या भावापासुन बोली प्रांरभ करतात

## हमी भाव


सरकार प्रत्येक वर्षी साळी, गहू, भुईमुग, अशा पिकांना हमी भाव देतात जर का व्यापारी या भांवाना मध्ये धान्य विकत घेत नसेल तर सरकार संस्था,भारत आहार संस्था (FCI) यासारख्या संस्था सरकारने हमी भाव दिलेल्या भांवामध्ये शेतकऱ्यांजवळुन धान्य विकत घेतात शेतकऱ्यांच्या भांडवलांना लक्षात घेऊन त्यांना नष्ट न होऊ देता सरकार हमी भाव ठरवतात हमी भावापेक्षा जास्त किंमतीत व्यापाऱ्यांने विकत घेतले असता शेतकऱ्यांना विकण्याची परवानगी आहे

बोली करतेवेळेस विकत घेणारे साळी धान्यांला कोणत्या भावाने विकत घेण्यासाठी तयार आहे माहिती करुन घेतात व्यापारी आपला भाव बोलल्यानंतर व्यवसाय मार्केट यार्ड कमिटि सभासद एका वेळी ,दोन वेळी ,तीन वेळी आणि असे म्हणतात तीन वेळा असे म्हण्यापुर्वी कोणीही भाव वाढवू शकतो तीन असे म्हटल्यानंतर बोली बंद होते अखेरच्या बोलीस जो भाव बोलला होता तोच भाव शेतकऱ्यांना मिळतो. बोली

SCERT TELANGANA

संपल्यानंतर पुन्हा बोली सुरु होत नाही इतर धान्यांनासुद्धा अशीच बोली बोलत असतात.

पुष्कळ व्यापारी , सावकार चंद्रशेखरची साळीभोवती सर्वजन गोल जमले होते त्याची साळ चांगली सुकलेली होती त्यात ओलसरपणा नव्हता बोली सुरु झाल्यानंतर प्रत्येक व्यापारी, तांदुळ विक्री सावकार उत्तम धान्य पाहुन भाव ठरवतात. चंद्रशेखर क्किंटलला 1150 रु भाव मिळाला हाच भाव त्यादिवशी अधिक होता पुष्कळजणांना आपल्या साळी धान्यांना क्किंटलला 1100 रु भाव मिळाला



*चित्र 8.5 व्यवसाय मार्केट यार्ड (कृषी उत्पन्न बाजार समिती )*

व्यवसाय मार्केट कमिटि सभासद साळीच्या राशीच्या झालेल्या भावाची नोंद करतात परत कार्यालयात जाऊन, बोली केलेल्या व्यापाऱ्यांचे नाव, चिठ्ठी नंबर नमूद करून, अत्याधिक भाव बोललेल्या व्यापाऱ्यांचे नाव, बोली भाव चंद्रशेखरला कळवितात. तो त्या भावात विकण्यासाठी तयार झाला कमिटी सभासद क्किंटल भाव एकूण रुपये नोंद करून चिठ्ठी त्याला देतात. जर का तो त्या भावात विकण्यासाठी तयार नसेल तर त्याला दुसऱ्या दिवशी किंवा आठवडाभर वाट पाहावी लागते.

व्यवसाय मार्केट यार्ड मध्ये विकत घेण्यासाठी व्यापाऱ्यांना काही रक्कम द्यावी लागते धान्य विकत घेते वेळेस ती रक्कम 100ला एक रु. प्रमाणे कमिटिला कमिशन द्यावे लागतात शेतकरी मात्र काही रक्कम भरत नाही परंतु खरे पाहता शेतकऱ्याचा मजदुरी खर्च, भरण्याचा खर्च, परिशुभ्रता खर्च प्रति 100 रु ला तीन रूपये पन्नास पैसे या प्रमाणे द्यावे लागते.

- या पैशांना शेतकऱ्यांना पैसे देणाऱ्या व्यापाऱ्यापासून सूट करुन व्यवसाय मार्केट कमिटि जवळुन सभासदांना द्यावे लागतात. ही पद्धत बरोबर आहे असे तुम्हाला वाटते काय ? या प्रक्रियामुळे शेतकऱ्यांना फायदा आहे काय ?

बाजार समिती शेतकऱ्यांना माल विक्रीसाठी आणण्यास एका क्किंटलला साधारणता दहा रु इतका खर्च येता तोच माल जर गावात विकला तर जाण्यायेण्याची बचत होते तांदळाचे व्यापारी चंद्रशेखर जवळ येऊन चिठ्ठीमध्ये असलेली रक्कम मधुन व्यवसाय मार्केट यार्ड कमिटि चे शुल्क सोडून सर्व पैसे देऊन टाकतात

- चंद्रशेखरला त्याने दिलेली रक्कम गणित करुन पाहूया

  एकूण साळी..........................क्विंटल

  क्विंटल भाव.............................रु

  एकूण................. X .................

  = रुपये .................


  येणे जाणे , परिशुभ्रता,साफ सफाई

  3.50 X .................

  चंद्रशेखरला मिळलेली एकूण रक्कम

  रूपये .................

- व्यवसाय उत्पन्न आणि व्यवसाय मार्केट यार्ड मध्ये धान्य विकल्यामुळे फायदा किंवा नुकसान यांविषयी तुमचे अभिप्राय सांगा.



వ్యవసాయ మార్కెట్ కమిటీ, చౌటుప్పల్

జిల్లా: నల్లగొండ.

మార్కెట్ అనుమతి పత్రము

నెం. 3295 తేది.............................

1. రైతు పేరుశ్రీ..............................................

2. గ్రామము..............................మండలం..............................

3. పట్టాదారు పాస్‌పుస్తకం నెం..............................విస్తీర్ణం..............

4. మార్కెట్ కు తీసుకురాదలచిన " ధాన్యము " యొక్క పరిమాణము (బస్తాలు)..............................

5. మార్కెట్ కు తీసుకురావలసిన తేది..............................

కార్యదర్శి

సూచనలు :

1. అనుమతి పత్రము పొందుటకు పట్టాదారు పాసు పుస్తకము లేక సంబంధిత మండల రెవిన్యూ అధికారిచే ధృవీకరణ పత్రం కార్యదర్శి వద్ద దాఖలు చేయవలెను.
2. రైతులు మార్కెట్‌కు ధాన్యము తీసుకొని వచ్చినప్పుడు వారి వెంట తప్పనిసరిగా ఈ పత్రము తీసుకొని రావలెను.
3. మధ్య దళారీలు రైతుల పేరుతో మార్కెట్ కు ధాన్యమును తెచ్చిన యెడల వారి యొక్క ధాన్యమును ప్రభుత్వము స్వాధీన పర్చుకొని వారిపై చట్టరీత్యా తగు చర్యలు చేపట్టబడును.
4. రైతులు వారు తెచ్చిన ధాన్యమును అమ్మిన తరువాత తక్ పట్టీ మరియు అనుమతి పత్రము చూపి వారి పట్టాదారు పాసు పుస్తకమును వాపసు పొందగలరు.
5. అనుమతించిన తేదికి ముందుగాని తరువాత గాని వచ్చిన యెడల అట్టి ధాన్యము మార్కెట్ లోనికి అనుమతించబడదు.
6. రైతులు వారి ధాన్యమును కళ్ళముల వద్దనే శుభ్రపరిచి మార్కెట్ కు తీసుకొని వచ్చినచో మంచి ధర లభించును.

चित्र 8.6 बाजार समितीची पावती

चंद्रशेखर सारख्या शेतकऱ्यांना व्यवसाय मार्केट यार्ड मध्ये विकण्यासाठी पाहीजे ते दर्जदार धान्य आहे गावा सारखे इकडे शुल्क देण्यासाठी किंवा भाव देण्यासाठी कोणताही उशीर लागत नाही.

विक्री पुर्णपणे जाहीर बोली असते म्हणुन शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत असतो अधिकारी मार्केट मध्ये व्यापाऱ्याने हात मिळवले तर शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे परंतु हे सर्व प्रदेशात होत नाहीत. आपल्या राष्ट्रात सुमारे 300 व्यवसाय मार्केट यार्ड आहेत $^1/_4$ भाग व्यवसाय उत्पन्नातील या मध्ये विक्री करतात.

उरलेला $^3/_4$ उत्पन्न विकण्यासाठी काय होत असते त्यांना इकडे विकतात काय ? ते शेतकरी व्यवसाय मार्केट यार्ड ला का येऊ शकत नाही ? त्या संबधी निरीक्षण करुया.

***तांदुळविक्री***

ते साळी कापण्याचे दिवस. नरसापुर ग्राम वाडयात असलेला मल्लया चंदुलाल चा मुनीम (लीपीक) ची वाट पाहात आहे मलयाला असलेल्या एका एकर सिंचन जमिनीव्दारे चौदा क्विंटल साळी पिकविले आहे त्याच्या जवळ पुर्णपणे भांडवल नसल्यामुळे कमी उत्पन्न झाले आहे बरोबर खत न मिळल्यामुळे, किटकनाशक वापरू शकला नाही व्यापारी चंदुलाल पाठवलेला मुनीम ट्रॉक्टर सोबत येऊन साळीत, माती ओलावा पाहून निरीक्षण करुन साळीते पोते ट्रॅक्टरमध्ये टाकून, इतर शेतकऱ्यांजवळील माल विकत घेऊन मुनीम निघून गेला

तांदुळ व्यापारी मल्लयाला साळी पोत्याचा काटा लावला एकूण 14 क्विंटल धान्यांला मोजून चंदुलाल ला मुनीम दाखवू लागला धान्य वाळलेली परिस्थिती, साळी पाहून चंदुलालला क्विंटल ला 950 रु भाव ठरविला हा भाव व्यवसाय मार्केट पेक्षा कमी आहे व्यवसाय मार्केट यार्ड मध्ये सरासरी क्विंटला 1100 रु भाव आहे मल्लयाला नगदी पैसे पाहिजे होते त्यामुळे त्याचक्षणी पैसे द्यावे म्हटले तर चंदुलाल 100 रु ला एक रूपया पन्नास पैसे कमी देतो क्विंटल 950 रुपये तर 14 रु 25 पैसे क्विंटल मागे कमी देतो नेल्लुर मध्ये प्रत्येक तांदूळ

SCERT TELANGANA

कारखाने दार, साळी व्यापारी याच पद्धतीचे अनुकरण करतात.

मल्लय्याला साळीपासुन मिळालेले उत्पन्न मोजू यात

साळीचे वजन = 14 क्विंटल

तांदुळ गीरणीने सांगीतलेला भाव रु. = रु.950/क्विं.

14 क्विंटलची किंमत = रु.950 x 14 = 13300

तत्काळ किंमत भरल्यास वजा झालेली किंमत

= रु.950 x 14 = 200

एकुण रक्कम देणे = रु.13,300 - 200=13100/-

(जर मल्लय्या अजुन 15 दिवस थांबल्यास त्याला कमीशन मिळणार नाही)

**तुम्हाला आहे का?**

मल्लय्या कमी किमंतीत चंदुलाल ला साळी का विकत होता? पुढील भाग वाचन करण्यापुर्वी वर्गात चर्चा करा

चार महिन्यापूर्वी मल्लया खत रासायनिक औषधी विकत घेण्यासाठी 5000 रु घेण्यासाठी चंदूलाला जवळून कर्ज घेतले होते पुष्कळ लोक लहान व्यापारी चंदुलाल पासुन अशाच प्रकाराने कर्ज घेत असतात त्यामुळे तो निर्णय केलेल्या भावामध्ये शेतकऱ्याकडुन सामान विकत घेत असतो मल्लयाला एकूण देणाऱ्या पैशामधून चंदूलाल आपण दिलेले कर्ज व त्याचा व्याज कापून उरलेले पैसे मल्लयाला देतो मल्लया अखेरिस किती पैसे येतात पाहूया

मल्ल्याने घेतलेले कर्ज = 5000 रु

महिन्याचे व्याज = 400 रु

एकूण कमी = 5400 रु

साळीला आलेले एकूण = 13100 रु

दिलेले एकूण = 13100-5400

= 7700 रुपये

आपल्या राज्यात मल्लया सारखे शेतकरी तांदुळाचा शेतकऱ्याकडून, व्याज व्यापाराकडून धानिक जमिनदाराकडून कर्ज घेतात पिक उत्पन्न नंतर कमी भावात आम्हांलाच विकावे अशी त्यांची इच्छा असते वारंगवार भावामध्ये साळी व्यापारी धोका देत असतात रैस मिल मालक शेतकरी पासून पिक घेणे हेच नसून भाव पण त्यांच्या नियंत्रणाखाली ठेवतात

- व्यवसाय मार्केट यार्ड मध्ये विकण्यासाठी मल्लया कितपत योग्य आहे ?
- मिल मालकाला विकण्यामुळे त्याचे किती पैसे नष्ट होतात
- मील मालका जवळचे कर्ज न घेता बँकेद्वारे कर्ज घेतले तर या दोघांमध्ये फरक सांगा ?
- सरकारी बँकेद्वारे मल्लयाने कर्ज घेतले असते तर त्याला किती पैसे उरत होते ?



*चित्र 8.7 साळी धान्य, तांदुळाचा कारखाना आयात-निर्यात करणे*

SCERT TELANGANA

वेंकटापूरम मधील लहान शेतकरी यांना मोठे जमिनदार कर्ज देतात तेच साळीच्या पिकांची विक्रि करतात तसेच इतर शेतकऱ्यापासुन सुद्धा विकत घेतात साळीच्या धान्याला मार्केट मध्ये किंवा शहरामध्ये ठोक व्यापाऱ्याला किंवा रैस मिल मालकाला विकतात जमिनदार शेतकऱ्याला अनेक पद्धतीने कर्ज देतात कर्जाव्दारे बियाणे ट्रॅक्टर जमिनीला पाणी पुरवठा सुद्धा करतात या पद्धतीने जमिनदार लहान शेतकऱ्यांना त्याच्या अनुकूल करुन घेतात त्याने निर्णय केलेल्या भावानेच शेतकऱ्यांपासून पिक विकत घेतात या प्रमाणे शेतकऱ्यांना कर्ज देऊन त्यांच्या कडून पिके घेतात पिकाच्या हंगामानंतर परत आपले कर्ज वसुली करतात काहीही झाले तर लहान शेतकऱ्यांपासुन व्यापारी कमी किंमतीत धान्य घेऊन त्यांना जास्त किंमतीत विकण्याचा अवकाश मिळतो

- नरसापूर गावातील शेतकऱ्याजवळून जमिनदार रैस मालक साळी धान्यांना विकत घेण्याची पद्धतींबद्दल लिहा

मध्यवर्तीद्वारा विक्री

वेंकटापूरम ग़ावामध्ये आणखी एक महिला शेतकरी शांती ही आहे पति मरण पावल्यानंतर तीने व्यवसाय करण्याचे ठरविले. ती स्वयंसहाय्याक गटाची सभासद आहे व्यवसायानिमित्त 20,000 रु कर्ज घेतले तीला असलेल्या दीड एकर जमिनीत या वर्षी 14 क्विंटल साळी पिकविल्या. त्यामधून सात क्विंटल यांची बोली बोलून विकण्यासाठी तयार झाली उरलेल्या साळींना पिकऊन कुटूंब आवश्यकतेसाठी ठेवल्या.

दुसऱ्या दिवशी मोठा तांदुळ गिरणी मालक मध्यस्थी नरसापूर गावांना येऊन, शेतकऱ्यांना मिळून साळी धान्य मला विकावे म्हणुन सांगितले शांतीच्या साळी धान्याचे सुद्धा निरक्षण केले तिच्या धान्याचा क्विंटल ला 1100 रु भाव निर्णय झाला. त्या साळीचे मोजमाप झाले तेव्हा सात क्विंटल होते दलालाने मोजमाप केले तेव्हा 6.50 क्विंटल मात्र साळी भरल्या शांतीने स्वयंसाहयक गटापुढे मोजणी केली असता सात क्विंटल भरले दलाल साळी धान्यांना घेऊन पंधरा दिवसात पैसे देतो म्हणून सांगितले त्याने दोन आडवठयानंतर येऊन 6825 रु. दिले त्यांनी मध्यस्थी शुल्क क्विंटलला 250 रु घेतले. आम्ही शांतीला भेटून काही प्रश्न विचारले

तुम्ही कोणत्या व्यापाऱ्याजवळून कर्ज घेत आहेत ? व्यवसाय मार्केट यार्ड ला जावून का विकत नाही ?

नलगोंडा जाण्यासाठी ट्रॅक्टर किराया, धान्याला ट्रॅक्टरमध्ये टाकण्यासाठी उतरण्यासाठी येणारा खर्च , मी आणि माझा मुलगा धान्य विकण्यसाठी एक दोन दिवस लागणारा खर्च आणि आम्ही विकणे फार कमी होते. मोठे शेतकरी मोठया प्रमाणात मात्र निल्लुरला जातात असे शांतेने सांगितले

पुष्कळ शेतकरी मार्केट यार्डात 1100 ते 1150 रु पर्यंत विकतात जास्त भाव का देत नाहीत म्हणून तांदुळ विक्रेत्याला तूम्ही का विचारत नाही ? असे आम्ही विचारले

''हे मध्यवर्ती जास्त भाव देत नाहीत, हा रवाना खर्च आम्ही सहन करु शकत नाही त्यासाठी आम्ही आमचे धान्य घरीच विकत असतो ''

असे शांताने सांगितले शहरात राहणारे मोठे तांदूळ मिल मालक किंवा ठोक व्यापारी शेतकऱ्यांना मध्यवर्ती

SCERT TELANGANA

म्हणुन राहतात ते शांता सारख्या लहान शेतकऱ्या पांसून कमी किंमतीत धान्य विकत घेतात त्यांना कायमचे दुकान, गोदाम यांसारखे काही ही असत नाही ते व्यापारी गावामध्ये हंगाम असे पर्यत रहातात आणि शेतकऱ्याशी संर्पक साधून अन्न धान्य विकणे व घेणे करत असतात मग तेच धान्य ठोक व्यापारी किंवा तांदुळ कारखादार ज्याने कोणी यांना धान्य विकत घेण्यासाठी पैसे दिले असतील त्यांना माहिती पाठवतात हे मध्यवर्ती शेतकऱ्यां पासूंन आणि व्यापाऱ्यांपासून दोघांजवळून आपले कमिशन घेत असतात काही शेतकरी व्याज व्यापाऱ्यासारखे काम करीत असतात आपण आता पर्यंत सांगत आलेला चंदुलालासारखा व्यापारी कर्जाने दिलेली रक्कम आणि व्याज दोन्ही घेत असतो

- मल्लयाला क्विंटला 935 रु मिळाले आणि शांतीला 975 रु मिळाले, यांच्या मध्ये काही फरक आहे काय ! कसा ?

### तेलंगाना मधील साळी व्यापार

तेलंगाना मध्ये अत्याधिक प्रमाणामध्ये साळीचे पिक घेतले जाते शेतकरी थोडेसे धान्य कुटुंबासाठी ठेऊन उरलेंले धान्य विकत असतात पुष्कळ कमी शेतकरी शांता सारखे त्यांचा कुटूंबासाठी भरपूर धान्य ठेवून, उरलेले धान्य विकत असतात मोठे शेतकरी जास्तीत जास्त शेतकरी आपले धान्य बाजारपेठेत विकण्यासाठी पाठवितात आपल्या राष्ट्रातील शेतकरी आपल्या उत्पन्नांचा $^3/_4$ भाग आपल्या गावात विकतात आणि $^1/_4$ भाग व्यवसाय मार्केट यार्ड ला विकतात या शेतकऱ्यांना स्वत:चे ट्रॅक्टर असल्यामुळे त्यांचा वाहतूक खर्च उरत असतो.

खेंडे गावात पुष्कळ लोक व्यापारी धान्यांना - जमिन दारापासुन, दलाला पासून, लहान मिल मालकपासून विकत घेत असतात पुष्कळ संर्दभात मल्लया सारखे शेतकरी चंद्रशेखर सारख्ये शेतकरी व्यापारी अश्या सारख्यांना विकत आहेत.

### कर्जामध्ये, साळी व्यापार

लहान शेतकरी त्यांच्या व्यवसायाची कामे चालवण्यासाठी मुख्य करुन बियाणे, औषधी, खत, पाणी पुरवठा या वस्तूसाठी कर्ज घेतात त्यांना बॅकव्दारे कर्ज घेणे कठीण असते म्हणून ते कर्ज व्यापारी,मिल मालक यांचा पासून कर्ज घेण्याची परिस्थिती निर्माण होते एका वेळेस त्यांच्या कडून कर्ज घेतल्या नंतर आपले पिकवलेले धान्य त्यांनाच विकावे लागते त्यांनी ठरवलेल्या भावामध्येच विकावे लागते साळी व्यापारी कमी भावामध्येच न घेता ते मोज मापणामध्ये सुद्धा तफावत करत असतात शेतकऱ्यांची इतर मार्गाव्दारे सुद्धा फसवणूक केली जाते विविध प्रमाणे कमिशन शुल्क वसूल करत असतात पुष्कळ शेतकरी कर्ज फरत फेड करण्यासाठी उशीर करीत आहेत व्यापारी, जमिनदारांचे कर्ज परतफेड करण्यासाठी आपले धान्य, त्यांनाच विकत असतात

- विविध शेतकऱ्यांना मिळालेला भाव, त्यांची मोजमाप वेगवेगळी कश्यामुळे आह? त्यांचा विचार करा त्यामुळे मिळणारा फायदा किंवा तोटा तुमच्या वर्गामध्ये चर्चा करा.

शेतकरी एकदा का या व्यापाऱ्यांच्या कचाट्यात अडकला की आयुष्यभर त्यांची सुटका नाही. गेल्या कित्येक दशकांपासून आंध्रप्रदेशात छोट्या शेतकऱ्यांची अवस्था अतिशय दारुण आहे. यामुळेच आताच्या

SCERT TELANGANA

काळात शेतकरी दिवसेंदिवस हवालदिल होत आहे. काबाडकष्ट करून पिकविलेले धान्य मातीमोल भावाने विकावे लागते. तर कधी पावसामुळे धान्याची नासाडी होते. आपल्या राज्यातील किनारपट्टी भागात दरवर्षी हजारो क्विंटल भात पीक नष्ट होत आहे. चुकीची मापनपद्धती भरमसाठ कर आणि हंगामाच्या दिवसात उतरलेले भाव याबरोबरच रसायनिक खते किटकनाशकांच्या वाढत्या किंमती यामुळे अनेक शेतकऱ्यांनी शेती व्यवसाय बंद करून इतर उद्योगधंद्याकडे केंद्रित केल्याचे दिसत आहे, याचा परिणाम देशाच्या अन्नधान्य साठ्यांवर होऊन महागाई वाढत आहे.

**महत्त्वाचे शब्द**

व्यावसाय मार्केट यार्ड

हमी भाव

भारत आहार संस्था

व्यापारी

ठोक व्यापारी

दलाल

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. वेंकटापूरममधील विविध प्रकारचे व्यापारी , साळी धान्यांना क्विंटलला किती भाव ठरवतात त्याची सूची तयार करा ?
2. तुम्ही गावामध्ये रहात असाल तर साळी धान्यांना कोण घेत असते ? भाव कशाप्रकारे ठरवतात ? व्यापरी जमीनदार या सारखे लोक देणाऱ्या भावाची माहिती मिळवा
3. किराणा दुकानामध्ये जाऊन एक किलो तांदुळचा भाव आणि शेतकऱ्यांचा 1 किलो साळीचां भाव यांची तुलना करा ?
4. सरकारतर्फे साळींना मिळणारा हमी भाव कितपत योग्य आहे असे तुम्हाला वाटते ?
5. स्वयंसाह्यक गटाद्वारे शेतकऱ्यांना कोणता फायदा मिळत असेल असे तुम्हालां वाटते ?
6. तेलंगाना नकाशात खालील स्थाने दाखवा ?

   अ)निजामाबाद ब) हैद्राबाद क) आदिलाबाद ड) वरंगल इ) खम्मम ई) नलगोंडा

7. पान क्र. 81,82 वरील ***कर्जदार..... विक्री,*** हा परिच्छेद वाचुन त्याचे विवेचन करा ?

***प्रकल्प कार्य:***

- काही मुलांना जवळील व्यवसाय मार्केट यार्ड मध्ये घेऊन जा, तेथील संघटना, व्यापाऱ्यांची बोली,इत्यादी दाखवून, त्यांनी पाहिलेल्या सर्व घटनांना अनुकरण करुन त्यांची नक्कल करा ?
- तेलंगानातील लहान व्यापाऱ्यांच्या परिस्थितीवर छोटे नाटक तयार करा ?

SCERT TELANGANA

पाठ 9

# आदिवासी जमातीचा सांघिक, सामुदायिक निर्णय

एका भागात सामूहिकरित्या निवास करणारे लोक त्यांच्या एकत्रित समस्यांना कसे तोंड देतात? त्यांच्यातील विवाद्याचे कसे समाधान करतात? त्यात पुढाऱ्यांची भूमिका काय असते? त्यापासून त्यांना मिळणारे प्रतिफळ कोणते? अशाच काही समस्यांचा आपण अभ्यास करणार आहोत. या पाठात आपल्या समाजातील तरतम भेद नसलेले निर्णय कोणत्या प्रकारे घेतात? याचा आपण अभ्यास करणार आहोत.

**आदीवासी - समाज जिथे सर्व लोक समान आहेत.**

वेगवेगळ्या प्रकारच्या समाजांना आदिवासी जमाती असे म्हणतात. तेलंगानामध्ये चेचुं, कोंडारेड्डी, गोंड, कोया, यनादुलु, स्वरलु इत्यादी गिरीजन समाज आहेत. आपल्या देशातील पुष्कळ राष्ट्रांमध्ये असलेले आदिवासी प्रथमत: जंगलात जीवन जगत आहेत. त्या सर्वांना विभीन्न जीवनपद्धती, भाषा, संस्कृती आहेत. त्यांच्यामध्ये थोडे फरक असले तरी त्या सर्वांना गिरीजन का म्हणत आहेत? त्यांच्यामध्ये समान लक्षणे असल्यामुळे त्याला कारण असावे. ते कोणते -

1. एक आदिवासी सभासदाला असे वाटते, आम्ही सर्व एका मूळ पुरुषापासून आलेले आहोत. त्यासाठी सर्व आदिवासी सभासद एकमेकांमध्ये बंधुत्वाने राहतात. त्यामुळे ते एकमेकांना भाऊ समजतात.
2. सहज वनसंपदा असलेली जंगले, जमीन, पाणी, पशुसंपदा या सर्वांना आदिवासी एकत्र संपत्ती म्हणून समजतात. तितकेच पण एका व्यक्तीचे, कुटुंबाचे आहोत असे समजत नाहीत. या वनसंपदा सर्वांना आदीवासी निर्णयाच्या अनुकूल वापरू शकतो.
3. धनिक मोठा किंवा धनवान यांच्यात दिसत नाहीत. प्रत्येक जणांना आदिवासी उत्पन्नात समान वाटा असतो. उदा. आदिवासी जमीन एकूण सर्व कुटुंबांना, कुटुंबातील सभासदांची संख्या पाहून वाटणी करतात. काही संदर्भात कित्येक वर्षानंतर परत कुटुंबांना जमीन वाटून देतात. नाही तर विभाजन करतात. आणखी काही संदर्भात आदिवासी सर्व समूह मिळून जमीनीत पिक पिकवतात. पिकलेल्या पिकांना सर्व जण समान वाटणी करतात. गिरीजन आदिवासी जमिनीला कोणी विकत घेऊ शकत नाही. कारण ती भूमी सर्व आदिवाशांची असते. कोणीही ते पिकवित असलेल्या जमिनीपेक्षा जास्त जमीन त्यांच्या ताब्यात ठेवू शकत नाहीत.

SCERT TELANGANA

4. आदिवासींमध्ये सर्वजण कामे करत असतात. व्यवसाय, जंगलातील वनसंपदा, पशु पालन पोषण करणे, कपडे बरोबर ठेवणे, टोपली तयारी, कामाचे अवजारे, घर बांधणे यासारखे कोणत्याही कामासाठी प्रत्येक माणूस राहत नाही.

5. कुटुंबातील वेगळा काम लहान, मोठा फरक न समजता पुरुष, स्त्री, मुले मिळून काम करीत असतात. तर पुरुषांना निर्णय अधिकार जास्त असल्यामुळे समस्यासारखे वाटत नाही.

6. जंगलातील देव, त्याच्या मूळ पुरुषांची संतृप्ती करण्यासाठी होणारे सण, उत्सवांना गिरीजन समाजामध्ये जास्त किंमत देत असतात. तेवढेच नव्हे तर त्यांना विविध विश्वास, आचार, गाणे, नृत्य, चित्रकला इत्यादी ते समूहात सामान्य दिसत असते.


- गिरीजनमध्ये दिसणाऱ्या प्रधान वृत्ती लिहा?
- गिरीजन आदिवासी सभासद सर्व समान असतात असे तुम्ही कसे सांगू शकता काय?

एक आदिवासी जमात एका मोठ्या भागात किंवा गावात नाही तर निवास प्रांतात राहू शकतात. अशा प्रकारच्या कोंडारेड्डी आदिवासी निवासांना निरखून पाहा. आदिवासी सर्व विषयांवर कसे निर्णय घेतात? तसेच समस्या कशा सोडवितात?

आदिलाबाद जिल्ह्यातील गोंड कसे भांडणांना मिटवतात याचे निरीक्षण करा. त्यासाठी आंध्र प्रदेशातील गोंड जमाती विषयी फयुरर हैमन डार्फने लिहीलेल्या पुस्तकातील संक्षिप्त सारांश तुम्हाला मिळवून देत आहोत.

SCERT TELANGANA

आत्रोंपालजिस्ट (मानव विज्ञानशास्त्रज्ञ) नावाचे परिशोध करणारे गिरीजन लोकांविषयी अध्यापन केले आहेत. गिरीजनासोबत राहून त्यांची संस्कृती, जीवनपद्धती, विश्वास, निर्णय इत्यादीविषयी नोंद केली आहे. तशा प्रकारात फयुरर हैमन डार्फ हा 1940 मध्ये आंध्र प्रदेशाला येऊन चेंचु, कोंडारेड्डी, गोंडाविषयी अध्यायन करून त्यांच्याविषयी पुस्तके लिहीली आहेत. आणखी त्यांनी भारत देशातील विविध गिरीजन आदिवासी, मुख्यत: इशान्य राष्ट्रातील गिरीजनाविषयी अध्ययन केले आहे.



9.1 फ्युरर हैमन ड्वार्फ



9.2 चेंचू जमातीसोबत ड्वार्फ

## गोंड पंच (पंचायत) पटेल (ग्रामप्रमुख)

पंच किंवा कुटूंबातील प्रमुखाला पटेल असे म्हटले जाते. तो कुटूंब प्रमुख असतो. त्यांना अधिकारांची वाटणी केली जाते. यासाठी गावातील सर्व वयस्कर (ज्येष्ठ) पुरूषांची एक समिती असते. या समितीचा निर्णय कोणत्याही वादावर अंतिम असतो. ही पंचायती पूर्णपणे गोंड जमातीचे प्रतिरूप असते.

पंचायती नियम तोडून समावेश करू नये. परंतु आता केव्हा आवश्यकता वाटली तेव्हा समावेश करीत आहेत. काहीतरी मुख्य विषया विषयी चर्चा करतेवेळेस, सर्व पुरुष हजर होत असतात. नवयुवक, महिला होणाऱ्या पद्धतींना निरिक्षण करीत असतात. महिलांना या मंडळीत बोलण्याचा अधिकार नाही. परंतु त्यांना समस्या सांगण्याचा हक्क आहे.

प्रमुख सणांची तिथी निश्चीत करणे, विवाह, घटस्फोट, भांडणाचे वाद, कर्मकांड, विधीविज्ञान, निर्णय पंचायत करीत असते. कोणालाही दोषी करार दिल्यानंतर त्यांना जुर्माना (दंड) लावतात. इतर त्या दोषीसोबत संबंध न ठेवता विरोध करतात. गावात समस्या आली असता सर्व पंच (पंचायती) संयुक्त समावेश करीत असतात.

कोणताही विवाद पंचायतीसमोर आला असता पंचाचे मुख्य उद्देश वादविवादातील वास्तव विषयी माहिती करणे. दोन वर्गातील ज्यांचे त्यांचे मत सांगु शकतो. नंतर गावातील मोठ्या माणसांना प्रश्न विचारून एका निर्णयावर येतात. साक्षीना सुद्धा विचारपूस करतात. साक्षांचे निरिक्षण करतात. हे सर्व पूर्ण झाल्यानंतर चर्चा करून पूर्वी अशाच संदर्भात दिलेल्या न्यायाचे निरिक्षण करून पंचायती (पंच) न्याय देतात. पिढ्यान पिढ्या आदिवासींमध्ये येणारी पद्धत अनुसरून न्याय दिला जातो. न्यायावर आदिवासी वृद्ध चर्चा करतात. अखेरीस निर्णयावर येतात. वाद विवादासंबंधी विचार ऐकल्यानंतर पंचायती अंतिम निर्णय सुचवितात. तरी हा शेवटचा निर्णय नव्हे. नंतर दोषींची इच्छा असेल तर न्यायामध्ये बदल करतात. त्यानंतर शेवटचा निर्णय देतात.

- गोंडातील पंचायतीमध्ये सभासद होण्यास पात्र नसणारे कोण आहेत ?
- पंचायतीमध्ये सर्व कुटुंबाना प्रतिनिधीत्व, प्राधान्य, राहण्यासाठी काय करावे असे तुम्हाला काय वाटते ?
- एखादी समस्या सोडविण्यासाठी पंचायत (पंच) कशा प्रकारच्या विषयांना समाविष्ट करतात.



*चित्र 9.3 गोड पंचायत बैठक*

SCERT TELANGANA

गोंड निर्णय कोणत्या प्रकारे देतात ही माहिती मिळवण्यासाठी एक हृद्यस्पर्शी उदाहरण पाहा. -

एके दिवशी एक मुलगी एका व्यक्तीवर फिर्याद करण्यासाठी पंचासमोर येते. कारण तो व्यक्ती तिला छेडछाड करण्याचा प्रयत्न करीत असतो. तिने त्याच्या गालावर मारले. त्याने तिला ढकलले. ती त्याच्याजवळून निसटून पळून गेली. पंचायतीपुढे त्या व्यक्तीने त्याची चूक कबूल केली. दोषीला कोणती शिक्षा द्यावी म्हणून पंचांनी (पंचायत) तिला विचारले. समाधान म्हणून तिने त्याला अत्यंत अवमानकारक शिक्षा द्यावी म्हणून तिने सांगितले. एवढेच नव्हे तर भविष्यात कोणताही त्रास तिला देत नाही म्हणून त्याच्याकडून तिने लिहून घेण्यास सांगितले. सभेमध्ये व तिच्यासमोर त्याने नाक घासावे आणि तिला माफी मागावी असा पंचायतने निर्णय दिला.

- पंचायतीने दिलेल्या निर्णयामुळे त्या मुलीला समाधान वाटली काय ?
- या शिक्षेमुळे तिच्या मनाला कसे वाटले असेल ? असे तुम्हाला वाटते ?

## पाटील (ग्राम प्रमुख)

प्रत्येक गावात पाटील (ग्रामप्रमुख) असतो. ही पदवी वारसाहक्कानी आलेली असते. (आई वडीलांकडून मिळणारी धन, दौलत, घरातील मुलांना मुलींना वारीस असे म्हणतात) तो पंचायतीला जबाबदारच नसून पुष्कळ विषयांमध्ये प्रतिभावंत प्रमुख म्हणून ओळखला जातो.

पंचायतीत एकदा समावेश झाल्यानंतर ग्रामप्रमुखाला दररोज त्याचे कर्तव्य पार पाडावे लागते. ग्रामप्रमुख साधारणत: गाव बनवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावावी लागते. गावाला एकत्र ठेवण्यासाठी बाहेरील व्यक्तीसोबत, सरकारी संस्थांसोबत चांगले संबंध ठेवावे लागतात. सणामध्ये, ग्रामाच्या संबंधित सामाजिक कार्यक्रमामध्ये समान व्यवहार करावा लागतो. गावात आलेल्या अतिथींचे आदरातिथ्य करावे लागते. प्रतिफळ म्हणून गावातील सर्व लोक त्यांच्या शेतात एक दिवस कामाला येतात. त्यामुळे त्यांचे कुटुंब थोडी जास्त शेती करू शकतात. अतिथींची मर्यादा करू शकतात.

ग्रामप्रमुख आदीवासी अभिप्रायांचे विरुद्ध गर्वाने वागत असेल तर त्याच्या जागेवर दुसऱ्यांना नियुक्त करतात. नसेल तर गावातील कुटुंबे या गावांना सोडून दुसऱ्या ठिकाणी निवास करण्यासाठी जात आहेत.

- ग्रामप्रमुख कोणाला होता येते ?
- पंचायत आणि ग्रामप्रमुख यातील असलेले संबंध कोणते ?
- गावामध्ये ग्रामप्रमुखाची विशिष्ट प्राधान्यता कोणती ?
- ग्रामप्रमुखाला केव्हा बदलता येते ?
- या पद्धतीतील मुख्य अंश, त्याच्यातील

तेलुगू भाषिक आणि मराठी भाषिक हे 1940-50 या दशकामध्ये वेगळे झाले तेव्हापासून पंचायत राज व्यवस्था अंमलात आली. यामुळे गोंड जमातीच्या पंचायतीमध्येही काही फरक आल्याचे मानववंश शास्त्रज्ञ हेमन ड्रार्फ यांनी आपल्या निरिक्षणात नमूद केले. अनेक लोक आपले वाद मिटविण्यासाठी स्थानिक पोलिस स्टेशन किंवा न्यायालयाकडे जात असल्याचे त्यांना अभ्यासात दिसून आले. एवढेच नव्हे तर स्थानिक निवडणुकाही गोंड लोक लढवू लागले.

SCERT TELANGANA

**कमतरताविषयी चर्चा करा?**

- गोंड पंचायतीला पूर्णपणे वाचून खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा?

1. इतर जातीतील व्यक्तींना गोंड पंचायतीमध्ये सभासद म्हणून घेतात काय? विचार करा.
2. हैमन ड्वॉर्फच्या मते नावाजलेला एक ग्रामप्रमुख कमी दर्जाच्या ग्रामप्रमुखापेक्षा जास्त भूमी वाहत असतो? असे का होत असते? विवरण करा.

गिरीजन समाज व्यवहारामध्ये प्रत्येक कुटुंबे सहभागी होते. काही संदर्भात ग्रामप्रमुखापेक्षा जास्त किंमत समाजाला आहे. ग्रामप्रमुख कुणालाही अनुकूल किंवा व्यतिरिक्त असू नये, सर्वांना सारखे असावे लागते. आदिवाशांच्या अभिप्रायाच्या विरुद्ध वागू नये. तसेच त्यांनी आदिवासींना केलेल्या सेवेच्या मोबदल्यात त्याच्या शेतात एक दिवस सर्वजण काम करतात. आदिवाशांमध्ये प्रमुख हा सर्वांत धनवान असून आदिवासी सुरक्षतेसाठी त्या धनाचा वापर करतो. जवळजवळ सर्व गिरीजन गावामध्ये असेच चालू आहे.

***महत्त्वाचे शब्द :-***

कम्युनिटी (जाती), आदिवासी, मानव विज्ञान शास्त्रज्ञ, वाद विवाद ऐकणे, आरोप करणे, विवाद

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. गिरीजनांना सर्वांसोबत समान भावना असते असे तुम्ही कशावरून म्हणत आहात. समाजात राहणारे सर्व वर्ग समान आहोत ही भावना नसेल तर काय होईल?
2. तुम्ही राहात असलेल्या गावामध्ये अशा प्रकारची पंचायत आहे काय? तुमचे शिक्षक, आईवडील, वडीलधाऱ्या माणसासोबत पंचायतीविषयी चर्चा करा.
3. पोलीस न्याय व्यवस्था त्यांचा संबंध नसता होणाऱ्या गोंड पंचायती न्याय करतात. तुम्ही याचे समर्थन करता काय?
4. प्युरर हैमन ड्वॉर्फनला गिरीजन समाजाविषयी असलेल्या संबंधाविषयी माहिती मिळवा.
5. पंचायती निर्णयामध्ये न्याय मिळाला नाही असे वाटले तर त्याला दुसरा उपाय कोणता?
6. तेलंगानाच्या नकाशात खालील जिल्हे दाखवा.

   अ) खम्मम   ब) आदिलाबाद   क) महबूबनगर   ड) पान क्र.
7. 86 वरील पाटील ( ग्राम प्रमुख ) हा परिच्छेद वाचुन त्याचे विवेचन करा?

SCERT TELANGANA

पाठ 10

# साम्राज्य, प्रजासत्ताकाचा उदय

सहाव्या पाठात आपण गिरीजन समाजाची काम करण्याची पद्धत याविषयी अध्ययन केले आहे.  मोठ्या साम्राज्यांना परिपालन केलेल्या राजांना, चक्रवर्तीविषयी तुम्ही ऐकलेच असेल. त्यांनी प्रारंभिक दशेत कोणत्या प्रकारे साम्राज्यांना, प्रजासत्ताकांना कसे निर्माण केले यांची माहिती मिळवू या.

गंगादरी : जनपदापासुन ते महाजनपदा पर्यंत

भारत देशाच्या नकाशामध्ये गंगा, यमुना नदी वाहणाऱ्या भागांमध्ये असलेल्या मैदान प्रांतांना ओळखा. आधुनिक शहर दिल्ली, अहालाबाद, वारासणसी, लखनौ, कानपूर, पाटना ओळखा. या भागांना समानत्व आहे काय? कारणे सांगा.

उत्तर भारत देश विशाल मैदान गंगा. सिंधू मैदान म्हणून ओळखल्या जाते. हिमालय, द्विपकल्प, पठारभूमी मध्ये गंगा यमुना वाहत असतात. गोदावरी, कृष्णा मैदानाप्रमाणे गंगा दरीमध्ये सुद्धा अधिक पाऊस आहे. हिमालयामधून वाहणारी सर्वात मोठ्या नद्या आणलेला गाळ सुपीक असतो. या नद्यामध्ये पाणी वर्षभर वाहत असते.

प्रारंभी विविध आदिवासी या मैदानामध्ये अनुकूल भागामध्ये व्यवसाय करीत स्थिर झाले आहेत. यालाच संस्कृतमध्ये 'जण' असे म्हणतात. ते स्थिर झालेल्या जागेला 'जनपद' असे म्हणतात.


लोक 4000 वर्षांपूर्वी या नदीच्या जवळ स्थिर होणे प्रारंभ झाले आहे. लोहा कामाचे अवजार जंगलांना तोडून, जमिनींना नांगरून साळी इतर पीके पिकवित होती. याप्रकारे या भागात मोठमोठे गावे, शहरे तयार होऊन विविध आदिवासी लोक निवास करू शकले. अशा मोठ्या गावांना किंवा शहरांना महाजनपद किंवा मोठे जनपद म्हणून ओळखतात.

- गंगा, सिंधू मैदानामध्ये प्रारंभी स्थिर होऊन आदिवासी नावांना तुमच्या शिक्षकाच्या सहाय्याने माहिती मिळवा.
- जनपद म्हणजे अर्थ काय आहे? महाजनपदाना यातील फरक कोणता?

**महाजनपदाविषयी कोणत्या प्रकारे माहिती मिळवू शकतो?**

इकडील गावांना शहरांना दोन प्रकारच्या आधाराने ओळखू शकतो. पहिले इकडे झालेल्या पुरातन खोदखनिजाद्वारे दुसरे त्या काळात लिहीलेल्या पुस्तकांच्या आधारे माहिती मिळवू शकतो. गंगादऱ्यात शेकडो भागामध्ये पुरातन शास्त्रज्ञाने खोद खनन केले आहे. तद्वारा मिळालेल्या आधाराद्वारे त्या काळातील लोक जीवनपद्धत माहिती मिळवण्यासाठी प्रयत्न केला.

SCERT TELANGANA




*नकाशा : महाजन पद*

## काही महत्त्वाची महाजनपदे

वर दिलेल्या भारताच्या नकाशात पाहा. या नकाशात काही महाजनपदे विस्ताराने मोठी आहेत तर काही लहान. मोठ्या महाजनपदांना मोठ्या शहरांमध्ये तर लहान जनपदांमध्ये लहान शहरांमध्ये विभागणी करून खालील तक्त्यात त्याविषयीची माहिती लिहा. ही सारी महाजनपदे गंगेच्या खोऱ्यात वसली होती.

गंगानदीच्या खोऱ्यात असलेले महाजनपद त्यांची शहरे यासंबंधी सूची तयार करा.

| महाजनपद | शहर |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |

SCERT TELANGANA

गावे, शहरेविषयी नसून पालन करणारे, राजाविषयी सुद्धा माहिती मिळते. काही पुस्तकांना ग्रीससारख्या दूर (त्या काळातील पुस्तके ही वैदिक धर्माचे पालन करणारे लोक लिहीत) राहणाऱ्यांनी सुद्धा लिहीले आहे. विविध आधाराच्या द्वारे मिळालेल्या माहितीआधारे त्या काळातील घटनांविषयी माहिती मिळवू या. महाजन पदामध्ये काही मुख्य पुरातत्त्व प्रांते, दिल्ली, आत्रंजीखेर, कौशंबी (अलाहाबादजवळ), पाटना, अयोध्या, राजगीर इत्यादी.

याकाळात लिहीलेली काही मुख्य पुस्तके -

उपनिषद, धर्मसूत्र, दिगानीकाय, यजमनिकाय, हेरीडोटस चरित्र, स्ट्राबो, इ.

- दोन हजार वर्षांपूर्वी आपण निवास केलेल्या गावांना, शहरांना, पुरातन वस्तू शास्त्रज्ञांनी उत्खनन केल्यामुळे ते आपल्या गावांना शहरांना काय पाहतात?
- एक प्रांत गाव/ शहर म्हणून ते कसे ओळखतात?
- एका पुस्तकामध्ये एखादे शहर सोने, चांदीने निर्मित झाले आहे. हजारो लोक मोठ्या विशाल भवनामध्ये राहत होते. लिखीत असेल तर ते काल्पनिक आहे? का वास्तव आहे? हे तुम्ही कसे ओळखता?

## महाजनपद काळातील गावे

त्या काळातील पुस्तके वाचली असता व्यवसाय करणारे भूमालकांना गृहपती किंवा महापती म्हणत होते. म्हणून माहिती मिळते. ते कुटुंबासोबत व्यवसाय क्षेत्रात काम करीत होते. त्यांना किंवा गुलामगिरी (युद्धात शरण आलेले शेतकऱ्यांना विकला गेलेला)ठेवत सुद्धा कामाला लावीत होते. काही जण धनवान असलेले गृहपतिंना जास्त जमीन असणाऱ्यांना गुलाम होते. साधारणतः अत्याधिक भूमी असलेला व्यक्ती ग्रामप्रमुख होत असतो. गोंड 'पाटील' त्या गावाचा प्रमुखच नसून राजापासून इतर गावाकडून कर वसूल करीत असे. तेवढेच नव्हे तर काही वेळेस न्यायमूर्ती, पोलीस अधिकारी सारखे व्यवहार करीत, गावातील शेती भद्रता टिकवून ठेवत होते.

पुष्कळ गावात कौशल्य आधारीत वृत्ती कामगार राहत होते. लोहार व्यवसायासाठी कामी येणारे कामाचे अवजारे (नांगरांचा फाळ, कुऱ्हाडी, बाणे इत्यादी) ना बळावीत होते. स्वयंपाकासाठी उपयोगात येणारे भांडे, धान्य साठवून ठेवण्यासाठी पात्रे कुंभार करीत होते. बैलगाडी, नांगर व इतर सामग्री सुतार करीत होते. कपडे, विणकर काम करणारे करीत होते. उत्पत्तीच्या बदल्यात त्यांना धान्य देत असावेत. या उत्पत्ती व्यवसायासाठी अति आवश्यक आहेत. त्यांना स्वतः तयार करण्यासाठी गृहपतींना त्यांच्याजवळ कौशल्य आणि वेळ राहत नाही.

- गोंड असलेल्या आदिवासीची गावे आणि महाजनपद असलेली गावे यातील फरक कोणता?
- गृहपती आणि गावातील वृत्ती काम करणाऱ्यांमध्ये संबंध कोणते?

## महाजनपद काळातील शहरे

तांबे, पितळ अशासारख्या पात्रांना त्तयार करीत होते. ते लाकडापासून बैलगाडी, ग्रहसामान तयार करत होते. रासायनिक, गवंडी, शिक्षक, झाडणारे, पाणी आणणारे, लाकडापासून हत्ती बनविणे, हत्तीच्या

SCERT TELANGANA

दातांपासून वस्तू बनविणे, अनेक प्रकारचे कामे करणारे होते. त्यांनी तयार केलेल्या वस्तू थोड्या उत्खननामध्ये सापडत आहेत. पुस्तकाद्वारे त्यांच्याविषयी आणखी माहिती मिळवू शकतो. कारागिराने उत्पत्ती केलेल्या काही गृहपतींना जास्त फायद्यामध्ये व्यापाऱ्यांना विकत होते. एवढेच नव्हे तर विविध देशाला त्या देशातील वस्तू बनवून विकत होते. ते व्यापार करण्याच्या निमित्ताने सहकुटुंबासोबत बैलगाडी, गाढव, उंटासोबत आठवडा, महिने, फिरत होते. नदी, मैदान, डोंगर, महावाळवंट, या सर्व ठिकाणी प्रवस करत होते. ते आलेल्या व्यापार लाभामध्ये मोठे घरे 6-7 नोकरे, सेवा करण्यासाठी 5,6 नोकरे ठेवत होते.

साधारणतः गावातील धनवान व्यक्ती त्या गावाचा प्रमुख बनत असे. गावातील सर्व कामांची जबाबदारी आपोआप ग्रामप्रमुखाकडे जात असे. लोकांकडून कर गोळा करणे, तंट्यांचा न्याय्यनिवडा करणे कधी कधी गुन्हेगारांना शिक्षा देणे ही कामेही ग्रामप्रमुख करीत असे.



*चित्र 10.1 महाजनपद काळातील भांडे, कपासारखे वस्तू सुंदर रंगीबेरंगी वस्तू तुम्ही येथे पाहू शकता.*

पुष्कळ महाजन पदांना राजे, पालन करीत होते. लोक त्यांच्या आज्ञेचे पालन करत होते. इतर राजे, त्यांच्या राज्यावर स्वारी करू नये म्हणून त्यांच्या काळातील राजांना सैनिक असायचे. राजधानी नगरामध्ये राहत. लाकडे, दगडे, विटामातीचे कामे आणि घरे बांधत होते.


- महाजनपदातील प्रजेला आवश्यक असलेले धान्य, दूध, मांस इ. ते कसे मिळवित होते, तसेच त्या काळात शेती व्यवसाय कसा होता याबद्दल माहिती मिळवा.

## राजा सैन्य आणि कर

धनवान आणि महान राहावे म्हणून पुष्कळ राजांना वाटत होते. यांना दोन मार्ग आहेत. पहिले त्यांच्या राज्यातील लोकांवर क़र वाढविणे, दुसरे जवळील राज्यावर विजय मिळवणे, व्यवसाय करणाऱ्या गृहपतीपासून कर वसूल करणे. ते त्यांच्या पिकलेल्या पिकांना सहा भाग करत होते. एक भाग राज्याला मोफ़त देत होते. कामगार, रोजगार हे सुद्धा कर देत होते. गोंड ग्रामप्रमुख पाटील सुद्धा केव्हा केव्हा बाहेरील आक्रमणामुळे त्या गावांची रक्षा करण्यासाठी येत होते. त्यावेळी गावातील सर्व जण मिळून लढाई करत होते. ग्रामप्रमुखाच्या शेतामध्ये पैसे न घेता एक दिवस गावातील लोक काम करत होते. त्याद्वारे आलेले उत्पन्न पाटील गावात आलेल्या सरकारी अतिथींचे आतिथ्य करण्यासाठी वापरत होते.

- या सर्वांना जास्त खर्च लागायचा. सैनिकांना त्यांच्या कुटुंबांना आधार मिळायचा. वीट बनविणाऱ्यांना, जादा मजूरी मिळायची. राजे आवश्यक असलेले धन कसे मिळवित होते ?

SCERT TELANGANA




*चित्र 10.2 कौसंबी शहरामधील एका राजमहालाची भिंत*

आदिवासी ग्रामप्रमुख महाजनपद मधील राजा यांच्यामध्ये पुष्कळ फरक आहे. लोकांपासून राजे, कामे, करवसुली करत होते. गृहपती, कामगार व्यापारी यांच्याकडून कामे करण्यासाठी अधिकारी होते. काम करीत नाही असे कोणी म्हटले तर सैनिक त्यांना शिक्षा देत होते. हे अधिकारी सैनिक राजाचा नोकरवर्ग होता. राजाच्या आज्ञेचे पालन करतात. लोक राज्याच्या आज्ञेचे पालन करीत आहेत किंवा नाहीत हे पाहण्यासाठी ग्रामप्रमुख उपयोगी पडत होते.

गोंड प्रमुख कधीकधी संरक्षणाचेही काम करीत त्याबदल्यात स्थानिक प्रजेकडून थोडासा कर वसूल करत तर कधी कधी गावातील इतर लोक प्रमुखाच्या शेतात एक दिवस मोफत काम करीत असत. या पैशांतून गोंडप्रमुख सरकारी अधिकाऱ्यांचे तथा अतिथींचे सत्कार करीत असे. पण हे उत्पन्न अतिशय थोडे होते.

तरीही या पैशाच्या उपयोगाने आदिवासी गोंड प्रमुख खूप धनवान बनले. गावातील सर्वसाधारण लोक या प्रमुखांची आज्ञा मानत होते. न्यायनिवाड्यामध्ये प्रमुखाचा निर्णय हा अंतिम मानला जात असे. इ.स. 2000 वर्षापूर्वीचे सांची येथील स्तूपावरील शिल्प पाहा. या शिल्पातील राजा तुम्ही ओळखू शकणार का ?

- महाजनपदातील राजांना सैन्याची आवश्यकता का होती?
- महाजनपद काळातील ग्रामप्रमुखांनी राजा यांचे उत्पन्नाचे मार्ग काय होते?



*चित्र 10.3 राजा राजमहालामधून निघतानाचे दृश्य*

SCERT TELANGANA

तत्कालीन अनेक राजांना शक्ती आणि संपत्ती गोळा करण्याची इच्छा होती त्यासाठी त्यांच्याकडे दोन मार्ग उपलबध होते. पहिला प्रजेवरील कर वाढविणे आणि दुसरा शेजारच्या राज्यांशी युद्ध करून विजय मिळविणे. तत्पूर्वी हे राजे सर्वसामान्यांकडून नियमितपणे गटहपतीद्वारा कर वसूली करीत असत. एकूण उत्पन्नाचा सहावा हिस्सा हा कररूपाने द्यावा लागत होत. यालाच भाग असे म्हणत असत. हस्तकला आणि तत्समान कारागिरांनाही कर द्यावा लागत असे. हे लोक रोख कर देण्याऐवजी श्रमाच्या मोबदल्यात कर देत असत. महिन्यातून दोन दिवस हे लोक राज्याच्या कामावर जात असत. या मध्ये राजाची गुरे चारणे, शेतीतील काम करणे, इत्यादी कामे असत. व्यापारी, शिकारी, आदि लोकही विविध मार्गाने कर देत असत. लाकूड वनउत्पत्ती आदींच्या माध्यमातून कर गोळा होत असे. कांही कर हे नाण्याच्या रुपात असत.

- प्रत्येकाला कष्ट केलेल्या उत्पन्नावर कर भरावा लागला तर हे त्यांच्या जीवनावर कशा प्रकारचा प्रभाव टाकू शकतो.
- ते कामे करण्यासाठी कशामुळे तयार झाले असावेत, नवीन निर्माण करण्यासाठी ते कोणत्या प्रकारचे प्रयोजन घेत होते ?
- भाग म्हणजे काय ? शेतकऱ्यांच्या उत्पन्नापासून आजचे सरकार सुद्धा कर घेतो का ?

इतिहासकाराच्या मते त्याद्वारे राज्यांना कर रूपामध्ये धन गोळा होत हाते. अशाच प्रकारे व्यापाऱ्यांजवळून त्यांचा कर वसूल करावा म्हणून राज्य ग्रामप्रमुख, यांना सांगत होता. ग्रामप्रमुख अधिकारी, धनसंपदासाठी सहयोग करत होते. राजा निरंतर राज्य विस्तारण्यासाठी युद्ध करत होते. या युद्धामध्ये सहभागी सैनिकांना पगार देत होते. हरलेल्यांचा नाश करत होता. गावांना लुटून घेत होते. पराजित झालेल्या राजाचे लोकांना गुलाम म्हणून वागवित होते. व त्यांना शेतकऱ्यांना शेती कामासाठी, व्यापाऱ्यांना, अधिकाऱ्यांना विकत होते.

शिवारी वनसंपदा जमा करणारे सुद्धा राज्याला कर देत होते. या काळात नाण्यांचा उपयोगाचा प्रारंभ झाला. काही प्रकारची कामे पैशाच्या रूपात देत होते. शेतकऱ्यांनी दर्जेदार सिंचनाच्या सहाय्याने जास्तीत जास्त उत्पादन वाढावे यासाठीही राजेही प्रोत्साहन देत होते.

- राज्याला कर देणाऱ्या गावांविषयी एक कथा लिहा. ही कथा लिहीताना त्या काळातील गावाविषयी तुम्हाला जेवढे कळाले तेवढे लक्षात असू द्या.
- कौशल्यावर आधारीत उत्पादक वाढविण्याकडे महाजनपद राजांनी उतसुकता का दाखवली. राजांनी लादलेला कर ग्रामप्रमुख कोणत्या प्रकारे फायदा घेत होता.

### मगध एक शक्तीशाली राज्य

तुम्ही वर तयार केलेल्या सूचीमध्ये मगध राज्य आहे काय ? हे गंगा नदीच्या दोन्ही बाजूस वितरण झालेले तुम्ही पाहिले असाल. नद्या जमिनींना सुपीक करातत. गृहपती त्यांच्या जमिनींवर सोयीस्कर पिक पिकवित होते. नदीद्वारे अन्नधान्य रवाना करीत होते.

SCERT TELANGANA



*चित्र 10.4 सांची स्तूपाच्या भिंतीवरील युद्धाचे दृश्य असणारे शिल्प*

सैनिकांना पोहंचवत होते. मगधमध्ये काही भागामध्ये जंगले आहेत. या जंगलामधून हत्तीला पकडून युद्धासाठी लढाई करण्यासाठी त्यांना शिक्षण देत होते. जंगलापासून मिळणाऱ्या लाकडापासून कोठा, राजभवन रथ तयार करत होते.

या सर्व कारणामुळे मगध राज्य शक्तीशाली राज्य म्हणून ओळखले जायचे. प्रथम राजा असणारा बिंबिसार आणि त्याचा पुत्र आजातशत्रू यांनी मगधला शक्तीशाली राज्य बनविण्यास मदत केली.

महापद्मानंद आणखी एक राजा या दोघांनी त्यांच्या सैन्यांनी इतर राजाला जिंकून घेतले. त्याचे फळ म्हणजे महापदमनंद काळात राज्ये वायव्य दिशेपासून ओरिसापर्यंत विस्तार झाला. मगधासारखे सर्व महाजनपद राज्यपालन करू शकले नाही हे लक्षात ठेवावे. पशू, मेंढ्या कापणारे सुद्धा प्राणी किंवा प्राण्यांपासून होणाऱ्या उत्पन्नांचे सुद्धा कर भरावे लागते व्यापारीसुद्धा आपल्या विकलेल्या वस्तूवर कर भरत होते.

- मगध राज्यांच्या दक्षिण भागात लोखंडाचे खनिज पदार्थ आहेत त्यांचा उपयोग करून अवजारे इत्यादी बनवित असत. त्याबद्दल दोन ओळीत माहिती लिहून मगध राज्य शक्तीशाली होण्यास कशी मदत झाली?

### वज्जी एक गणराज्य

मगध राज्याच्या उत्तर दिशेला गणतंत्र सरकार असलेले वज्री महाजनपद राहात होते. राज्याला एकच पालन करणारा नसून एक परिपालन करणारे गट असायचे. काही संदर्भामध्ये हजारो माणसे मिसळून पालन करत होते. प्रत्येक जन स्वत:ला राजा समजत होते. त्यांच्या संप्रदायाचे संगोपन करीत असताना सर्वजण समाविष्ट होऊन सर्वांना सबंधित असलेल्या विषयावर वाद उपवाद करीत होते.


बुद्ध आणि महावीर यांचा जन्म राजघराण्यात झाला होता. हे ख्यातनाम उपदेशक होते. म्हणूनच राजे राजवाड्याने त्यांना मान दिला. त्यांच्या उपदेशांना नष्ट करण्याचे अनेक प्रयत्न झाले. ते 1500 वर्षांपर्यंत टिकून होते.

**महत्त्वाचे शब्द**

राज्य
प्रजासत्ताक
भिक्षुक
गृहपती
जनपदे
महाजनपद
गंगेचे मैदान
दास



SCERT TELANGANA



*चित्र 10.5 सांची स्तूपाच्या भिंतीवरील बैठकीचे (गण) दृश्य असणाारे शिल्प*

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. गण म्हणजे काय? राजांचे राज्य यातील फरक स्पष्ट करा.
2. गोंड 'पंच' पंचायती आणि राज्यामध्ये समानत्व आणि फरक लिहा.
3. महाजनपद काळात ग्रामपालन आणि आजच्या ग्रामपालन मधील फरक सांगा.
4. आज सरकार रोजगार यांना कोणत्या प्रकारे कामे देत आहे ? महाजनपद मधील कामाच्या पद्धती दोन्ही एकच आहे काय?
5. पान क्र. 87 वरील ***दुसरा परिच्छेद (पुष्कळ गावात....)*** वाचुन विवेचन करा.
6. भारताच्या नकाशात 16 महाजनपदे दाखवा (पान क्र. 89 वरील नकाशाचा आधार घ्या)

SCERT TELANGANA

पाठ 11

# प्रथम साम्राज्य

महापद्मानंतर काही काळाने वयाने युवक असलेला मौर्य चंद्रगुप्त मगध देशाचा राजा बनला. त्यांनीच मौर्य साम्राज्याची स्थापना केली. (एकाच कुटुंबातील व्यक्ती वारसाने राजा झाला तर त्याला वंशपारंपरिक पालन असे म्हणतात.) चंद्रगुप्तचा मुलगा बिंदूसार, त्याचा नातू अशोक यांनी मगध साम्राज्याचा विनाश करून भारतीय उपखंडातील पुष्कळ भागावर राज्य केले. भारत देशाच्या नकाशात मगध साम्राज्याचे विस्तारण पाहा ते आजच्या अफगाणिस्तानापासून दक्षिणेकडे कर्नाटक पर्यंत, पूर्वेस बंगालपर्यंत विस्तारीत आहे.


SCERT TELANGANA

मौर्य साम्राज्य -

मोठ्या राज्यांना साम्राज्य म्हणतात. त्या साम्राज्याच्या राजास चक्रवर्ती म्हणतात. भारतीय उपखंडातील प्रथम चक्रवर्तीत चंद्रगुप्त मौर्याला एक समजले जाते. प्रारंभी मगध व त्याच्या सभोवतालच्या प्रांतात सीमित असायचे. परंतु काही काळानंतर बऱ्याच प्रांतात विस्तारीत झाली. त्या साम्राज्यात हिंदूकुश, पर्वते भारतातील सर्वात मोठे वाळवंट (थार) गुजरात गंगा-सिंधू नदीचे खोरे, माल्वा, भूमी, अति विस्तारीत मध्य भारतीय जंगले, कृष्णा, तुंगभद्राची खोरी व गोदावरीची खोरी आहेत. या विशाल अशा साम्राज्याची तेथील विविध प्रकारच्या लोकांचे अंदाज करा. त्यात गंगा नदीचे खोरे, कृष्णा नदीचे खोरे, माल्वा, गुजरात, पंजाब हे प्रांत फार सुपीक व जास्त लोकसंख्या असलेल्या घनतेची असायची. व्यापार, संस्कृती इतर प्रांत प्रसिद्ध झाले. या ठिकाणाहूनच मोठ्या नगरास जहाजाद्वारे इतर देशांशी मुख्य व्यापार चालायचे. काही प्रांतात, सोने रत्न यांच्या खाणी प्रसिद्ध झाल्या.

- आपण मौर्य साम्राज्याचे बद्दल कोणकोणत्या आधाराद्वारे अध्ययन करू शकतो?
- मौर्य साम्राज्यातील व्यापारी मार्ग ओळखणे, व्यापारी मार्ग राजांना कोणत्या प्रकारे महत्त्वाचे?
- मोठे राज्य व साम्राज्य यातील भेद काय?

मौर्य राजे विविध प्रांतात लोकांकडून सवलती, कर मिळवायचे अशा विशाल साम्राज्याचे राजांनी कसे राज्य केले? उदा. कृष्णा खोऱ्यातील प्रांतातील लोकांनी कर देण्यास नाकारल्यास पाटण्यात बसलेल्या राजास या विषयाची माहिती कशी व्हावी? त्यांना शिक्षा द्या म्हणून ते सैन्यास कसे सांगतील? सैन्य कृष्णा प्रांतास कसे पोहोचावे? तेथे पोहोचून त्यांना कसे ओळखावे?



SCERT TELANGANA

*नकाशा–1 मौर्य साम्राज्यातील प्रमुख नगर व प्रांतांना दर्शविणारा नकाशा*

कर न भरणाऱ्यांना कशी शिक्षा देतात? या सर्वांसाठी किती वेळ लागेल?

साम्राज्यातील विविध प्रांतांना विविध प्रकारे मौर्य राजे पालन करीत असत. पाटलीपुत्र आणि त्या सभोवतालचा सर्व प्रांत प्रत्यक्ष राजाच शिक्षा ठोठावण्यास अधिकाऱ्यांची नेमणूक करीत असे. अधिकाऱ्यांच्या कामकाजांची माहिती गुप्तचर राजांना देत व राजाचा संदेश अधिकाऱ्यांना सेवकाद्वारा पोहंचत असे. मंत्री व राजकुटुंबिक सदस्याच्या सहकार्याने अधिकाऱ्यांच्या कामकाजाचे पर्यवेक्षण करावयाचे.

- राजांच्या प्रत्यक्ष नियंत्रणात असलेल्या प्रांतावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणत्या विधानाचा उपयोग करीत?
- साम्राज्यात गुप्तचरांची आवश्यकता काय?

इतर प्रांत व प्रदेशांचे पालन तक्षशिला, उज्जैनी, सुवर्णनिधी यासारख्या प्रादेशिक राजधान्यांवरून होत असे. यांचे पालन करण्यासाठी राजकुमारांना पाठवीत असत. यांना पालक (गव्हर्नर) असे संबोधित असे. त्या प्रदेशास संबंधित सर्व निर्णय घेण्याचा अधिकार त्यास असायचा. एवढेच नव्हे तर त्यांचे स्वत:चे सैन्य व अधिकारी असायचे. यांना सुद्धा राजाकडून सेवकामार्फत किंवा इतरांद्वारा सूचना पाठवीत. त्या प्रदेशातील आचार-विचार, नियम, जीवनमान या गोष्टींचा ज्ञात असलेल्या त्या प्रांतातील कुटुंबाकडून सुद्धा पालक मदत घेत असत.

या प्रादेशिक शहरी प्रदेशामध्ये जास्त खेडी किंवा शहरे नसणारा विशाल असा जंगली विभाग असायचा. व्यापारी, सैन्य, इतर या सर्वांचा प्रवास मार्ग या जंगलातूनच असायचा. याचे निर्वाहन करण्यासाठी मौर्यांनी विशिष्ट व्यवस्था निर्माण केली. या रहदारीमध्ये सोन्याच्या खाणी असलेल्या सुवर्णगिरी, विदेशी वस्तू सापडणारे ठिकाण तक्षशिला. हे ठिकाण या रहदारीतच येत असे. या जंगली प्रांतातून सोने, अनमोल दगड, जंगली प्राणी व त्यांचे चर्म. अशा स्वरूपात कर मिळवीत असत. बहुधा या जंगलातील आदिवासी जातींच्या जीवनात यांची ढवळाढवळ राहत नव्हती.

**आपणास कसे समजते ?**

या साम्राज्याची माहिती समजून घेण्यासाठी त्या काळाबद्दल लिहिल्या गेलेल्या अनेक पुस्तकांची आपणास उपयोग होतो. चंद्रगुप्तचा मंत्री 'कौटिल्य' याने लिहिलेले 'अर्थशास्त्र' हे पुस्तक फार महत्त्वाचे. चंद्रगुप्तांच्या कारकिर्दीतील ग्रीक राजदूत 'मेगस्थानिस' यांनी लिहिलेला 'इंडिका' हा अजून एक महत्त्वाचा ग्रंथ एवढेच नव्हे तर अशोकाच्या काळात विविध प्रांतात स्थापिलेल्या स्तूपांद्वारा आपणास त्या काळाची अनेक माहिती मिळते.

**अर्थशास्त्र**

या पुस्तकाद्वारे राजांनी राज्यांचे प्रशासन कसे करावे हे कौटिल्य (चाणक्य) यांनी सांगितले आहे. एवढेच नव्हे तर राज्याचे रक्षण कसे करून घ्यावे. विविध व्यावसायिकांकडून कर कसा वसूल करावा व भारतीय उपखंडात मिळणाऱ्या विविध खनिज संपदेबद्दल विस्तृतपणे वर्णन केलेले आहे. आजही जगभरातील अथतज्ज्ञ या पुस्तकाला अर्थशास्त्राचा कणा मानतात.

SCERT TELANGANA

- मौर्य राजांना विविध प्रांतातून विविध वस्तुरूपाने कर वसूल करण्याची आवश्यकता काय होती?
- शेतकरी, व्यापारी, हस्तव्यवसाय, जंगली निवासी गायी राखणे त्यांनी फेडलेल्या कराबद्दल त्यांनी काम संपादन केले असे तुम्हास वाटते?
- तक्षशिला सुवर्णगिरीसारखी नगरे मौर्यांना का महत्त्वाची होती?
- मौर्यांनी, पाटलीपुत्रभोवतालच्या प्रदेशाचे शासन वेगळे करण्याचे कारण काय होते? या तिन्ही प्रांतांना एकाच प्रकारचे कायदे असतील असे तुम्हांला वाटते काय?

अशोक - विशिष्ट राजा -

मौर्यात सर्वात प्रसिद्ध राजा अशोक स्तूपाद्वारे वर्तमानाचे ज्ञान प्रजेला पोहोचविणारा पहिला राजा होय. अशोकाचे स्तूप जास्तीत जास्त प्राचीन भाषेत ब्राम्ही लिपीत आढळतात.



*चित्र 11.1 सम्राट अशोक*

राजा अशोक - कलिंगचे युद्ध

कलींग म्हणजे आजच्या ओरिसा राज्यचे जुने नाव. (नकाशा पहा) कलींगला हस्तगत करण्यासाठी अशोकने युद्ध केले. युद्धात झालेली हिंसा पाहून त्याचे मन द्रवले. युद्धात लाखाच्यावर सैनिकांचा बळी गेला. त्यामुळे आता पुढे युद्ध न करण्याचे ठरविले जगाच्या इतिहासात, युद्धात विजय संपादन करून युद्धास पूर्णविराम देणारा पहिला राजा सम्राट अशोक.

कलींग युद्धाचे दर्शन घडविणारे

अशोकाचे स्तूप

या स्तूपात अशोकाने असे जाहीर केले चक्रवर्ती झाल्याच्या आठ वर्षानंतर मी कलींग राज्य संपादन केले. या युद्धात एक लाख पन्नास हजार लोक बंदी झाले. लाखाच्या वर सैनिक मृत्युमुखी पडले.

हेच माझ्या दु:खास कारण का ?

एक स्वतंत्र राज्य जिंकतो तेव्हा काही लाख लोक मरण पावतात. नातलग, मित्र, कैदी, सेवक, काही बिचारे मरतात. म्हणूनच मला दु:ख व्हायचे. मी दु:खी आहे आजपासून धर्माचे रक्षण करण्याची प्रतिज्ञा करीत आहे. धर्मप्रचार करीन, शक्तीने जिंकण्यापेक्षा धम्माद्वारे जिंकणे योग्य होय असा मी विश्वास करते. भविष्यात माझी मुले, नातू यांनी माझ्यानंतर युद्धाबद्दल विचार करू नये. यासाठी धम्मप्रचार कसा करता येईल याचा विचार करण्यासाठी आज मी हे विचार शिला फलकावर कोरीत आहे. (धम्म या प्राकृत पदास संस्कृत भाषेत धम्म असा समानार्थी शब्द होतो.)

SCERT TELANGANA

- युद्धाविषयी अशोकाचे विचार कलिंग युद्धानंतर कसे बदलले ?
- कलींग युद्धाबद्दल त्याच्या भावना त्याने शिला फलकावर का चढविल्या ?
- कोणतेही युद्ध न करण्याच्या अशोकाच्या निर्णयाचा प्रजेवर कसा प्रभाव पडला ?

**अशोकाचा धम्म म्हणजे काय ?**

अशोकाच्या धर्मात देवपूजा, बळी देणे यासारख्या प्रथा नाहीत. एक बाप आपल्या मुलांस शिकविल्यासारखेच त्याने आपल्या प्रजेस शिकवायचे ठरविले. बुद्धांच्या बोधनामुळे अशोक प्रभावित झाला.

अनेक समस्यांनी तो ग्रस्त झाला. साम्राज्यातील लोक अनेक धर्माचे अनुकरण करणारे होते. काही संदर्भात त्यांच्यामध्ये संघर्ष व्हायचे. पशुबळी द्यायचे. सेवकांना सतवायचे. तसेच शेजाऱ्यांमध्ये भांडणे सुद्धा व्हायचे. या सर्व समस्यांचे निवारण करणे आपले कर्तव्य होय असे अशोकाला वाटले. यासाठी त्यांनी धर्मप्रचारकांची नियुक्ती केली. त्यांनी राज्यातील विविध प्रांत फिरून धर्माचा प्रचार करावा एवढेच नव्हे तर अशोकाने त्याचा संदेश दगडावर (शीलावर) स्तंभावर कोरला असावा. लोकांना ते वाचून सांगण्यास माणसांची नियुक्ती केली. अशोकाने आपल्या धर्माचा प्रचार दूर प्रदेशामध्ये. सिरिया, इजिप्त, ग्रीस, श्रीलंका पर्यंत व्याप्ती केली त्यासाठी राजदूतांची नियुक्ती केली.

त्याने रस्त्यांची निर्मिती केली. विहिरी बांधल्या. मोठमोठ्या धर्मशाळा बांधल्या. माणसास नव्हे तर पशुपक्ष्यांसाठी वैद्यकीय उपाय (दवाखाने) केले.

अशोकाने लोकास दिलेला संदेश -

लोक आजारी झाल्यास, लग्न करताना, मूल जन्माला आल्यास, प्रवासासाठी बाहेर पडताना, लोक बऱ्याचशा आचारांचे अवलंबन करतात. या आचारापासून फायदा नाही. याच्या व्यतिरिक्त लोकांनी इतर पद्धतीचा अवलंब केल्यास उपयोगी ठरेल ते कोणते ?

एकमेकाशी प्रेमाने वागावे. मोठ्यांना मान द्यावा. सर्व प्राण्यांवर दया दाखवावी. संन्यासी, ब्राह्मण यास दान द्यावे. आपल्या मनाला मोठे दाखवून दुसऱ्याच्या मनाला कमी लेखणे हे चूकच. प्रत्येकांनी सर्वांच्या धर्माचा आदर करावा. आपल्या धर्माचा गौरव करून इतर धर्मांना कमी लेखून आपल्या धर्मास तीव्र अन्याय करीत आहेत. म्हणूनच इतर /मुख्य मुख्य विषयांची जाणीव करून त्याचा आदर करण्याचे शिकावे.

- अशोकाच्या धम्म प्रचारामुळे कोणकोणत्या समस्यांचे परिमार्जन करता येईल ?
- मंडलीकांना व सेवकांना कमी लेखण्याची कारणे सांगा
- राजाच्या कायद्यामुळे त्यांच्या परिस्थितीत काही बदल झाला काय ? होत असल्यास कारणे सांगा ?
- सामान्य लोकामध्ये अशोकाने धर्माची व्याप्ती का केली ?
- आचाराच्या स्थानी अशोकाने काय प्रोत्साहित केले ?
- सिरिया, इजिप्त, ग्रीस, श्रीलंका देशांना नकाशात ओळखा ? पाटणावरून या देशास जाणारे मार्ग शोधा ?

**दख्खनमधील राज्ये व साम्राज्ये -**

मौर्यांनी दख्खन जिंकण्यापूर्वी (गोदावरी नदीपासून कृष्णा, तुंगभद्रा, नदीच्या खोऱ्यांपर्यंत) पुष्कळ प्रांतात लहान लहान गाव, शहरे असायची. त्या वेळी त्या गावात लोखंडापासून तयार केलेल्या वस्तू विकायचे. काही प्रांतात सोन्याच्या खाणीतून सोने काढून, त्यापासून दागिने तयार करून विकायचे. बाकीच्या बराच भाग जंगलाचा असायचा. त्यात शिकार, आहार पदार्थ गोळा करणारे, पशुपालक (गरिबी) छोट्या छोट्या झोपड्यात राहायचे.

SCERT TELANGANA

- अनेक नगरास मजबूत तट असायचे. असे असले तरी त्यांना अनेक प्रसंगाना सामोरे जावे लागले. त्यांनी सामना केलेल्या विपरीत परिस्थिती कोणत्या ?
- गंगा, सिंधूची खोरी, कृष्णा, तुंगभद्राच्या खोऱ्यामध्ये असलेले साम्य तेथील खेडी व शहरांच्या विकासात उपयोगी ठरल्या ?

बहुतेक जन्मत: किंवा लग्नामुळे जुळलेले संबंधच यात राहायचे. या प्रकारच्या एकाच संबंधातील समूहाला पोडे म्हणतात. या समूहातील बलिष्ठ माणूस या समाजाचे नेतृत्व करीत असे क्रमाक्रमाने त्यांनी संपदा संपादन करून बलवान अशा प्रांताचे राज्य करीत असत.

मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर प्रांतांच्या नेत्यांनी लहान लहान राजांचे अवतार घेतले. त्यातील आंध्रातील सातवाहन नर्मदा नदीपासून ते कृष्णा गोदावरी तीरापर्यंत विस्तारीत असलेली लहान, विशाल साम्राज्याचे संघटन केले. सातवाहनात गौतमीपुत्र सातकर्णी, वशिष्ठपुत्र, पुलेमाई, यज्ञश्री, सातकर्णीचे महान राजे 2000 वर्षांपूर्वी 200 वर्षांपर्यंत त्यांचे राज्य चालले. काही राजे कृष्णा नदीच्या तीरावर अमरावती जवळ असलेला धान्यकटकास राजधानी करून राज्य चालविले. गावातील मोठ्या लोकांना लहान लहान राजांना त्यांच्या जवळ घेतल्यानंतरही त्यांच्या पालनात सातवाहन राजांनी कसलीही ढवळाढवळ केली नाही.

*चित्र 11.2*



बरेच कुटुंबप्रमुख त्यांच्या कुटुंबातील महिला, व्यापारी, अमरावती, भट्टीपोलू, वडलमानू इत्यादी ठिकाणी बौद्धाश्रम व स्तूप निर्माणास सहकार्य केले. या काळात दूर असलेले प्रांत, बंगालशी, रोम या देशांशी प्रामुख्याने व्यापार चालू लागला. रोमन आणि सोबतच रोमन शैलीत तयार केलेली मडकी इथे मिळाली. व्यापारी, समुद्रमार्गाने व्यापार करायचे. कृष्णा नदीवर बोटी आणि नौकांद्वारे अमरावती सारख्या दूर नगरास वस्तूंची रवानगी चालायची.

**शातवाहन काळातील कोटींलींग:**

कोटीलिंग हे तेलंगानातील करीमनगर जिल्ह्यांत गोदावरी नदीच्या पेद्दावागु संगमा जवळ श्रीपाद येल्लमपल्लि प्रकल्पाच्या वरील वसलेले आहे. हे प्राचिन भारतातील 16 व्या महाजन पदामधील एक आहे''आसम्का'' ही जनपदाची राजधानी नगर होय.सातवाहन वंशियांची कोटीलिंग ही प्रथम राजधानी होय. तेथे उत्खननामध्ये शातवाहनाच्या आगोदर झालेल्या शातवाहन, इक्षवाकु यांच्या काळातील चांदीचे नाने किमतीदार मातीचे मडके(पात्रे)कुंभारी पात्रे मोठ्या संख्येने बाहेर पडले आहे. भट्टी विटापासुन सभोवती भिंत असलेली गोल विहिर सुध्दा उघडकीस आली आहे. शातवाहनचा वंशजाची स्थापना केलेला श्रीमुख हा होय. त्या नंतर शासनकर्ता कन्हा, शातकर्णी, काळातील कितीतरी नाणे सापडले आहे. कोटीलिंग येथे चिखलाच्या किल्ला आहे. त्याला अनेक व्दार आहेत



*Fig. 11.3: Kotilingala Coins*



*Fig. 11.4: Kotilingala - Pottery*

SCERT TELANGANA

आणि त्या मनोऱ्यातुन चार ही बाजु पाहु शकतो. ऐवढेच नव्हे तर राष्ट्रातील फनिगीरी, नेल्लाकोंडा पल्ली, कोंडापुर, दुल्हीकटा, पेदाबंकुर, केसरा डोंगरातील बौध्द स्तुपे, विहारे, चैते बहिरगत झाले आहेत.

- तुम्ही सुध्दा घर बांधण्यासाठी विट्ट भट्टीतुन भाजलेल्या विट्टाचा उपयोगात आणता काय?
- तुम्ही वापरलेले सांडपाणी जाण्यासाठी गठारांना आत मध्ये पाईप आहेत काय?
- तुम्ही व्यापारा आहात असे गृहीत धरा आणि पेंदाबंकुर गावावरुन रोम येथे कारखाण्यातील उत्पत्ती कशी पोहचवाल? या विषयावर एक कथा लिहा?

### काही लहान नेते राजे कसे बनले?

कर्नाटकामधील बल्लारी जिल्ह्यात सापडलेला माकदोनी शिलालेख

- सातवाहनाच्या काळातील शिलालेख समजले जाणारे हे वाचा.

सातवाहनांचा राजा श्री 'पुलोमाई'च्या आठ वर्षांच्या पालनात त्यांचा महासेनापती स्कंदनाग जनपदांमधील सातवाहन जिल्ह्यात कुमारदत्ताच्या आधिपत्याखाली असलेल्या वेपूर ग्रामीण कांत जातीसंबंधित सम्हा, याने या तलावाचे निर्माण केले.

1) वेपूर गावात कोणत्या जातीचे लोक राहायचे?

2) त्यांचा अधिपती कोण?

3) वेपूर गाव असलेल्या जिल्ह्याचे नेतृत्व कोण करतो?

4) गहपती सम्हा याने तलावांची निर्मिती का केली?

*चित्र 11.5*



सातवाहनाच्या राज्याचा अंत झाल्याच्या काही काळानंतर इक्ष्वाकू राजे बनले. कृष्णा नदीच्या तीरातील नागार्जुन पहाडाच्या जवळचा विजयपुरीस राजधानी करून त्यांनी इक्ष्वाकू साम्राज्याची निर्मिती केली. या देशातील मुख्य राजे क्षंतमूल, विरपुरुषदत्त या राजांनी इतर जातीच्या महिलांशी लग्न करून त्या जातीच्या वरिष्ठ माणसांना लहान राजे बनविण्याचा प्रयत्न केले. त्याचवेळी अश्वमेध, राजसूय सारखा खर्चीक यज्ञ करून ब्राह्मणास खूप दान करून त्यांची प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न केला. रामायणातील रामाचे वंशज म्हणवून घेऊ लागले. आश्चर्याचा विषय काय म्हणजे इक्ष्वाकू कुटुंबातील महिला बौद्ध गुरूचा आदर करीत. बौद्धाश्रम स्तूपांच्या निर्माणास (नागार्जुन पहाड) अधिक दानधर्म करायचे. हे नागार्जुन पहाडात खूप मोठा आश्रम व स्तूपांची निर्मिती केली.

**भारत उपखंडातील काही मुख्य साम्राजे:**

**कुशान :** 2000 वर्षापुर्वी कुशान हे चिनवरुन येथे आले. क्रमाक्रमाणे आफगाणिस्तान केंद्र बिंदु ठेऊन आपले साम्राज्य स्थापित केले. कुशान राजामध्ये प्रख्याती मिळवलेला राजा कनिष्क हा होय. आट्याहत्तर (सीई 78) मध्ये सिंहासणावर अधिष्ठाण केले. प्रस्तुत पाकिस्तातुन भारत देशातील मथुरा, आल्हाबाद पर्यंत असलेल्या विशाल भुभागावर राज्य केले. आफगाणिस्तान मधील सर्वात मोठ्या प्रातावरच नसुन काका, अक्सस नदी पर्यंत कुशानाने राज्य केले. भारत, चीन, इराण आणि रोमला या देशांना मिळविणारा सर्वात मोठा व्यापारी मार्ग समर्थपणे पार पाडले. वरील देशामध्ये व्यापार भरभराटीस आला असे या काळात ओळखल्या जाते. ऐवढेच नसुन धर्म उपदेशक, शास्त्रवेते, कलाकरांचे येणे जाणे मोठ्या प्रमाणात झाले. एका

SCERT TELANGANA

देशाची उत्पादन दुसऱ्या देशांनी विकत घेणे, ऐवढेच नसुन त्या त्या देशांच्या जनतेने एक दुसऱ्यांशी माहिती मिळविण्यासाठी, त्यांच्या आचार विचार, व्यवहार, धर्म, तात्विक विचार त्यांच्या कला, वस्तु, शिल्परिती अशी माहिती मिळविण्यासाठी याव्दारे संधी मिळाली. त्यामुळे भारतदेशातील शहरामध्ये व्यापार विस्तृत झाला आणि त्यामुळे सोने चांदिच्या व्यापार मोठ्या प्रमाणात भरभराटीस आला.सर्वात मोठ्या संख्येने सोनेरी नाने सापडले हे आज आपल्या निर्धनास येत आहे.

शकयुग:
सी ई 78 मध्ये कनिष्काने चक्रवर्ती म्हणुन राज्याभिषेक करुन अधिकारावर आल्यापासुन शक वंशाचा प्रारंभ झाला. यालाच शकयुग किंवा शकाब्दी असे म्हणतात. पुष्कळ दक्षिण भारतात लोक या युगांचा उपयोग करीत आहेत.हे साधारणता: युग सी ई (78) वर्षाच्या नंतर असते.

**गुप्त साम्राज्य:**

गुप्त साम्राज्या राजांनी आजच्या काळातील बिहार मधील एका लहान राजाला परिपालन केल्यामुळे येथुन त्यांच्या पालनेस प्रारंभ झाला. तीन पिढ्यांमध्ये उत्तर भारत देशामध्ये गुजरात वरुन बंगालपर्यंत दिल्ली वरुन आजच्या मध्यप्रदेश पर्यंत पुर्ण पणे अधिपत्त्य गाजविले होते. प्रथम चंद्रगुप्त, समुद्रगुप्त, दुसरा चंद्रगुप्त, कुमार गुप्त, सकंदगुप्त हे राजे या साम्राज्यातील प्रसिध्दी मिळविणारे राजे होत.

भारतीय राजकीय व्यवस्थेत दोन नविन विधानांचा प्रवेश आमलात आणला व त्यांना प्रसिध्दी मिळाली. त्यातील एक असे की, त्यांनी कोणत्याही राज्यावर विजय मिळविला तर तिथे हरलेल्या राजांना पुन्हा तो राज्य कारभार सोपविण्यात येत असे व गुप्ताच्या राजाचे आज्ञाचे पालन करावे लागत असे. त्यांना समान दर्जा मिळावा असे पाहत होते. या प्रकारे प्रत्यक्षपणे भारत देशात राजा युध्दात हरला तरी पुष्कळ प्रांतात हरलेल्या राजालाच कारभार देत असायचे. म्हणुन गुप्त राजांनी उत्तर भारत देशांच्या अनेक प्रांताना परत आपल्या आधिनाखाली ठेऊन घेतले. दुसरे विधान असे की, काही गुप्त राजे त्यांचे समर्थन करणारे राज्य व त्यांचे मित्रत्व असलेल्यांना, ब्राम्हनांना पुर्ण पणे गावाचा अधिकार देत होते. अशा प्रकारच्या गावांना राजाला कोणत्याही प्रकारचा कर द्यावा लागत नसत. प्रादेशीक अधिकारांची आज्ञा सुध्दा पालन करण्याची गरज नव्हती. ऐवढेच नसुन त्या ग्रामामध्ये सुध्दा येत नव्हते. ब्राम्हण या गावात राहुन यज्ञ करुन वेद युवा ब्राम्हणांना शिक्षण देत असत होते. ते इतिहास क्षत्रिय आणि वैश्य यांना पण पुरान सर्वांना शिकवित.

मेहरुली लोखंडी स्तंभ:
दिल्लीतील कुतुबमिनार प्रागंनात प्रख्यात असलेला मेहरुली लोखंडी स्तंभाची स्थापना दुसऱ्या चंद्रगुप्तांनी केली. गत 1700 वर्षापुर्वी पासुन बाहेर हावेत ऊभा असुन तो स्तंभ आजपर्यंत जंग खाला नाही. म्हणुन या स्तंभाची जास्तीत जास्त प्रामुखे मिळाले आहे.



चित्र 11.6: मेहरुली लोखंडी स्तंभ

SCERT TELANGANA

- खालील नकाशाचे निरिक्षण करुन तेलंगाना हा गुप्त साम्राज्याचा भाग आहे काय?
- गुप्त पालनकर्ते दक्षिण भारत देशातील राजांना युध्दात हारवल्यानंतर सुध हारलेल्या राजांना परिपालन करण्यासाठी त्यांना राजा म्हणुन का ठेवत होते?
- गावांना ब्राम्हणांना दिल्यामुळे गुप्त राजांना कोणत्या प्रकारचा फायदा मिळात असेल असे तुम्हाला वाटते?

गुप्तराजे वैदिक धर्म आचाराशी सहमत होते. त्यांनी आश्वमेघा यज्ञाला प्रामुख्य देऊन त्याचे पालन करीत होते. ऐवढेच नसुन हिंदु मतातील पुरानांना प्रत्येक करुन वैष्णव आणि शैव मतांचे पालन करीत होते. विष्णु, शिव, दुर्गा मातेच्या आवताराशी संबंधी देवालय निर्माण करीत होते. देवळात दररोज पुजा व्हावी म्हणुन विशेष काळजी घेत होते. गुप्ताची धर्म पालन करण्याची पध्दत, यज्ञ करण्याची पध्दत, शिव, विष्णु दुर्गामातेचे आवतार असलेल्या स्थानिक देवतांची पुजा करण्याची पध्दत मंदीरात जाऊन पुजा करण्याच्या पध्दतीचे पालन पोषण करीत होते. तसेच ब्राम्हणांना बक्षीस देऊन त्यांचा सत्त्कार करीत होते. ऐवढेच नसुन गुप्तांनी जैन मंदीर सबंधीत, बौध्दांचे सांची स्तुप सारख्या बौध्द स्तुपांना सुध्दा निधी देत होते आणि त्यांचे पालन पोषण करीत होते.

गुप्त राजाने त्यांच्या काळात अनेक सुंदर मंदीरांचे निर्माण केले. मध्य प्रदेश येथील दियोघर, उदयगिरी, उत्तरप्रदेशातील भिट्रागाव, एरान मध्ये आज पण गुप्तांनी निर्माण केलेल्या मंदीरांना आपण पाहु शकतो.




SCERT TELANGANA

भारत देशातील अतिसुंदर दगडी शिल्पकलेशी काही संबंधीत आहेत. गुप्त काळातील मंदीरे जास्तीत जास्त विष्णु शिवांशी संबंधीत असुन बौध्द शिल्पाना संबंधीत आहे. या शिल्प कलेत सारनाथ नी सुध्दा प्राख्याती मिळविली आहेत.

- गुप्त राजांनी वैदिक कर्म, देवालयातील पुजा, बौध्द, जैन या सर्व मंदीरांना कशा साठी साहय्य केले?

**महत्वाचे शब्द**

साम्राज्य
अर्थशास्त्र
धम्म महामात्र
धम्म
हेर
यज्ञ
उपखंड

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती

1. बौद्ध भिक्षुकास दिलेले दान, इक्ष्वाकू, सातवाहनास कोणत्या प्रकारे उपकारीच ठरले?
2. अशोक हा विशिष्ट राजा होता असे का समजतो?
3. 2000 वर्षापूर्वी दक्खनमध्ये राज्यांची निर्मिती करतांना उपयोगी ठरलेल्या परिस्थिती कोणत्या?
4. नकाशा क्र. 1 मध्ये तीन नद्या आणि दोन प्रादेशिक राजधानी ओळखा.
5. कलिंग युध्दानंतर अशोकाने युध्द न करण्याचा निर्णय घेतला असे निर्णय जागतीक शांततेसाठी उपयोग पडतात असे तुम्हाला वाटते का? स्पष्ट करा?
6. जगाच्या नकाशामध्ये खालील दिलेल्या देशांचे नावे ओळखा.
   अ) सिरिया   ब) इजिप्त   क) ग्रीस   ड) श्रीलंका   इ) भारत देश
7. अशोकाच्या काळात वारसा हक्काने राज्य चालत असे सद्याच्या काळातील व्यवस्था कशा प्रकारे भिन्न स्वरुपाची आहे? ते सांगा?
8. पान क्र. 100 वरील अशोकाने प्रजेला दिलेला संदेश वाचुन स्पष्ट करा?
9. गुप्त काळातील सांघीक विधाना विषयी चर्चा करा?

***प्रकल्प कार्य :***

❑ तुमच्या प्रांतात कोणतेही जुने शिलालेख असतील तर त्याची माहिती गोळा करा.

SCERT TELANGANA

पाठ 12

# लोकशाही सरकार

वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या काही बातम्यांची शीर्षके पाहा. ही शीर्षके सरकार करत असलेल्या कामांशी निगडीत आहेत. यावरून सरकार विविध लोकोपयोगी कामे करत आहे हे तुमच्या लक्षात येईल.

असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या हक्कांचे सरकारमार्फत रक्षण.

पूरपरिस्थिती नियंत्रित करण्यासाठी विस्तृत आराखडा : राज्य सरकार

कांद्याचे भाव निर्धारित बाजारात मुबलक साठा

सर्वोच्च न्यायालयात आणखी पाच न्यायाधीश : सरकार

कोळसा आणि ऊर्जा क्षेत्राची पुर्नव्यवस्था : केंद्र सरकार

15000 गावे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर

SCERT TELANGANA

**सरकार काय करते ?**

या काळात निर्णय घेण्यास व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक देशास एका सरकारची (शासनाची) आवश्यकता असते. या सरकारचे निर्णय कुठे सडक टाकायची, शाळेच्या इमारती बांधायच्या, कांद्याचे भाव कमी करण्याचे, वीज पुरवठा यासारखे निर्णय घेण्यासाठी असेल. एवढेच नव्हे तर किती तरी सामाजिक विषयांवर निर्णय घेत असते. उदाहरणार्थ शासन विविध कार्यक्रमाद्वारा गोरगरिबांच्या पाठीशी राहते. तसेच टपाल सेवांचे नियंत्रणही करते. रेल्वे सेवाचे नियंत्रण यासारखी कामेही शासन पाहते. एवढेच नव्हे तर देशाच्या सीमांचे (सरहद्दीचे) रक्षण करीत इतर देशांशी चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न करीत असते. देशातील सर्व लोकांना आवश्यक आहार पुरवठा करणेच नव्हे तर त्यांच्या आरोग्याची जबाबदारी स्वीकारते. जेव्हा केव्हा नैसर्गिक आपत्ती (त्सुनामी, भूकंप) यासारख्या आपत्तीच्या वेळी मुख्यत: सरकार लोकास आवश्यक ते सहाय्य करते. लोकांचा वाद न्यायस्थानाद्वारा मिटविला जातो. ही न्यायव्यवस्था शासनातील एक भागच होय. ह्या सर्व गोष्टीचे सरकार

कसे आयोजन करते? हे सर्व कामे का करते? असे तुम्हास वाटत आहे ना? का म्हणजे समाजात मिळून मिसळून राहत असताना सर्वांसाठी काही निर्णय घेण्यासाठी एका व्यवस्थेची कितीतरी आवश्यकता आहे. ही व्यवस्था काही नियमांद्वारा, निर्बंधाद्वारा सामाजिक योग्य अभिवृद्धी होण्यासाठी प्रयत्न करीत असते. ती व्यवस्था म्हणजेच 'शासन' किंवा सरकार' यासाठी सर्वांना लागू होईल अशा काही नियमाची अंमलबजावणी करावी लागते. उदा. सहज सामग्रीचे नियंत्रण द्वारा, सरहद्दीचे रक्षणामुळे प्रजेस रक्षण देण्याची भावना निर्माण करण्यास लोकाकडून नेतृत्व करून शासन ही कामे करीत असते.

- तुम्ही शिकत असलेली शाळा कोण चालविते?
- शासन करीत असलेली काही कामे सांगा

**विविध प्रकारचे सरकार**

आपण नवव्या पाठात आदिवासी समाज कसे काम करीत आहे ते पाहिले. तिथे सर्व पुरुष एका ठिकाणी एकत्र झाल्यावर नंतर ते ज्या रितीने निर्णय घेतात, आदिवासीतील नायक त्याची अंमलबजावणी कशा रितीने करतात, ते करण्यासाठी काही लोक कोणत्या प्रकारे त्यास उपयोगी ठरतात. मदत करतात हे आपण पाहिले. समाज लहान असला तर ही व्यवस्था योग्य ते काम करते परंतु आजच्या समाजात हे शक्य आहे काय? लोकसंख्या हजारो, लाखात असताना सर्वजण एकाच ठिकाणी एकत्र होऊन सभा घेणे व निर्णय घेणे शक्य आहे काय? नाही ना !



*चित्र 12.1 काचीगुडा रेल्वे स्टेशन*




*चित्र 12.2 पोस्ट ऑफिस (टपाल कार्यालय)*



*चित्र 12.3 सरकारच्या काही संस्था त्याचे हे उदाहरण सर्वोच्च न्यायालय (सुप्रीम कोर्ट)*

तेव्हा त्यांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते.

आदिवासी सामाजासारखे सर्व लोक एकाच समूहाची एकत्र समाजाची संस्कृतीची (धर्म, जात, भाषा) संबंधित असेल तर सर्वांना सर्वसंमत अशी नियमावली तयार करणे साध्य होते. परंतु आजच्या समाजात विभिन्न संस्कृतीच्या प्रजेसाठी ही व्यवस्था कुचकामी ठरते. आदिवासी समाजात लोकांच्या आकांक्षा, जीवन विधाने एकसारखी असतात. त्यांच्यात गरीब-श्रीमंत असा भेदभाव नसतो. परंतु शेतकरी, व्यापारी व्याजाचा धंदा करणारे व्यापारी, उद्योगपती, जमीन नसलेले मजूर इत्यादी लोक राहत असलेल्या

SCERT TELANGANA

आजच्या समाजात, सर्व संमतीयुक्त निर्णय असो किंवा कायदे असो बनविणे असाध्यच म्हणावे लागते.



चित्र 12.4 शालिवाहन राजा



चित्र 12.5 तेलंगाना राज्य विधान सभा

यापूर्वीच्या इतिहासात आपण पाहिले की, चक्रवर्ती राजे, राणी यांनी म्हटले तेच कायदे, त्यांनी सांगितलेलाच न्याय, प्रजेवर ठोठविणारा कर, युद्ध ते म्हणेल तेवढा कुणी जर राजाच्या निर्णयांच्या विरुद्ध गेल्यास किंवा धिक्कार केल्यास त्यांना राजे कठीण शिक्षा देत असे.

कोणीही त्यांच्या अधिकारावर प्रश्न विचारु शकत नव्हते. साम्राज्य विस्तारासाठी सतत युद्ध होत असल्यामुळे अनेक राजे त्यांच्या राज्यकाराभारावर समाधानी नव्हते. अशाप्रकारच्या सरकारला राजेशाही म्हणतात. राजाला (राजा किंवा राणी) कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार होता. महत्वाच्या भांडणाच्या खटल्यात राजा सर्वोच्च न्यायाधीशाच्या पदावर न्याय देऊ शकतो.

बहुतेक राजे राज्य पालनापेक्षा राज्य विस्तारावरच जास्त भर द्यायचे. राजा किंवा राणी काही वेळा निर्णय घेत असताना इतरांशी संपर्क करीत परंतु अंतिम निर्णय त्यांचाच असायचा. राजाचाच राजांनी घेतलेल्या निर्णयावर त्यांनी विवरण देण्याची आवश्यकता राहत नसे.

- आदिवासी लोकशाही व्यवस्थेस राजकीय व्यवस्थेशी भेद स्पष्ट करा?
  - *i* या दोन्हीमध्ये लोकांच्या अभिप्रायास गौरव देणारी पद्धत कोणती?
  - *ii* मोठा समाज किंवा विभिन्न व्यक्ती असलेल्या समाजात कोणती व्यवस्था समर्थपणे काम करू शकते?
  - *iii* कोणत्या सरकारी व्यवस्थेत राजे क्रूर बनून प्रजेविषयी अधर्मरित्या वागण्याची शक्यता आहे?
- आजच्या मोठ्या व क्लिष्ट समाजात कोणते शासन असल्यास बरे राहील? ते लोकांना न्यायाधिष्ठित शासन देणारे असेल का?
- राजकीय व्यवस्थेत युद्ध जास्त असायचे का? आदिवासी समाजात जास्त? कारणे सांगा?


SCERT TELANGANA

## लोकशाही सरकारे

विभिन्न लोकांच्या विभिन्न अभिप्रायांना समजून देऊन समाजात अन्याय दमनास उद्युक्त होणाऱ्या शक्तींना नियंत्रित करणारे शासन व लोकशाही सरकार जगात कितीतरी युद्ध दडपशाही नीतीवरच राहील. त्याचे फलितच लोकांच्या आकांक्षेच्या अनुरूप काम करणारी व्यवस्था म्हणून लोकशाही व्यवस्था अंमलात आली.

भारत देश हा लोकशाहीप्रधान देश. विभिन्न मते, भावना, संस्कृती, आकांक्षा असलेल्या समाजात लोकांच्या गरजानुरूप शासनाला काम करायचे असते. भारत देशात काही कोटी लोक राहतात. सर्वच नागरिक निर्णय घेण्यात भाग घेतल्यास असंख्य अभिप्राय येतात. हे निर्णय घेण्यास विलंब होण्यास कारणीभूत ठरते. एवढेच नव्हे तर सर्व नागरिक शासकीय कार्यक्रमावर वेळ, पैसा, शक्ती खर्च करण्याचे निवारण कमी असतात. अशा परिस्थितीत समस्यांचे परिष्कार कसे होईल?

अमेरिकन अध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी दिलेली व्याख्या ''लोकांचे लोकांसाठी लोकांकडून चालणारे सरकार'' या निर्वचनाबद्दल विचार करा. तुम्ही यास सहमत असाल काय ? चर्चा करा.



*चित्र 12.6 अब्राहम लिंकन*

यासाठी आपणास दोन मार्ग आहेत. एक प्रतिनिधित्व लोकशाही. दुसरी बहुमताचे राज्य. या दुसऱ्या भागास प्रथम समजून घेऊ. या काळात सर्व लोकशाही शासन प्रतिनिधित्व करीत आहेत या विधानात नागरिक आपले प्रतिनिधी निवडणुकीद्वारा निवडून घेतात. उदा. एका गावात 5000 पर्यंत लोकसंख्या असेल तर त्या गावाचे वॉर्डात विभाजन करतात. एकेका वॉर्डात 100 ते 200 मतदार असतात. प्रत्येक वॉर्डातून एक प्रतिनिधी (वॉर्ड मेंबर) ला निवडून देतात. या निवडणुकीत गावातील 18 वर्षे पूर्ण केलेल्या लोकांना मतदानाचा हक्क असतो. त्यात गरीब, श्रीमंत, स्त्री, पुरुष, जात, धर्म, भाषा, निरक्षर, साक्षर असा भेद नसतो. मतदानास पात्र असलेले लोकच मतदान करतात. सर्वात जास्त मते आलेल्या व्यक्तीस प्रतिनिधी (वॉर्ड मेंबर) संबोधले जाते. निवडून आलेले प्रतिनिधी बैठक घेऊन लोकांच्या हिताचे निर्णय घेतात.




*चित्र 12.7 ग्रामीण भागातील मतदान*
*बोटांवर शाई लावून मतदान झाल्याचे दर्शविणारे चित्र*

SCERT TELANGANA




*चित्र 12.8 प्रातिनिधिक लोकशाही*

निवडणुकीच्या अगोदर लोकांनी विचारपूर्वक चर्चा करावी. कोणकोणत्या अंशावर सरकार चालविण्याचा निर्णय करावा. व नंतरच मतदान करावे. निवडणुकीच्या पूर्वी मतदारास विविध प्रतिनिधी किंवा पक्ष (पार्टी) विविध अंशांना विविध कोणात प्रजेसमोर ठेवतात. मतदाराने विचारपूर्वक कुणास मत द्यावे याचा निर्णय करावा. व आपला प्रतिनिधी निवडावा. निवडल्या गेलेले प्रतिनिधी त्यांनी दिलेले शब्द व हमीस बांधील राहून लोकांच्या मनोभावनेस व समस्येस जेव्हाच्या तेव्हा लक्ष ठेवून हे प्रतिनिधी एका निर्दिष्ट कामासाठी म्हणजे (केवळ 5 वर्षांसाठी) सभासद म्हणून राहात. भारत देशात पुन्हा निवडणुका होतात. पुन्हा मतदाता आपले मताद्वारे प्रतिनिधी निवडून देतात.

- लोकांनी निवडणूक लढवीत असलेल्या सदस्यांचे अभिप्राय समजून घेणे का आवश्यक आहे?

- कायम सदस्याची निवड झाल्यास काय घडेल?
- लोकप्रतिनिधी, लोकांचे विचार, गरजांच्याविरुद्ध काम करतात असे तुम्हास वाटते काय?

आता आपणास काय समजले म्हणजे प्रतिनिधित्व लोकशाहीत साधारण बहुमतांद्वारा सुद्धा प्रतिनिधी निवडले जातात. कधी कधी एक मत जास्त आल्याने सुद्धा निवडणूक होते. त्यावेळी दुसऱ्या प्रतिनिधीस मत टाकणाऱ्यांनासुद्धा या निर्णयास मानावे लागेल. अशा प्रकारे निवडून आलेले प्रतिनिधीसुद्धा निर्णय घेत असताना बहुमत विधानांचीच अंमलबजावणी करावी.

उदाहरणार्थ - एका ग्रामपंचायतीत 20 जण वॉर्ड सभासद असल्यास 11 लोकांनी एका मागणीस समर्थन दिल्यास ते आमोदित होते. इतर एक सदस्यांच्या अभिप्रायाला किंमत राहात नाही असे आधुनिक लोकशाही सरकार बहुमत निर्णयास वाव देऊन काम करीत असते.



*चित्र 12.9 भाववाढीच्या विरुद्ध निदर्शने*

SCERT TELANGANA

मग बहुमत निर्णयास बांधून राहिल्यामुळे बहुमत निर्णयाला वाव दिल्या जात नाही हे बरोबर आहे काय?

अनेक लोकांचा विश्वास आहे की, या पद्धतीद्वारे अल्पसंख्यांकांच्या विचारांना दुर्लक्ष केल्यामुळे (जे संख्येने कमी आहेत), आपली लोकशाही पद्धत त्यांच्यावर अन्यायी ठरत आहे.

- हे खरे म्हणून समजता काय? इतरांशी चर्चा करा.
- तुमच्या वर्गात बाल परिषद स्थापन करून वर्गात कसे वागावे यासाठी काही नियम तयार करा. नंतर बाल परिषदेला निवडणुका ह्या निर्णय घेताना प्रत्येक विद्यार्थी भान देईल असे पाहा. प्रत्येक विद्यार्थ्यांनी स्वतःच्या अनुभवाने यावर एक रिपोर्ट तयार करावा.

## निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींवर नियंत्रण

निवडून आलेले लोकप्रतिनिधी कुणावरही 'मी'पणा दाखवणार नाहीत यासाठी आपण काय करावे?

लोकशाहीत निवडून आलेल्या प्रतिनिधींवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यघटनेत काही बंधन सांगितलेले आहे. त्यांनी त्या बंधनाचे उल्लंघन केले तर न्यायालय त्यांना राज्यघटनेनुसार बडतर्फ करू शकते. तसे नागरिक कुणीही केव्हाही लोकप्रतिनिधीची टीका करू शकतात. ही प्रक्रिया बैठकीद्वारा असते किंवा दूरध्वनीद्वारा, वर्तमानपत्रांद्वारा ते कळवू शकतात.

## समानता आणि लोकशाही


लोकशाहीत प्रत्येक स्त्री-पुरुष, युवक, वृद्ध, श्रीमंत, गरीब, अधिकारी या सर्वांना थोडा वेळ खर्च करून लोकांच्या गरजा समजून घ्याव्या व शासन करीत असलेल्या प्रत्येक कामाचे ज्ञान असावे. आवश्यक निर्णय घेण्यास मदत करावी. मतदान करताना निर्भयपणे कोणत्याही प्रलोभनाच्या आहारी न जाता मतदान करावे. दुर्भाग्यवश प्रत्येक वेळी असे घडत नाही. लोकांना लोकशाहीच्या फायद्याबद्दल बरोबर ज्ञान नसते. व निरक्षरता हे पण एक कारणच होय. विविध विभागात चालणारी कामे समजून घेण्यासाठी बरेच लोक सरकार हक्क कायद्याचा फायदा करून घेत नाहीत. मुख्यतः स्त्रिया, गरीब लोक, आवश्यक ज्ञान नसल्याने लोकशाहीबद्दल लोकांच्या गरजांबद्दल पाहिजे तेवढे जागरूक नाहीत म्हणूनच सांगावे लागेल. ते आपआपल्या कामात जास्त वेळ गुंतून राहतात. हे पण एक कारण म्हणून सांगता येते. बऱ्याच संदर्भात यांना निवडणुकीच्या वेळी लहान लहान प्रलोभनास भाग पाडणारे काही श्रीमंत लोक निवडून येत आहेत. काही संदर्भात जात, धर्म ह्या गोष्टी सुद्धा निवडणुकीच्या वेळी लोकांवर प्रभाव टाकतात तेव्हा लोक आपल्या इच्छेच्या व्यतिरिक्त मत टाकण्याची आवश्यकता जास्त आहे. या कारणांमुळे लोकशाहीच्या फायद्यांना बाजूला ठेवून इतर कारणांमुळे प्रतिनिधींना निवडून देत आहेत.

- तुमच्या आई वडिलांना विचारून निवडणूक प्रक्रियेतील समस्या समजून घ्या. ह्या समस्यांच्या निर्मूलनासाठी तुमच्या वर्गात चर्चा करा एक माहितीचा तक्ता तयार करा.

SCERT TELANGANA

नकाशा - भारत देश, राजधानी




SCERT TELANGANA




*नकाशा - जिल्हास्तरीय पालन*

असमानता याचा अर्थ काय? उदाहरणासहित स्पष्ट करा?

- योग्य व्यक्तीला निवड करण्यात लोकांना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते.

**विविध स्तरावर शासन -**

शासन विविध स्तरावर काम करते. स्थानिक, राष्ट्रिये, जागतिक स्तरावरही काम करते. स्थानिक म्हणजे आपण असतो त्या प्रांतात आपल्यासाठी काम करणारे. राष्ट्र स्थायी म्हणजे पूर्ण राष्ट्रासाठी काम करणाऱ्या सरकारला राष्ट्र सरकार असे म्हणतात. उदा. आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, आसाम, शासन म्हणजे संपूर्ण देशावर राज्य करते व पूर्ण देशाची देखभाल करते.

तुम्ही नंतर पुढच्या वर्गात गेल्यानंतर राष्ट्रीय सरकारांबद्दल मिळवा?

तुमच्या वर्गातील मुलांना तीन चार गटात विभाजन करा. खाली दिलेले कोणत्या विषयावर अभिनय करायला लावा.

- *एक निवडणूक प्रसंग, प्रतिनिधित्व चर्चा.*
- *लोकांना खरी माहिती नसतानाही मतदानावर घेतलेला निर्णय.*
- *लोकशाही व राजकारण यातील भेद*
- *मतदान करताना श्रीमंत, बलवान यांचा खेड्यातील लोकांवर पडणारा प्रभाव.*

SCERT TELANGANA

**महत्त्वाचे शब्द**

| | | |
|---|---|---|
| लोकशाही | राजेशाही | राज्यघटना, |
| निवडणुका | निर्णय घेणे | प्रतिनिधी |

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. गोंड जातीमधील शासन व आधुनिक लोकशाहीमध्ये असलेले साम्य व भेद स्पष्ट करा?
2. अल्पसंख्यांकांच्या अभिप्रायांना मान देऊन निर्णय घेणे साध्य आहे का? काही उदा. सहीत चर्चा करा.
3. विद्यार्थी, शिक्षक मिळून शाळा चालविल्यास कसे राहील? शाळा चालविण्यास सर्वांनी भर द्यावा असे तुम्हांला वाटते का ? किंवा प्रतिनिधींची निवड करून त्यांच्याद्वारा चालवावे असे वाटते का? कारणे सांगा?
4. तुमच्या घरी घेणारे निर्णय लोकशाही पूर्ण होत आहे काय ? प्रत्येक जण आपआपले अभिप्राय सांगतात काय?
5. गोपालच्या वडिलांनी एक दुकान उघडायला घरात सर्वांचे मत विचारले. प्रत्येकांनी एकेक अभिप्राय सांगितला. तरी पण वडिलांनी दुकान उघडले. त्यांनी हे काम लोकशाहीपूर्ण केले काय?
6. मेरीच्या आईने तिच्या मुलांना रविवारी कुठे जाऊ म्हणून विचारले? दोन मुले सिनेमाला जाऊ, तीन मुले बगीचात जाऊ, तू मेरीच्या ठिकाणी असता तर कोणता निर्णय घेतोस?
7. शासनाच्या स्तरावरून वर्गीकरण करा (एम.पी. एम.एल.ए, सरपंच) मेयर, मुख्यमंत्री, प्रधानमंत्री.
8. तुमच्या भागातील लोक प्रतिनिधीचे छायाचित्र वर्तमानपत्रातुन संपादित करा?
9. पान क्र. 110 वरील भारताचा नकाशा पाहुन त्या नकाशाचे मानचित्र काढा?

**प्रकल्प कार्यः**

1. गेल्या सात दिवसाचे वर्तमानपत्र घेऊन सरकारच्या कार्याबद्दल माहिती मिळवा? वहीच्या किंवा मोठ्या कागदावर ते चिटकवा, या माहितीमध्ये सरकारने काय कार्य केले ते शोधा? सरकार काय कार्य करते? याची चर्चा वर्गात करुन त्याची यादी तयार करा?
2. तुमच्या गावातील 10 व्यक्तिंना भेटून ज्यांना मत देण्याचा हक्क आहे, निवडणूकीच्या वेळी कोणत्या व्यक्तिला मत टाकावे? याची माहिती घ्या? यावर एक अहवाल तयार करुन त्याची वर्गात चर्चा करा?

SCERT TELANGANA

पाठ 13

# ग्रामपंचायत

### लोकांच्या गरजा पुरविणे

गावात एक हातपंप दुरुस्त करायचा आहे. दुसऱ्या प्रांतात नाल्या भरून सांडपाणी रस्त्यांवरून वाहत आहे. या समस्यांना कोण पूर्ण करावे? हातपंप असो, नाल्याचे काम असो, विद्युत दिवे असो हे सर्व लोकांशी संबंधित आहे. ह्या सर्वांना लोकांच्या गरजा पुरविणे म्हणतात. ह्या सोयी कोण पुरवितो? कोण यास समर्थपणे पूर्ण करू शकतो? यासाठीच गावात पंचायती व शहरात नगरपंचायती आहेत.

- तुमच्या परिसरातील लोकांच्या गरजा समजून घ्या.
- तुमची ग्रामपंचायत किंवा नगरपरिषदेतर्फे अंमलबजावणी होत असलेल्या विविध पथकांबद्दल तुमच्या वर्गात चर्चा करा.

### ग्रामस्तरावर लोकशाही शासन

लोकांच्या सामूहिक गरजा शासनच पूर्ण करते. परंतु ते राष्ट्रराजधानीवरून वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत कनिष्ठ अधिकाऱ्यांना सूचित केल्या जाते. यासारख्या व्यवस्थेत गावातील नागरिकांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या यात कोणताही संबंध नसतो. एवढेच नव्हे तर लोकांच्या गरजा व समस्यांचे भान यांना जेवढे माहीत असते तेवढे वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहीत नसते. ज्यांच्या समस्या त्यांनीच पूर्ण करून घेतल्या तर बरे होईल. मुख्यत: लोककार्यात प्रजेला संधी असावी म्हणूनच स्थानिकरीत्या मौलिक सोयी उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामपंचायती व नगर परिषदांची स्थापना करण्यात आली.

या उद्देशाने लोकशाहीच्या निर्वाहनासाठी प्रत्येक गावात ग्रामसभांची निर्मिती करण्यात आली. ग्रामसभेत गावातील सर्व मतदार असतात. ही सभा ग्रामपंचायतीचे कार्यभार पाहते. ग्रामपंचायतीने घेतलेल्या निर्णयावर याचा प्रभाव असतो. मतदार ग्रामपंचायतीच्या सदस्यांना (वॉर्ड सदस्य) व सरपंचाला निवडतात. सरपंच ग्रामपंचायतीत चालणाऱ्या रोजच्या कामावर लक्ष ठेवतो.

### ग्रामसभा

यापूर्वीच्या पाठात आपण शासनाबद्दल लोकांच्या सहभागाचे महत्त्व याबद्दल शिकलो देश व राज्य स्तरावर सर्व जण मिळून निर्णय घेणे कठीण होते. म्हणून ग्रामसभेद्वारे ते शक्य होते. गत काही वर्षांपासून हीच पद्धत आपणा जवळ अंमलात आहे. एक उदाहरण पाहू.

*रेशनकार्डसाठी कुपन देत आहेत. हे समजूत कनकमा ग्रामसभेला हजर झाली. परंतु तिला ग्रामसभा कशासाठी चालते हे माहीत नाही.*

SCERT TELANGANA



*चित्र 13.1 ग्रामसभा*

*सभेत सरपंच मागील वर्षी केलेले काम आणि यापुढे करावयाच्या कामाबद्दल लोकांना विवरण देत आहेत. सरपंचांनी केलेल्या कामाबद्दल ग्रामसभेस आलेले लोक टाळ्या वाजवून त्यांचे अभिनंदन करत आहेत. त्यानंतर त्यांनी दारिद्र्यरेषेच्या खाली असलेल्या लोकांची माहिती दिली. शासन करीत असलेल्या सहाय्याचा हे लोक लाभ घेतील.*

*त्यांचे बोलणे झाल्यावर कनकम्मा उभी राहिली व म्हणाली, माझे नाव पण या यादीत ठेवा. कारण मला नोकरी नाही, जमीन काहीही नाही. मला कोणताही आधार नाही म्हणून तिने सांगितले. सरपंचांनी कनकम्माचे नाव दारिद्र्य रेषेखालील यादीत घालण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे कनकम्माला खूप आनंद झाला व ती ग्रामसभेतून निघून गेली.*

वर सांगितलेली ग्रामसभा एक उदाहरण होय. बऱ्याच गावात ग्रामसभेविषयी लोकांना हवी तेवढी माहिती नाही जाणीव असलेले सर्व लोक या सभेस हजर होत नाहीत. जे हजर होतात त्यातल्या बऱ्याचशा लोकांना ग्रामसभेत काय बोलले हे कळत नाही, परंतु लोकशाहीत लोकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. गावातील प्रत्येकाने ग्रामसभेत भाग घ्यावा. गतवर्षी झालेल्या कामाविषयी चर्चा करावी. याशिवाय कमी खर्चात कामे कशा प्रकारे करता येतील याबाबत चर्चा करावी. दारिद्र्य रेषेखालील लोकांची यादी वाचताना यातील लोक खरेच फायदा घेणारे आहेत काय ? यावर चर्चा करावी. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना (MNREGA) चे पर्यवेक्षण ग्रामसभेने करावे.

परंतु वास्तवात काय होत आहे? तर गरज असेल तेव्हा ग्रामसभा घेतली जात नाही. घेतली तरी कमी लोक उपस्थित होतात. उपस्थितांपैकी फार कमी लोक चर्चेत सहभागी होतात.

- तुम्ही गावात राहात असलात तर आई-वडिलांना विचारून ग्रामसभेची माहिती घ्या. तसेच ग्रामसभेची आगाऊ सूचना दिली जाते का ? याविषयी विचारा. सभेला किती लोक येतात. इतर गावीच लोकं येतात का? ग्रामसभेत चर्चेसाठी येणाऱ्या विषयाविषयी अगोदरच सर्वांना माहिती असते काय? सर्व जण चर्चा करून निर्णय घेतात का? एखाद्या विषयावर सर्वांचे एकमत होते का?

SCERT TELANGANA

- ग्रामपंचायतीचे काम चांगले होण्यासाठी वरील विषय कितपत उपयोगी आहेत ?
- ग्रामसभेत लोकांचा सहभाग वाढण्यासाठी काही घोषवाक्य लिहा ?

**ग्रामपंचायतीची निर्मिती**

ग्रामपंचायत निवडणुकीद्वारे निर्माण केली जाते.

मतदार यादी

18 वर्षांवरील प्रत्येकाने न चुकता आपले नाव मतदान यादीत नोंदवून घ्यावे. तरच तो मतदानासाठी पात्र ठरतो. साधारणत: सरकारी नोकर निवडणुकीच्या पूर्वी घरोघर फिरून मतदारयादीचे सर्वेक्षण करतो. यादीत काही बदल करावयाचे असल्यास तशी दुरुस्ती करतो. यात नवीन मतदाराचे नाव टाकणे / मतदाराचे नाव गाळणे हे ही यावेळी केले जाते.

- मतदार यादीचे पुर्ननिरिक्षण का केले जाते ?
- तुमच्या घरात 18 वर्षांवरील किती व्यक्ती आहेत ?
- मतदाराचे नाव आधुनिकीकरण कोण करते ते तुमच्या शिक्षकांना विचारा.
- 18 वर्षाखालील व्यक्तींना मतदानास का अनुमती देत नाहीत ?

**वॉर्ड (प्रभाग)**

साधारणत: गावाची विभागणी अनेक प्रभागात (वॉर्ड) होते. प्रति प्रभागात मतदारांची संख्या एकसमान असते. प्रति वॉर्डातून एका सदस्याची निवड केली जाते. ग्राम पंचायतीत कमीत कमी 5 ते जास्तीत जास्त 21 सदस्य असतात. 21 वर्षांवरील कोणताही नागरिक निवडणुकीस उभा राहू शकतो.

**ग्रामपंचायतीचे आरक्षण**

आपल्या समाजात महिलांना निवडणूक लढवणे, सरपंच म्हणून काम करणे सोपे नाही. याचे कारण म्हणजे स्थानिक संस्थेत पुरुषांची संख्या जास्त असते. यामुळे अर्ध्या लोकसंख्येला प्रतिनिधित्व मिळत नाही. या विषयाला अनुसरून संसदेने स्थानिक संस्थात स्त्रियांसाठी $^1/_3$ जागा राखीव ठेवण्याचे आदेश दिले. याचबरोबर अनुसूचित जाती, अनुसूची, मागासवर्ग यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणावरून आरक्षण मिळाले. यामुळे समाजातील सर्व वर्गांना निवडणुकीत सहभागी होता येते.

**निवडणुका**

साधारणत: 4-5 वर्षांनी एकदा ग्रामपंचायतीच्या निवडणुका होतात. वॉर्डात राहणार प्रत्येक मतदार दोन मतांचा वापर करतो. एक प्रभाग सदस्यासाठी दुसरे मत सरपंचासाठी जास्त मत ज्याला पडतील तो विजयी झाल्याचे घोषित केले जाते.

तुम्ही ग्रामपंचायतीच्या निवासी असाल तर याबद्दल माहिती करून घ्या.

- तुमच्या ग्रामपंचायतीत किती सदस्य आहेत ?
- तुमच्या घरात किती जण मतदार आहेत ?
- तुमचे घर कोणत्या प्रभागात आहे ?
- तुमच्या प्रभाग सदस्याचे नाव काय आहे ?
- गत निवडणुकीत किती जण उभे होते हे तुमच्या आई-वडिलांना विचारून माहीत करून घ्या. तसेच निवडणुकीच्या वेळी त्यांनी काय केले, नेमके काय झाले याची माहिती घ्या.

SCERT TELANGANA


### सरपंच - उपसरपंच -सचिव

ग्रामपंचायतीत सरपंच प्रथम नागरिक असतो. ग्रामपंचायतीच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे काम सरपंचाचे असते. पंचायतीचे दैनंदिन कामकाजही सरपंचाच्या मार्गदर्शनाखाली चालते. ग्रामपंचायतीचे उत्पन्न आणि खर्च याची जबाबदारी त्याचीच असते. याप्रकारे सरपंचाला ग्रामपंचायतीच्या अनेक जबाबदाऱ्या पेलाव्या लागतात. सरपंचाच्या उदारपणामुळे अनेक गावांचा विकास झाल्याचे अनेक उदाहरणे आपणास माहीत आहेत.

### उपसरपंच

निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यामधून उपसरपंचाची निवड केली जाते. ही निवड सरपंचाच्या निवडीनंतर होते. सरपंचाच्या अनुपस्थितीत उपसरपंच सरपंचाच्या जबाबदाऱ्या पार पाडतो.



चित्र13.2
ग्रामचित्र

### सचिव - कार्यनिर्वाहक अधिकारी

प्रत्येक ग्रामपंचायतीला एक सचिव असतो. तो सरकारी नोकर असतो. ग्रामपंचायतींचा ताळेबंद, बैठकीचे इतिवृत्त लिहिण्याचे काम त्याच्याकडे असते. जर ग्रामपंचायत मोठी असेल तर उत्पन्नाच्या दृष्टीने आणखी एका कार्यनिर्वाहक अधिकाऱ्याची नेमणूक सरकार करते.

### ग्रामपंचायत काय करते?

जनतेला सुविधा पुरविण्याचे प्रमुख काम ग्रामपंचायतीला करावे लागते. गावातील रस्ते, सांडण्याची व्यवस्था, नाल्या सफाई, नवीन निर्माण, रस्त्यावरील पथदिवे त्यांची दुरुस्ती, निगा, स्वच्छता, स्वस्त धान्य दुकान यांच्यासह शाळा, अंगणवाडी, माता बालसंगोपन केंद्रे चालविणे तथा पर्यवेक्षण करणे इ. कामे ग्रामपंचायत करते. मोठी ग्रामपंचायत असेल तर लघू पाटबंधारे प्रकल्प, जलसंधारणाची कामे तसेच भूसंस्करणाची कामेही ग्रामपंचायतच करते. त्यासाठी कार्यनिश्चिती करणे, अंमलबजावणी करणे हा ही कामाचाच एक भाग होय.

अनेक राज्यात ग्रामपंचायतींना विशेष अधिकार देण्यात आले आहेत. त्याचबरोबर पंचायतींच्या जबाबदाऱ्याही वाढल्या आहेत. तथापि, आंध्र प्रदेशासारख्या काही राज्यांना अद्याप काही मौलिक, महत्त्वाचे अधिकार ग्रामपंचायतींना दिले नाहीत. यातील महत्त्वाचे म्हणजे बाजारावरील नियंत्रण, जमिनीचा विकास, वन उत्पादने, कुटीर उद्योग, गरिबांना घरे,

SCERT TELANGANA



*चित्र 13.3 ग्रामपंचायतीची बैठक*

विद्युतीकरण, गरिबी निर्मूलन, प्राथमिक आरोग्य सेवा पुरवणे या कामामुळे गावातील लोक आपल्या बहुतांश समस्या स्वतः दूर करतात.

ग्रामपंचायतीची बैठक महिन्यातून एकदा होते. दर बैठकीला किमान अर्धे सदस्य उपस्थित होणे आवश्यक आहे. कोरमअभावी सभा रद्द केली जाते. साधारणतः सभेची सुरुवात मागील सभेच्या इतिवृत्तांवरून केली जाते. गतमहिन्यात झालेल्या कामाविषयी सरपंच बैठकीमध्ये विषयसूची मांडतात. तसेच गतमहिन्यापर्यंतच्या खर्चाविषयी ग्रामसभेला माहिती दिली जाते. सभेतील सदस्यांना काही माहिती हवी असल्यास त्यावर चर्चा केली जाते. सोबतच वॉर्ड सदस्य त्यांना हवी असलेली माहिती मागू शकतात. दरवर्षी एप्रिल महिन्याअखेर आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला अंदाजपत्रक तयार केले जाते. सरपंच, सचिव, आदी लोक अंदाजपत्रकाविषयी आडाखा बांधतात. उत्पन्न आणि खर्च याचा ताळेबंद एकत्र करून ग्रामसभेसमोर ठेवला जातो. या ताळेबंदास मंजुरी दिली जाते. नंतर हा ताळेबंद मंडल परिषद आणि जिल्हा परिषद यांना पाठविला जातो. अंदाज पत्रकातील तरतुदीनुसार निधी उपलब्ध होतो. त्यानुसार प्रस्तावित कामांची सुरुवात केली जाते. तसेच त्याचे पर्यवेक्षणही केले जाते.

अनेक ग्रामपंचायतीमध्ये हे काम सरपंचच करतात. त्यासोबतच उपलब्ध निधी त्याचा विनियोग किंवा दुर्विनियोग होण्याची शक्यता असते. या बाबी खूप लोकांना माहिती होतात. असे होऊ नये म्हणून ग्रामसभेला सर्व सदस्यांनी तसेच माहिती हवी असलेल्या गावातील लोकांनी न चुकता हजर व्हावे विषयसूचीप्रमाणे कामे होत आहेत की नाही याची पडताळणी करावी.

- तुम्ही तुमच्या ग्रामपंचायतीमध्ये जाऊन गेल्या महिन्यात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त समजावून घ्या.

SCERT TELANGANA

- ग्रामपंचायत बैठकीसाठी अर्धे सदस्य न चुकता उपस्थित व्हावे हे आवश्यक आहे का याविषयी चर्चा करा.
- तुमच्या प्रभाग (वॉर्ड) मध्ये गतवर्षी झालेल्या विकासकामांविषयी चर्चा करा.

**ग्रामपंचायतींना निधी**

ग्रामपंचायतींना आवश्यक असलेला निधी कोठून येतो?

ग्रामपंचायतींना काही प्रकारचे कर वसूल करण्याचे अधिकार आहेत. घरपट्टी, जमिनीवरील कर, शिक्षणावरील कर, इत्यादी. याद्वारे ग्रामपंचायतींना साधारणत: $^1/_3$ उत्पन्न मिळते. तथापि ग्रामपंचायती राज्य आणि केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या निधीवर अवलंबून असतात. त्या निधींच्या उपलब्धतेनुसार कामे केली जातात. काही कामांसाठी निधी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेद्वारे उपलब्ध होतो.

ग्रामपंचायतींना येणारा निधी तुटपुंजा असतो. त्या निधीद्वारे मोठ्या प्रमाणात विकास शक्य नसतो. यामुळे अंदाजपत्रकाप्रमाणे कामे होत नाहीत. म्हणून लोकसहभागाद्वारे विकास होणे आवश्यक आहे.

**मंडल परिषद, जिल्हा परिषद**

यापूर्वीच्या भागामध्ये आपण ग्रामपंचायतीबाबत माहिती घेतली. साधारणत: एका मंडल परिषदेमध्ये 20 ग्रामपंचायती असतात. जिल्ह्यामध्ये असलेल्या सर्व मंडल परिषदा, जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली काम करतात. मंडल परिषद प्रादेशिक मतदार संघामधून (एमपीटीसी) ची निवड केली जाते. तसेच जिल्हा परिषद प्रादेशिक मतदार संघातून (झेडपीटीसी) ची निवड मतदानाद्वारे केली जाते. मंडल परिषद आणि जिल्हा परिषद दोघेही संयुक्तपणे आपापल्या क्षेत्रातील विकासकामांची पर्यवेक्षणे करतात. तसेच आवश्यक असलेला निधी मंजूर करतात.

**जंगम्मा - हाजिपल्ली**




*चित्र 13.4 हाजीपल्ली ग्रामसरपंच जंगम्मा यांना डिसेंबर 2008 मध्ये राष्ट्रपती प्रतिभा देवीसिंह पाटील यांच्याकडून निर्मल ग्राम पुरस्कार मिळाला तो क्षण.*

रंगारेड्डी जिल्ह्यातील हाजीपल्ली हे एक लहानसे गाव गावातील सरपंच जंगम्मा यांनी अनेक विकास कामे केली. गावात सिमेंटचे पक्के रस्ते निर्माण केले. भूअंतर्गत सांडपाणी व्यवस्था निर्माण केली. घराघरात शौचालयाची निर्मिती केली. गावाला आवश्यक असलेला शुद्ध पाणीपुरवठा निर्माण केला. सरकारी सहाय्यातून गावाचा विकास शतप्रतिशत साधला. जंगम्माचे हे काम पाहून 2008 साली हाजीपल्ली ग्रामपंचायतीला निर्मल ग्राम पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

SCERT TELANGANA

सूचना : सदर पुरस्कार गावातील घरांमध्ये, कार्यालयामध्ये, शाळेमध्ये शौचालये निर्माण करून संपूर्ण गाव पांदणमुक्त साधलेल्या गावांना दिल्या जातो. आपल्या राज्यात अनेक गावांनी असा पुरस्कार मिळविलेला आहे. सदर गावांची यादी मिळवून त्यावर चर्चा करा.

- हाजीपल्ली गावांमध्ये कोणकोणत्या सुविधा आहेत?
- हाजीपल्ली गावामध्ये सांडपाणी आणि रस्ते कसे आहेत?
- तुमच्या गावामध्ये असलेली सांडपाणी व्यवस्था तथा रस्ते कसे आहेत?

**ग्रामपंचायती ग्रामसभा घेतात का?**

आंध्रप्रदेशामध्ये अनेक गावात ग्रामसभा होतात. ग्रामसभेत लोकसहभागातून विकासाची कामे आणि त्यावर चर्चा होतात. लोकांच्या अभिरुचीनुसार कामांची निर्मिती केली जाते. आपल्या राज्यात वरंगल जिल्ह्यातील गंगादेवीपल्ली, कर्नूल जिल्ह्यातील पांडूरंगपूर, करीमनगर जिल्ह्यातील रामचंद्रापूर, निजामाबाद जिल्ह्यातील अंकापूर ही गावे ग्रामसभेच्या माध्यमातून गावाचा विकास साधल्याची उदाहरणे होत. तसेच महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार हे गावसुद्धा ग्रामसभेतून विकास साधलेले गाव म्हणून उदाहरणादाखल सांगता येईल.



*चित्र 13.5* गंगादेवीपल्ली गावातील

गंगादेवीपल्ली ग्रामपंचायत

गंगादेवीपल्लीमध्ये एकंदर 18 ग्रामसमित्यांद्वारे गावातील विविध समस्येंची सोडवणूक केली जाते. यामध्ये शुद्ध पाणी पुरवठा समिती, आरोग्य, शिक्षण, आवक जावक, इ. समित्या आहेत. या समित्यांना अनेक प्रकारची कामे करावी लागतात. त्यासाठी समित्यांनी कामाची विभागणी करून परस्पर समन्वयाने गावाचा विकास साधला.

- संपूर्ण मद्यपान निषेध
- शंभर टक्के पटनोंदणी
- संपूर्ण साक्षरता
- शुद्ध जलपुरवठा
- कुटुंब कल्याण योजना
- लहान मुलांना लसीकरण
- सर्व कुटुंबांना बँकेत खाते
- ग्रामस्वच्छता अभियान

एवढेच नव्हे तर गंगादेवपल्ली गावातील प्रत्येक व्यक्ती 18 समित्यांपैकी कोणत्या ना कोणत्या एका

SCERT TELANGANA

समितीत सदस्य आहे. त्यामुळे गावामध्ये असणाऱ्या प्रत्येक नागरिकांचा सहभाग आपोआप होतो.

- गंगादेवीपल्ली कोणत्या जिल्ह्यात आहे?
- गंगादेवीपल्लीमध्ये किती समित्या आहेत?
- गंगादेवीपल्लीबद्दल तुमचे मत काय आहे?
- गंगादेवीपल्लीच्या विकासाबद्दल तुमचे मत काय?
- तुमच्या गावची ग्रामपंचायत आणि गंगादेवीपल्ली ग्रामपंचायत यातील फरक तुम्ही कसा कराल?

### महत्त्वाचे शब्द

ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसभा, नागरी सुविधा निवडणुका, स्थानिक स्वयंपालन,मंडल परिषद जिल्हा परिषद

SCERT TELANGANA

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. तुम्ही स्थानिक संस्थेत सदस्य असाल तर कोणत्या समस्या निर्मूलनासाठी प्रयत्न कराल?
2. तुमच्या ग्रामपंचायत / नगर पालिकेत सामान्य लोक कोणत्या समस्येबाबत चर्चा करतात?
3. ग्रामसभेला उपस्थिती घटण्यामागे असलेल्या कारणांविषयी चर्चा करा.
4. दारिद्र्य रेषेखालील लोकांची यादी ग्रामसभेत का वाचली जाते?
5. दलित ग्रामपंचायत सदस्य, सरपंच तुमच्या परिचयाचे असतील तर त्यांना कोणत्या समस्याला तोंड द्यावे लागते. याविषयीची माहिती मिळवा.
6. पंचायत सदस्य, सरपंच यांना कोणत्याही प्रकारचे मानधन सरकार देत नाही. याबद्दल तुमचे मत काय?
7. विकास कामे वाढवण्यासाठी ग्रामपंचायतींनी कर तर राज्यसरकारांनी निधी वाढवावा याबद्दल तुमचे मत काय?
8. मन लावून काम करणाऱ्या सरपंचाला येणाऱ्या समस्या कोणत्या? त्याविषयी चर्चा करा.
9. तुमच्या ग्राम पंचायत मधील प्रभाग सदस्य, सरपंच, उपसरपंच, पंचायत सचिव यांची माहिती गोळा करुन एक तक्ता तयार करा?
10. पान क्र.119 वरील गंगादेवीपल्ली ग्राम पंचायत हा परिच्छेद वाचुन त्याचे विवेचन करा.

***प्रकल्प कार्य***


- ☐ तुमच्या गावातील सरपंच, मंडल परिषद सभापती किंवा जिल्हा परिषद अध्यक्ष यांना तुमच्या शाळेत आमंत्रित करा. त्यांच्याकडून ग्रामपंचायतीच्या कामांची माहिती मिळवा.
- ☐ तुमचा वॉर्ड मेंबर / सरपंच यांच्याशी गावातील विकास कामांविषयी चर्चा करून ग्रामपंचायतीमार्फत होत असलेल्या कामांचे एक भित्तिपत्रक तयार करून वर्गात प्रदर्शित करा.

पाठ 14

# शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्था

खाली दिलेल्या चित्राचे निरीक्षण करा. गाव आणि शहर यातील फरक दिसतो का? शहरामध्ये कोणकोणत्या लोककल्याणकारी सुविधा आहेत? तसेच शहरी लोकांचे राहणीमान कसे आहे? ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे राहणीमान कसे आहे? या विषयी वर्गात चर्चा करा.

SCERT TELANGANA




*चित्र 14.1 शहरातील दृश्य*

साधारणतः शहरात आणि खेड्यात अनेक लोक वस्ती करून राहतात. शहरात प्रचंड गर्दी असते तसेच वाहने, दुकाने, उद्योगधंदे हेही जास्त. म्हणूनच गावातून शहरांकडे जाणाऱ्यांचा ओघ जास्त असतो. म्हणूनच शहरांच्या विकासाविषयी विशिष्ट प्रकारची कार्यप्रणाली तयार करणे अत्यावश्यक ठरले आहे. यासोबतच उपजीविकेसाठी, कामधंद्यासाठी शहरामध्ये येणाऱ्या लोकांची संख्या खूप मोठी म्हणूनच शहरांचा विस्तार

दिवसेंदिवस वाढत आहे. अशा वस्त्यांमध्ये पिण्याचे पाणी, विद्युतीकरण, दळणवळणाची साधनं, शिक्षण, आरोग्य, आदी सुविधा पुरविण्याची गरज आहे. यासाठी फार मोठ्या नियोजनाची गरज आहे. हे नियोजनाचं काम मोठी पंचायत, नगरपालिका, महानगरपालिका यांच्यामार्फत केले जाते.

मोठी पंचायत 20,000 ते 40,000

नगरपालिका 40,000 ते 3,00,000

महानगरपालिकेस 3,00,000 पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी


**नगरपालिकेची निर्मिती**

ग्रामपंचायतीप्रमाणेच नगरपालिकांची निर्मितीदेखील निवडणुकींद्वारे होते. नगरपालिकेतही अनेक प्रभाग (वॉर्ड) असतात. प्रभागासाठी सदस्य असतात. या सदस्यांची निवड निवडणुकींद्वारे होते. निवडून आलेल्या सदस्यांना नगरसेवक म्हणतात. यांच्यापैकी एकाची निवड नगराध्यक्ष/महापौर म्हणून केली जाते.

ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी असलेले नियम नगरपालिका / महानगरपालिका यांनाही लागू असतात. खाली दिलेल्या माहितीची पडताळणी करा.

1. नगरपालिकेच्या निवडणुका दर तीन वर्षाला एकदा होतात.
2. मतदाराचे वय 18 वर्ष किंवा जास्त असावे.
3. प्रत्येक प्रभागासाठी एक नगरसेवक असतो.
4. त्याचे /तिचे नाव त्या प्रभागाच्या मतदार यादीत असणे आवश्यक आहे.
5. नगरसेवक हा पुरुषच असला पाहिजे.
6. 21 वर्षावरील प्रत्येक व्यक्ती निवडणुकीमध्ये भाग घेऊ शकतो.

- शिक्षकांच्या मदतीने तुमच्या जिल्ह्यातील नगरपालिका / महानगरपालिकेची माहिती मिळवा.



*चित्र 14.2 इलेक्ट्रॉनिक वोटींग मशीन*

**नगरपालिकेची कामकाज पद्धती**

नगरपालिका अनेक प्रकारची कामे करतात. उदा. पाणी पुरवठा, पथदिवे, नवीन रस्त्यांची निर्मिती, दुरुस्ती, गटारे-सांडपाण्याची व्यवस्था. तसेच कचरा उचलणे, त्याचे व्यवस्थापन करणे, शाळा चालविणे, आरोग्यविषयक सुविधा पुरविणे, याशिवाय अनेक विकासात्मक कामे करणे. ही सारी कामे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची गरज असते. नगरसेवक ही कामे करत नाहीत. किंबहुना ही त्यांची कामे नव्हेत. या कामांसाठी नगरपालिका मोठ्या प्रमाणात नोकरांची भरती करते. यामध्ये नोकरचाकर, अधिकारी, लेखा विभागांशिवाय अनेक कर्मचारी काम करतात. नगरपालिकेमध्ये अनेक विभाग असतात, प्रत्येक

SCERT TELANGANA

विभागासाठी स्वतंत्र अधिकारी नेमलेला असतो. त्या विभागाची जबाबदारी त्या अधिकाऱ्यावर असते. उदा. पाणी पुरवठा विभाग, विद्युत पुरवठा विभाग, शिक्षण विभाग, केरकचरा निर्मूलन विभाग, इत्यादी. हे सर्व असताना आता तुम्हांला प्रश्न पडेल की, नगरसेवक काय करतात? वास्तवत: नगरसेवकांचे काम जनतेच्या समस्या जाणून घेऊन पालिकेच्या बैठकीमध्ये त्यावर चर्चा करून त्या समस्या सोडवण्यासाठी कार्यरत राहणे. विविध प्रकारचे कामे करण्यासाठी नगरपालिकेमध्ये काही समित्या असतात. या समित्यांमध्ये मुख्य पात्र नगरसेवकांचे असते. या समित्या आपापल्या अख्त्यारितील कामांचे पर्यवेक्षण करते. त्यासाठी नगरपालिका विषयसूची तयार करते. ही विषयसूची पालिकांच्या बैठकीमध्ये चर्चेअंती मान्य करून त्याची अंमलबजावणी केली जाते. यामध्ये नगरपालिकेचे कर्मचारी तथा नगरसेवक यांचा सिंहाचा वाटा असतो.

नगरसेवक आपापल्या प्रभागातील समस्या पालिकेच्या बैठकीत मांडतात. त्या समस्या सोडवण्यासाठी जास्तीत जास्त निधी आपल्याला मिळावा यासाठी प्रयत्न करतात. यासोबतच वॉर्डातील जनसामान्यांशी संवाद साधतात. जनता नगरसेवकाकडे कशा प्रकारे समस्या मांडतात याचे एक उदाहरण पाहू.

- ग्रामपंचायत आणि नगरपालिका यांच्यामधील निधीचे वाटप याविषयी माहिती मिळवा.
- नगरपालिकेतील विविध विभाग एकमेकांशी समन्वय साधत कामे कशी करतात ते पाहा.
- तुमची शाळा नगरपालिकेकडून कशी व कोणत्या समितीकडून चालवली जाते?



*चित्र 14.3 जनतेकडून कचरा निचऱ्यासाठी अधिकाऱ्यांना विनंती पत्र देत असताना*

**जनतेची विनंती**

*नुकत्याच निर्माण झालेल्या एका उपनगरातील यास्मीन खाला आपली तक्रार मांडताना घराच्या आजूबाजूला पसरलेल्या कचऱ्यामुळे तेथे कुत्री, डुकरं, डास, माश्या यांच्या प्रभावाने मोठ्या प्रमाणात आरोग्य समस्या निर्माण झाल्याचे स्थानिक नगरसेवकाला निवेदन करते. हे ऐकून तिची सहकारी गंगूबाईसह काही महिला नगरसेवकाकडे विनंती अर्ज घेऊन जातात. नगरसेवक त्यांचा विनंती अर्ज घेऊन म्हणणे शांतपणे ऐकून घेतो. त्यांच्या उपनगरात असलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची मुख्य मागणी करत त्या आपला विनंती अर्ज नगरसेवकाकडे देतात. त्यानंतर घरोघरी जाऊन कचऱ्यामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्य समस्यांची तीव्रता पटवून दिली जाते.*

*दुसऱ्या दिवशी सकाळी प्रभागातील महिला, पुरुष, मुले-मुली यांच्यासह नगरसेवकासोबत महापालिकेमध्ये जातात. तेथे महापालिका आयुक्तांशी प्रभागातील समस्येविषयी चर्चा होते. यास्मीन खानने प्रभागातील कचऱ्याची समस्या*

SCERT TELANGANA

*अतिशय गंभीर असल्याने ती समस्या तात्काळ सोडवण्याची मागणी केली जाते. इतर प्रभागातील कचरा उचलण्यासाठी वाहनांची व्यवस्था असताना आमच्या प्रभागातील कचरा का उचलला जात नाही. आयुक्त कचरा उचलण्याची हमी देतात. दोन दिवसात कचरा उचलून प्रभागाची स्वच्छता करण्याचे वचन देतात. स्वच्छतेचे महत्त्व सांगण्यासाठी रेहाना नावाच्या महिलेने केलेली सूचनाही मान्य होते व समस्येचे समाधान होते.*

*रिहानाने विचारले, ''रस्ते स्वच्छ झाले का?'' नेहमी कामे अर्धवट सोडून देतात. हो, त्या दिवसापासुन आमच्या विभागात दररोज स्वच्छता होऊ लागली.*

तुमच्या प्रभागातील सोयी सुविधा पुरविण्यासाठी नगरसेवक काय करतात?

- तुमच्या घरासमोर जमा झालेला कचरा उचलण्यासाठी तुम्ही काय करतात?

**नगरपालिका-निधी**

नगरपालिका घरपट्टी, नळपट्टी, पथदिवेपट्टी, दुकानांवरील कर, सिनेमा तिकिटावरील कर, इत्यादी कर वसूल करते यातून पालिकेला भरपूर उत्पन्न मिळते. पालिकेला राज्य सरकारमार्फत निधी उपलब्ध होतो. त्यातून नवीन रस्त्यांची निर्मिती, पाणी पुरवठा, पाणी टाकी, जलवाहिन्या टाकणे इ. कामे केली जातात.



*चित्र 14.4 रस्त्याची साफसफाई*

**कंत्राटी कामे**

जनसेवेची कामे करताना पालिका अनेक कामे करते. यामध्ये मुख्यत्वे करून कचऱ्याचे निर्मूलन करणे. पूर्वी हे काम पालिकेचे कर्मचारी करत असत. त्यामुळे कंत्राटी पद्धतीने हे काम देशभरातील पालिका करीत आहेत. यामध्ये पालिका काही कामगारांना कंत्राटी पद्धतीवर नेमून कचऱ्याचे निर्मूलन करते. कचऱ्याचे व्यवस्थापन करताना विशिष्ट प्रकारचे कपडे, मोजे, हेलमेट, आदी वापरावे लागते. यालाच कंत्राटी पद्धत म्हणतात. कंत्राटी कामगारांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्याचे काम पालिका करीत आहे.

- तुमच्या शहरातील पालिकेमध्ये काम करणारे कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी किती आहेत, याचा शोध घ्या.
- पालिका कंत्राटी कामांकडे का वळत आहेत? याची कारणे शोधा.

**पालिका कर्मचारी**

आता पालिका कर्मचाऱ्याचे एक दिवसाचे काम कसे असते ते पाहू?

*आज सोमवार. सकाळी पाच वाजता चिन्नू उठली. काल रविवार असल्यामुळे तिला सुटी होती. सकाळी उठणे जिवावर आले. परंतु कामावर जाणे गरजेचे होते. ती सफाई कामगार होती. नजीकच्या स्टार लाईट कॉलनीमध्ये जाऊन साफसफाईचे काम करणे ही तिची जबाबदारी. काल रविवार असल्यामुळे कॉलनीतील रहिवाशांनी मोठ्या*

SCERT TELANGANA

*प्रमाणात कचरा केला असेल? कचरा जितका जास्त तितकी साफसफाई कठीण शिवाय ती जिथे राहात होती, तो भाग झोपडपट्टीचा असल्याने तिथेही अस्वच्छता मोठ्या प्रमाणात होती. संपूर्ण प्रभागासाठी एकच कूपनलिका (बोअरवेल) होती. उठण्यास उशीर झाल्यामुळे आणि कामावर लवकर जायचे असल्याने तिची चिडचिड वाढली.*

*तिची सहकारी नजमा तिला लवकर जाण्याविषयी सांगत होती. आपण दहा मिनिटात जर स्टार लाईट कॉलनीत पोहचलो नाही तर आपल्याला घेऊन जाणारी बस मिळणार नाही. म्हणून तू लवकर आटप. असे सांगत नजमा चालायला लागली.*

*सकाळी 6.45 मि. बस येते. याबरोबर चिन्नूने झोपीत असलेल्या मुलीला गदागदा हलवून उठविले. 'मी कामावर जात आहे. शाळेला वेळेवर जा' असे सांगून ती निघाली. दोघी पायी पायी स्टार लाईट कॉलनीत आल्या. त्यांना जाण्यासाठी कोणत्याही प्रकारची वाहन व्यवस्था नव्हती. साफसफाईच्या वस्तू घेऊन घंटागाडीसह त्या कॉलनीत आल्या. अती कष्टावर सफासफाईच्या कामाला सुरुवात झाली. काम करत असताना त्यांच्या असं लक्षात आलं कॉलनीतल्या सर्व कचराकुंड्या भरून कचरा जमिनीवर सांडला. लोकांनी रस्त्यावरही कचरा टाकला होता.*

*रस्ते झाडणे, कचरा गोळा करणे, तो कचरा घंटागाडीत टाकून त्याची विल्हेवाट लावणे ही त्यांची कामे. एकदा कचरा उचलणे, उचलून मोठ्या गाडीत टाकणे हाही त्यांच्याच कामाचा भाग होता. दररोजच्या कामामुळे त्यांना नैराश्य येत गेले. घनकचरा, ओला कचरा वेगवेगळा टाकण्यासाठी दोन वेगळ्या कुंड्या असल्या तरीही लोकांनी एकाच कुंडीत सर्व प्रकारचा कचरा टाकल्यामुळे दोघी भयंकर रागावल्या. त्यांना असं वाटलं की लोक जाणूनबुजून त्रास देताहेत.*

*घरोघर कचरा वेगळा ठेवण्याची सूचना देण्यात आली होती. तरीही लोक सूचनेचे पालन करत नाहीत. समाजातील लोक आमच्या कामाला कनिष्ठ दर्जाचे मानतात असे नजमा आणि चिन्नूला वाटत होते. शहराची स्वच्छता ठेवून नागरिकांना उत्तम आरोग्य मिळवून देण्याचे काम आम्ही करतो परंतु लोकं मात्र आमच्याकडे तुच्छ नजरेने पाहतात असे त्यांना वाटते. रस्ते साफसफाई करणारे, वाहनचालक, सहाय्यक या सर्वांचा सहभाग स्वच्छतेमध्ये असतो. कचरा गोळा करून तो कॉलनीपासून दूरवर टाकण्यापर्यंत नजमा आणि चिन्नूची जबाबदारी होती.*

- चिन्नू कोठे काम करत होती. तिला कोणी नोकरी दिली?
- कॉलनीची साफसफाई करण्यासाठी त्या काय काय करतात?
- चिन्नू, नजमा करीत असलेल्या कामाकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन कसा आहे?
- चिन्नू राहात असलेली कॉलनी आणि काम करीत असलेली स्टार लाईट कॉलनी यातील सुखसुविधा यातील फरक यावर चर्चा करा.
- दोन्ही कॉलनीमधील असलेला फरक यावर तुमचे मत सांगा.
- तुमच्या कल्पनेद्वारे दोन कॉलनींचे नकाशे तयार करा.

**वेमुलवाडा पालिकेचा आदर्शः**

वेमुलवाडा पालिके ही करीमनगर जिल्हा केंद्रापासुन 33 कि.मी. दुरी वर आहे. या पालिकेत 20 वार्ड आहेत.या नगरपालिकेत 2011 पर्यंत मोठी ग्रामपंचायत म्हणुन ओळखल्या जात असे. येथे श्री राजराजेश्वर स्वामी देवस्थान प्रसिध्द पुण्यक्षेत्र आहे. देवालयाला अनेक लोके यात्री म्हणुन येत असतात. देवालयाची अधिकारी देवालयाचा परिसर परिशुभ्र ठेवण्यासाठी अधिक काळजी घेत असतात.

या शहरात पाण्याच्या पाण्याची सोय चांगल्या प्रकारे आहे. या पाण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेत 'आकाश गंगा' असे म्हणुन ओळखले जाते. या

SCERT TELANGANA

आकाश गंगेचे निर्माण 2003 मध्ये झाले. खांबाच्या आधारावरुन पाईपलाईन टाकुन पाणी पुरवठा करीत असतात. 'स्वजल धारा'योजने व्दारे टाकलेली ही पाईप लाईन प्रत्येक दहा किंवा पंधरा कुंटुबाना मिसळुन एक नळ लावला आहे. अशा प्रकारे पाच हजार कुंटुंबांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असतो. पाणी एक दिवस आड नंतर एक दिवस आड करुन पाणी पुरवठा करीत असतात.

शहरात दररोज कचरा गोळा करीत असतात. नगर पाहिलकेच्या कर्मचाऱ्यांना चाकाच्या गाड्या आहेत. हातांना हातमोजे आहेत. गणवेश सर्व कामगांराना देत असतात. हायड्रीलीक डम्पर बिन्स ट्राली आटो रिक्षा, टॅक्टर यांचा उपयोग करुन कचरा गोळा करुन डम्पींग यार्ड कडे पोहचविला जात असतो. हा डम्पींग यार्ड शहराच्या पाच कि.मी. दुर आहे. कचऱ्यातुन प्लास्टीकला वेगळे करुन त्या कचऱ्यापासुन विद्युत उत्पत्ती करण्याचे प्रतिपादन आहे.

जवळ जवळ सर्व घरात व्यक्तीगत शौचालय आहेत. यांना स्वच्छंद संस्था व्दारे किंवा सरकाराव्दारे निधी मिळवुन त्याचे निर्माण होते.

शहराजवळ असलेल्या नदीत बतकम्मा सोहळा साजरा करण्यासाठी प्रत्येक सोयी आहेत. ही शहराचे मुख्य आकर्षण म्हणुन ओळखले जाते. सनाच्या संदर्भात प्रत्येक रक्षणाची सोयी आहे आणि विजेचे सुविधा आहे.



*चित्र 14.5: पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याची सोय*



*चित्र 14.6: पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असलेली पाईप लाईन (आकाश गंगा)*



*चित्र 14.7: बतकम्मा सोहळाचे चित्र*

**महत्त्वाचे शब्द**

- स्वयंशासन
- नगरपालिका
- महानगरपालिका
- कचरा
- कंत्राटी कामे
- जैविक कचरा

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा :

1. तुमच्या भागात कचरा कसा गोळा करतात? त्याचे काय करतात?
2. नगरपालिका देत असलेल्या कोणकोणत्या सुविधा ग्रामपंचायत देऊ शकत नाही.
3. तुमच्या शहरात / गावात नगरपालिकेने गेल्या दोन वर्षात कोणती कामे केली त्याची माहिती घ्या.
4. पोचम्मा राहत असलेल्या कॉलनीत नळाचे पाणी अर्धा तासही येत नाही त्यामुळे पाण्यासाठी रोज भांडणे होतात हे निवारण्यासाठी तुम्ही कोणता सल्ला द्याल?
5. झेविएर पथदिव्यांची दुरुस्ती करतो. तो कंत्राटी कामगार आहे. दुरुस्ती करताना झेविएर जखमी झाला. हात पूर्ण भाजला तो दोन महिने कामावर येऊ शकला नाही. त्याला दोन महिन्याचा पगार मिळाला नाही. एवढेच नव्हे तर त्याला कंत्राटदाराने कामावरून कमी केले त्याला तुम्ही काय सल्ला द्याल?
6. नगरपालिकांनी सार्वजनिक सेवा पुरवताना कमी दरात सेवा द्यावी ही सर्वांची अपेक्षा असते. तसेच पालिकेतील कर्मचाऱ्यांना कामाचे तास सक्तीचे असावेत असेही काही जणांचे म्हणणे आहे. यावर तुमची सूचना काय?(AS1)
7. गरिबांच्या उन्नतीसाठी पालिका कोणत्या सेवा देते?
8. गाव आणि शहर यामधील भेद कोणते?
9. तुम्हांला गाव आवडतो की शहर आवडते ते सांगा?
10. तुमच्या जिल्ह्याच्या नकाशातील नगर परिषद ओळखा?
11. स्थानिक नगर सेवक किंवा प्रभाग प्रतिनिधी यांना भेटुन स्थानिक विकास कामासंबधी माहितीसाठी प्रश्नावली तयार करा.
12. पान क्र. 123 वरील पहिला परिच्छेद वाचुन त्याचे विवेचन करा?

***प्रकल्प कार्य***

- पालिका जनतेला देत असलेल्या सोयीसुविधा बसस्थानक, इस्पितळ, शाळा, धर्मशाळा, शौचालय यांच्यापैकी कोणत्याही एकाचे निरीक्षण करून अहवाल तयार करा.
- पालिकेच्या दोन कर्मचाऱ्यांशी बोलून त्यांची कार्यप्रणाली एका कागदावर लिहून ती वर्गात प्रदर्शित करा.
- स्थानिक वृत्तपत्रात पालिकांविषयी आलेल्या बातम्या संकलित करून त्याचे पुस्तक तयार करा.

SCERT TELANGANA

पाठ 15

# आपल्या समाजातील विविधता

यापूर्वीच्या पाठात आपण राहात असलेल्या विविध स्तरातील लोकांच्या जीवनशैलीविषयी माहिती घेतली. वैविध्य हे केवळ राहण्याच्या प्रदेशावरून ठरत नाही तर ते आपल्या वर्गात आणि परिसरातही दिसते.

### आपल्या परिसरातील वैविध्य

तुमच्या वर्गावर एक नजर टाका. वर्गातील विद्यार्थी तुमच्यासारखी आहे का? प्रत्येकामध्ये वैविध्य आहे. तसेच समाजातील लोकांमध्ये वैविध्य आहे. सर्वजण एकसारखे दिसत असले तरी प्रत्येकामध्ये वेगळेपण आहे. अनेक लोक अनेक प्रांताशी निगडीत आहेत. अनेक आचार विचार, संस्कृती सवयी यातील भेद मुख्यत्वे करून दिसतात. या सोबतच जाती, धर्म, प्रांत आणि विचारामध्येही भेद असतात. हे भेदच मानवी जीवनाला अनेक प्रकारे संपन्न करतात. अनेक प्रकारचे लोक म्हणजे अनेक प्रकारच्या प्रथा, अनेक सांप्रदाय, संस्कृती, आचार-विचार, यामुळे भारत देशात विविधेत एकता निर्माण झाली. ही विविधता समाजातील लोकांना ऐक्यतेत बांधत आहे. *विविधेत एकता म्हणजे काय? आपल्या जिवनात वैविध्यतेचे काय महत्व ? याविषयी आपण या पाठामध्ये अभ्यास करू. भारतात इतकी विविधता कशी? का सगळ्या प्रकारचा फरक हा विविधतेचा एक भाग आहे? या चित्रातिल बालबालिका तुमच्याच वयाचे आहेत. या चित्रांचे निरीक्षण करून खाली दिलेल्या चौकटीत एक मानवी चित्र काढा.*







SCERT TELANGANA

तुम्ही काढलेले चित्र आणि तुमच्या समवयस्कांनी काढलेली चित्रे यामध्ये साम्य आहे का? तुम्ही काढलेले चित्र आणि तुमच्या समवयस्कांनी काढलेल्या चित्रामध्ये काय फरक आहे?

प्रत्येकांमध्ये चित्र काढण्याची वेगवेगळी शैली असते हे यावरून सिद्ध होते.

तुमच्याविषयीची माहिती खालील रिकाम्या जागेत लिहा.

1) बाहेर जाताना मला .......... प्रकारचे कपडे आवडतात.

2) घरामध्ये मी .......... भाषेत बोलतो.

3) मला आवडणारा खेळ ..........

4) मला .......... प्रकारची पुस्तके वाचायला आवडतात.

आता तुमच्या शिक्षकांच्या साहाय्याने वर्गातील किती लोकांनी वरील प्रश्नांची उत्तरे एकसारखी दिली याचा शोध घ्या. सर्वचजण सर्वच प्रश्नांची उत्तरे एकसारखी देत नाहीत. तथापि काहीजण एका प्रश्नाचे उत्तर एकसारखेच देतात, त्याविषयी वर्गात चर्चा करा. उदा. एकाच प्रकारचे पुस्तक आवडणाऱ्या लोकांनी दिलेली उत्तरे तपासून पाहा. तुम्ही राहात असलेल्या भागामध्ये किती प्रकारच्या भाषा बोलल्या जातात. तुमची उत्तरं आणि तुमच्या मित्रांची उत्तरं यामध्ये कितपत साम्य आहे. यावरून तुम्ही भिन्नत्वाविषयी जाणू शकता.

## मित्रत्व

तुमच्यापेक्षा भिन्न व्यक्तीशी मित्रत्व करणे सोपे *आहे असे तुम्हाला वाटते का ? खालील कथा वाचा.*

*विकाराबाबद शहरातील गजबजलेल्या चौकात सुमनच्या आईचे भाजीपाला विक्रीचे दुकान होते. सुमन कधी कधी आपल्या आईला भाजीपाला विक्रीत मदत करायचा. त्यामुळे त्याचे नाव **भाजीवाला सुमन** असे झाले. त्याचे त्याला काहीच वाटत नव्हते. एके दिवशी तो भाजीपाला विकत असताना त्याचाच समवयस्क मुलगा सायकलवरून भाजी घेण्यासाठी आला. सुमनने त्याला काय पाहिजे म्हणून विचारले. त्या मुलाच्या अंगावर शाळेचा गणवेश होता. त्याने **'अर्धा किलो भेंडी पाहिजे'** असे उत्तर दिले. नवीन आलेल्या मुलाने पैसे दिले आणि भाजी घेऊन निघून गेला. दुसऱ्या दिवशी तो*



*Fig. 15.1: Suman at vegetable shop*

*पुन्हा भाजी घेण्यासाठी दुकानात आला. त्याला पाहिल्याबरोबर सुमनने स्मित हास्य केले. आणि **भैय्या क्या चाहिए?** बोलतो भेंडी आधा किलो? भाजीवाला सुमन म्हणाला. त्या मुलाने मान हलवुन होकार दिला. नविन आलेल्या मुलाने पैसे दिले आणि भाजी घेवुन निघुन गेला दुसऱ्या दिवशी तो पुन्हा भाजी घेण्यासाठी दुकानात आला. त्याला पाहिल्यावर भाजीवाल्या सुमनने स्मित हास्य केले. आणि **भैय्या क्या चाहीए ?** असे अतिशय प्रेमाने विचारले. त्याने भाजीपाल्याची चौकशी केली. काय काय मिळतं? भाव काय? इत्यादी चौकशी केली. सुमनने उत्तर दिले. त्याच्याकडे **कद्दू, दोडके, भेंडी, टोमॅटो, आलू, कांदा** अशी यादी सांगितली. त्यावर शाळेतील मुलाने तुला तेलुगू येत नाही का? असे विचारून **तू कुठून आलास?** म्हणून चौकशी केली. त्या मुलाने हिंदीमध्ये उत्तर दिले. **"हम बिहारके है. मेरे घर में हिंदी बोलते है."** एवढे म्हणून तो म्हणाला "कोंचम कोंचम*

SCERT TELANGANA

*तेलुगू आता है''. यानंतर शाळेतील मुलांनी त्याला त्याचे नाव विचारले. भाजीवाल्याने सांगितले, ''माझे नाव सुमन. मला भाजीवाला सुमन असे म्हणतात''. हे ऐकल्यावर त्या मुलाने माझे नावही सुमन असल्याचे सांगितले. आणि त्याच्याशी हात मिळविला तेव्हापासुन ते दोघे मित्र झाले.*

एका रविवारी सुमनने भाजीवाल्या मित्राला क्रिकेट खेळण्यासाठी आमंत्रित केले. भाजीवाला सुमन खेळताना काही दिवसातच उत्तम क्षेत्ररक्षक बनला. ते पाहून बिहारी सुमन त्याला म्हणाला, तू उत्तम क्षेत्ररक्षक होशील. भाजीवाला सुमन म्हणाला मी रोज रात्री अभ्यास करतो? असेच काही आठवडे गेले. एके दिवशी बिहारी सुमन मित्राकडे गेल्यावर त्याला भाजीवाल्या सुमनचा चेहरा उतरलेला दिसला. चौकशी अंती त्याला कळाले की, भाजीचं दुकान महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये असल्याने ती जागा रिकामी करण्याचे आदेश देण्यात आले. लवकरच आम्हांला हे दुकान खाली करून जावे लागणार आहे. ते आम्हाला मोठ्या बाजारात जाण्यास सांगु लागले. आम्ही इतके गरीब की तेथे जास्त भाड देऊ शकत नाही. आम्ही कुठे जाऊ हे काहीही निश्चित नाही हे ऐकून शिकत असलेला सुमन खूप नाराज झाला. त्याच्यासाठी काही करता येईल का याचा विचार करू लागला. दोन दिवसानंतर तो पुन्हा भाजी खरेदीसाठी दुकानावर गेला , तेव्हा त्याला दुकान दिसले नाही. त्याच्या मित्राचे दुकान तिथून कुठे तरी दुसरीकडे गेले. महानगरपालीकेनी अतिक्रमन केलेल्या सगळ्या जागा रिकाम्या केल्या होत्या.

कथेतील दोन्ही सुमन यांच्यात फरक स्पष्ट आहे. भाषा, प्रांत, कामे, आहार, सणवार यांतील फरक स्पष्टपणे जाणवणारा आहे. याशिवाय दोघांनाही मिळणाऱ्या संधी, सोयी, सुखसुविधा यातही मोठा फरक आहे. तरीही त्या दोघांत घट्ट मैत्री झाली.''

- दोन्ही मित्रांमधील आणखी काही फरक स्पष्ट करा.
- बिहार किंवा इतर राज्यातील लोक साजरा करणारे सण, आहार याची माहिती घ्या.
- विद्यार्थी सुमन, त्याचा आहार, तो साजरा करत असलेले सण, याची माहिती घ्या.
- ते दोघे कोणत्या प्रकारच्या घरात असतील?
- भाजीवाला सुमन शाळेमध्ये जात नाही पण भाजी विकतो. भाजीवाला सुमन शाळेमध्ये का जाऊ शकला नाही असे तुम्हास वाटते?
- आता जर भाजीवाला सुमन शाळेत जाणार असेल तर त्याला कोणकोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागेल.

## भारतातील विविधता

आपण अशा देशात राहतो जिथे विविध प्रकारच्या भाषा, संस्कृती, धर्म, सामर्थ्य असलेले लोक राहतात. ही विविधता आपले जीवन समृद्ध करीत आहे. आपल्या देशातील 29 राज्यांतील लोकांची स्वत:ची भाषा, संस्कृती, आहारपद्धती, परंपरा वेगवेगळ्या आहेत. तद्वतच एकाच राज्यातील लोकांच्या भाषा, धर्म संस्कृती, सण, कपडे वापरण्याच्या पद्धती यातही बराच फरक दिसतो. कालानुक्रमे एकाची संस्कृती आहारपद्धती, सण, भाषा, परंपरा दुसरा आत्मसात करतो हे आश्चर्यकारक आहे. यामुळे प्रत्येकाचे जीवन वैविध्याने नटलेले असते. तुमच्या परिसरात अशी अनेक उदाहरणे दिसतात का?

तुम्ही घेत असलेले आहार पदार्थ जे तुमच्या आजी आजोबांना माहित नाही. त्याची यादी बनवा. एका चार्टवर लिहुन वर्गामध्ये प्रदर्शित करा.

SCERT TELANGANA

| विषय | कोठून आले | |
|---|---|---|
| आहार | | |
| वस्त्र | | |
| खेळ | | |
| सण | | |

आता आपण लांबच्या राज्यातील उदाहरणे घेउन, ही विविधता कशी निर्माण होते, ते पाहू या.

आपल्या स्वतःच्या तेलंगाना राज्यात, आपण लोकांमध्ये विविधता पाहू सकतो हे पाठ्यपुस्तक पण सुमारे सात भाषेत प्रकाशित झाले आहे. ह्या भाषा आपल्या राज्यात बोलल्या जातात. सा व्यतीरिक्त अनेक आदिवासी समुदाय त्यांची आपली भाषा बोलतात आणि एक वेगळयाच पद्धतीने जीवन निर्वाह करतात. लंबाडी आणि बंजारा जाती सारखे भटक्या जमातीचे लोक राज्याच्या विभिन्न प्रांतात राहतात. गोलकोण्डाचे सुलतान आणि निजामाच्या काळात, सामारकण्द, भोखरा, इरान आणि तुर्की सारखा दुर दुर राष्ट्रातुन लोक हैद्राबाद, सिकंदराबाद आणि राज्याच्या इतर भागात स्थायिक झाले आफ्रिकेतील गुलामाना मोठ्या संखेत हैद्राबादेत आनल्या  गेले. हैद्राबादेतील हबसीगुडा सारख्या काहि वसाहर्तींना त्यांचे नाव देण्यात आले.

इतर लोकांशी मिळून मिसळूण, ह्या विविध लोकांनी तेलंगानाची एक विशिष्ट आणि विविध संस्कृती निर्माण केली. अशा प्रकारे तेलंगानाची आपली एक वेगळी अशा तेलगु, हिन्दी आणि उर्दु (ज्याला दख्खणी महणतो) भाषा आहे. जी देशातल्या इतर बोलल्या जाणाऱ्या भाषा पैकी वेगळी आहे. हैद्राबाद तेलगु आणि उर्दु कविताचे प्रमुख केन्द्र आहे. लोकांच्या अशा विविधतेचा परिणाम म्हणजे समृद्ध सांस्कृतिक परंपरा ज्यात अनेक धर्म, विभिन्न सण परंपरा आणि संस्कृती, वेशभूषा, विविध आहार पदार्थ, अनेक प्रकारचे वास्तुकला, भवन शैली इत्यादीचा समावेश आहे.

## विविधता कशी येते ?

भूतकाळात अनेक लोक स्थलांतर करीत असत. नविन प्रदेशाच्या शोधात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊन राहात असत. कधी दुष्काळामुळे, कधी पुरामुळे, तर कधी रोगराईमुळे, तर कधी अन्य कारणांमुळे गावे सोडून अन्यत्र स्थलांतर करीत असत. नंतरच्या काळात युद्ध, नैसर्गिक आपत्ती यांमुळेही लोकांनी स्थलांतर केल्याची उदाहरणे आहेत. स्थलांतरित लोक आपल्या सोबत आपली भाषा, संस्कृती, धर्म, परंपरा, चालीरीती यांसह नवीन ठिकाणी येऊन राहतात. कालांतराने तेथील स्थानिक लोकांसोबत आपल्या संस्कृतीची देवाणघेवाण होते. नंतर स्थानिक लोकांच्या काही परंपरा, आणि स्थलांतरितांच्या काही परंपरा एकजीव होतात, पुढील विभागात विविध प्रांतातील लोकांचे जिवन विविधतेपासुन कसे प्रभावित होते ते पाहु या.




*Fig. 15.2: Thar desert (Rajasthan)*

SCERT TELANGANA

- भारत देशाच्या नकाशामध्ये (धडा 12) केंद्रशासित प्रदेश आणि राज्यांना ओळखून त्यामध्ये तेलंगाना राजस्थान, सिक्कीम ही राज्ये शोधा.

## थारचे वाळवंट

भारत आणि पाकिस्तानच्या सरहद्दीवर थारचे वाळवंट आहे. या वाळवंटातील भारताचा मोठा भूभाग राजस्थानमध्ये मोडतो. त्यातल्या त्यात राजस्थानमध्ये मारवाड विभाग थारच्या वाळवंटात आहे. या भागात पावसाचे प्रमाण अत्यल्प आहे मोठ्या नद्या नाहीत. त्यामुळे झाडे नाहीत. लहान लहान खुरटी झुडपी आणि




*Fig. 15.3: Jaisalmer Fort*

काटेरी गवताशिवाय या भागात कोणतेही वनस्पती नाहीत. खुप कमी पिके घेऊ शकतो. येथील लोक मेंढीपालन, शेळीपालन आणि उंटांचे पालन यावर आधारलेले आहेत. येथील लोक शेळ्या, मेंढ्या आणि उंटांसह तात्पुरते स्थलांतर करतात. पावसाळ्यापूर्वी परत आपल्या गावी थार मध्ये हे मेंढपाळ आपले गुरेढोरे घेऊन पुष्कळशा राज्यातुन प्रवास करतात आणि परत येतात.

बरेच व्यापरी इराण आणि अफगाणिस्तान येथुन भारतामध्ये येतात. वाळवंटातुन ये-जा करतात. विश्रांतीसाठी सोयीस्कर ठिकाणी ते लोक थांबतात. म्हणून काळाच्या ओघात जैसलमेर, बिकानेर, जोधपूर अशी शहरे निर्माण झाली. गेल्या अनेक शतकांपासून विभिन्न धर्माचे लोक जसे या भागात बोहरा मुस्लीम, सुन्नी मुस्लीम, शिया मुस्लीम, जैन, शैव, वैष्णव आणी सिख लोक येऊन स्थाईक झाले. याचवेळी येथील स्थानिक मारवाडी व्यापारी, व्यापाराच्या निमित्ताने देशभर विविध जागी जाऊन स्थिर झाले. अनेक यात्री जे गुजरात मधील द्वारका किंवा अरेबिया मधील मक्का आणि मदीना किंवा अजमेर आणि पुश्कर तलाव च्या यात्रेला जातात. ह्या प्रांतातुन आपल्या व्यापाऱ्याबरोबर प्रवास करतात. काळाच्या ओघात ही प्रांते महत्वपुर्ण नगरे आणि शहरे यांच्यात परिवर्तीत झाली जसे जैसलमेर, बिकानेर आणि जोधपुर.

उपखंडच्या विविध भागातून अनेक राजानी ह्या प्रांतात राज्य स्थापित केले. ह्या सगळ्या लोकांनी मिळून पावसाच्या पाण्याच्या साठवणीसाठी आणि वाळवंटातील भूमीच्या मशागतीसाठी मिश्र पद्धत विकसीत केली अशा प्रकारे थार हे जगातील जास्त लोकसंख्या असलेला वाळवंट बनला आहे.

एकेकाळी स्थानिक लोक मुगाची दाळ आणि बाजरीची भाकरी खात होते. सोबत उडदाची डाळही खात होते. कालांतराने यात बदल झाला. विविध प्रकारच्या झाडावरील (सांग्री) आणि काटेरी झुडपे भाज्या,



*Fig. 15.4: Rumtek Monastery*

SCERT TELANGANA

फळभाज्या यांना सुकवून त्या वर्षभर वापरत. पण आता भारतातील कोणत्याही भागातील कोणताही पदार्थ या वाळवंटात उपलब्ध आहे. इडली-सांबार पासून ते पिझ्झा, आईस्क्रीमपर्यंत कोणताही पदार्थ सहज उपलब्ध होतो. या वाळवंटाला भेट देणारे त्यांचा सोवत विविध प्रकारच्या



*Fig. 15.5: Kanchenjunga*

कला, वेशभूषा, नवीन प्रकारचे आहार घेउन येतात। आज जगभरातुन हजारो पर्यटक थार वाळवंटाची विविधतेचा आनंद घेण्यासाठी येतात.

## सिक्कीम

हिमालयाच्या पूर्वेला सिक्कीम हे छोटेसे राज्य आहे. हिमालयातील अनेक उंच शिखरांपैकी एक उंच असलेले कांचनगंगा शिखर सिक्कीममध्ये आहे. या राज्यात मोठमोठी दरी-खोरी पर्वतरांगा, निसर्ग सौंदर्य भरपूर प्रमाणात आहे. घनदाट अरण्य, धुक्याने दाटलेला परिसर यामुळे वर्षभर हा भाग थंड असतो. हिवाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणात बर्फवृष्टी होते. पाऊस भरपूर असतो. सखल भागात लहान मोठ्या नद्या भरपूर आहेत.

भारत देश, नेपाळ, भूतान आणि तिबेट (चीन) या सरहद्दीवर सिक्कीम हे राज्य आहे. यामुळे या भागात उपरोक्त देशातील लोक राहतात. यामध्ये काही नेपाळी, काही तिबेटी, काही भुतानी भाषा बोलतात. सिक्किम मधील लोकांना आकरा भाषा येतात. तिबेट मधील लामाशी त्यांचे घनिष्ठ संबंध आहेत. ज्यांनी या भागात बौध्द धर्म आणला होता. त्या लोकांनी सिक्किम मध्ये सुंदर मठांची ( मोनास्ट्री बौध्दमठ) स्थापना पण केली.

सन 1975 पर्यंत सिक्कीम हे स्वतंत्र राष्ट्र होते. चोंगवाल राजवंशीय लोकांनी या राज्यावर सत्ता चालवली. नंतर त्याच वर्षी हे राज्य भारतीय संघ राज्यात सामील झाले आणि तेथे लोकशाहीची सुरुवात झाली.

थार आणि सिक्किम हे दोन्ही भाग भारत देशात आहेत. थार हा वाळवंटाच्या प्रदेश तर सिक्कीम हिमालयात आहे.

विविध संस्कृतीचा प्रभाव ही प्राचीन गोष्ट नाही. सध्या कामाच्या शोधात आपण स्थलांतरीत होत असतो. प्रत्येक स्थलांतरा सोबत आपली सांस्कृतीक परंपरा आणि जिवन शैली हळुहळु आपण ज्या नविन ठीकाणी राहतो. त्याचा एक भाग बनतो. अशा प्रकरे आपल्या शेजारी आपण अनेक विभिन्न समुदायांच्या लोकांमध्ये राहतो. आपल्या दिनचर्यंत आपण सगळे एकत्र मिळुन काम करतो आपल्या चालीरीती आणि परंपरा आपल्या जिवनाचे एक अंगच / भाग बनतो.

## पॉंडेचरी

पाँडेचरी भारतातील दक्षिण पुर्व किनाऱ्यावरील एक छोटेसे राज्य आहे. पाँडेचरी नी डच, पोर्तुगीज, इंग्रज आणि फेंच्र सारख्या अनेक युरोपातील व्यापारीक कंपनीना आर्कषित केले. त्या लोकांनी ट्रेडींग पोस्ट आणि त्या लोकांच्या लहानशा वसाहती निर्माण केल्या. कालांतराने फ्रेंच नी या जागेवर 1954 पर्यंत नियंत्रण ठेवले. जेव्हा पाँडेचरी च्या लोकांनी भारतीय संघात विलीन होण्याचे मत दर्शविले अशाप्रकारे पाँडेचरी मध्ये तामिल आणि इतरांना सोडुन मोठ्या संख्येत फ्रेंच भाषीक लोक होते. भारतामध्ये इंग्रजाच्या विरुध्द स्वांतत्र्य चळवळीच्या वेळी पाँडेचरी नी अनेक स्वातंत्र सैनिकांन्न शरन दिली जसे सुब्रमणीयम भारती आणि ऑरोबिंदो घोष यांना आश्रय दिला. सुब्रमाणियम स्वामी तमीलनाडु चे महान राष्ट्रवादी कवी होते. ऑरोबिंदो घोष सुरुवातीस बंगाल चे क्रांतीकारक राष्ट्रवादी होते आणि नंतर आधुनिक भारताचे महत्वाचे आध्यात्मिक गुरु झाले. भारत भरातुन मोठ्या संख्येत



*Fig. 15.6: Auroville Matri Mandir*

SCERT TELANGANA

भक्तगण येथे येऊन स्थायिक झाले. ऑरोबिंदो घोष आणि त्यांचे फ्रेंच शिष्य, द मदर, या दोघांनी मिळुन ऑरोबिंदो आश्रमाची स्थापना केली. त्यानंतर एक आंतरराष्ट्रीय गाव ऑरोविले (Auroville) ची स्थापना संयुक्त राष्ट्राच्या मदतीने करण्यात आली. याचा उद्देश शांतता आणि जागतीक सहकार्य च्या संदेशाचा प्रसार करणे. अशा प्रकारे पॉडीचेरी हे असा जागेचे उदाहरण आहे. जेथे भारताची विभिन्न संस्कृती विलीन होतेच पण तेथे संपुर्ण जगातील लोक मानवतेची एकता साजरा करण्यासाठी एकत्र येतात.

## विविधतेत एकता

वैविध्यपूर्ण असलेली देशातील जनता एकाच देशात मिळून मिसळून कशी राहात असेल ही एक आश्चर्याचीच गोष्ट. इंग्रजांच्या देशावरील राज्याच्या वेळेस भारतीय लोकांनी त्यांना हाकलून लावण्यासाठी प्रचंड प्रयत्न केले. युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली. कदाचित यामुळे भारतीय लोक सर्व विसरून एकत्र आले. इंग्रजांनी भारतावर राज्य केले, त्याविरोधात भारतीय जनता कोणताही भेदभाव न बाळगता विभिन्न संस्कृती, धर्म, परंपरा, चालीरीती या सर्वांना बाजूला ठेवून सर्वजण एक होऊन इंग्रजाविरुद्ध उभे राहिले. ही एक राष्ट्रीय लढाई /राष्ट्रीय चळवळ होती. यामुळेच कदाचित राष्ट्रीय ऐक्याचे बीज रोवले गेले असेल.

*रक्ताची नदी वाहिलेले दिवस विसरु नको हे मित्रा तुमच्या संतोषामध्ये आम्ही आहोत हे गृहीत धरुन एका डोळ्यातुन एक आश्रु येऊ दे.*

*शिकाऱ्यांनी प्रत्येक फुलांची पाकळी गाळुन टाकली आहे. वाळवंटी प्रदेशात एक फुलांचे झाड लावा. हे मित्रा . बंदुकीच्या गोळ्या झेलेले आम्ही जलीयन वाला बाग मध्ये झोपलो आहोत.*

*या एकाकी समाधीवर एक दिपक लाव हे मित्रा, हिंदुचे आणि मुसलमानाचे रक्त आज मिसळुन वाहात आहे. तुझ्या कपड्यांना या रक्ताच्या तळ्यामध्ये डुबव.*

*प्रिय हे मित्रा,*

*काही जन जेलमध्ये कुजत आहेत. काहीजन समाधी मध्ये झोपी गेले आहेत. त्यांच्यासाठी डोळ्यातुन आश्रु वाहु दे हे मित्रा. ( भारत प्रजा नायक मंडळी)*

जलीयनवाला बाग गोळीबारा नंतर हे गित गाईल्या गेले. आमृतसर मध्ये त्यांच्या जवळ कोणत्याही प्रकारचे हत्यारे नव्हते. आणि प्रशांत समोवश होत असलेल्या लोकांवर गोळीबार करावा म्हणुन ब्रिटीश



*चित्र 15.7: स्वतंत्र दिवशी लाल किल्यावरुन देशांला उद्देशुन संभोधीत करतांना स्वतंत्र भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडीत जवाहरलाल नेहरु*

जनरल यांनी आदेश दिल्यामुळे कितीतरी लोक मरण पावले आहेत आणि नारजगी जाहीर करण्यासाठी स्त्री, पुरुष, हिंदु, सिख, मुस्लीम, धणिक, गरीब यांचा समावेश झाला. त्या साहासी लोकांसाठी गौरवपद करण्यासाठी हे गाणे लिहीले आणि गात आहेत.

भिन्नतेमध्ये एकतेला गौरव करणारा आपला देश धन साप्रदयांना स्वतंत्र संग्रमात निर्माण झालेले गाणे चिन्हे, माहिती देत असतात. राष्ट्रीय ध्वजांची कथा तुम्हाला माहित आहेत काय? ब्रिटीशांच्या विरोधात नाराजगी जाहीर करण्याच्या संकेताने लोकांनी देशभर झेड्यांचा उपयोग केला.

जवाहरलाल नेहरु यांनी लिहीलेल्या *भारत एक खोज* या पुस्तकात भारतातील लोकांची एकता दिखावा नाही ते अतिशय गंभीर आहे. ते विभिन्न आचांराने विश्वासाने भरलेली असुन सहनशिलतेवर आधारीत आहे. सर्व प्रकारे ओळखनेच नसुन प्रोत्सहान दिले. आपल्या देशा विषयी सांगायचे म्हणजे ''अनेकता मध्ये एकता'' होय, हे जवाहरलाल नेहरु नी पटवुन दिले आहे.

✻ भारत देशाच्या एकतेला दाखविणारे आणखी एक गित रविंद्रनाथ टागोर यांनी राष्ट्रीयगीत लिहले आहे. या अनेकते मध्ये एकतेला हे राष्ट्रीय गीत कसी माहिती देते यावर चर्चा करा?

**महत्त्वाचे शब्द**

विविधतेत एकता

कोलोनियल/वसाहती

संस्कृती

लामा

देशभक्ती

SCERT TELANGANA

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. तुमच्या परिसरातील भिन्नता दर्शविणारी दोन उदाहरणे द्या.
2. विभिन्न धर्मातील ऐक्यता दर्शविणारा तक्ता तयार करा.
3. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा भिन्नतेतून एकता कशी निर्माण करतात ते सांगा.
4. तुमच्या परिसरातील अनेक प्रांतीय, धर्मीय, एकत्रितपणे साजरा करणाऱ्या सणांची यादी तयार करा.
5. विविधतेने नटलेल्या भारतातील राहणीमान, जीवन कसे संपन्न करते.
6. पान क्र. 132 वरील हा परिच्छेद ( जेव्हा इंग्रज .... विरोध केला ) वाचा आणि विवेचन करा.
7. विविध राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांची / त्यांनी केलेल्या कामाची माहिती गोळा करून त्याचे एक हस्तलिखित तयार करा.
8. भारताचे विलक्षण वैशिष्टय ''विभिन्नते मध्ये एकता'' दर्शविणारे उदाहरणासहीत एक भितीपत्रक तयार करा?
9. खालील तक्ता पूर्ण करा.

| अ.क्र. | विषय | मी | माझा मित्र | मैत्रीण |
|---|---|---|---|---|
| 1. | आहार | | | |
| 2. | कपडे | | | |
| 3. | घर | | | |
| 4. | मातृभाषा | | | |
| 5. | धर्म | | | |
| 6 | सण | | | |
| 7. | इतर | | | |

वरील विषयांना अनुसरून ऐक्यता निर्माण करण्यासाठी तुम्ही काय प्रयत्न कराल?

10. भारत देशाच्या नकाशामध्ये खालील नावे ओळखा.
अ) सिक्कीम ब) थार वाळवंट क) पाँडीचेरी ड) तेलंगाना उ) पंजाब
ऊ) केरळ
11. पान क्र.130 वरील "विविधता कशी येते", हा परिच्छेद वाचुन त्याचे विवेचन करा. तुम्ही वाचलेल्या थार, सिक्कीम आणि पॉडीचेरी च्या आधारे विवेचन करा.

SCERT TELANGANA

पाठ 16

# स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने वाटचाल

भारतीय राज्य घटनेने कोणताही भेदभाव न ठेवता सर्वांना समान संधी दिली. याच कारणाने अनेक महिलांनी राज्य घटनेतील तरतुदींचा वापर करून विविध क्षेत्रात भरीव प्रगती साधली. महिलांनी मिळालेल्या संधीचा सुयोग्य वापर करून विशेष कार्यक्रम, प्रोत्साहन यांच्या साहाय्याने अधिकाराच्या जागा पटकावल्या. असे असले तरी आजही महिलांप्रति दुजाभाव दाखवला जातो. या पाठात लिंगभेद निर्मूलनासाठी सरकारने उचललेली पावले तसेच लिंगभेद म्हणजे काय ते समजून घेऊ.

- पिढ्या न् पिढ्या महिलांच्या जीवनात अनेक बदल झाले. तरीही अद्याप अजून काही बदल अपेक्षित आहेत, त्यासाठी सरकार, सामाजिक संस्था दुर्लक्ष करीत आहेत, त्या बाबी कोणत्या?
- मुलींना मुलांपेक्षा वेगळे पाहण्यात येते हा मुलींवर अन्याय होतो असाच एक अन्यायाचा तक्ता तयार करा.

वयाने वाढलेल्या प्रौढ स्त्री पुरुषांमध्ये अनेक भेद आपण पाहतो. स्त्री नेहमी चार भिंतीच्या आत घर काम म्हणजेच रांधणे, वाढणे आणि उष्टी काढणे यासोबतच मुलांचे संगोपन, घरातल्या सर्व व्यक्तींची काळजी घेणे इत्यादी कामांमध्ये व्यस्त असते, तर पुरुष घराबाहेरील कामे मोठ्या आनंदाने करतो. तथापि काही कुटुंबामध्ये महिला नोकरी करतात, त्यासोबतच घराची जबाबदारी उचलतात. त्यामुळे त्यांच्यावर प्रचंड ताण येतो. त्यांना कुणीही साह्य करीत नाहीत. घरचेही काम आणि बाहेरचेही काम तिनेच करायचे असते. यावेळी पुरुष मात्र मदत करण्याऐवजी मद्यपान करून स्त्रीला मुलांना धाक दाखवणे, अत्याचार करणे आदी करतो.

- मुलामुलींच्या पालनपोषणात भेदभाव का करण्यात येतो याचा फटका महिलांनाच बसतो. असे का व्हावे असे तुम्हाला वाटते?

मुलींचा सहजस्वभाव असाच असतो का?

काहींना असे वाटते की, स्त्री बलहीन आहे, ती जबाबदारीविहिन आहे ती केवळ प्रेम करण्याची वस्तू आहे, तथापि आहे. तथापि समस्यांना सामोरे जाण्याची शक्ती तिच्यात नाही. त्यांनी केवळ घरकाम, भांडीकुंडी, शिलाई अशीच कामे करावीत. स्त्रीमध्ये कुटुंबाची जबाबदारी घेण्याचे काम जन्मत:च येते, यामुळे तिने आयुष्यभर कुणाच्या ना कुणाच्या संरक्षणात (आज्ञेत) राहावेत. स्त्रियांनीच मुलांचे संगोपन करावे, किंबहुना ते काम त्यांचेच आहे. त्यासोबतच अर्थार्जनातही पुरुषांना सहकार्य करावे. वरील मत वाचले तर तुम्हाला काय वाटते?

SCERT TELANGANA

खाली दिलेल्या तक्त्यावरुन, स्त्री, पुरुष आणि दोघांनाही लागू असलेले, कांही गुण दिलेले आहेत. त्या विषयी तुमच्या वर्गात चर्चा करुन एक तक्ता तयार करुन तो सर्वांकडून भरुन घ्या.

| अ.क्र. | गुण | महिला | पुरुष | दोघे |
|---|---|---|---|---|
| 1. | धैर्य - धैर्याने सामना करणे | | | |
| 2. | विद्वत्ता - गणित, विज्ञान, यातील प्रतिभा | | | |
| 3. | कलात्मकता - चित्र काढणे, नृत्यकला, संगीतातील प्रतिभा | | | |
| 4. | अभ्यास - विद्याभ्यास आणि त्यातील प्रगती | | | |
| 5. | शक्ती - सामर्थ्य, काम करण्याची ताकद | | | |
| 6. | भावना - रडणे, भयानक राग करणे | | | |
| 7. | लाज - बाहेर पडण्याची भिती/इच्छा नसणे | | | |
| 8. | वाक्चातुर्य - न अडखळता कोणत्याही विषयावर बोलणे | | | |
| 9. | एकलकोंडेपणा - कुणातही न मिसळता शांत राहणे | | | |
| 10. | प्रेम - मोठ्यांची काळजी घेणे, लहानांचे संगोपन, संरक्षण करणे. | | | |
| 11. | शारीरिक क्षमता - क्रीडा क्षेत्रातील प्रतिभा | | | |
| 12. | वेशभूषा | | | |
| 13. | दुर्बल - हलक्या कामासाठी योग्य | | | |

- हा तक्ता वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना सांगून भरून घ्यावा. तक्त्यातील जास्तीत जास्त समान घटक गोळा करून शिक्षकाच्या मदतीने भिंतीवर लिहावे.
- आता यातील प्रत्येक लक्षणावर सखोल चर्चा सोदाहरण करावी.

आपण जर वरील तक्त्यातील माहिती अभ्यासली तर आपणास अनेक बाबी स्त्री आणि पुरुषांमध्ये समानपणे आढळतात. खोल अभ्यासांती निष्कर्ष काढता येईल की, भित्रेपणा आणि धैर्य हे दोघांतही समानपणे दिसते. तसेच लहान मुलांना कितीतरी प्रेमाने आपलेसे करण्यात स्त्रीचा हातखंडा असला तरीही पुरुषही तेवढ्या जबाबदारी हे काम करतात. तर दुसऱ्या बाजूला बे-जबाबदार स्त्रियाही दिसतात. अशीच काही लक्षणं स्त्री आणि पुरुषांमध्येही वेगळी दिसतात. स्त्री पुरुषाच्या शरीरामध्ये प्रचंड बदल आहेत. त्या बदलाचा परिणाम म्हणून स्त्रीला गर्भधारणा होते. ती बाळाला जन्म देते. काही महिने बाळाला स्तनपान करते. म्हणून पुरुषांनीही लहान मुलांना स्नान घालणे, त्यांची स्वच्छता ठेवणे, हे काम करणे योग्य आहे असे वाटते का?

स्त्रियांप्रमाणेच पुरुषही अनेक कामे करू शकतात. स्त्रियांइतक्याच समर्थपणे कुटुंबाची जबाबदारी पेलताना. साधारणतः महिला करतात ती कामे पुरुषही करतात. त्यामुळे श्रेष्ठत्वाची भावना निर्माण होते. वास्तविक पाहता ही लक्षणं हजारो वर्षांपासून दोघांमध्येही कायम आहेत. याविषयी खूप चर्चा झाली. हे सहजच तथापि स्त्रियांनी नेहमी पुरुषांच्या अधीन राहावे ही पुरुषाची इच्छा असते. इतिहासात जेव्हा

SCERT TELANGANA

जेव्हा स्त्रियांचे आधिपत्य होते तेव्हा तेव्हा काहीतरी मोठ्या घटना घडल्याचे सांगितले जाते. याचे उदाहरण म्हणजे इतिहासातील राजे महाराजे मोठमोठे संत महात्मे जगाला दिशा देणारे पुरुषच आहेत म्हणून पुरुषांचा वरचष्मा आहे म्हटले जाते. स्त्री आणि पुरुष यामध्ये दोन भेद दिसतात.

पहिले, शारीरिक भेद यामुळे स्त्रियांना कमी लेखलं जाते.

दुसरे म्हणजे त्यांची समाजातील किंमत - या भेदामुळेच त्यांना समाजात खालच्या नजरेने पाहिल्या जाते. यालाच वेगळ्या भाषेत लिंगभेद असेही म्हटले जाते.

### मुलामुलींच्या पालनपोषणाची असमानता

जन्मत:च मुलामुलींमध्ये फरक केला जातो. खालील बाबींच्या आधारे भेदभावांवर वर्गात चर्चा करून सत्य जाणून घ्या.

**कांही कुटुंबातच का.**

- मुलाचा जन्म झाला की, त्याचा आनंद साजरा केला जातो, मुलीचा जन्म झाला की, त्याचे ओझे समजले जाते.
- मुलांना केव्हाही मित्रांबरोबर बाहेर जाता येते. खेळता येते. सर्वांसह फिरता येते. त्याला त्याचे स्वातंत्र्य असते परंतु मुलींने घरातच राहावे, घरातील कामे केली पाहिजे असाच कल असतो.
- मुलांना खेळण्यासाठी वेगवेगळ्या वस्तू जसे बंदुका, मोटारगाड्या सहज आणून देऊन प्रोत्साहन दिल्या जाते. तर मुलींना आपोआप स्वयंपाकघराकडे पाठवले जाते.
- मुलांना पळण्यासाठी, झाडे चढण्यासाठी, उड्या मारण्यासाठी प्रोत्साहित करून तशा प्रकारचे कपडे घालण्याची परवानगी देण्यात येते परंतु मुलींना सर्व शरीर झाकण्याचे बंधनकारक करण्यात येते.
- मुले इतर ठिकाणी जाऊन शिक्षण अभ्यास करण्यास मोकळे आहेत परंतु हेच प्रोत्साहन मुलींना मिळत नाही.
- मुलांच्या तुलनेत फार कमी मुली उच्च शिक्षण घेऊ शकतात.
- मुलांना आपल्या आवडी निवडीप्रमाणे उच्च शिक्षणाच्या निवडीला मान्यता दिली जाते. पण मुलींचे तसे नाही. त्यांना लग्न करून संसार थाटणे अनिवार्य केले जाते.
- तुमच्या परिसरात अशाच प्रकारचा भेदभाव असेल तर तुम्ही त्यासाठी कोणत्या प्रकारच्या सूचना देता.

### काही मुलींबद्दल - काहीमहिलांबद्दल

अशा भेदभावामुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. उदा. देशाच्या लोकसंख्येत महिलांची संख्या कमी होत आहे. यासाठी एक उदाहरण पाहू. 1951 साली दर हजारी पुरुषांमागे महिलांची संख्या 946 एवढी होती. तर 1981 साली हीच संख्या घटून दर हजारी पुरुषांमागे 934 एवढी झाली. सन 2011 मध्ये हे प्रमाणे थोडेसे वाढून 940 एवढे झाले. आता परिस्थिती आपल्या राज्याची 1991 यावर्षी आपल्या राज्यात दर हजारी पुरुषांमागे 969 महिला होत्या तोच आकडा 2011 मध्ये थोडासा वाढून दर हजारी पुरुषांमागे 988 एवढा झाला. अशा प्रकारे भारतातील सर्व राज्यांच्या तुलनेत आपण मुलींचा जन्म दर उत्तम प्रकारे टिकून ठेवला आहे. परंतु सहा वर्षाखालील मुलामुलींची अवस्था

SCERT TELANGANA

पाहिली तर वेगळेच चित्र दिसते. त्यासाठी खालील तक्ता पाहा.

| वर्ष | मुले | मुली |
|---|---|---|
| 1991 | 1000 | 978 |
| 2001 | 1000 | 963 |
| 2011 | 1000 | 933 |

यावरून आपणास काय समजते तर मुलींची परिस्थिती भूतकाळापेक्षा आता थोडीशी चांगली आहे. तशीच आपल्या राज्यात महिलांची परिस्थिती बरीचशी सुधारलेली आहे. वैद्यकीय मताप्रमाणे दर हजारी पुरुषांमागे तेवढीच स्त्रियांचीही संख्या असावी. परंतु महिलांना आरोग्यप्रद जीवन जगण्याची संधी कितपत मिळते यापेक्षाही आश्चर्याची गोष्ट म्हणजे मृत्यूचे प्रमाण पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये जास्त आहे, असे का घडते ?

याचे एक कारण असेही असू शकते की, अनेक लोक मुलीच्या जन्माला विरोध करतात. आईच्या पोटात असतानाच तो गर्भ जर मुलीचा असेल तर त्याची विल्हेवाट लावली जाते. खाजगी आरोग्य केंद्रांमार्फत आगाऊ गर्भजल निदान परीक्षण केली जाते, त्यातून जर तो गर्भ स्त्रीचा असेल तर गर्भपात केला जातो, यामुळेही स्त्री-पुरुष संख्येत असमतोल निर्माण होत आहे. याचे आणखी एक कारण म्हणजे मुलीच्या जन्मानंतर काही महिन्यातच मृत्यू होण्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच पाच वर्षांत मृत्यूचे प्रमाण तपासले तर पुरुषांपेक्षा स्त्रीचे प्रमाण जास्त आहे.

- तुमच्या भागात स्त्री-पुरुष मृत्यू दर किती आहे हे तुमच्या शिक्षकांना आणि आई वडिलांना विचारून माहीत करून घ्या. त्या विषयीची माहिती गोळा करून वर्गात प्रदर्शित करा.


### *शैक्षणिक भेद*

आपल्या जीवनातील महत्वाच्या गोष्टी म्हणजे शाळेला जाऊन लिहायला आणि वाचायला शिकणे.

चित्र 16.1 पहा तेलंगानातील निरक्षरांची संख्या दोन वेगवेगळ्या बार ग्राफमध्ये दाखविली आहेत. पुरुष आणि स्त्रीया सात वर्ष वयापेक्षा जास्त असलेले जे तेलगू किंवा इतर भाषेत लिहु किंवा वाचु शकतात. तेलंगानात स्त्रियांपेक्षा जास्त पुरुष साक्षर आहेत. निरीक्षण करा. तुम्हाला समजेल की, तेलंगानातील प्रति 100 स्त्रियांमध्ये 1991 मध्ये फक्त 28 स्त्रिया साक्षर आहेत. 2011 मध्ये ही संख्या 58 झाली. ह्या काळात ही संख्या पुरुषांच्या तुलनेत 52 ते 75 झाली. तुम्हाला कळेल की, पुरुष आणि स्त्रियांच्या संख्येत हळू हळू अंतर कमी होत आहे.

भारतात तेलंगाना आणि आन्ध्रप्रदेशात सर्वात मोठी शैक्षणिक पद्धती जवळ-जवळ 1 लाखापेक्षा जास्त शाळा आणि महाविद्यालयातुन 1.50 कोटी विद्यार्थी शिकतात. मध्येच शाळा सोडून जाणाऱ्या मुलांची संख्या सुद्धा जास्त आहे. हा एक महत्वाचा प्रश्न आहे. 30 वर्षा पुर्वी मुलींच्या संख्येमध्ये हा प्रश्न एक गुंतागुंतीचा झाला आहे. उदा. प्रत्येक 100 मुलींमध्ये 65 मुली 5 वी नंतर शाळा सोडून देतात आणि फक्त 15 मुली 12 वी पर्यंत शिकतात.

दुसरा मुद्दा म्हणजे स्त्रियांमध्ये कमी साक्षरता दर मुलींना घरी बसुन शाळेला जाण्यास प्रोत्साहीत केले जात नाही.



*चित्र 16.1* तेलंगानातील साक्षरता दर

SCERT TELANGANA

त्यांना दुकानात आणि शेतात कामाला लावले जाते. जरी त्या शाळेत गेल्या तरी त्यांना अभ्यासाला कमी वेळ मिळतो. जरी त्या शाळेत गेल्या तरी त्यांना गणित आणि विज्ञानासारखे विषय घेण्यासाठी परावृत्त केले जाते. कारण त्यांना वाटते की, मुलांना ते योग्य आहे. मुलांना सांगितले की जाते, की तुम्हाला घरगूती विज्ञान आणि साहित्य हे विषय घेता येतात. अनेक संस्था अशाप्रकारे मुलांना आणि मुलींना जबरदस्ती करीत आहेत.

आता परिस्थिती बदलली आहे. 5 वी नंतर 1/6 मुले शाळेला जात नाहीत. याठिकाणी मुले-मुलींमध्ये मोठे फरक दिसून येते.

- तुम्ही शिकत असलेल्या शाळेत मुला-मुलींत भेदभाव करणारे विषय टिपून चर्चा करा.
- वर्गातील प्रत्येक जण 2 व्यक्ती व्यक्तींसी बोलू शकतो. (स्त्री आणि पुरुष) कांही वर्ष शाळा शिकून सोडून दिली. त्याची कारणे शोधून काढा? वर्गात याची चर्चा करा?
- गेल्या वर्षी तुमच्या आजू-बाजुला शाळा सोडणाऱ्या मुलींची शाळा सोडण्याची कारणे शोधून वर्गात चर्चा करा?

***संपत्तीचा हक्क***

आपल्या देशात अचल संपत्तीत मोठा भाग पुरुषांच्या नावे असतो. जमिनी, घरे, मोठमोठे उद्योगधंदे हे पुरुषांच्याच नावे असतात. आई वडिलांच्या संपत्तीमध्ये मुलीला हक्क दिला जात नाही. त्यासाठी कायदे असले तरीही त्याची अंमलबजावणी होत नाही. आई-वडिलांच्या संपत्तीत वाटा मिळविणाऱ्या महिला बोटावर मोजण्याइतक्या आहेत. यामुळे स्त्रियांची परिस्थिती अतिशय दारुण त्यांना मिळणारे उत्पन्न अत्यल्प असते. यामुळे त्या आर्थिकदृष्ट्या आई-वडिलांवर, पतीवर, मुलांवर, भाऊ बहिणींवर आधारित असतात.

अलीकडच्या काळात तेलंगानातील परिस्थिती चांगली आहे. 1980 मध्ये कायदे केले त्यानुसार वडिलोपार्जित संपत्तीचे मुलगा आणि मुलगी यांच्यात समानतेने वाटप करने, देशात आपले राज्य हे असे पहिलेच आहे, संपत्तीतील असमानता कमी आहे.

***रोजगाराची संधी***

यापूर्वी पाहिल्याप्रमाणे पौष्टिक आहार, शिक्षण, यांमध्ये मुलींचे प्रमाण कमी आहे. ग्रामीण भारतात जास्तीत जास्त कामे स्त्रियांमार्फत केली जातात. नोकरी करणाऱ्या स्त्रीला घरकामांसाठी रजा घ्यावी लागते. खूप शिक्षण घेतलेल्या स्त्रियांच्या विकासामध्ये कुटुंबातील व्यक्तीच अडथळे आणतात. कुटुंबाला सोडून बरेच दिवस बाहेर राहावे लागते. या कारणांमुळे नोकरीच्या अनेक संधी सोडलेल्या स्त्रिया आपल्या आजूबाजूला आपण पाहू शकतो. तथापि, मोकळीक असताना करणारी कामे याकडेच कुटुंबाचा कल असतो. यामुळे त्यांच्यावर मानसिक आणि शरीरिक दबाव येतो. आपल्या देशातील राजधानी दिल्लीतील एक घटना पाहू.

दिल्लीतील एका गर्भश्रीमंताच्या घरी काम करणाऱ्या मालिनीची ही कथा.

SCERT TELANGANA

*'मी एका तीन मजली इमारतीच्या मालकाच्या घरी काम करते. मालकाने सांगितलेले कोणतेही काम करणे मला बंधनकारक आहे. कोणतेही काम सांगताना यजमानीनबाई कर्कश्शपणे ओरडून सांगते. मुख्यत्वे करून माझे काम स्वयंपाक घरात आहे. घराची साफसफाई करण्यासाठी आणखी दोन मुली आहेत. आमचं काम सकाळी पाच वाजता सुरू होते. बदल्या कामाला कपभर चहा आणि दोन वाळलेल्या भाकरी एवढाच मोबदला मिळतो. तिसरी भाकर आवश्यक असली तरीही मिळत नाही.*

*रहस्यमय परिस्थितीत आम्ही आवश्यक असलेल्या रोटी लपवून ठेवतो आणि कुणाच्याही लक्षात न येईल अशाप्रकारे त्याचा उपयोग करतो. अतिशय अपमानजनक काम पाहून खूप दुःख होते. आमच्या कामाविषयी कुणालाच आपुलकी नाही का ?'*

- तुम्हाला माहीत असलेल्या मोलकरणीविषयी माहिती गोळा करून त्यांच्यांशी घरमालक / मालकीण कसा व्यवहार करतात ?

- त्यांना भेडसावणाऱ्या समस्या कोणत्या हे जाणून घ्या.
- मालिनीसारख्या मोलकरणी दिवसाकाठी शंभर रुपये देतील. कमवत नाहीत याचे कारण काय ?

साधारणतः महिला आणखी कोणकोणती कामे करू शकतात याविषयी वर्गात चर्चा करून माहिती गोळा करा. गेल्या काही दशकांपासून महिलांच्या कामामध्ये अनेक बदल झाले. एकेकाळी उच्च विद्या अर्हता आणि त्यासोबतच उच्च प्रतीची कामे ही पुरुषांची मक्तेदारी होती. त्यामुळे शास्त्रज्ञ, राजदूत, अभियंते या जागा पुरुषांसाठी राखीव असायच्या. परंतु बदलत्या काळानुसार या जागेवर आता तुरळक का होईना स्त्रिया दिसत आहेत. संरक्षण, रेल्वे, या सारख्या जोखमीच्या क्षेत्रातील आताशी स्त्रिया दिसत आहेत. नुकतीच भारतातील पहिली रेल्वे चालक महिला म्हणून एका स्त्रीची नेमणूक झाली. उच्च शिक्षणासाठी संघर्ष केला आणि अनेक व्यवसायांमध्ये लैंगिक भेद मोडून काढले.



*चित्र 16.2 भारतातील पहिली महिला रेल्वेचालक : सुरेखा यादव*



SCERT TELANGANA

***न ओळखली जाणारी स्त्रीयांची कामे***

आपण स्त्रिया करीत असलेली कामे पाहिली तर दिवसाचा जास्तीत जास्त वेळ त्या स्वयंपाक घरातच असल्याचे दिसते. तथापि त्यांच्या कामाला मात्र कोणतीही मान्यता नाही. त्यांच्या कामाविषयी दोन गौरवाचे शब्द कुणीही बोलत नाहीत.

- खाली दिलेल्या रिकाम्या चौकटीत शेतांमध्ये शेतमजुरांचे चित्र काढा. हे चित्र तुमच्या शिक्षकांना दाखवा.

वरील चित्रात किती पुरुष, किती स्त्रिया, शेतमजुरी करताना दिसतात. याची माहिती घ्या.

गमतीची बाब म्हणजे पुरुषालाच शेतकरी म्हटले जाते. तथापि दर दहा शेतकऱ्यांमध्ये आठ शेतकरी महिला आहेत. जमिनीची मशागत करणे, बी-पेरणी करणे, रोपे लावणे, खत-औषधे टाकणे, फळांची तोडणी करणे, प्रतवारी करणे इत्यादी असंख्य कामे स्त्रियाच करतात. तरीही त्यांना शेतकरी म्हणून कुणीही मान देत नाही. शेतातील काही खास कामे स्त्रियांसाठीच राखीव असतात. यामध्ये निंदणी, खुरपणी, गवताची कापणी, इत्यादी कामे, पती किंवा घरातील पुरुष परगावी किंवा कारखान्यात कामावर गेल्यास घराची आणि शेताची संपूर्ण जबाबदारी त्यांच्याच खांद्यावर असते. एवढं काम असूनही त्यांना कोणतीही मान्यता नाही. मजुरीच्या बाबतीतही तोच भेदभाव. कामे जास्त मजुरी कमी अशी स्त्रियांची दयनीय अवस्था आहे.

अनेक महिला त्यांच्या कुटुंबात काम करत



*चित्र 16.3 या चित्रात पहा स्त्री जरी नौकरी करीत असली तरी तिला ही सर्व कामे करावी लागतात. तरी आपण तिच्या घरातील कामांना मजूरी म्हणतो का?*

असतांनाही त्यांचे काम ओळखले जात नाही. दुसऱ्यांच्या शेतात पुरुषांप्रमाणेच महिला सुद्धा काम करतात. परंतु त्यांना पुरुषांपेक्षा कमी मजुरी मिळते.

वरील उदाहरणावरून आपणास कळणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्त्रियांच्या सहभागाशिवाय घर आणि व्यवसाय अपूर्ण आहे. घरातील कामे आणि घराबाहेरची कामे स्त्रिया न थकता करतात. म्हणून त्यांच्या कामाविषयी थोडासा विचार करा. स्त्रिया करणारे प्रत्येक काम उदा. स्वयंपाक, लोणची, मुलांचे संगोपन, त्यांना संरक्षण, घरातील मोठ्यांची सेवा, आजारी व्यक्तींची सुश्रूषा, कपडे शिवणे, इत्यादी कामे स्त्रिया सहजपणे करतात.

स्त्रियांनी केलेल्या कामाच्या मोबदल्यात आपण त्यांना काय देतो? वेळेवर सहकार्य करत नाही (त्यांचे म्हणणे नीटपणे ऐकून घेत नाही.) स्त्रियांच्या कामाचा मोबदला द्यायचं ठरवलं तर किती द्यावा लागेल याची कल्पना करा.

- तुमच्या घरी आई, बहीण, भाऊ, वहिनी हे लोक कोणकोणती कामे तयार करतात, त्याची एक यादी तयार करा. सकाळी उठल्यापासून सायंकाळपर्यंतची दिनचर्या तपासून नोंद करा.

***आता गोष्टी बदलत आहेत.***

तुम्ही 13 व्या आणि 14 व्या पाहिले असेल ग्राम

SCERT TELANGANA

तेलंगानातील ग्राम पंचायत आणि शहरी संस्थांचे कार्य अशा संस्थांचे सदस्य खेड्यातील महत्वाचे निर्णय घेऊन विकास करतात. राजकारणात कांही स्त्रिया आणि मुली आवडीने भाग घेतात. सरकारने अनिवार्य केल्यामुळे पंचायतमध्ये स्त्रिया जास्तीत जास्त पुढे येत आहेत आणि निवडणुकांमध्ये सुद्धा सहभाग घेत आहेत. 8 व्या पाठामध्ये इंद्रा वाळलेली मिर्ची विकण्यासाठी स्वयंसहायक गटाकडुन कर्ज घेते. कुटुंब चालविण्यासाठी या महिला स्वयंसहायक गट करुन साधने निर्माण करतात. कांही महिला त्यांच्या पती सोबत महत्वाचे निर्णय घेतात. असे स्वयं सहायक गट त्यांना चर्चा करण्यास वाव देतात. गावात राजकिय पक्षात महिलांना सहभागी होण्यासाठी मदत करतात. अशाप्रकारे स्त्रिया नवीन भूमिका निभावत आहेत.

| महत्त्वाचे शब्द | |
|---|---|
| रोजगार | साक्षरता |
| मालमत्तेचा हक्क | लैंगिक प्रमाण |

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. मुलांपेक्षा मुली बलहीन असतात हे खरे काय? तुमचे मत सांगा.
2. तुमच्या घरात तुम्ही, बहीण, भाऊ कोणकोणती कामे करतात याची एक यादी बनवा.
3. 10 महिला कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांचे काम आणि मोबदला याविषयीची माहिती गोळा करा.
4. तुमच्या घरातील वयोवृद्ध व्यक्तींकडून 25 वर्षाखालील शैक्षणिक परिस्थितीची / शालेय स्थितीची माहिती घेऊन चर्चा करा.
5. आई वडिलांच्या संपत्तीत मुलीला वाटा का देत नाहीत, याचे कारणे सांगा.
6. पान क्र. 140 वरील ***संपत्तीच्या वाटपात भेद*** हा परिच्छेद वाचुन त्याचे विवेचन करा?

प्रकल्प कार्य

- ❑ तुमच्या शाळेतील उपलब्ध माहिती आधारे 1, 5, 8, 10, 12 या वर्गात गतवर्षी किती मुलींनी प्रवेश घेतला ही माहिती गोळा करा. मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण कमी की जास्त यावर चर्चा करा.
- ❑ पुरुषांच्या कार्यक्षेत्रातील महिलांनी केलेली भरीव प्रगती याविषयीची माहिती गोळा करा. त्यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करून त्यांनी अडचणीवर कशाप्रकारे मात केली. या संबंधीचे एक हस्तलिखित तयार करा.
- ❑ महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याला स्वयंसहायता गट कसा मदत करतो त्याचे काय फायदे आहेत हे तुमच्या भागातील गटांना विचारून माहिती करून घ्या.
- ❑ तुमच्या गावातील/प्रांतातील शाळा सोडलेल्या मुलांच्या आई वडीलांना भेट देऊन खालील पट्टीकेत माहिती गोळा करा.

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नाव | सामाजिक वर्ग SC/ST/BC/OC/Minority | कोणत्या वर्गात शाळा सोडली | शाळा सोडण्याचे कारण काय? |
|---|---|---|---|---|
| | | | | |

वरील माहितीच्या आधारे कोणत्या समाजातील लोक अधिक शाळाबाहेर आहेत? त्यांची कारणे कोणती? वर्गात चर्चा करुन स्पष्टीकरण करा?

SCERT TELANGANA

पाठ 17

# प्राचीनकालीन धर्म आणि समाज


भारत अनेक धर्मांचा देश. भारतातील लोक विविध धर्माचे अनुयायी आहेत. विविध प्रकारच्या पूजा, प्रार्थना, परंपरा येथे प्रचलित आहेत. काहीजण केवळ प्रार्थना, यज्ञ, निशब्दपणे देवाचे स्मरण करतात. तर काहीजण वेगवेगळ्या प्राण्यांचे बळी देऊन देवाला प्रसन्न करण्याचे प्रयत्न करतात. काही लोक प्रार्थनाच करत नाहीत. आता आपण प्राचीन काळात भारतातील धर्म आणि समाज कसा होता याविषयीची माहिती घ्यावी.

## शिकार, अन्नधान्य अन्वेषणावर आधारीत समाज

प्राचीन काळात मानवी समाज मुख्यत्वे पालनपोषणासाठी शिकारीवर अवलंबून होता. याविषयीची माहिती तुम्ही याअगोदरच वाचली आहे. प्राचीन काळाविषयीची माहिती मिळण्याचे स्रोत खूप कमी आहेत. जुन्या काळातील चित्र आणि मोठमोठ्या समाधिवश इमारती यातून थोडीशी माहिती मिळते.

- ते कशाची आणि का प्रार्थना करत होते, याविषयी तुम्ही कल्पना कराल का?

आजही प्राचीन गुहांमध्ये याविषयीची चित्रे उपलब्ध आहेत त्यातून प्राचीन मानवाच्या धार्मिक आचारविचारांबाबत माहिती मिळते. जनावरांच्या शिकारीनंतर त्याचा मुखवटा धारण करून इष्ट देवीदेवतेला प्रसन्न करण्यासाठी नृत्य करण्याची प्रथा तत्कालीन समाजात रूढ होती. चांगली शिकार मिळाली म्हणून देवीसमोर नृत्य केले जायचे. पुरातन वास्तू संशोधकाच्या मते प्राचीन काळी शिकाऱ्याच्या मृत्यूनंतर त्याला त्याच्या काही प्रिय वस्तूंसोबत समाधिस्त



*चित्र 17.1 मुखवटाधारी नृत्य*

करण्यात येत असे. या समाध्या प्रचंड मोठ्या आकाराच्या असत. त्यात त्याच्या दैनंदिन उपयोगाच्या सोबतच काही आवडीचे पदार्थही ठेवलेले असत.



*चित्र 17.2 बिंबेट्टा येथील जंगली वराह*

SCERT TELANGANA

बाराव्या शतकातील तमिळ भाषेतील पुस्तक ‘पेरिया पुरानम्’ यात आंध्रप्रदेशातील प्रसिद्ध भक्त कन्नप्पा यांची कथा आहे. या कथेला अनुसरून चित्तूर जिल्ह्यातील श्रीकालहस्ती परिसरातील शिकारीवर आधारीत जीवन जगणाऱ्या लोकांविषयीची माहिती आहे. त्यांच्या चालीरीती, पूजापद्धती, जीवनशैली याविषयीची माहिती मिळते. भक्त कन्नप्पाच्या देवभेटीच्या वेळेस एक म्हातारी स्त्री पुजारी म्हणून वावरली. तिने मांस, मध, फळ आणि फुलांच्या साहाय्याने जंगलातील देवी देवतांची पूजा करून आशीर्वाद देण्याची विनंती केली.

नल्लामल्ला आरण्यात राहणारे चेंचू लोक हे पुरातन शिकारीवर जगणारे लोक. हे लोक देवीची पूजा गोरल्लामैसम्मा किंवा गंगम्मा या नावाने करतात. हे लोक श्रीशैलमच्या मल्लिकार्जुन स्वामी या देवाचेही भक्त आहेत. तसेच ते नरसिंह स्वामी या देवाचीही पूजा करतात. त्यांच्या मते या देवांनी चेंचू जमातीतील मुलींशी लग्न केले म्हणून हे लोक देवांची विशिष्ट पूजेद्वारे आराधना करतात.



*चित्र 17.3 चिंचू लोकांचे नृत्ये*

- प्राचीन काळातील शिकारी आणि शेतकऱ्यांच्या धार्मिक चालीरीतीत कोणकोणते बदल अपेक्षित आहेत असे तुम्हाला वाटते.

**पहिला शेतकरी : पशुपालक**

पुरातत्त्व विभागाच्या उत्खननातून मिळालेल्या माहितीनुसार देवीची पूजा प्राचीन काळामध्ये केली जात असत. आम्मतल्ली किंवा नेतलतल्ली या नावाने शेतकरी आणि पशुपालन देवीची आराधना करत. पशूंचे पालनपोषण, उत्पादन, शेती उत्पादन भरपूर व्हावे हा



*चित्र 17.3 मेहर नगर येथील मातीचे भाजलेले 5000 वर्षापुर्वीचे जुने शिल्प*

त्या मागचा उद्देश. आम्मतल्लीच्या आशीर्वादाने पशुपक्ष्यांचे उत्पन्न वाढते, तर नेतलतल्ली देवीच्या आशीर्वादाने जमिनीचे उत्पन्न वाढते. लहान लहान दगडांच्या रूपात आम्मतल्ली देवीची फळ फुलांच्या साहाय्याने पूजा केली जाते. दख्खनच्या पठारावरील



*चित्र 17.5 इ.स. 4000 वर्षापूर्वीचे दगडावर चितारलेले प्राणी*

पशुपालक सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी आपल्या मागे राखेने भरलेले एक विशिष्ट भांडे ठेवत होते. हे भांडे अग्नी आणि तत्सम वस्तू सोबत बाळगण्याच्या कामी येत असे. या अग्नीच्या साह्याने आवश्यक तेव्हा विस्तव पेटवून त्याच्या उजेडात नृत्य, पूजा, तत्सम कामे केली जात असत.

भारत देशात सध्या राहात असलेल्या पशुपालकांना विविध नावांनी ओळखलं जातं. त्यात महाराष्ट्रात धनगर, कर्नाटकमध्ये कुरुबा, आंध्रप्रदेशात कुरुमा, गोल्ला, यादव इत्यादी नावे आहेत. वास्तविक पाहता हे सारे पशुपालक होत. महाराष्ट्रात या समाजात विठोबाची भक्ती केली जाते तर कर्नाटक, आंध्रप्रदेशात रेणुकामाता, येलम्मा, म्हैसम्मा, पोचम्मा इत्यादी नावांनी देवीच पूजा केली जाते. शेतकरी पशु पालन करीत असते व पशु पालकांसोबत जवळचे संबंध असत. विशेषतः दक्षिण भारतात स्त्रीरूपी देवीची पूजा मोठ्या प्रमाणात आहे. विशेष सणावारांच्या वेळेस देवीला रेडा, बकरा, कोंबडी आदी प्राण्यांचा बळी देऊन प्रसन्न केले जाते. या पूजेमुळे उत्तम पिके आणि आरोग्यदायक जनावरे यासोबतच सुखशांती मिळते अशी यामागची समजूत आहे.

काही लोक शेतीसोबतच वृक्षपूजकही आहेत. हे लोक जंगलातील विविध वृक्षांची पूजा करतात. यामध्ये



*चित्र 17.6 पाच हजार वर्षांपूर्वीची चित्रित केलेली भांडी अफगाणिस्तानातील मुंडीगाक येथे सापडली.*

आपटा, कडूलिंब, पिंपळ, वड इत्यादी झाडांची पूजा करतात. पुरातत्त्व विभागाला मिळालेल्या अवशेषावरून हजारो वर्षांपूर्वी पिंपळाच्या आणि वडाच्या पानांची पूजा करण्याची पद्धत प्राचीन समाजात रूढ होती. हत्ती, वाघ, साप, माकड (वानर) या पशूंचीही पूजा होत असल्याचे दाखले मिळतात.

**सिंधू संस्कृतीकालीन धर्म**

भारतीय उपखंडातील वायव्य प्रांतात (पश्चिमोत्तर) सिंधू नदीच्या खोऱ्यातील हजारो वर्षांपूर्वी एक प्रगत अशी संस्कृती जन्माला आली. तिचेच नाव सिंधू संस्कृती होय. सुमारे 4,600 वर्षांपूर्वी सिंधू नदीच्या खोऱ्यात अनेक अत्याधुनिक शहरे वसलेली होती. ही संस्कृती साधारणतः 900 वर्षे जिवंत होती. हरप्पा नंतर पुरातत्व विभागाने केलेले पहिल्या उत्खननात अनेक प्रकारच्या वस्तू आढळल्या यात मातीच्या, लाकडाच्या, दगडाच्या, सोने, चांदीच्या वस्तू, भांडी, शिल्पे, हातमागाशी संबंधित वस्तू, राजे, महाराजे, अधिकारी गण यांच्या वापरातील अनेक वस्तू आढळल्या.

सामान्य लोकांचे स्नानगृह, कोठारे, धान्य, सार्वजनिक इमारती, रस्ते, नाले आणि घरे सापडली. आतापर्यंत मोठी मंदिरे सापडली नाहीत. अनेक देवी, देवतांच्या मुर्त्या सापडल्या. हे सुद्धा दिसून येते की, ते लोक अनेक झाडे, वृक्षे आणि प्राणी यांची पुजा करत.

SCERT TELANGANA

♦ खालील चित्राचे काळजीपूर्वक निरीक्षण करा. त्यात एखाद्या देवतेचे प्रतिबिंब जाणवते का?



*चित्र 17.7 हरप्पाकालीन पुरुष देवता*



*चित्र 17.8 हरप्पाकालीन अम्मातल्ली देवी*

हरप्पाकालीन पुरुष देवतेचे चित्र एक जरी असले तरी तेथील लोक शिवपूजक होते. असे काही लोक मानतात. काही चित्रात सिंधू संस्कृतीतील लोक पताका घेऊन मिरवणुकीने पूजेला जात असल्याचे चित्र आहे. या शहरात कोणतेही मोठे देऊळ अद्याप सापडले नाही. परंतु देवतांच्या अनेक मूर्त्या आणि चित्रे आढळली.

**वैदिक धर्म**

भारतीय उपखंडातील सर्वप्रथम साहित्य म्हणून वेदांचे नाव घेता येते. वेद चार असून ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद आणि अथर्ववेद यापैकी ऋग्वेद अतिशय प्राचीन साधारणत: साडेतीन हजार वर्षांपूर्वी ऋग्वेदाचे संकलन केले असावे असे मानले जाते. वेदात देव देवतांची स्तुती मंत्र, स्तोत्र मानवी जीवनाच्या विकासासाठी देवांकडे करावयाच्या प्रार्थना आहेत, वेदातील मंत्र विविध देवदेवतांच्या प्रार्थनेने युक्त आहेत. यातील तीन देव मुख्य आहेत. वायू, अग्नी आणि इंद्र (युद्धदेवता) यासोबतच सोमलता (विशिष्ट प्रकारचे पेय बनविण्यासाठी लागणारे झाड). वेदातील वाक्य कसे उच्चारावे याचे पूर्वी ऋषी मुनी शिक्षण देत असत. आश्रमपद्धतीत वेदांचे अध्ययन होत असे. वेदातील काही भागच स्त्रियांच्या वापरासाठी होता. यज्ञ, बलिदान आदी करताना मंत्र पठण होत असे. खाली एका मंत्राचा अर्थ दिलेला आहे. आपण समजून घेऊया.

**प्रार्थना**

असतो मा सद्गमय
तमसो मा ज्योर्तिगमय
मृत्योर्मामृतंगमय
ओम शांती शांती शांती...

अर्थः– अज्ञानापासुन, सत्यापर्यंत, अंधारापासुन प्रकाशाकडे, मृत्यूपासुन अमरत्वाकडे
ओम शांती शांती शांती...

हे इंद्रा ये, आमची ही आहुती (समर्पण) स्वीकार. शिकारी जसा शिकाराचा शोध घेतो तद्वतच आम्हीसुद्धा संपत्तीचा शोध घेत आहोत. हे इंद्रा आम्हांला युद्धात जय मिळविण्यास साह्य कर. हे इंद्रा आम्हांला अखंड संपदा प्रदान कर. आमच्या इच्छा पूर्ण कर. आम्हांला दीर्घायुष्य प्रदान कर.

SCERT TELANGANA

**विश्वामित्र आणि नद्या**

विश्वामित्र : हे नद्यांनो पर्वतावरून खळखळत खाली या वेगाने येताना तुमच्या जलधारांना एकत्र करून खाली या इंद्राच्या शक्तीमुळे तुम्ही अश्वाच्या वेगाने समुद्राकडे धावत आहात तुमच्यात भरपूर पाणी आहे तुम्ही समुद्राशी एकरूप होण्यासाठी धावत आहात.

नद्या : भरपूर पाण्यासह आम्ही देवतांच्या मार्गाने प्रवाहित होत आहोत. एकदा का आम्ही प्रवाहित झालो तर थांबणार नाही. हे मुनिश्वरा तू आमची प्रार्थना का करत आहेस?

विश्वामित्र : हे भगिनींनो कृपा करून माझी विनंती ऐका हा गायक खूप दुरून आलेला आहे तुमचे पाणी आमच्या उंचीपेक्षा जास्त प्रवाहित करू नका सुरक्षितपणे पैलतीरी जाऊ द्या


नद्या : आम्ही तुझी विनंती ऐकतो तुला सुरक्षितपणे मार्ग देतो.

- हे श्लोक कुणाला उद्देशून म्हटले आहे?
- ऋषी देवांना काय अर्पण करीत आहेत असे तुम्हाला वाटते?
- ते देवाकडे कशासाठी प्रार्थना करीत आहेत?
- ते शिकार आणि आहार अन्वेषणासाठी फिरणारे किंवा गुरे चारणारे, खेड्यात राहणारे का शहरात राहणारे लोक होते. तुमचे मत काय?

ऋग्वेदात पशूंसाठी, मुलांसाठी, घोड्यांसाठी वेगवेगळ्या प्रार्थना आहेत. वेदांचा अभ्यास केलेल्या इतिहासकारांनी वेदकालीन लोकांच्या राहणीमानाविषयी काही निष्कर्ष मांडले आहेत. त्यांच्या मते, वेदकालीन लोक गोपूजक होते तसेच ते घोड्यांचेही शौकीन होते. भारत देशाच्या वायव्य भागातील हिंदकुश पर्वतश्रेणीपासून ते यमुना नदीच्या मध्यभागात वेदकालीन लोकांची वस्ती होती.

वेदकालीन लोक लहान लहान गटागटाने राहत असत. प्रत्येक गटाला एक नेता असे. तो त्या गटाचा प्रमुख असे. धार्मिक कार्य करण्यासाठी ब्राम्हण, पुरोहित असे. पुरोहित गटातील प्रमुखाकडून यज्ञयागादि कार्य करून घेत असे. कार्योत्तर रोख रूपात पुरोहिताला दक्षिणा देण्यात येत असे. अनेक गटामध्ये आधिपत्यासाठी युद्ध होत असे. या युद्धात घोड्यांचा आणि रथांचा वापर होत असे. पशूंचे पालन आणि हरण हे दोन मुख्य उद्देश युद्धामागे असायचे. शेकडो वर्षांच्या नंतर गंगा यमुना नद्यांच्या खोऱ्यात अतिशय संपन्न आणि सुपीक जमीन निर्माण झाली. तेथे हे लोक स्थिर झाले. या प्रदेशात कसदार जमीन मुबलक पाणी असल्यामुळे भात, गहू अशी पिके घेऊ लागली. कालांतराने स्थलांतर करणे बंद होऊन वेदकालीन लोक अनेक गट एकत्र येऊन गावाच्या रूपामध्ये स्थिर झाले. याच काळात यजुर्वेद, अथर्ववेद यांची निर्मिती झाल्याचे मानल्या जाते. दीर्घ श्लोक असल्याने वेदांचा अर्थ कठीण आहे. वेदांमध्ये युद्धनीतीही सांगितली आहे. युद्धामध्ये विजय मिळविण्यासाठी देवतांच्या प्रार्थनांचाही समावेश आहे. याच काळात समाजात वर्णव्यवस्था निर्माण झाली. कामाच्या आधारे विभाजन झाले. ब्राम्हणांना समाजात अग्रस्थान मिळाले.

SCERT TELANGANA




## मृत पुर्वजांची पुजा - दख्खनमध्ये प्रचंड समाध्या

वरील चित्रात दिसत असलेल्या मोठमोठ्या दगडांना महासमाधी असे म्हणतात. प्रजेने भूतकाळात मोठमोठ्या दगडांचा वापर करून या समाधीची निर्मिती केली. साधारणत: 3000 वर्षांपासून या समाधीची पद्धत सुरू झाली. ही पद्धत प्रथम दक्षिण भागातील काश्मीरपासून उत्तर पूर्व ईशान्य भागापर्यंत वाढत गेली.

या महासमाध्या जमिनीवर, जमिनीखाली बांधण्यात आल्या. गोल आकार असलेल्या जागेत मोठमोठे दगड एका विशिष्ट पद्धतीत उभे करून त्या दगडांवर आणखी एक मोठा दगड झाकत असत. याच्या आतल्या भागात राहण्यासाठी दगडांनीच बांधलेली एक लहानशी गुहा निर्माण करण्यात आली. या गुहेत विशिष्ट गटाशी संबंधित लोकांना मृत्यूनंतर ठेवले जायचे. अशाच एका गुहेत कितीतरी अस्थिपंजर संशोधकांना सापडले. मृतदेहासोबत त्या व्यक्तीला आवडणाऱ्या अनेक वस्तू तेथे ठेवण्यात येत असत. मृत्यूनंतरच्या जीवनात त्या वस्तूंची आवश्यकता पडेल असा यामागचा उद्देश असावा.

या समाध्या एकाच प्रकारच्या दगडांनी आणि आरेखनांनी बांधण्यात आल्या होत्या. मृतदेहासोबत साधारणत: काळ्या आणि पांढऱ्या रंगाच्या दोन भांड्यामध्ये विविध वस्तू ठेवल्या जात होत्या. यामध्ये काम करण्याच्या वस्तू लोखंडी वस्तू, त्या व्यक्तीची आयुधे, त्या व्यक्तीच्या घोड्याचे अवशेष इत्यादी.

यासोबतच सोन्याच्या वस्तूही ठेवण्यात येत होत्या. उपखंडात अनेक मोठमोठ्या खोदकामात तत्कालीन समाजात वापरण्यात येणाऱ्या लोखंडी वस्तू आढळून आल्या. यात काही वस्तू शेतीकामासाठी वापरण्यात आल्याचे दिसते. यावरून तत्कालीन समाज कृषिप्रधान होता असे म्हणता येते.

यावरुन असे दिसून येते की, द्विप खंडातील हे

SCERT TELANGANA

पहिले लोक आहेत, ज्यांनी मोठ्या प्रमाणात लोखंडी औजारे वापरली, तसेच टाकीच्या सिंचनाद्वारे तांदळाची शेती केली. ते त्यांच्या पुर्वजांच्या समाध्यांची पुजा करने महत्वाचे समजत असत.

a ♦ आपल्या कुटुंबातील मृत सदस्यांना आपण पुजतो का? याविषयी माहिती गोळा करा.


### तेलंगानातील मेगालिथ्स

मेगालिथ्स काळातील समाध्या ह्या पहाडांच्या जवळपास तसेच शेतात, तलावात देखील खुप मोठ्या प्रमाणात आढळुन आल्या. जवळपास सर्व प्रकारच्या मेगालिथ्स जसे मेहरिन किंवा मोठ्या दगडाच्या, गोल दगडाच्या, डोलमेन्स हे तेलंगानाच्या सर्व जिल्ह्यातील गावात आढळून येतात. खालील दिलेल्या मेगालिथ्स च्या चित्रांना पहा.

मेगिालिथ्स मध्ये अनेक प्रकारचे भांडी जसे मडके जे काळ्या आणि लाल रंगाने पॉलीश केलेले आढळतात. तसेच लोखंडी अवजार, हाताने बनविलेले सरकोफागी (समाधी) दिसतात. जे मृत व्यक्तिसाठी ठेवलेले असतात.









*चित्र 17.9: a) टेरराकोटा सर्कोपगी, इलेश्वरम नलगोंडा (b) मेंहीर, देऊलगुट्टा जवळ, वरंगल (c) पोतन्नापल्ली महबूबनगर येथील डोलमेन समाध्या (d) रेपूनी गावातील दगडी गोलाकार समध्या, वरंगल*

**नविन प्रश्न - जनपदकालिन नगर**

जनपदे - नगरकालिन नवीन प्रश्न

गंगा नदीच्या खोऱ्यात पूर्वी महाजनपद निर्माण झाले तसेच काही नगरांची निर्मितीही झाली. याविषयी आपण यापूर्वीच अभ्यास केला आहे. या प्रदेशात अनेक प्रकारचे लोक राहत. त्यात शिकार करून जगणारे, पशुपालन करणारे, कामगार, गरीब लोकांचा भरणा मोठ्या प्रमाणात होता. हे सर्व लोक एकमेकाशी अत्यंत सामंजस्याने राहत होते. कोणत्याही प्रकारचा धर्मभेद, मतभेद नव्हता. यामुळेच या भागात संमिश्र संस्कृती निर्माण झाली. वेदकार्य, अग्निकार्य, सूर्यपूजा, नदीपूजा, देवीपूजा त्यासह वानर, हत्ती, सर्प आणि झाडे यांचीही पूजा प्रचलित होती. या काळात मृत माणसाची पूजा केली जायची. माणसाच्या मृत्यूनंतर त्याचा आत्मा जिवंत राहतो असा एक विश्वास तत्कालीन लोकांमध्ये होता म्हणूनच मृत माणसाची पूजा केली जाई. कर्मकांडांना महत्त्व होते. यातूनच काही नवीन प्रश्न निर्माण झाले.

**मृत्यू नंतर काय होते?**

नचीकेताची एक प्रसिद्ध गोष्ट आहे. ह्या तुम्ही ही एकेली असेल, त्याच्या मनात एक प्रश्न आला मृत्यू नंतर काय होते? त्याला विचार आला. यम हा मृत्यूचा देवता, त्यालाच आपण उत्तर विचारावे. तो सरळ यमाकडे गेला. त्याला जराही भीती वाटली नाही. त्याने यमाकडे जाऊन प्रश्न विचारले, *मृत्यू नंतर काय होते?* यमाने या अवघड प्रश्नाचे उत्तर देण्याचे टाळले, त्याने त्या ऐवजी सोने, चांदी, गाई वैगेरे देईन पण मला या प्रश्नाचे उत्तर नको विचारु. परंतु नेचिकेत ऐकेना. पण यमाला आनंद झाला. नेचिकेताची जिद्द आणि उत्सुकता पाहून यम म्हणाला, मानव हे आंधळे आहेत. त्यांना भौतिक सुख हेच खरे वाटते. ते कधीच पुर्ण होऊ शकत नाही. आणि त्यांना नष्ट ही करु शकत नाहीत. म्हणून पुन्हा पुन्हा यात अडकून जन्म घेतात.

खरे तर या जगात आत्मा अमर आहे. हे कसे साध्य करता येते? आत्म्याचे वर्णन यमाने नचिकेताला सांगितले. ते ऐकूण नचिकेताला समाधान वाटले. आणि तो निघून गेला. ही कथा कठोपनिषदातून घेतली आहे.

- आपल्या मृत्यूनंतर काय होते? याची वर्गात चर्चा करा?

**अविनाशी काय आहे?**

पूर्वीच्या काळी अनेक लोक जंगलांमध्ये राहत होते. विविध विषयांवर सखोल चर्चा होत असे. एकमेकांच्या अनुभवांचा फायदा होत असे. आश्रमात राहून ध्यानधारणा करणाऱ्या लोकांना ऋषी, मुनी म्हणत असत. ऋषी आणि राजा यांच्यातील अनेक संभाषणे, चर्चा, मत यांचे संकलन उपनिषद या ग्रंथात संकलित करण्यात आले आहे. तत्कालीन ऋषी समुदायात याज्ञवल्क्य, उद्धालक, अरुणी हे अतिशय प्रसिद्ध ऋषी होते. हे ऋषी अविनाशी, अमर आणि दु:खविरहित जीवनाविषयी चर्चा करीत, शोध घेत. त्यांच्या मते, आत्मा हा अविनाशी आहे. त्यालाच ब्राम्हण असे नाव देण्यात आले. आत्मा किंवा ब्राम्हण याची माहिती मिळाली तर माणूस अमर होईल असे त्यांना वाटत असे. आत्म्याविषयी समजून घेण्यासाठी तपश्चर्या आवश्यक असल्याचे त्यांचे मत होते.

- आत्मा - तपस्या याविषयी तुम्हास काही माहिती असल्यास त्यावर चर्चा करा.

**भिक्षू**

सत्याचा शोध घेत एकाच ठिकाणी न राहणाऱ्या लोकांना भिक्षू असे म्हणतात. यांना घर नसते. प्रापंचिक जीवनाचा त्याग केलेले लोक एकाच ठिकाणी कधीच राहत नसतात. एका अरण्यातून

SCERT TELANGANA

दुसऱ्या अरण्यात फिरत सत्याचा शोध घेत असतात. या लोकांना भिक्षू म्हणतात. 'भिक्षू' या शब्दाचा अर्थ 'फिरणारे' असा होतो. अशाच प्रकारच्या भिक्षूंपैकी वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध महान होते.

**जन्म मृत्यूच्या चक्रातून मुक्ती कशी मिळणार (वर्धमान महावीर)**

वर्धमान महावीरांचा जन्म एका राजघराण्यात झाला. वयाच्या तिसाव्या वर्षी घराचा त्याग करून ते भिक्षू बनले. जन्म आणि मृत्यू या बंधनातून बाहेर कसे पडावे या प्रश्नाचा शोध त्यांनी घेतला. अनेक वर्ष ध्यानधारणा, तपस्या केल्यानंतर महावीरांना त्याचा शोध लागला. महावीरांच्या मते, इतरांच्या दु:खाचे कारण झाले तर आपल्या पापात वाढ होते म्हणून लहान प्राण्याला देखील दु:ख होईल असे कोणतेही काम करू नये. कठोर साधनेच्या सहाय्याने मन आणि शरीरावर नियंत्रण ठेवल्यास दु:खाचे समूळ उच्चाटन होते. अशी शिकवण महावीरांनी दिली. कठोर नीतिनियमाने शरीर आणि मन पापमुक्त होते. असे महावीरांचे म्हणणे आहे. त्यांच्या शिकवणीचा तत्कालीन समाजात विस्तृतपणे प्रचार झाला. त्यांनी देशभर पर्यटन करून प्रवचने दिली. त्यांच्या प्रवचनांमुळे जैन धर्माची भरभराट झाली.

**संपूर्ण जग का दु:खात आहे? दु:खावर विजय कसा मिळवायचा? (गौतम बुद्ध)**

महावीरांप्रमाणे गौतम बुद्धांचा जन्मदेखील राज परिवारात झाला. कमी वयातच गौतम बुद्धांना दु:खाची जाणीव झाली. दु:ख दूर कसे करावे या प्रश्नाभोवतीच गौतम बुद्धांचे विचार सतत फिरत होते. भिक्षू बनून अनेक गावे फिरत फिरत तपश्चर्या आणि ध्यान करत करत शेवटी त्यांना एके दिवशी त्यांना त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले. 'सर्व दु:खाचे कारण इच्छा हे आहे. मानवाने इच्छेला काबूत ठेवल्यास आपोआप दु:खापासून मुक्ती मिळते. इच्छांचे दमन करण्यासाठी नीतिनियमाने जीवन जगणे आवश्यक आहे. कुणालाही दु:ख देऊ नये, कुणाचेही नुकसान करू नये असे गौतम बुद्धांनी प्रवचनात सांगितले.' बुद्धांची ही शिकवण कालांतराने बौद्ध धर्म म्हणून उदयास आली. गौतम बुद्धांनी दिलेल्या अनेक प्रवचनांचे संकलन त्यांच्या शिष्यांनी केले. त्यांना 'पीटिका' असे म्हणतात. 'विनय', 'सूक्त ', आणि 'अभिधाम' हे तीन प्रमुख ग्रंथ होत. यालाच 'त्रिपिटिका' असेही म्हणतात. बौद्ध धर्माचे अनुयायी त्रिपिटिकांना पवित्र ग्रंथ मानतात. गौतम बुद्धांनी जीवनासाठी मध्य मार्ग सांगितला. बौद्ध धर्म हा जास्त कठीणही नाही आणि जास्त सोपाही नाही म्हणून या धर्माची मध्ययुगीन कालात भरभराट झाली. यालाच बुद्धाचा महान मध्यमार्ग असे म्हणतात. त्यांच्या या शिकवणीलाच बौद्ध धर्म म्हणतात.



*चित्र 17.12 सारनाथ येथील बुद्धांचे शिल्प*

SCERT TELANGANA

1. नचिकेताला पडलेला प्रश्न कोणता?

2. ऋषींनी कशाची इच्छा बाळगली?

3. इतर प्राण्यांना दु:ख देऊ नये असे कोणी सांगितले?

4. दु:ख दूर करण्यासाठी बुद्धांनी कोणता मार्ग सांगितला?

5. अनेक साधू नेहमी फिरत असतात ते कशाची अपेक्षा करतात?

## महत्त्वाचे शब्द

| | | |
|---|---|---|
| राजघराणे | मंत्र | त्रिपिटिका |
| राखेचे भांडे | यज्ञ | गण |
| देवीपूजा | महासमाधी | मध्यमार्ग |
| मृण्मयपात्र | भिक्खू | त्याग |

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. खालील तक्त्यात योग्य ती माहिती भरा. (AS1)

| शिकार, आहार गोळा करणारा समाज | आत्ताचा समाज |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |

2. बौद्ध आणि जैन धर्मातील साम्य लिहा?

**2. खालील प्रश्न चर्चा करून लिहा.**

3. वृक्षांना, सर्पांना आपण धन्यवाद का द्यावेत?

4. आपल्यापैकी काही जणांना प्राण्यांना त्रास द्यायला आवडते यावर तुमचे मत काय? प्राण्यांना त्रास देण्याचा अधिकार मानवाला आहे काय?

5. पुरातन लोक मृतपुर्वजांची पुजा का करीत होते? समाधी स्थळी मोठ मोठ्या शिला का ठेवत असत?

6. भारत देशाच्या नकाशात समाध्यांची जागा ओळखा आणि रंगवा?

7. तुमच्या भागातील विविध धार्मिक आचारणाचे पालन कसे होते?

8. पान क्र. 150 वरील अविनाश काय आहे? हा परिच्छेद वाचुन त्याचे विवेचन करा?

SCERT TELANGANA

**प्रकल्प कार्य:**

- विविध प्रार्थनास्थळांचे चित्र जमा करून त्याचे पुस्तक तयार करा. हे पुस्तक शाळेतील ग्रंथालयात ठेवा.
- तुमच्या भागातील उपलब्ध असलेल्या प्रार्थनास्थळांना भेट द्या. तेथील धर्मगुरूंशी खालील गोष्टींवर चर्चा करा.

अ. लोक इकडे का येतात?

आ. ते प्रार्थना का करतात?

इ. मोक्ष म्हणजे काय?

ई. अशा प्रकारची पुजा मानवाला आवश्यक आहे? कशी

SCERT TELANGANA

पाठ 18

# देवांविषयी प्रेम, भक्ती

या अगोदरच्या पाठात आपण भारतीय उपखंडातील प्राचीन लोकांच्या चालीरीती, विश्वास, परंपरा, कर्मकांडे, आचारविचार याविषयी जाणून घेतले. मौर्योत्तर काळात उपखंडातील लोकांच्या धार्मिक आचरणात प्रचंड बदल झाले. याच वेळी व्यापाऱ्यांनी शिकार आणि शेती यात लक्ष घातले. तर शिकार आणि व्यापार करणाऱ्यांनी अन्य मार्ग शोधला. तत्कालीन बदलांना सामोरे जात  राजे महाराजे यांनीही या लोकांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी, ब्राह्मण जे वेदांच पालन करत घेते. वौध आणि जैन श्रमनास संपूर्ण देशात पसरले आणि या समुदायाची संवाद साधला.

याच काळात ब्राम्हणांनी वेगवेगळ्या ठिकाणी आश्रमांची स्थापना करून यज्ञयागाला सुरुवात केली. यासोबतच धर्म आणि तत्संबंधी चर्चेला प्रोत्साहन दिले तर बौद्धधर्मीय अनुयायांनी अनेक विहारांची आणि स्तूपांची स्थापना करून बौद्ध धर्माचा प्रसार व प्रचार केला. त्याचबरोबर जैनधर्मीयांनीही आपापल्या पद्धतीने आपल्या धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्यास सुरुवात केली. एकाच वेळेस ब्राम्हण आणि श्रामनेर यांनी आपापल्या धर्मातील चांगल्या तत्त्वांची सरमिसळ केली त्यामुळे लोकांना नेमके काय करावे याचा बोध होत नव्हता. तशा परिस्थितीत देवीची पूजा, पशुपूजा, वृक्षपूजा आणि मृत लोकांची पूजा हे वाढले. ब्राम्हणांनी, बौध्द, जैनांनी यांनी हयांनी चित्रकला, शिल्पकला याचा आधार धर्मप्रचारासाठी केला. असे असतानाही पशुपक्षांची बळी देण्याची प्रथा सोडुन दिली कारण या धर्मीयांनी अहिंसेवर भर दिला. यामुळे लोकांमध्ये मिश्र धर्माची आराधना सुरू झाली

- तुमच्या आजूबाजूला मिश्रधर्मीय प्रथा, परंपरा असलेले लोक आढळतात का ? आढळल्यास त्यावर वर्गात चर्चा करा.

**हिंदू धर्म**

हिंदु धर्म आज जगातील एक प्रमुख धर्म आहे. सगळ्यांनी आपआपसात शांततेने मिळुन मिसळुन राहणे आणि निसर्गाच्या सानिध्यात राहण्याच्या तत्वांवर आधारीत आहे. हिंदु लोक या तत्वांवर विश्वास ठेवतात. ''सर्वेजना सुखीनो भवन्त'' ''लोकसंस्था सुखानो भवन्तू'' हिंदु धर्म सर्वांना शांतता आणि एकत्र आणतो. हिंदू धर्म जीवन जगण्याचा मार्ग आहे. यात कडक नियम, आचार संहिता नाहीत. निसर्गाची मूलभूत तत्वे पृथ्वी, आकाश, वायू, पाणी, अग्नी यांना देवा समान माणून पुजा केली जाते. हा धर्म निसर्गाशी अगदी जोडलेला आहे. बरेच हिंदु लोक वेदाचे अधिकार स्वीकारतात. सध्याचा हिंदू धर्म हजारो वर्षापासुन अस्तीत्वात आला आहे. आतापर्यंतच्या अनेक महान संतांनी, विचारवंतांनी

SCERT TELANGANA

या धर्माची शिकवण आणि महत्व सांगितले. 'हिंदू' हा शब्द इ.स 1000 वर्षापुर्वीपासुन अस्तीत्वात आहे आणि त्या अगोदर हिंदुना मुख्यत्वे वेद किंवा वैदिका चे अनुयायी म्हणतात.

हिंदू धर्मातील कांही महत्वाची तत्वे ज्यामध्ये वैदीक यज्ञ, शिव पूजन, विष्णु आणि दुर्गा पुजन मंदिरे बांधणे, त्यागातून मोक्षाकडे इ. इ.स. 500 च्या आधी चांगल्या प्रकारे रुजलेली होती. वेद, उपनिषद, रामायण, महाभारत (भगवत गीता) आणि पुराण हे पवित्र ग्रंथांपैकी आहेत.



*चित्र 18.1 विधिशा (म.प्रद्र) मधील सुमार 400 सी.ई. चे एक शिवलिंग*

**भागवत आणि शैव**

या धर्माचे अनुयायी विष्णू किंवा नारायणाचे पूजक होते. त्यांच्या मते विश्वाची निर्मिती विष्णू किंवा नारायण यांनी केली. तो सर्व शक्तिशाली आणि जाणता देव आहे. त्यांचा विश्वस घेता की विष्णु हे सर्वात उच्च महान देव आहे. सर्वांचे कल्याण करण्याची शक्ती श्रीविष्णूमध्ये आहे. या जगाला वाईट मार्गावरून वाचविण्यासाठी पृथ्वीवर अनेक अवतार घेतले. यामध्ये राम, कृष्ण हे मुख्य अवतार. साधारणत: 2000 वर्षांपूर्वीच हे अवतार आपल्या देशातील विविध भागात प्रचलित आहेत.

आपण जर बौद्ध, जैन आणि उपनिषदांचा अभ्यास केला तर आपल्याला असे आढळून येईल की, सर्वच धर्मांनी फक्त मोक्षाचा मार्ग दाखवलेला आहे. त्यासाठी भगवंताची आराधना अनाआवश्यक आहे. पश्चातापाद्वारे माणूस पवित्र होतो, माणसामध्ये बदल होतात. इच्छांचे दमन होते, ध्यानधारणा तपश्चर्येने माणूस शुद्ध होतो. भागवता प्रमाणे विष्णूची पूजा करणे, भक्तिभावाने आराधना करणे तेव्हाच आपण सर्व संकटातून बाहेर पडू. असे झाले तरच आपणास मोक्ष मिळेल, देवावर विश्वास ठेवणे, यज्ञ करणे, ब्राम्हणांना दान देणे, वेदांची पूजा करणे, त्यातील वाक्य प्रमाण मानणे हे यातील प्रमुख कार्य. अनेक मंदिरांची निर्मिती करून त्यात कृष्णांच्या प्रतिमेची लोकांनी



*Fig. 18.2: An early coin with images of Balarama and Krishna (about 2200 years ago) Balarama holds pestle and plough while Krishna holds a wheel, conch and a sword*

आराधना केली. मध्यप्रदेशातील विदिषा, येथे 2000 वर्षांपूर्वी अशी अनेक मंदिरे निर्माण झाली. त्यातील काही मंदिरांची पुरातत्त्व विभागाने शोधही लावले. याच काळात काही जणांनी भगवान महादेवाची पूजा करण्यास सुरुवात केली. त्यांनी जागोजागी शिवलिंगाची स्थापना करून लहान लहान मंदिरे बांधली. तर काही लोकांनी जे मुळात देवीपूजक होते त्यांनी दुर्गादेवीची मूर्ती उभारून दुर्गापूजेला प्रारंभ केला.

SCERT TELANGANA

विष्णु, शिव आणि दुर्गा या देवतांन सर्वोच्च स्थान देऊन पुजा केली जाते. बौद्ध आणि जैनांनी सुद्धा बुद्ध तिर्थकरांची पुजा केली. (जैन आर्य गुरु) त्यांनी बुद्ध आणि तिर्थकरांच्या सुंदर प्रतिमा तयार करुन त्यांना स्तूप किंवा मंदिरात स्थापन केल्या. त्यालाच चैत्य असे म्हणतात. आणि त्यांची पुजा करु लागले. तेलंगानातील फणीगोरी आणि नेलोकोंडापल्ली या ठिकाणी बांधण्यात आले आहे.

- भागवत, शैव, बौद्ध यात असलेली समानता सांगा.
- देवाल्यात देवांची पूजा केल्याचे तुम्ही पाहिले असेल. पूजा करताना काय काय केलं जातं हे सांगू शकाल का? तुम्हाला माहीत असलेली एखादी पूजापद्धती वर्गात सांगा.

**कथाकार**

घरातील वयोवृद्धांकडून तुम्ही कथा ऐकत असालच. धर्म आणि दैवासंबंधी काही लोक कथा सांगतात. ही कथा सांगताना कठपुतली आणि तत्सम वस्तूंचा वापरही केला जातो

- तुम्ही असे एखादे कथाकथन ऐकले आहे काय? त्याविषयी वर्गात सांगा.
- मंदिरात सांगितले जाणारे प्रवचन ऐकले आहे काय? त्याबद्दल सांगा

कथा ही आवडीने ऐकली जाते. प्राचीन भारतात लोकांना कथा ऐकण्याचे वेड होते त्या काळात कथा ह्या मनोरंजनाचे प्रमुख साधन होते. धार्मिक कथाकार, (हरीकथा) कथा सांगण्यासाठी भटक़त असे. कथा सांगतांना पुराणे, रामायण, महाभारतातील अनेक देवीदेवता, शिव, विष्णू, दुर्गा यासंबंधित अनेक कथा सांगत. या कथा सांगताना मध्ये मध्ये गायनदेखील होत असे तर कधी कधी यात कथांमध्ये बुद्धाचा उल्लेखदेखील होत असे. कथा ऐकण्यासाठी लोक मोठ्या संख्येत जमा होत असे. कथा ऐकण्यासाठी लोक उदा. नागपूजा करणारे लोक सर्पासंबंधीची कथा ऐकवण्याची मागणी करीत. त्यामुळे लोकांच्या मागणीनुसार कथा सांगणारे काही लोक आपोआप तयार झाले. कालांतराने हा त्यांचा व्यवसाय झाला. अशा प्रकारे देव, देवता, पुराणे, धर्मातील विशिष्ट वचने, पूजापद्धती यावर प्रामुख्याने कथा सांगितल्या जात. हळूहळू लिहिण्याची कला अवगत झाल्यानंतर या कथांना लिपीबद्ध करण्यात आले. गौतम बुद्धांशी संबंधित जातक कथा तसेच महादेवाच्या / विष्णुच्या संबंधित कथा पुराणांच्या रूपाने लिपीबद्ध झाल्या. या पुराणात विविध संप्रदाय, परंपरा यांचे मिश्रण होऊन अत्यंत महत्त्वपूर्ण, शक्तिमान असलेल्या देवतांविषयी अनेक कथा सांगितलेल्या आढळतात. एका विशिष्ट देवतेला परमात्मा म्हणतात. समस्या दूर करून मोक्ष देणाऱ्या देवाची पूजा करणे महत्त्वाचे असा संदेश पुराणे देतात.

**ईश्वरभक्ती - भक्ती चळवळ**

इ.स. पूर्व 550 वर्षांपूर्वी तामिळनाडूत सर्वप्रथम भगवंताविषयी एक चळवळ सुरू झाली. या चळवळीत काही जण शिवउपासक तर काही जण विष्णूउपासक होते. यज्ञ, पशुबळी असे आचार

SCERT TELANGANA

त्यांच्यात नव्हते. त्या लोकानी देव न मानणाऱ्या बौद्ध आणि जैन धर्माचा विरोध केला. शिव किंवा विष्णूची पूजा करून मोक्ष मिळतो हा एकच मार्ग उत्तम मार्ग आहे असा संदेश जनमानसात रुढविला गेला. त्यांनी आपल्या समस्या दूर करण्यासाठी, अर्थार्जनासाठी, अधिकारासाठी लोक देवाची प्रार्थना केली नाही तर देवाशी एकरुप होण्यासाठी पुजा केली. कालांतराने जाती, धर्म विरहित भक्त एकत्र येऊन आनंदाने जल्लोषाने नृत्य करीत भक्ती करू लागले. काही जण विविध मंदिरांना भेटी देऊन देवाची स्तुती करू लागले. तेलुगू, तमिळ तर इतर भाषांमध्येही देवांची स्तुतीपदे लिहिली गेली. शेकडो वर्षांपासून या पदांचे गायन आजतागायत चालू आहे. ख्रिस्तपूर्व सन 1100 मध्ये सर्वप्रथम पदे लिपीबद्ध करण्यात आल्याचे सांगण्यात येते. आपल्या राज्यात प्राचीन देवालयात तिरूपती, श्रीकालहस्ती या देवालयांचा समावेश आहे. या देवांच्या भक्तीने प्रभावित झालेले लोक शैव आणि वैष्णव मार्गाकडे वळले.

- शिकार- आहार अन्वेषणाकरिता भटकणारे लोकांच्या धार्मिक श्रध्दे आणि भक्ती मार्गामधील साम्य आणि भेद ओळखा.
- भक्ती चळवळ आणि वेदकालीन धर्म यातील साम्य ओळखा.

**अलवार्स - नयनार्स**

विष्णुभक्तांमध्ये प्रमुख 12 भक्तांना अलवार्स म्हटल्या जाते. 12 भक्तांमध्ये प्रमुख पेरिअलवार्स, आणि नम्मलवार्स, अंदाल ही एकमेव महिला भक्त होती. ती पेरिअलवार्सची कन्या. यातील अनेक जण वैष्णव धर्माचे पूजक आणि प्रसारक होते. या 12 प्रमुख भक्तांनी देशभरात अनेक ठिकाणी विष्णूची देवालये उभारली. विष्णू आणि वैष्णव धर्माविषयी विविध पदांची, भजनांची रचना करून त्याचे गायन केले. नम्मलवार्स भक्तांनी गायिलेली काही गीते येथे देत आहोत. त्यांचा अर्थ समजून घ्या.

**सृष्टी**

*देवा, तूच पिता विष्णू*
*देवा तूच पिता*
*पृथ्वी, जल, अग्नी, आकाश आणि वायु ही*
*तुझीच निर्मिती*
*दिवस-रात्र कारक सूर्य चंद्र*
*पर्वत - समुद्र - पाऊस*
*हे श्रीहरी तुझीच संकल्पना*

वरील पदात नम्मलवार्स देवाकडे दर्शनाची मागणी करतात. त्याला सृष्टीकर्ता, पिता म्हणून पुजण्यात आले आहे. कितीही मोठा असला तरी देव हा पितासमान असतो. पिता जसा पुत्रांशी प्रेमाने वागतो, संकटात मदत करतो त्याप्रमाणेच देवाने आमच्यावर प्रेम करावे असे या पदात सांगितले आहे.

वरील पदात नम्मलवार्स देवाकडे दर्शनाची मागणी करतात. देवाच्या विश्वरूपाची तुलना करून विश्वरुप दाखविण्याची विनंती करतात.

साधारणत: 63 लोकांचा समूह नयनार्ल म्हणून ओळखला जातो. हे सर्व शिवभक्त. या भक्तांमध्ये अनेक जाती, धर्माचे लोक आहेत. यामध्ये कन्नप्पा हा शिकारी भक्त, तर नंदनार्ल हा कनिष्ठ कुलोत्पन्न भक्त होता. अप्पर, आणि मलिक्कावसागर हे लोक वेगवेगळ्या



SCERT TELANGANA

थरातून आले होते. फिरता फिरता या सर्वांनी अनेक पदांची रचना केली. त्या पदातून शिवश्रेष्ठत्वाचा संदेश आहे. यातील एक जोडपे कराईक्कल अय्यर हे स्त्री होते. खाली काही पदे दिली आहेत.

*आम्हाला भय नाही कोण्या राजाचे*
*भय नाही मृत्यूचे*
*भय नाही नरक यातनांचे*
*भय नाही कोणत्याही दबावाचे*
*आम्हाला भय नाही व्याधीचे*
*आम्ही नित्य आनंदी जीव*
*आम्ही नाही कुणाचे दास*
*आम्ही नेहमी आनंदी राहु*
*आम्हाला दु:ख नाही कशाचे*
*(अप्पर)*

वरील पदाद्वारे अप्पर यांनी शिवभक्त कोणत्याही राजाला, मृत्यूला, रोगांना, नरकयातनांनाही भीत नाहीत तर सदा सर्वदा आनंदी असतात असे सांगितले आहे.या पदात अप्परने त्याला अशाश्वत असलेल्या जगातील सुख, सकल संपदा याची किंमत नाही असे सांगून गरिबी, रोगग्रस्त, दलित असे असले तरीही शिवभक्त असेल तर पुरेसे आहे. केवळ एकाच नामस्मरणाने जीवन आनंदी जाते असे म्हटले आहे.

परमशिवा तुज भजितो मी
मला मुक्ती दे
नतमस्तक मी, व्याकूळ मी
बाधीत मी, दु:खीत मी
मी गातो, स्तुती करतो
हिरव्या झाडाच्या खोडात
शिरणाऱ्या खिळ्याप्रमाणे प्रेम तुझे
उत्स्फूर्त वाहणाऱ्या समुद्राप्रमाणे
हृदयाची धडधड, शरीरात कंपन,
जगते मला वेडा म्हटले, हसलो
तरी लाज बाजूला ठेवून तोच
एक दागिना होऊन मी हरवलो
अत्यानंदात न्हाऊन गेलो

**(मानिक्यवाचकर)**

वरील पदात देवाच्या ध्यान करण्याने त्याला प्रचंड आनंदानुभूती झाल्याचे मानिक्यवाचकर यांनी



*चित्र 18.3 चेन्नई मधील सेट थॉमस बेसिलिका चर्च, सन 1523 मध्ये बाधण्यात आले. सेंट थॉमस जे भारतात 2000 वर्षा पुर्वी आले होते, त्यांचे नाव ह्या चर्च देण्यात आले.*

म्हटले आहे. तथापि, इतरांना त्यांचा गंध नसल्याचे ते म्हणतात.

**ख्रिस्ती धर्म (ख्रिश्चन)**

भक्तीने, प्रेमाने एकाच देवाची आराधना केल्याने सर्व समस्येतून मुक्ती मिळून जन्म सफल होतो. एकाच देवावर विश्वास ठेवल्याने अंतिमत: मुक्ती मिळते. असा विश्वास भारतीय उपखंडातील लोकांमध्ये जसा निर्माण झाला तसाच जगातील इतर देशातही अशाच प्रकारचे विचार निर्माण झाले. उत्तर मध्य आशियातील इस्राईल, पॅलेस्टीन या देशामध्ये ख्रिस्ती नावाचा एक नवीन धर्म निर्माण झाला.

ख्रिस्ती धर्माची स्थापना येशू ख्रिस्ताच्या नावाने 2000 वर्षांपूर्वी झाली. सध्याच्या इस्राईलमधील येरुशलेमजवळच्या बेत्लेहेम या गावात येशू ख्रिस्ताचा जन्म झाला. सर्व लोक समान असून सर्वांना एकसमान जीवन जगण्याचा अधिकार असल्याचे येशू ख्रिस्ताने

SCERT TELANGANA

सांगितले एकमेकाशी प्रत्येकाने प्रेमाने वागावे, शांती, प्रेम, करुणा यांनी माणसाचे जीवन समृद्ध असावे असे येशूने सांगितले. जशास तसे या पद्धतीस येशूने विरोध केला. शत्रू जरी असला तरी त्याला प्रेमाने जिंकण्याचे येशूने सांगितले.

येशूने दिलेला संदेश बायबल नावाच्या ग्रंथात समाविष्ट करण्यात आला आहे. बायबल या ग्रंथाला ख्रिस्ती लोक पवित्र ग्रंथ मानतात. येशूने केलेल्या प्रवचनांचा त्यात समावेश केलेला आहे. खाली बायबलमधील काही महत्त्वपूर्ण वचनांचा सारांश दिलेला आहे. ज्याला **सरमन ऑन द मांऊट** असे म्हणतात.



*Fig.18.4:An old illustration of Cheraman Mosque, in Kerala. This is believed to be the first Mosque in India. Describe the architecture. Here to, Islam was spread through the trade relations.*

1. *आत्मविश्वास असलेले लोक परलोकातही सुखी असतात. दु:खी लोकांचे सांत्वन करावे*
2. *सात्त्विक लोकांचा नेहमी विजय होतो.*
3. *नीतिमान लोक नेहमी यशस्वी होतात. त्यांना कशाचीही कमतरता भासत नाही.*
4. *दया दाखवणाऱ्या लोकांना देवाकडून दयेची प्राप्ती होते.*
5. *शुद्ध हृदय असलेले लोक देवाला प्रिय असतात.*
6. *कोणत्याही समस्येबाबत देवावर विश्वास ठेवणारे लोक समस्येचे समाधान मिळवतात.*
7. *हिंसेचा विरोध करावा. सर्व काही देवाला अर्पण करावे.*

*- शेजाऱ्यांवर तथा शत्रूवर प्रेम करण्याचा संदेश येशू ख्रिस्तांनी दिला. ज्यांनी तुम्हाला त्रास दिला, दु:ख दिले त्यांना तुम्ही माफ करा. सर्व जण स्वर्गातल्या देवाची लेकरे आहेत. तो सर्वांचा पालनकर्ता, तारणहार आहे. सत्य हे सत्यच असतं. नेहमी सत्याचा विजय होतो. अशी शिकवण येशू ख्रिस्तांनी दिली.*

येशूला अटक करून क्रूसावर चढवण्यात आले. तत्कालीन राजांना येशूचे म्हणणे आवडले नव्हते.

असा विश्वास आहे की, येशूचे अनुयायी सेंट थॉमस रोमन व्यापाऱ्यासोबत भारतात आले आणि त्यांनी भारतामध्ये ख्रिस्ती धर्माची सुरुवात केली. भारतामध्ये ख्रिस्ती धर्माचा प्रारंभ दक्षिण भारतामध्ये सर्वप्रथम झाला.

- चर्चमधील देवाची प्रार्थना तुम्ही पाहिलीत का? पाहिली असेल तर प्रार्थनेची कृती लिहा?

***इस्लाम धर्म***

भारतातील अप्पर याच्यासह इतरांनी ईश्वर एकच आहे ही भावना सर्व जगात पसरविली. तशाच प्रकारची विचार असलेला आणखी एक धर्म अरेबियात जन्माला आला. त्याची स्थापना महंमद पैगंबरांनी केली. त्याचेच नाव इस्लाम धर्म. सन 570 मध्ये अरेबियातील मक्का मध्ये महंमद पैगंबरांचा जन्म झाला. सर्व मानव ईश्वराची लेकरे. ईश्वराच्या दृष्टीत सर्व जण समान. आई-वडिलांच्या दृष्टीत जशी सर्व लेकरे समान असतात तशीच सर्व माणसे ईश्वराला प्रिय असतात. ईश्वराला कोणताही भेदभाव नाही. त्याला कोणताही आकार नाही. ईश्वर किंवा अल्लाह हा एकच आहे. म्हणून इस्लाम धर्मात मूर्तिपूजेला विरोध आहे. केवळ प्रार्थना केली जाते.

पैगंबरांना अल्लाहचा दूत मानल्या जाते. त्यांची शिकवण ''कुराण'' या पुस्तकात समाविष्ट आहे. इस्लाम-धर्मीयांमध्ये कुराणाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. कुराणामधील काही पद वाचा.

SCERT TELANGANA

**अल फातीहा**

**अल्लाह एकटाच स्तुतीयोग्य आहे. तो सकल जगाचा स्वामी आहे. अनंत करुणेचा धनी आहे. अपार कृपाशील आहे. आम्ही तुझेच स्मरण करतो. सहाय्यासाठी पुकारतो. आम्हाला सन्मार्ग दाखविलास. आमच्यावर कृपा करणारा तुझ्या कोपाला बळी न पडणाऱ्या मार्गावर आम्हाला चालण्याची बुद्धी दे.**

अरब व्यापारी जे भारतीय बंदराला भेट देत होते त्यांनी भारतात इस्लाम धर्माला आणले. अरब आणि तुर्की चे विजेते जे इस्लाम मध्ये परिवर्तीत झाले होते त्याच्या बरोबर पण आला. इस्लाम चे विद्वान आणि साधु संत व्यापारी आणि राजांबरोबर आले आणि भारताच्या विविध प्रांतात स्थायिक झाले. त्यानी एकेश्वरवाद चा प्रचार केला आणि एकट्यानें एक सर्वोच्च देवांची उपासना आणि त्या अगोदर सगळ्या मानवाची समानता यावर जोर दिला.

- मशिदीतील प्रार्थनापद्धती तुम्ही पाहिली आहे काय ? प्रार्थना पध्दतीचे वर्णन करा ?

***सवौच्च देवात विश्वास***

हिंदू, मुस्लीम आणि ख्रिस्ती धर्मातील समान तत्त्व काय तर ईश्वर एकच आहे सर्व जण त्याच्यावर विश्वास ठेवतात, पुजतात, आराधना करतात सर्वजण ईश्वराची आराधना करताना धन, शिक्षण, पद हे विसरून आराधनेत सहभागी होतात, नतमस्तक होतात. समानता, प्रेम याच्यावर विश्वास ठेवतात. अल्पकाळात असे विचार सामान्य प्रजेपर्यंत पोहोचविण्यात तत्कालीन प्रचारक सफल झाले. त्यांच्या शिकवणीला तत्कालीन राजे महाराजे यांनीही पाठिंबा दिला. यामुळे ही धर्मे झपाट्याने लोकांच्या आवडीस पात्र ठरली. त्यामुळेच सर्वसामान्यांच्या सुविधेसाठी आणि देवळे, चर्च आणि मशिदी निर्माण झाल्या.

अनेक इतिहासकारांनी याबाबत जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मधल्या काळात उपरोक्त विचारसरणी मोठ्या प्रमाणात रुजली, लोकप्रिय झाली. अनेक राजे आणि राज्य मोठ्या राज्यात विलीन झाली. त्यामुळे एखाद्या गटाचा, एखाद्या जातीचा, एखाद्या विशिष्ट जमातीचा वेगळा देव राहिला नाही. सर्वांनी एका समान, सर्वशक्तिमान शक्तीच्या आराधनेकडे लक्ष वळविले. राजपरिवारांनीही या संकल्पनांना मान्यता दिली. त्यामुळे या धर्मांना पाठिंबा मिळाला.

तत्कालीन समाजात गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी दिवसेंदिवस वाढत गेली. बलवान अधिक शक्तिशाली बनले. तर बलहिन अधिक दुर्बल बनले. यामुळे समाजातील एक मोठा वर्ग निराश झाला. जर सर्व जण देवाची लेकरे असून ती देवाला सारखीच प्रिय असतील तर हा भेदभाव का? असा एक विचार जनसामान्यांमध्ये रुजला. त्यामुळे कदाचित लोक मोठ्या प्रमाणात या धर्मांकडे आकर्षित झाले असावेत असे इतिहासकार मानतात. याच वेळेस समाजातील दुसरा एक मोठा वर्ग मात्र या नवीन संकल्पनेपासून दूर होता. त्यांनी आपली परंपरा सोडली नाही. ती आचारपद्धतीही बदलली नाही. एवढेच नव्हे तर सर्वशक्तिमान ईश्वराची संकल्पनाच अमान्य केली.

SCERT TELANGANA

**महत्त्वाचे शब्द**

मुक्ती अवतार जातक कथा शिल्प

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. बौद्ध भिक्षू आणि प्राचीन शिकारी यांच्यातील कल्पनिक आणि समानता संभाषण तयार करा.
2. प्राचीन आणि वैदिक धर्मातील कोणता फरक आणि समानता तुम्हाला दिसतो.
3. बौद्ध आणि जैन धर्म तथा भागवत व शैव धर्म यांच्या आचारातील फरक स्पष्ट करा.
4. अनेक आचार विचारांना एकत्र आणण्याचे काम पुराणांनी केले चर्चा करा?
5. तामिळनाडूतील भक्तीचळवळ आणि प्राचीन भक्त चळवळ यातील भेद स्पष्ट करा.
6. पैगंबरांनी सर्व मानव समान असल्याचे कसे स्पष्ट केले?
7. पान क्र.161 वरील ''इश्वर एकच आहे'', हा परिच्छेद वाचुन त्याचे विवेचन करा?
8. सध्याच्या काळात तुमच्या भागात घडलेला एका धार्मिक कार्यक्रम विषयी माहिती सांगा?
9. जगाच्या नकाशात खालील स्थळे दाखवा.

अ) जेरुसलेम ब) मक्का क) केरळ राज्य ड) चेन्नई क) अमरावती

SCERT TELANGANA

पाठ

# 19 भाषा, लिपी आणि महान ग्रंथ

दीपिका गावी जाण्यासाठी नेल्लोरच्या रेल्वे स्टेशनला आली. रेल्वेविषयीची उद्घोषणा अनेक भाषेत होत असल्याचे पाहून तिला आश्चर्य वाटले. तसेच नेल्लोर हे नाव अनेक भाषेत लिहिलेले पाहून ती चक्रावून गेली. इतक्या वेगवेगळ्या भाषांची खरेच गरज आहे का? असा एक विचार तिच्या मनात डोकावला.




*चित्र 19.1शादनगर स्टेशनवरील फलक*

भाषा म्हणजे काय?

कुत्र्याचे भुंकणे, पक्ष्यांचे आरवणे हे तुम्ही पाहिले असेलच. या संपूर्ण पृथ्वीतलावर भाषेचा वापर फक्त आपण माणसेच करतो. कोणताही पक्षी आणि प्राणी करू शकणार नाही इतके ध्वनी माणूस आपल्या तोंडावाटे करू शकतो. हे अनेक ध्वनी आपणास बोलण्यास तथा भाषाभिवृद्धीस कारक होतात.

- पक्षी आणि प्राणी यांच्या आवाजाचे अनुकरण करा. पाऊस पडताना होणाऱ्या ध्वनीचे अनुकरण करा. कार, ट्रक यांच्या आवाजाचे अनुकरण करा. अशा प्रकारे आपण किती प्रकारच्या ध्वनींचे अनुकरण करू शकतो त्याचा शोध घ्या.

भाषा ही मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग बनली आहे. भाषेशिवाय मानवी जीवन ही कल्पनाच करवत नाही. एकमेकाला समजून घेण्यासाठी भाषा हेच प्रभावी माध्यम होय. एकमेकांशी बोलणे, परस्पर सहकार्य, भावनांचे आदान-प्रदान हे सारे भाषेच्या द्वारेच होते. आपली सर्व कामे आपण भाषेद्वारेच करतो.

1. आपली सर्व कामे शिस्तीने करण्यासाठी आणि कामाविषयी बोलण्यासाठी भाषा उपयोगी पडते.
2. इतरांचे लक्ष आपल्याकडे वळविण्यासाठी किंवा इतरांकडून काम करवून घेण्यासाठी भाषा उपयोगी पडते. उदा. त्या पक्षाकडे पहा.
   आई, मला ती बाहुली घेऊन देशील का?
   थांब. हलू नको. अशी अनेक वाक्ये आपण बोलतो.
3. नवनिर्मितीसाठी, शोधासाठी, विनोद, संभाषण, गीतगायनासाठी, समूह नियंत्रणासाठी भाषेचा वापर होतो.
4. आपल्या सभोवतालच्या परिसराविषयी जाणून घेताना भाषेची मदत होते. तसेच कल्पनेतील किंवा अस्तित्वात नसलेल्या गोष्टी समजण्यासाठी भाषेची मदत होते. गतकाळातील अनेक कथा, संदर्भ जाणून घेण्यासाठी भाषा उपयुक्त ठरते. भाषेविना एखाद्याचा शोध घेणे शक्य आहे काय?
5. आपल्या मनातल्या भावनांना व्यक्त करण्याचे सर्वोत्तम माध्यम म्हणजे भाषा होय. अनुभव

SCERT TELANGANA

आणि कल्पना भाषेविना अशक्य आहे. उदा. प्राचीन काळातील शिकाऱ्यांनी शिकार अथवा फळांनी बहरलेले एखादे झाड पाहिले परंतु जर भाषा नसली तर ती अभिव्यक्ती बाकीच्या लोकांना ती व्यक्ती कशी करणार? तसेच तुम्हाला एखादी जखम झाली आणि असह्य वेदना होत आहेत अशा वेळी भाषेविना तुम्ही तुमच्या आई-वडिलांना हे कसे सांगणार?

वरील उदाहरणावरून आपणास असे दिसते की, भाषेविना सर्वच निरर्थक आहे. जगाच्या पाठीवर केवळ मनुष्यच असा एकमेव प्राण आहे की जो एकच नव्हे तर अनेक भाषांचा समर्थपणे वापर करू शकतो. अगदी अर्वाचीन काळापासून ते आत्ताच्या प्रगत मानवाकडून निरंतरपणे भाषेचा वापर होत आहे. तसेच भाषेची प्रगतीही होत आहे.

पिढ्यान् पिढ्या वारसत्वाने माहितीची देवाणघेवाण भाषेच्या माध्यमातून होत आहे. गतकाळाचे अनुभव आत्ताच्या पिढीचे अनुभव यांची तुलना भाषेच्या माध्यमातूनच होते. तसेच दूरच्या लोकांशी, आप्तांशी जवळीक, आपुलकी वाढविण्याचे महत्त्वाचे कामही भाषा करते.

## अनेक भाषा कशासाठी?

समाजात राहणाऱ्या लोकांनी भाषेचा विकास केला. तहान भागवणाऱ्या द्रवपदार्थास पाणी म्हणतात. काहींनी त्यालाच जल असे म्हटले, तर काहींनी तन्नी असे म्हटले तर अन्य काही जणांनी वॉटर म्हटले. ही नावे जरी वेगळी असली तरी द्रवपदार्थ मात्र एकच आहे. येथे एक गोष्ट समजून घ्यावीशी वाटते की, नावे आणि उच्चारपद्धती वेगवेगळी आहे. अशाच प्रकारे माणूस गटागटाने जगभरात पसरला गेला. तो तेथील रहिवासी बनला. काळाच्या ओघात एका नवीन भाषेची निर्मिती झाली. उदा. तेलुगू, इंग्रजी, संस्कृत, फारसी, चिनी, स्वाहिली (आफ्रिकन) हिंदी इत्यादी.

एकच भाषा बोलणारे अनेक लोक दूरदूर राहतात. अनेक ठिकाणी जाऊन कायमचे स्थिर पडतात. तेव्हा स्थानिक भाषा आणि स्थलांतरितांची भाषा यामध्ये फरक स्पष्टपणे दिसतो. कालांतराने दोन्ही भाषा काही शब्दांची देवाणघेवाण करतात. यामुळे मूळ भाषा आणि नवीन शब्दांनी समृद्ध झालेली भाषा यामध्ये फरक पडतो. हळूहळू ती भाषा स्वतंत्र म्हणून गणली जाते. अशा बदलामुळेच एके काळी आपल्या देशात प्रचलित असलेल्या संस्कृत भाषेपासून अनेक भाषा निर्माण झाल्याचे आपण म्हणतो. तेलुगू आणि तमिळ या भाषा मूळ द्रविडीयन भाषेपासून निर्माण झाल्या.

मूळ द्रविड भाषेपासून तेलुगू, तमिळ, कन्नड, मल्याळी, गोंडी भाषा निर्माण झाल्याचे भाषातज्ज्ञ सांगतात. भारतातील आणखी एक भाषाकुटुंब म्हणजे 'इंडोआर्यन' भाषा. या भाषेतूनच संस्कृत, हिंदी, मराठी, बंगाली आदी भाषा निर्माण झाल्या. उदा. तेलुगू भाषेत, संस्कृत, मराठी, अरबी, फारशी शब्द रुजलेत.

## लिपी आणि रचना

आपण लिपीद्वारे भाषांचे वाचन करतो. लिखाण करतो. सध्याच्या काळात अनेक प्रकारच्या लिपी प्रचलित आहेत. रोमन लिपी (ABCDEF), देवनागरी लिपी (अ, आ, इ, ई), अरेबिक, तेलुगू, तमिळ इत्यादी. वास्तवता कोणतीही भाषा लिपीसह लिहिता येते. उदा. हैद्राबाद हा शब्द रोमन, देवनागरी, तेलुगू, तमिळ, अरेबिक भाषांमध्ये लिहिता येतो.

SCERT TELANGANA

तरी सुद्धा आपण नवीन लिपी तयार करु शकतो. तुम्हीला गुप्तपणे स्वतःची लिपी तयार करता येते का? प्रयत्न करा. मजा वाटले. आज आपण जी लिपी वापरतो, ती मानवाने हजारो वर्षापुर्वी तयार केली.

सुरुवातीला ते चित्र काढत, शेळी पळत आहे हे सांगण्यासाठी ते चित्र काढून दाखवत. हळूहळू लिपीतून दाखवण्यास सुरुवात झाली. जवळ जवळ 4000 वर्षापुर्वी सिंधू खोऱ्यातील लोकांनी लिपीचा वापर केला. परंतु ती वाचता येत नाही.


| | |
|---|---|
| मेरा नाम रघु | Hindi |
| నా పేరు రఘు | Telugu |
| ראַגהו זיא נאָמען \|ויים | Yiddish |
| میرا نام رگھو | Urdu |
| jina langu ni raghu | Swahili |
| Mi Nombre es Raghu ...... | Spanish |

*चित्र 19.2 विविध भाषा, लिपी*



*चित्र 19.3 सिंधू लिपी*

आता भारतात वापरत असलेल्या अनेक लिपीच्या मुळाशी सम्राट अशोकाने वापरलेले ब्राम्ही लिपी म्हणून सांगता येते. (देवनागरी, तेलुगू, तमिळ आदी भाषा याच लिपीतून निर्माण झाल्या) प्राचीन शिलालेखांपैकी एक आंध्र प्रदेशातील कृष्णा जिल्ह्यात भट्टीप्रौलु येथे आहे. ख्रिस्तपूर्व 200 वर्षांपूर्वीचा हा शिलालेख असल्याचे मानले जाते.



*चित्र 19.4 भट्टीप्रौलु येथील शिलालेख*

एका कार्डबोर्डवर तुमचे नाव लिहून त्याचे भाषांतर विविध लिपीत करा आणि ते वर्गखोलीत लावा.

- तेलुगू भाषेतील कोणतेही तीन शब्द निवडून इतर भारतीय भाषेतील समानार्थी शब्द लिहून वर्गात प्रदर्शित करा.
  उदा. तेलुगू - आम्मा, तमिळ - ताई, इंग्रजी - मदर, संस्कृत - मातृ, पर्शियन - मदर, मराठी - आई, हिंदी - माँ
- खालीलपैकी कोणाला कोणत्या प्रकारे लिपीची गरज जास्त भासते त्याविषयी चर्चा करा. राजे, महाराजे, व्यापारी, शेतकरी, जमीनदार, ब्राम्हण पुरोहित, महिला जमीनदार, बौद्ध गुरू, कवी, हस्तकला व्यापारी, महिला, मजूर, सैनिक.

SCERT TELANGANA

## लिपी लिहिण्यासाठी काय वापरत?

अर्वाचीन काळी सर्वप्रथम जेव्हा लिपींचा शोध लागला तेव्हा दगडांवर आणि मोठमोठ्या भिंतींवर लिपी लिपीबद्ध केली जायची. कालांतराने झाडांची पाने, झाडांच्या साली यावर लेखन करू जाऊ लागले. परंतु या वस्तूंचे आयुष्यमान अतिशय कमी होते. त्यामुळेच दीर्घकाळासाठी लिखाण टिकवून ठेवण्यासाठी दगडाचा वापर आणि धातूंचा वापर करण्यात आला. गेल्या 4000 वर्षांपासून मानव लिपींचा वापर करीत असल्याचे इतिहासकार मानतात.

सम्राट अशोकाच्या काळातील लिपीबद्ध केलेले अनेक शिलालेख आजही चांगल्या अवस्थेत पाहायला मिळतात. दक्षिण भारतात अद्याप अनेक ठिकाणी वनस्पतींच्या पानांवर लिखाणाची पद्धत वापरल्याचे दाखविले आहे. तर उत्तर भारतात हिमालयातील भूर्जपत्र नावाच्या वनस्पतीच्या पानांचा कागदाप्रमाणे उपयोग केला जायचा.

## पद्य - गद्य - कथा

तुम्ही तुमच्या आई-वडिलांकडून अनेक पद्य, गाणी तसेच कथा, म्हणी, वर्णन ऐकले असेल. तुमचे आई वडील त्याच गोष्टी त्यांच्या आई-वडिलांकडून ऐकलेले असतील. वास्तविक पाहता, ह्या कथा, कविता पिढ्यान् पिढ्या कोणत्याही लिपीशिवाय चालत आलेले होत. या सर्व कथा, कविता, गीत आजही लिपीबद्ध नाही. तरीही पिढ्यान् पिढ्या जतन करून पुढच्या पिढीला देत आहोत. आई वडील आपल्या मुलांना ज्ञान देतात. तेच ज्ञान पुढच्या पिढीला थोडीशी भर टाकून दिलं जातं. अशा प्रकारे रामायण, महाभारतासारखे महाकाव्य निर्माण झाले.

- तुमच्या कुटुंबातील ज्येष्ठ लोकांकडून तीन कथा, तीन गाणी आणि तीन म्हणी यांचे संकलन करा.
- स्वत:च्या कल्पनेने लहान लहान कथा लिहून त्याचे हस्तलिखित तयार करा.

## वेद

जगातील सर्वात प्राचीन साहित्य म्हणून वेदांकडे पाहिले जाते. मुळात वेद हे मौखिक रूपात पिढ्यान् पिढ्या चालत आले. ऋषी आश्रमातील शिष्यांना मौखिक पद्धतीनेच वेद शिकवीत असत. शिष्य एकही सूक्त न विसरता वेदाचे जतन करी. नंतर पुढच्या पिढीला हेच वेद परंपरेने शिकविले जाई. या विश्वाची निर्मिती कशी झाली याबाबत ऋग्वेदामध्ये माहिती देण्यात आलेली आहे.

या विश्वाची निर्मिती कशी झाली हे कुणीही निश्चितपणे सांगू शकत नाही. सृष्टीचा आविर्भाव कशातून झाला याचीही माहिती नाही. देवांनी विश्वाची निर्मिती केली असे म्हणतात. कशातून विश्व निर्माण झाले हे कुणाला माहीत आहे? ही सृष्टी कुठून आली? कदाचित भगवंतांनी ही सृष्टी निर्माण केली नसेल या जगाचा नियंता स्वर्गात आहे का? ही गोष्ट एकालाच माहीत असेल ज्याने ही सृष्टी निर्माण केली असेल.

(नसदीय सूत्तं - ऋग्वेद)

- या जगाची निर्मिती कशी झाली? याबाबतची माहिती अतिशय मनोरंजक आहे. वरील मंत्राद्वारा सृष्टीच्या अगोदर काय होते याची कल्पना करा.
- ही सृष्टी कशी निर्माण झाली? कोणी निर्माण केली? याविषयी चार ओळी लिहा.

### *दोन महान महाकाव्य*

### *रामायण - महाभारत*

भारतीय इतिहासात रामायण आणि महाभारत ही महान महाकाव्य म्हणून गणली जातात. दुष्टांवर सुष्टांनी मिळविलेला विजय म्हणजेच महाकाव्य अशी महाकाव्याची थोडक्यात व्याख्या करता येते. प्रत्येक देशाला त्या त्या देशाचा स्वत:चा इतिहास असतो. भारत देशालाही दोन मुख्य इतिहास आहेत. त्यातून तत्कालीन समाजाबद्दलची माहिती मिळते. त्यापैकी

SCERT TELANGANA

एक रामायण आणि दुसरे महाभारत होय. रामायणात राम, सीता, रावण आदी माहिती आहेत. रामायण मुख्यत्वे राम-रावण युद्धाविषयी प्रसिद्ध आहे. तथापि, त्याच्या मुळाशी राम, सीता हेही तितकेच महत्त्वाचे. रावणाने सीतेला लंकेला पळवून नेले त्यामुळे रामाने लंकेवर स्वारी करून रावणाचा वध केला. रामायणाला संस्कृतमध्ये आदीकाव्य म्हणतात.

वाल्मिकी महर्षींनी रामायणाची रचना केली. रामायण सुरुवातीला भागवतधर्माच्या आचरकाकडून सांगण्यात येत होते. कालानुक्रमे रामायणाचे लिपीबद्धीकरण करण्यात आले.

महाभारत ही भावाभावांची कथा. कौरव आणि पांडव हे ते दोन भाऊ. राज्य मिळविण्यासाठी दोघांनी आपापसात युद्ध केले. शेवटी महाभारताच्या युद्धात कौरवांचा पराभव तर पांडवांचा विजय झाला. अर्थात, पांडवांना भगवान श्रीकृष्णाचे सहाय्य होते. जगातील सर्वात जास्त ओव्या असलेले हे एकमेव महाकाव्य होय. महाभारतात कौरव-पांडवांची कथा प्रधान असली तरी हे महाकाव्य इतर अनेक लहान लहान कथांचा संग्रहच होय.

**जातक कथा**

तुम्ही मागील पाठामध्ये गौतम बुध्दा विषयी वाचन केले आहे ना, गौतम बुध्दाने धर्माचे प्रचार करण्यासाठी अनेक जन्म घेतला असे म्हटल्या जाते. या जन्माविषयी अनेक कथा सांगण्यात आल्या आहेत. त्यालाच जातक कथा असे म्हणतात. हे पाठकांना आनंद देत असतात. अशा कथा तुम्हाला वाचविण्यासाठी आनंद वाटतो. सन 1600-1800 यांचा संकलन केले असावे असे गृहीत धरण्यात येते.

***किसोगौतमी कथा***

गौतम बुद्धांच्या जीवनाशी संबंधित किसोगौतमी कथा.

एके दिवशी किसोगौतमी नावाची एक महिला आपल्या मृत पुत्राच्या मृतदेहासह रस्त्याने विलाप करीत जात होती. 'माझ्या पुत्राला कुणीतरी जीवदान द्या.' असे ती टाहो फोडून रस्त्याने ये-जा करणाऱ्या प्रत्येकाला विनवणी करीत होती. तिचे दुःख पाहून काही जणांनी तिला बुद्धाकडे नेले. बुद्धांनी तिला मुलाला वाचविण्याची हमी दिली. परंतु तिने मूठभर मोहऱ्या घेऊन याव्या अशी अट घातली. ती आनंदाने तयार झाली. तेव्हा बुद्ध म्हणाले, ''ज्यांच्या घरी एकही मृत्यू झाला नाही अशांचाच घरून तू मूठभर मोहऱ्या घेऊन ये.'' किसोगौतमी नगरातील घरोघर फिरली पण तिला एकही घर मृत्यूविना मिळाले नाही. प्रत्येकाच्या घरी कुणी ना कुणी मेल्याचे तिला सांगण्यात आले. कुणाचे वडील, तर कुणाची आई, बहीण, भाऊ, पती, पत्नी, मुले, मामा, मामी, आजी, आजोबा असे लोक मृत्यू पावल्याचे सांगण्यात आले. ती निराश होऊन बुद्धाकडे परतली.

***तामीळ, संगम वाङ्मय***

दक्षिण भारतात तामीळ भाषा बोलणारी लोकसंख्या सगळ्यात जास्त आहे. अनेक वर्षांपूर्वी दक्षिण भारतात शेकडो लोकांनी तयार केलेल्या कथा कवितांचा संग्रह करून एक पुस्तक तयार करण्यात आले. त्यालाच संगमवाङ्मय म्हणतात. या ग्रंथाचा लेखक एक नसून अनेक आहेत. म्हणून त्याचे नाव संगम ठेवण्यात आले. यातील बहुतांश कविता या वीरांना उद्देशून लिहिलेल्या आहेत. बहुतांश कथांमध्येही शूरवीर आणि त्यांच्या युद्धांविषयीची माहिती तसेच काही शूरवीरांच्या प्रेमकथांचाही समावेश आहे. यासोबतच निसर्ग वर्णन या ग्रंथामध्ये करण्यात आले आहे.

- या ग्रंथातील एक पद पाहा -

''तुझे राज्य हत्तींनी भरलेले आहे. हत्तीसारख्या विशाल राज्याचा तू स्वामी आहेस. वाढत्या मुला-मुलींना आई वडील जसे सांभाळतात तसेच तू राज्यातील प्रजेला सांभाळ.''

SCERT TELANGANA

उपरोक्त ओळींचा अर्थ - 'भरलेले आहे' म्हणजेच हत्ती जसा बलवान प्राणी तसा त्या देशाचा राजा पर्यायाने देश बलवान होता असे सुचवायचे आहे.

***वैद्य, शास्त्र आणि तत्सम ग्रंथ***

मानवी आरोग्याविषयी अनादी कालापासून ऋषी मुनी अत्यंत जागरूक होते. मुळात निरोगी राहण्यावरच तत्कालीन समाजाचा भर होता. तथापि, एखादे वेळेस अनारोग्य आल्यास त्याची कारणे शोधली जायची. युद्धामध्ये झालेल्या जखमा लवकरात लवकर भरण्यासाठी विशिष्ट प्रकारची औषधे वापरली जायची. यासाठी तत्कालीन वैद्य पूर्णतः वृक्षांवर आधारीत होते. विशिष्ट झाडांच्या पान, फूल, बीज, मूळ यापासून निरनिराळी औषधे तयार केली जायची. ही औषधे अत्यंत गुणकारी सिद्ध झाली आहेत. सुश्रुत ऋषीप्रमाणेच चरक ऋषींनीही वैद्यकीय क्षेत्रात सखोल संशोधून करून चरकसंहिता नावाचा ग्रंथ तयार केला. आजच्या आयुर्वेदिक उपचारातले बरेचशे उपचार उभय ऋषींच्या संहितांवर आधारीत आहेत. औषधांच्या तयार करण्याच्या पद्धती, वापरण्याच्या पद्धती याविषयीची सखोल माहिती कालांतराने एका पुस्तकात संकलित करण्यात आली. हेच पुस्तक पुढे यजुर्वेद नावाने प्रसिद्धी पावले. अन्य सुश्रुत नावाच्या ऋषीनेही वैद्यकीय क्षेत्रात मोलाचे संशोधन करून स्वतःची सुश्रुतसंहिता नामक ग्रंथ तयार केला. या दोन्ही ग्रंथामध्ये मानवी आरोगय आणि आरोग्यरक्षक औषधांची विस्तृत प्रमाणात माहिती देण्यात आली. तसेच शल्यक्रियेविषयी माहिती देण्यात आली आहे.

- तुमच्या परसबागेत किंवा परिसरात असणाऱ्या औषधी वनस्पतींची माहिती गोळा करा. तसेच तिचे उपयोगही सांगा.
- उत्तम आरोग्यासाठी आवश्यक असलेल्या चांगल्या सवयी माहिती करून घ्या. त्यांचे संकलन करून त्यावर चर्चा करा.

## खगोल, गणित शास्त्रांवरील पुस्तके

आपले पूर्वज सूर्य, चंद्र, नक्षत्र आणि ग्रह यांचे निरीक्षण करून दररोज त्यांच्यातील होणारे बदल टिकवून ठेवीत. चंद्र, सूर्य यांच्या गती, नक्षत्रांच्या गतींचा अभ्यास करून त्यावर संशोधन आणि अभ्यासात्मक ग्रंथांची निर्मिती केली. कोणत्याही प्रकारची अत्याधुनिक साहित्य नसताना कितीतरी वर्षांपूर्वी ग्रहांचे, ताऱ्यांचे चलन वलन याविषयीच्या अत्यंत सूक्ष्म नोंदी पूर्वजांनी नोंदवून ठेवल्या. आज हजारो वर्षानंतरही त्याच नोंद प्रमाण मानण्यात येत आहेत, यावरून खगोल आणि गणितशास्त्रातील आपल्या पूर्वजांची प्रगती किती दर्जेदार होती याविषयीची माहिती मिळते. सूर्य सकाळी उगवतो आणि रात्री मावळतो. तर चंद्र महिन्याला एकदा कमी कमी होत जाऊन पुन्हा पूर्ण स्थितीत येतो. सूर्य आणि चंद्र यांचे स्थान बदलते तर नक्षत्र स्थिर राहतात. सूर्य आणि चंद्रामध्ये विश्वाची अनेक रहस्य लपून आहेत, विश्वाच्या निर्मितीविषयीची अनेक रहस्य सूर्य, चंद्र, तारे यात तिन्हीच्या अभ्यासावरून कळते असे पूर्वजांचे ठाम मत होते. ख्यातनाम खगोल शास्त्रज्ञ आर्यभट्ट यांनी आपल्या आर्यभट्टीय या ग्रंथात मोलाची माहिती दिली. आर्यभट्टांनी सर्वप्रथम पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे ठामपणे सांगितले. तथापि तत्कालीन प्रजेने त्याचा विरोध केला. आर्यभट्टांच्या सिद्धांतावर आजचं प्रगत गणितशास्त्र आधारीत आहे. त्यांनी गणितामध्ये केलेले संशोधन अत्यंत मोलाचे आहे. दशांश पद्धती, स्थानाच्या किंमती, यासह सध्याच्या गणितात वापरत असलेले अनेक चिन्ह त्यांनी निर्माण केले. पूर्वी रोमन चिन्हांचा वापर होई. 102 या संख्येसाठी CII किंवा 120 यासंख्येसाठी CXXVII (C = 100, X = 10, V = 5, I = 1) ते शून्याचा वापर करीत नसत. बेरीज विचित्रपद्धतीने करीत असत.

दशांश पद्धती, संख्येच्या स्थान किमती या 102, 107 अशा पद्धतीने आता लिहिल्या जातात. जगभर हीच पद्धत रूढ झाली. आर्यभट्टांनी जगाला दिलेली ही देणगी.

SCERT TELANGANA

महत्त्वाचे शब्द : भाषा, इतिहासाची रचना, संगम वाङ्मय, दशांश पद्धती, आयुर्वेद

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. भाषेचे महत्त्व सांगा.
2. आर्य भट्टांनी खगोलशास्त्राला काय देणगी दिली.
3. चरकसंहिता, सुश्रुतसंहिता यामधील फरक सांगा.
4. गणितातील काही नवीन शोध सांगा.
5. चलनी नोटेवरील विविध लिपी ओळखा. कोणकोणत्या भाषा वापरल्या ते सांगा.
6. सामान्य ज्ञानाचे कोणतेही पुस्तक वापरुन मराठी भाषेतील चार मुख्य ग्रंथाची नावे तसेच पाच इतर ग्रंथाची नावे लिहा.
7. प्राचिन भारतीय शास्त्रज्ञांनी घेतलेली मेहनत आताच्या शास्त्राज्ञांना संशोधकाला कशी स्फुर्तीदायक ठरली ते सांगा?
8. भारताच्या नकाशात खालील स्थळे दाखवा?

   अ) बिहार ब) तमिलनाडु क) उत्तर प्रदेश ड) महाराष्ट्र ई) पश्चिम बंगाल
9. पान क्र. 167 वरील दोन महाकाव्य हा परिच्छेद वाचुन त्याचे विवेचन करा.

**प्रकल्प**

- ❑ भाषेची निर्मिती, वापर या विषयीचा एक फ्लो चार्ट तयार करा.

SCERT TELANGANA

पाठ 20

# शिल्प, बांधकामे

प्राचीन सिंधू संस्कृतीच्या उत्खननात पुरातत्त्व वास्तू शास्त्रज्ञांना दगडावर कोरलेल्या मुद्रा, भाजलेल्या मातीची शिल्पे, याबरोबरच ब्रांझची आणि इतर धातूंपासूनच्या सुंदर मूर्तीही सापडल्या. त्यापैकी तुम्ही काही येथे पाहू शकता.



*चित्र 20.1 सिंधूकालीन धर्मप्रचारक*



*चित्र 20.3 उभ्या असलेल्या युवतीचे ब्रांझचे शिल्प*



*चित्र 20.2 बैलसदृश्य प्रतिमा असलेले हरप्पा येथील शिल्प*



*चित्र 20.4 टेरा कोटापासून तयार केलेली देवीच मूर्ती.*


SCERT TELANGANA

**हरप्पातील शहरे - द्विपखंडातील पहिले शहर**

6 व्या पाठामध्ये तुम्ही शिकलात की, मानव हा भटक्या जातीचा आणि शिकाऱ्यांप्रमाणे जिवन जगत असे. फक्त 10,000 वर्षापुर्वी आधुनिक सिरीया आणि पॅलेस्टाईनमध्ये लोकांनी शेती करण्यास सुरुवात केली. भारत सारख्या द्विप खंडात ते 7 ते 8000 वर्षा पुर्वीपासुन उत्तर पश्चिम भाग बलुचिस्तानात शेतीची सुरवात झाली. वेगवेगळ्या प्रांतात राहणारे लोक शेती व शिकार करत हळुहळु लोक अन्न गोळा करु लागले. परंतु सर्वात प्रथम कोणकोणत्या शहरात याची सुरुवात झाली. भारत सारख्या द्विपकल्पात याची सुरुवात 5000 वर्षापुर्वी उत्तर पश्चिम भाग बलुचिस्तान, सिंध, पंजाब आमि गुजरात येथे झाली. उत्खननांतर मोठी शहरे सापडली. आपल्याला ते जरी माहित नसले तरी, त्यांना आपण नविन नावाने ओळखतो. तुम्ही प्रसिद्ध शहरे - मोहोंजोदारो, हरप्पा, काली बंगन आणि लोथाल यासारखी नावे असतील. ही सर्वात प्राचिन शहरे आहेत. उत्तरेकडे अफगानिस्तान ते गुजरात , दक्षिणेकडे पंजाब आणि हरीयाणापर्यत, पुर्वेकडे आणि पश्चिमेकडे बलुचिस्तान. यालाच हरप्पातील संस्कृती हे नाव देण्यात आले आहे. आपल्या इतिहासात यालाच सिंधू खोऱ्यातील संस्कृती म्हणतात. या संस्कतीतील शहरे ही सिंधू नदीच्या खोऱ्यात वसलेली होती.

- या प्रांतातून जाणाऱ्या नद्यांची नावे सांगा? नकाशात ही ठिकाणे सांगुन हैद्राबादपासुन किती दूर आहेत ते सांगा?

- तुम्हाला वाटते का की, तेलंगाना हे हरप्पा संस्कृतीचा एक भाग होता? तेलंगानात राहणाऱ्या लोकांना हरप्पा संस्कृतीबद्दल माहीत आहे का? कशी?
- जर तुम्ही एखाद्या ठिकाणी भेट दिली तर शहर आहे का गाव तुम्ही कसे ओळखता?
- शहर आणि गाव यात कसा फरक करता येतो?
- पुरात्व शास्त्रज्ञांनी ही प्राचीन शहरे गाव कसे कशी शोधून काढली? तुम्ही विचार करु शकता का? किंवा ही उरलेल्या शहरांची वेगळी वैशिष्ट्ये आमि गावांची वैशिष्ट्ये ती इथे नाहीत




SCERT TELANGANA

**शहरे म्हणजे काय?**

शहरे म्हणजे ज्या ठिकाणी मोठ्या संख्येने आपल्या उपजिवीकेसाठी लोक शेतीवर किंवा शिकार गोळा करण्यासाठी अवलंबून राहत नाहीत. शहरात लोक वेगवेगळ्या उद्योगातील जसे - कला, कुंभार, धातूच्या वस्तु बनवणारे, सुतार, गव़ंडी, दगडाच्या वस्तु बनवणारे इ. व्यापारी जे वस्तु बनवतात आणि विकतात. शहराबाहेरील बाजारात वस्तु विकतात. ह्यापैकी बरेच लोक जमिनीची मशागत करीत नाहीत किंवा पिके पिकवत नाहीत. म्हणून अन्न धान्यासाठी शेतकऱ्यांवर किंवा दूध आणि मांस यासाठी शिकाऱ्यांवर अवलंबून राहतात. शहरामध्ये हे धान्य शेतकऱ्यांवर कर लावून साठवून ठेवल्या जाते.

- तुम्हाला असे वाटते का राज्यकर्त्यांची घरे त्यांचे छत एकसारखे आहे का? वेगळे आहे? का?
- तुम्हाला असे वाटते का, शहरात असलेले व्यापारी असेच राहत होते का? विचार करुन सांगा?
- शेतकरी शेतीचे धान्य शहरातील व्यापाऱ्यांना देण्यास तयार झाले का? सांगा?

**शहराची वैशिष्ट्ये**

हरप्पातील शहरे लवकर एकत्रित आली. जवळ जवळ 4600 वर्षापुर्वी आणि 700 वर्षापर्यत भरभराट झाली आणि हळूहळू 3900 वर्षापर्यंत नाहीशी झाली. हरप्पा शहरातील इमारती ह्या चांगल्या लाकडांपासून बनवलेल्या आणि योग्य अशा आकाराच्या होत्या. हे चांगल्या शहराचे वैशिष्ट्य आहे. अनेक महत्वाची शहरे काळजीपुर्वक योजना करुन त्यातील सरळ रस्ते जसे - बुद्धी बळाच्या खेळातील रस्त्यासारखी विकसित केलेली आहेत. रस्त्याच्या बाजूंनी नाल्यांची व्यवस्था तसेच पावसाच्या पाण्याची व्यवस्था केली होती. अनेक शहरे दोन विभागात विभागली. पहिल्या भागात शहरातील महत्वाचे सार्वजनिक इमारती जसे - धान्य कोठारे, मोठ्या खोल्या आणि मोठ्या इमारती. दुसऱ्या विभागात कलाकार, व्यापारी आणि सामान्य लोकांना राहण्यासाठी घरे. यावरुन असे दिसून येते की, शहरात काम करणारे अधिकारी हे स्वतःला सामान्य लोकांपासुन वेगळे समजत असत.

- तुम्हाला आज शहरात काम करणाऱ्या लोकांमध्ये कांही फरक दिसून येतो का? त्यांच्या घरांमध्ये कांही फरक दिसून येतो का? असा फरक का आहे?

हरप्पा शहरात कोणत्या प्रकारचे कलाकार राहत होते? घराच्या बांधकामावरुन तुम्ही कलाकार ओळखू शकता का? भांडी पाहून ओळखू शकता का? भारताच्या इतिहासात हरप्पा कालिन बनवलेली भांडी ही उत्तम प्रतिची होती, त्याचप्रमाणे नमुन्यांची मातींची भांडी आणि खेळणी सुद्धा होती. येथील लोक तांबे, चांदी आणि पत्र्यांची सुद्धा वस्तु वापरत. लोखंडापासुन

SCERT TELANGANA



*चित्र 20.5 लोथल येथील डॉकयार्ड - त्या जहाजाची कल्पना करा जे एवढ्या मोठ्या जागेत बसत असत. (जेथे याचे माप - 37 मी. पुर्व-पश्चिम, 22 मी. उत्तर-दक्षिण)*


बनवलेली वस्तु ते वापरत नसत. भारतात नंतर ह्या प्रकारच्या वस्तु पाहण्यास मिळाल्या. तांब्याच्या धातूच्या वस्तु कमी प्रमाणात दिसत. रोजच्या जीवनात दगडी आणि लाकडी वस्तु ते वापरत. दगडाच्या तेज करवती प्रमाणे आणि चकाकी येण्यासाठी दागिन्यांसाठी उपयोगात आणत. सुती आणि लोकरी विणकाम करत. वेगवेगळ्या शंखांचा उपयोग चमचे, बांगड्या इत्यादीसाठी करत.

हरप्पा कालिन सिक्के (छाप) आणि वजन पाहून वाटते की, मोठ्या संख्येत व्यापारी एका ठिकाणाहून दुसरीकडे व्यापार करीत होते. जहाजातून जवळ असलेल्या इराक सारख्या विकसित देशात जाऊन व्यापार करत. बैलगाडी आणि नावेचा उपयोग ते दळण-वळणासाठी करत.

- तुम्हाला असे वाटते का हे सर्व वस्तु बनवणारे कलाकार एकच आहेत का? किंवा वेगवेगळ्या कलाकारांनी वेगवेगळी वस्तु बनवावेत.

**भाषा**

हरप्पन लोकांनी लिहलेली कोणतेही लिखित दस्तावेज नाहीत. कांही सिक्के, शिलालेख आहेत



*चित्र 20.6 सारनाथचे सिंहशीर्ष स्तंभ शिल्प*

SCERT TELANGANA



*चित्र 20.7 मोठे आंघोळीचे स्थान, मोहोंजोदारो*
*(माप- 11.8 X 7 मीटर*

राहिले. शेती आणि शिकारीसाठी एकत्र आले. कांही काळानंतर हरप्पा संस्कृति हळूहळू नाहीशी झाली. 20 व्या शतकात उत्खनानंतर या संस्कृतिचे कांही अवशेष सापडले.

- तुम्हाला कांही असे लोक माहीत आहे का? ज्यांनी आपले जीवनमानात बदल केला - जसे शेतकरी पासुन ते कारखान्यात काम करणाऱ्या मजुरात किंवा दुकानात काम करणारे मुनीम? किंवा कारखान्यात कांहीही काम करण्यास तयार असलेले मजुर किंवा जे आपल्या पुर्वजांचे गाव सोडून कामाच्या शोधात नव्या ठिकाणी गेले.

परंतु त्यास आपण वाचू शकत नाही. म्हणून त्यांची भाषा आपल्याला माहित नाही. जी ते बोलण्यासाठी वापरत होते. आपल्याला हे ही माहित नाही की ते एकमेकांना नावे घेऊन बोलवत असत, तसेच त्यांचे राज्यकर्ते, देव आणि शहरांची नावे ही माहित नाही.

**राज्यकर्ते**

आपल्याला राज्यकर्त्यांची नावे माहित नाहीत. जी शहरे मोठ्या प्रमाणावर विस्तारलेली होती. त्यांच्याकडे केंद्र स्थानी अधिकार होते. हे राजे होते किंवा धर्मगुरु होते किंवा नेत्यांचा समुह गट होता हे आपल्याला माहित नाही.

**राहणीमानातील बदल**

असे समजले जाते की, हरप्पन शहरे 700 वर्षापुर्वीची होती, व्यापारी आणि कलाकार उत्पादनासाठी शहरातून गावाकडे येत. तरी पण कांही इतिहासकारांचा विश्वास आहे की, अनेक नद्या कोरड्या झाल्या तेंव्हा ते गंगा नदीच्या पुर्वेला येऊन



*चित्र 20.8 मोहोंजोदारो येथील सांडपाण्याची व्यवस्था*

SCERT TELANGANA

हिसारी शिल्पे सहज सिद्ध असल्यासारखी वाटतात. तथापि त्यांचा उपयोग कशासाठी करण्यात आला याची माहिती नाही. यानंतरच्या काही कालावधीनंतर धातूंचा लेप देण्याची कला महाराष्ट्रात सुरू झाली. अत्यंत अद्‌भुत अशा ब्रांझच्या अनेक मूर्त्या, शिल्पे उत्खननात आढळली. साधारणत: तीन हजार वर्षांपूर्वीची ही शिल्पे असावीत. कदाचित ही खेळणीही असावीत नाही का?



*चित्र 20.9 दैनाबाद येथील तांबे*

यानंतर 2200 वर्षांपूर्वी शिल्पासंबंधी नवीन युग निर्माण झाले ते मौर्यांच्या काळात. या स्तंभाच्या बुडाशी काही प्राण्यांच्या आकृती होत्या. त्यांना 'राज चिन्हे' (कॅपिटल्स) असे म्हणत. यात प्रथम स्तंभ येतो तो सारनाथची बुद्धाने सारनाथ येथे सर्वप्रथम संदेश दिल्याचे मानले जाते. त्या स्मरणार्थ सिंहशीर्ष स्तंभ उभारण्यात आला. यातील चारही सिंह चार दिशांचे प्रतीक असून पायथ्याशी असलेले 'धर्मचक्र' ठळकपणे कालाची गती सुचविते.

- शिल्पातील सिंहाचे पाहणे कृत्रिम असे तुम्हास वाटते का?
- सदर चित्र तुम्ही नेहमीच पाहता; नाही का? ही प्रतिमा आणखी कोठे कोठे पाहिली?

सिंहशीर्ष स्तंभ, दगडावरील कोरीव काम हे मौर्य साम्राज्याच्या शक्तीचे प्रतीक होय. या शिल्पाचे तथा रामपूर्वमधील बैलाचे शिल्प यांची तुलना करताना हरप्पा येथील बैल सदृश प्राण्याचे चित्र पाहा.



*चित्र 20.10 सारनाथ येथील अशोक स्तंभ*



*चित्र 20.11 रामपूरा बैल*

SCERT TELANGANA

**बौद्ध स्तूपे आणि विहार :**

भारतातील प्रसिद्ध अशा सांचीच्या स्तूपाचे हे चित्र होय. आकाशाकडे पाहिले तर कसे दिसते? अर्ध गोलाकार (अर्ध्या चेंडूसारखा) आकार दिसतो. एका मोठ्या जागेत या अर्ध गोलाकार इमारतीची निर्मिती करण्यात आली. याच्या मध्यभागी बुद्ध किंवा बौद्ध भिक्षू यांचे अवशेष असतात. (दात, हाडे केस इ.) हा संपूर्ण अर्धगोल बंद करण्यात आलेला असतो. मंदिरात प्रवेश केल्याप्रमाणे यात प्रवेश करता येत नाही. सभोवतालच्या आवारभिंतीमधून आत जाता येत नाही.

यावर एक स्तंभ असतो. (प्रवेशद्वार) अशोकाच्या काळात अशा अनेक स्तूपांची निर्मिती झाली. माती आणि विटांच्या साह्याने याचे बांधकाम होत असे. नंतर दगडांचा उपयोग करून यांची निर्मिती केली जाई.

स्तूपांचे अनेक अर्थ होतात. स्तूपांना बुद्धाचे प्रतीक मानले जाते. तसेच घुमटाला विश्व, स्तंभाला पृथ्वी आणि स्वर्गाचा दुवा मानले जाते.

पर्यटक फुलांच्या साह्याने याची पूजा करतात. स्तूपाच्या प्रदक्षिणा करतात. बाह्यभागात ध्यानधारणा करतात.

- स्तूप आणि मंदिर यांच्यातील साम्य आणि भेद ओळखा. तसेच याची पूजा पद्धती सांगा.

आंध्रप्रदेशातील अनेक भागात पुरातत्त्व वास्तुशास्त्रज्ञांनी स्तूपांचे अवशेष शोधून काढले आहेत. अमरावती, भट्टीप्रौलू, रामतीर्थ, सालीहुंडम येथे प्राचीन अवशेष सापडले. भट्टीप्रौलू येथे बुद्धांच्या अस्थी असल्याचे एक स्थानही शोधण्यात आले.



*चित्र 20.12 मध्यप्रदेशातील सांची येथील स्तूप सम्राट अशोकाने याची निर्मती केली*

SCERT TELANGANA




चित्र 20.13 बुद्धीस्ट स्तुम, नेलकोंडापल्ली, खम्मम जिल्हा.
तुम्ही पद्धतीशीर पणे मांडलेल्या विटांना बघितले का।



*चित्र 20.14 अमरावती येथील स्तूप*

सध्या अमरावतीला स्तूप भग्नावस्थेत आहे. 1900 वर्षापूर्वी दगडांपासून कोरीव काम करून याची निर्मिती केली गेली. बाजूच चित्रात बुद्धाच्या मूर्तीसह एक शिल्प तोरण आहे. या शिल्प तोरणाचे बरेचसे अवशेष इंग्रजांनी लंडनच्या वस्तूसंग्रहालयात हलविले. जे हलविणे शक्य नव्हते ते, मद्रासच्या संग्रहालयात सुरक्षित ठेवण्यात आले आहेत. या उर्वरित तोरणांच्या आधारे तत्कालीन स्तूपाची कल्पना येऊ शकते आणि त्याच्याच आधारे नवीन स्तूपाची निर्मिती होत आहे.




*चित्र 20.15 पुर्णनिर्माण अवस्थेतील अमरावती स्तुप*

SCERT TELANGANA

नागार्जुन कोंडा येथील आणखी एक स्तूपही तितकाच महत्त्वाचा ईक्ष्वाकूंची राजधानी विजयापूरी या हा एक भाग कृष्णा नदीच्या काठावरील या भागात अनेक स्तूपे, विहार, राजप्रासादे आहेत. तसेच सुंदर अशा क्रीडांगणाची निर्मिती करण्यात आली. आंघोळीसाठी नदीच्या किनाऱ्यावर घाटांची निर्मिती करण्यात आली होती. दुर्दैवाने येथे निर्माण करण्यात आलेल्या नागार्जून सागर धरणामुळे हा संपूर्ण भूभाग पाण्याखाली बुडाला. तेथील अनेक शिल्पांना / अवशेषांना जवळच्याच वस्तुसंग्रहालयात ठेवण्यात आले आहे.

खाली दिलेल्या नागार्जुन कोंडा आणि अमरावती येथील शिल्प तोरणांचे निरीक्षण करा. दक्षिण भारतातला अतिशय प्राचीन अशी ही शिल्प संपदा होय. या शिल्पांना पाहून तत्कालीन प्रजेची कलात्मकता, रसिकता आदीची कल्पना करता येते.



*चित्र 20.16 अमरावतीची शिल्प संपदा पिसाळलेल्या हत्तीने बुद्धांना पाहताच त्याच्यापुढे शरणागती पत्करल्याचे हे शिल्प राजाचे मुख्य वाहन असलेला हा हत्ती पिसाळला. नगरात प्रचंड धुमाकूळ घालणार हा हत्ती बुद्धासमोर येताच शांत झाला. वरील चित्राकडे पाहिल्यास ही कथा कळते, नाही का?*



*चित्र 20.17 नागार्जुन कोंडा येथे सापडल्या या शिल्पात सहाजण युवराज तथा उपाली नामक न्हावी यांनी संघात प्रवेश देण्यात आला तो क्षण. मानल्याचे शिक्षण देण्यासाठी बुद्धोदन सर्वप्रथम उपालीला संघात प्रवेश दिला तर नंतर इतरांना प्रवेश दिला. बुद्धांच्या डाव्या बाजूला लहानशा आसनावर बसलेल्या उपालीला शिल्पात पाहता येते.*



*चित्र 20.18 सांचीतून आणलेले शिल्प. या शिल्पातून तत्कालीन दिनचर्या कळते. हा सुंदर फलकात बुद्धाचे पर्यटन दिसते. तत्कालीन जनसामान्याची कामे त्यांचा व्यवसाय याबाबतची माहिती मिळते. सध्या अशा प्रकारची दिनचर्या खेडेगावात पाहायला मिळते काय याचा विचार करा!*

काही काळानंतर या भागात लहान शिल्पाऐवजी मोठ्या शिल्पांची, इमारती निर्मितीस सुरुवात झाली. बुद्धांच्या विशाल मूर्ती, शिल्पे कोरण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. मोठमोठ्या शिल्पातून बुद्धांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न झाला. ही शिल्पे वायव्य भागातील गांधार (अफगाणिस्तान) पासून उत्तर प्रदेशातील मथुरा, सारानाथ या भागापर्यंत आढळली. यासारखी अनेक शिल्पे नागार्जुन कोंडा या भागातही पाहता येतील.

विहारे ही बौद्ध भिक्षेसाठी निर्माण करण्यात आली होती. त्याच्या राहण्यासाठी विहारांचा उपयोग होत होती. साधारणत: विहारात मोकळे मैदान असायचे. सभोवताली अनेक खोल्या असायच्या दुसऱ्या बाजूला बुद्धाची प्रतिम, किंवा मंदिर किंवा लहानसे स्तूप असायचे. या प्रार्थना स्थळांनाच बौद्ध भिक्षू चैत्य म्हणतात.

नाशिक कार्ले येथे गुहा विहारांचा शोध लागला आहे यात काही सुंदर शिल्पेही आहेत.

तक्षशिला नागार्जुन कोंडा, नालंदा यासारख्या अनेक विहारांची निर्मिती विटामातीपासून करण्यात आली आहे ही स्थळे फार मोठी अभ्यासकेंद्रे होत. या केंद्रात बौद्ध भिक्षूंकडून शिष्यांना धर्माचरण शिकविले जाई. या बरोबरच वैद्यकीय शिक्षण, आचार विचार हेही येथे शिकविले जाई. या विहारातून अनेक शिलालेख सापडले. या विहारांच्या निर्मितीसाठी अनेक महिला, पुरुष, शेतकरी, व्यापारी, सैनिक कलाकार इत्यादी दानदक्षिणा देत त्यांच्या देणग्यामुळे या विहारांचा खर्च चालत असे.

बौद्धांची ही विहारे भारतातच नव्हे तर जगभरातील अनेक विद्याप्रेमींची आवडती स्थळे झाली. जगभरातील अनेक अभ्यासक येथे आले. यात प्रामुख्याने चिनी यात्रेकरू ह्यूएनत्संग, फाही यान, इत्सींग आदी होत यांनी या स्थळांना भेट देऊन येथील विद्याभ्यासाची प्रशंसा केली.

पवित्र स्थळांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या प्रवाशांना 'यात्रेकरू' म्हणतात.

ह्यू-एनत्संग याने तत्कालीन प्रख्यात अशा नालंदा विद्यापीठात (बिहार) काही काळ विद्याभ्यास केला. आपल्या येथील निवासाचा / अनुभवाचा त्याने खालील शब्दात उल्लेख केला आहे.

*येथील शिक्षक (गुरू) अत्यंत ज्ञानी / विज्ञानी आहेत. हे सारे बुद्धांनी दाखविलेल्या मार्गावरून चालणारे आहेत. या विद्यापीठांचे नियम फार कठीण, प्रत्येकाने त्याचे पालन करणे बंधनकारक आहे. दिवसभर अनेक गोष्टीवर चर्चा होत असे. वृद्ध तरुण एकमेकांस सहकार्य करीत असतात. आपल्या शंकांचे निरसन करण्यासाठी दूरदूरच्या नगरावरून येथे अनेक इच्छुक येतात. नवीन येणाऱ्यांना येथील रक्षक कठीण प्रश्न विचारतात. त्यांनी योग्य ते उत्तर दिले तरच त्यांना आत प्रवेश असे दहापैकी एका दोघांनाच प्रवेश मिळत असे.*

## दगडापासून निर्मिलेली चैत्ये


प्रथम देवालये सातवाहनांच्या काळात विहारांच्या निर्मितीसाठी कलाकार, व्यापारी, राजे-महाराजे मोठ्या प्रमाणात देणग्या देत असत. यासारखी चैत्ये महाराष्ट्रात प्रामुख्याने कार्ले, खाज, कण्हेरी, नाशिक येथे पाहता येतात. दगडावर छिन्नी / टाकीचा वापर करून लाकडावर काम करण्याचा सुतारापेक्षाही सुंदर कोरीव काम केले जायचे. विहारात बौद्ध भिक्षूसाठी मोठी प्रार्थनास्थळे, राहण्यासाठी खोल्यांची निर्मिती दगडापासून करीत होते काही ठिकाणी बुद्धांच्या मूर्तीही कोरण्यात येत असत. 2100 वर्षांपूर्वी कार्ले येथे निर्माण करण्यात आलेल्या चैत्यगृहाचे चित्र पाहा.

- या शिल्पाआधारे स्त्री पुरुष समानता आहे हे तुम्ही म्हणून शकता काय?
- या चैत्यांची निर्याती करताना अगोदर कोणत्या भागाची निर्मिती करण्यात आली असली असे तुम्हास वाटते काय?

SCERT TELANGANA



*चित्र 20.19 कार्ले येथील बुद्धाचे शिल्प*



*चित्र 20.20 आतील भाग*



*चित्र 20.21 व 20.22 कार्लेचे शिल्प*

या काळात देखील सुतार, गवंडी आदी लोक देवालय, चैत्य यांच्या निर्मितीसाठी माती, लाकूड दगड्यांचा वापर करीत असत. या देवळात काही कृष्ण तर काही बुद्धासाठी निर्माण करण्यात आली आहेत.

तथापि ही मंदिरे आता चांगल्या अवस्थेत नाहीत. मध्यप्रदेशातल्या सांची येथे एक प्राचीन देवालये शिथीलावस्थेत आहे. याची निर्मिती साधी सरळ आहे. गर्भगृहात बुद्धांची एक लहानशी मूर्ती आहे. कोणत्याही प्रकारच्या भीती नसलेले एक सभामंडप आहे. स्तंभावरील कोरीव काम अतिशय सुंदर आहे. मंदिराचे छत समतल आहे. याला कोणतेही शिखर नाही. या मंदिराची निर्मिती 1600 वर्षांपूर्वी करण्यात आली.



*चित्र 20.22 सांची येथील जुने स्तुप*

| महत्त्वाचे शब्द | |
|---|---|
| चैत्य | भिक्षू |
| विहार | स्तूप |
| वस्तु | मठ |

SCERT TELANGANA

## तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा

1. सम्राट अशोकाने आपल्या शिल्पावर सिंह, बैलांचे चित्र का कोरले? त्याच्या जागी तुम्ही असाल तर कोणत्या प्राणी वापरला असता? त्याचे कारण काय?
2. कंगनहल्ली येथील चित्राचे निरीक्षण करून राजा तथा सामान्य जनता यातील भेद स्पष्ट करा.
3. आंध्रपेदशातील अनेक स्तूपे नदीकिनारी आहेत. उदा. सालीहुंडा, नागार्जुन, कोंडा, अमरावती. या स्तूपांच्या निर्मितीसाठी याच भागाची निवड का करण्यात आली?
4. हत्तीला शांत करण्याच्या प्रसंगाच्या शिल्पात काही लोक उंचावर दिसतात हे लोक कोण असावेत असे तुम्हास वाटते?
5. शिल्पातील स्त्री पुरुषांच्या वस्त्रधारणेकडे पहा. त्याची नोंद करा, सध्याच्या वस्त्रधारणेसोबत भेद सांगा.
6. दगडांनी बांधण्यात आलेली चैत्य गृहे, विहारे आता शिथीलावस्थेत आहेत याचे कारण काय असावे? असे तुम्हास वाटते?
7. चैत्य तथा देवालये यांच्यातील फरक तसेच पूजा पद्धतीमधील फरक स्पष्ट करा.
8. चैत्य आणि स्तूप यांना बौद्धधर्मीय पवित्र का मानतात?
9. विहार, चैत्य हे कसे उपयोगी होते?
10. पान क्र. 176 वरील पहिला उतारा वाचुन त्याचे विवेचन करा.

प्रकल्प

- तुमच्या गावातील / शहरातील देवालयांना भेट देऊन त्याच्या निर्मितीमागची कौशल्ये जाणून घ्या. त्याच्या निर्मितीचा आराखडा तयार करा. त्या मंदिराविषयीची समग्र माहिती असलेली एक संचिका तयार करा.

SCERT TELANGANA

CHAPTER 21

# तेलंगानातील हिरवळ (Greenery in Telangana)

खालील चित्रे पाहुन तुलना करा.



*Fig. 1*



*Fig. 2*

- तुम्ही पहिल्या चित्रातील परिस्थितीची कारणे सांगु शकता काय?
- तुमच्या भागातील अशा परिस्थिती वरच्या चित्राशी तुलना करा?
- दुसऱ्या चित्राप्रमाणे आपल्या भागातील चित्र असे असावे यासाठी तुम्ही काय कराल?

तेलंगाना हे $15^{0}46$ आणि $19^{0}47$ उत्तर अक्षांश आणि $77^{0}16$ आणि $81^{0}43$ पुर्व रेखांशा मध्ये वसलेले आहे. दख्खन पठाराच्या समशितोष्ण भागात आहे. येथील हवामान हे उष्ण आणि कोरडे आहे. येथे तुरळक आणि कधी कधी पाऊस पडतो त्यामुळे कोरडा गवताळ प्रदेश आणि जंगले तयार होतात. 1988 च्या भारताच्या राष्ट्रीय जंगल योजने प्रमाणे पर्यावरणाचा समतोल आणि भुगर्भाचा समतोल राखण्यासाठी कमीत कमी झाडांनी व्यापलेले क्षेत्र हे 33% असले पाहिजे जिवाच्या सर्व स्तरातील मानव आणि प्राणी यांच्या पोषणासाठी सुध्दा आवश्यक आहे. परंतु तेलंगानात झाडांनी व्यापलेले क्षेत्र जवळ जवळ हे 24% च आहे. याचे कारण झाडे कापणे आणि त्याचाच परिणाम म्हणजे पाऊसाचे प्रमाण कमी होते आणि पाण्याचे प्रश्न निर्माण होते. सतत जंगलतोड, जंगलाचे प्रमाण कमी होते. जास्त प्रमाणात मातीची झीज होते यामुळे जंगली प्राणी, माकडे, अस्वंल, चित्ते हे गावात शिरुन लोकांना त्रास देत आहेत.

तेलंगाना राज्य सरकारनी पुढाकार घेऊन सामुहीक झाडे लावण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. झाडांनी व्यापलेले क्षेत्र 33% पर्यत वाढविणे हे दोन टप्यात भौगोलीक क्षेत्र योजिले होते. 1) नोंद केलेल्या जंगलाना व्यापलेले क्षेत्रात पुढाकार घेतला 2) नोंद न केलेल्या जंगले नसलेल्या क्षेत्रात सुध्दा पुढाकार घेतला.

सामुहीक झाडे लावण्याचा कार्यक्रम हा रस्त्याच्या दोन्ही बाजुने, नदी आणि तलावाच्या किनारी नापीक,

SCERT TELANGANA

कोरड्या टेकळ्यांवर, टँक बंड आणि किनारीय भागात, शाळा आणि महाविद्यालय, धार्मिक ठिकाणे, महानगरपालीका, औद्योगिक क्षेत्रात आणि शेताच्या जमीनीत इत्यादी ठिकाणी करण्यात आला.



*Fig.3 Children in plantation*

- तुमच्या शाळेत वनमहोत्सव कार्यक्रम कसा करण्यात आला ?
- तुमच्या शाळेत लावलेल्या विविध झाडांची यादी तयार करा ?

हे साध्य करण्यासाठी राज्यात 230 बियाने मागविले मागवुन लावण्यात आले. राज्यात सरकारी आणि जंगल विभागाकडुन 4000 रोपवाटीका स्थापन करण्यात आल्या. रोपवाटीकातील रोपे हरीत - हरम कार्यक्रमात भाग घेणाऱ्यांना मोफत वाटण्यात आले. सरकारी अधिकारी जसे जिल्हाधिकारी, जागरुक नागरीक लोकांचे प्रतिनिधी, न्यायाधिश, पोलीस, सिनेकलावंत या सर्व क्षेत्रातील लोकांनी हा कार्यक्रम यशस्वीरित्या होण्यासाठी भाग घेतला.

औषधी वनस्पती जसे कडुनिंब, तुलसी इ. फळे देणाऱ्या वनस्पती दाने देणाऱ्या जसे बदाम, आंबा आणि चिकु, गुवा, पुरु, सफरचंद इत्यादी फुलझाडे जसे जाई-जुइ, सुर्यफुल, गुलाब, मोहर इ. या शिवाय ही इतर झाडे जसे सिलार, ओक रावी ही सर्व झाडे वरील ठिकाणी लावण्यात आली.

जास्तीत जास्त झाडे लावली तर पाऊस चांगला पडेल पृष्ठभागावरील आणि जमीनीच्या आतील पाण्याचे प्रमाण वाढेल तलाव आणि विहीरीत पुरेसे पाणी येऊन शेतीला पाणी चांगला करता येईल. शेळ्या, मेढंया आणि गाईना भरपुर गवत मिळेल. या प्राण्यांना गवत हिरवळ मिळेल. कारखाण्यामुळे निर्माण होणारे प्रदुषण कमी करता येईल. जंगलापासुन मिळणारे लाकुड, बांबु औषधी वनस्पती आणि विडीची पाने, सरपन, मध, फळे, शेंगा, इत्यादी उपलब्ध होईल पक्षी आणि जंगली प्राणी यांना त्यांचे निवासाचे ठिकाण मिळेल.

- तुम्ही कसे सांगु शकता की, जंगले वाढली तर पावसाचे प्रमाण खुप वाढेल ?
- कल्पना करा की, तुमच्या गावाच्या/शहरात सगळीकडे हिरवळ आणि झाडी आहेत.

रोप लावणे ही आपल्या पैकी अनेकांची आवड असते. परंतु त्यांचे संरक्षण आणि देखभाल केली जात नाही. पुष्कळ रोपे लावली जातात परंतु आपल्या निष्काळजी पणामुळे त्यातील काहींचा वाढ होत नाही.

SCERT TELANGANA



*Fig.4 Plantation with treeguards*

पाठविल्या झाडांचे संगोपन करणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. शाळांमध्ये शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी आजुबाजुच्या लोकांची मदत घेऊन झाडे लावली. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी काही झाडे दत्तक घेतली आणि वर्गाप्रमाणे किंवा गटाप्रमाणे त्यांची काळजी घेत आहेत. त्यांच्या रिकाम्या वेळेत किंवा शाळेच्या आधी किंवा नंतर विद्यार्थी झाडांना पाणी घालतात आणि झाडांना जाळ्या बसवुन त्यांचे प्राण्यांपासुन संरक्षण आणि मानवापासुन रक्षण करतात. अशा प्रकारचे हरीत हारम कार्यक्रम राज्य सरकार शाळाकडुन करवुन त्यांना पुरस्कार देतात.

**भारताचा जंगलपुरुष**

आसामच्या जोरहट जिल्ह्यातील जाधव मोलाई पायेंग हा जंगलातील कामगार वयाच्या 16 व्या वर्षी याने 1979 मध्ये सामाजिक जंगले कार्यक्रम मध्ये पाच वर्ष चाललेल्या या प्रकल्पात कामगार म्हणुन भाग घेतला प्रकल्प पण लावली. प्रकल्प संपल्यावर सर्व कामगार निघुन जातात पण याने हे काम चालु ठेवले. त्याने आपल्या गावात खुप झाडे लावली. ब्रम्हपुत्रा नदीच्या वाळुमय मैदानात 20 वर्षात 1360 एकर जमिनीत अनेक झाडे लावुन त्यांची देखभाल त्याच्या या कामामुळे संपुर्ण तो प्रदेश जंगलात परिवर्तीत झाली. तो गेल्यानंतर त्या जंगलाला मोलाई जंगल हे नाव देण्यात आले. भारताचा जंगल पुरुष या नावाने पद्मश्री पुरस्काराने त्याला सम्मानित करण्यात आले. देशातील चौथा नागरीक पुरस्कार करण्यात देण्यात आले.

काही शाळांमध्ये शिक्षक विद्यार्थ्यांना रोपे देतात आणि त्यांना त्या ठिकाणी लावण्यास सांगतात. अप्रत्यक्षपणे यामध्ये पालक, समाज, जोडला गेला आहे. 230 कोटी रोपे सामुहीक रित्या लावण्याचा कार्यक्रम तेव्हाच शक्य होईल जेव्हा समाजातील लोकांनी आवडीने आणि एका हेतुने सहभाग दिला तरच काही शाळांमधुन एक विद्यार्थी एक झाड असा कार्यक्रम केला.

- तुमच्या परिसरात झाडे लावण्याचा कार्यक्रम कसा साजरा केला याची चर्चा करा.
- तुमच्या परिसरात झाडे, बगीच्या, पार्क आहेत का याची चर्चा करा.

राज्य सरकारने या देखाभाल निटपणे होत आहे की नाही हे ठरवण्यासाठी जिओ गेटींग केले. अधिकाऱ्यांनी जिसे आवश्यकता आहे त्या ठिकाणी जसे शाळा, कार्यालय, आणि इतर ठिकाणी झाडांना संरक्षण देणाऱ्या वस्तु




SCERT TELANGANA

## वनजिवी रामय्या (*Vanajeevi* Ramaiah)

दारीपल्ली रामय्या वय ७० वर्ष याला वनजिवी रामय्या या नावाने लोकप्रिय असुन तेलंगाना राज्यातील खम्मम जिल्ह्यातील रेड्डीपल्ली गावात राहतो. त्याने नुसते सांगण्यापेक्षा प्रत्यक्ष करुन दाखविले. त्याने प्रसिध्द घोषणा दिली. झाडे लावा जिवन वाचवा आणि त्याचे फायदे सांगितले. येथील स्थानिक लोक त्याला सायकल वरुन पॉकेट भरुन बिया आणि रोपटे घेऊन जाणारा माणुस म्हणुन ओळखतात. त्याला पर्यावरणाचे महत्व कळाले आणि जमिनीच्या प्रत्येक भागात झाडांची रोपटी लावण्याचे काम हाती घेतले. त्याने नुसती रोपटी लावली नाहीत तर त्यांना वाढवली लोकांना ही सामाजिक चळवळ करुन प्रोत्साहीत केले.

त्याच्या या अथक परिक्षमामुळे त्याला भारताच्या सर्वोच्च नागरी सम्मान पद्मश्री पुरस्कार देऊन त्याचा सम्मान करण्यात आला.

### महत्वाचे शब्द

पर्यावरणाचा समतोल प्रदुषण जमिनीतील पाण्याची पातळी हिरवळ

### तुमच्या अभ्यासाची प्रगती करा

1. तेलंगानातील हिरवळ वाढवण्याची का आवश्यकता आहे?
2. जंगलाचे उपयोग सांगा?
3. झाडांचे संरक्षण करण्याचे काही उपाय सांगा?
4. रस्त्याच्या दोन्ही बाजुस झाडे लावण्याचे उपयोग आपल्याला काय आहेत?
5. झाडांची रोपटी, झाडे लावतांनाची चित्रे मिळवुन एक अल्बम तयार करा?
6. तुमच्या विभागात अलीकडे वनमहोत्सव कसा साजरा केला ते लिहा?
7. जंगले वाढवा यावर काही घोषवाक्य तयार करा?

SCERT TELANGANA

# शैक्षणिक माणके

1) वर्गातील नियम ।

शिकविलेल्या पाठ्यांशाला समजून घेण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध करून द्यावा त्यासाठी विविध प्रश्न, चर्चा महत्त्वाच्या ही प्रश्ने, चर्चा, संकल्पना ग्रहणशक्ती, विश्लेषण, वैचारिक पातळी तथा कल्पनेला वाव देणारी असावीत.

2) संकल्पनांची समज । विविध संकल्पनांच्या समज येण्यासाठी विश्लेषण, चर्चा, उदाहरणे, व्यक्तींचा अभ्यास यांची गरज असते निरीक्षणाला महत्त्व द्यावे.

3) पाठयांश तथा पाठ्यांशेतर चर्चा ।

या पाठातील विविध संकल्पनांचे विश्लेषण थेट न करता, नकाशे व इतर सह माहितीद्वारे करण्यात आले आहे त्यासाठी विद्यार्थ्यांना पुरेसा कालावधी उपलब्ध करून द्यावा.

4) माहिती कौशल्य ।

प्रकल्प कार्याधारे विद्यार्थी माहिती गोळा करतात जिचे संकलन-नोंदणी या बाबी माहिती कौशल्याच्या विकासासाठी योगदान देतात.

5) कारणकारक संबंध ।

आपल्या जीवनातील घटनांचे जगातील इतर घटनांशी तुलना करण्याचे कसब विद्यार्थांत अवगत करावे, तसेच अनेक घटनांची मीमांसा करून विचार करण्यास, संशोधनास प्रोत्साहन द्यावे.

6) नकाशावाचन तथा नकाशाची समज ।

या पुस्तकात विविध प्रकारचे नकाशे तथा रेखाटने दिली आहेत यांच्या साह्याने विविध प्रांत , घटना यांच्या बद्दलचे विश्लेषण कौशल्य विकास करणे, हा या मागचा उद्देश नकाशा वाचनाचा सराव शाळेपासून करून त्याची व्याप्ती वाढवावी नकाशा तयार करणे वाचन करणे, नकाशातील स्थळे, घटना, ओळखणे, ही कौशल्ये वाढवावी नकाशाचे नामकरण तथा ओळखण्याचे कसब वाढवावे.

7) प्रशंसा तथा प्रोत्साहन ।

आपल्या देशात विविध भाषा , आचार-विचार,व्यवहार, अन्नपदार्थ पुष्कळ आहेत सामाजिक अध्ययन शास्त्राद्वारे याचे संगोपन करावे सहाव्या व सातव्या वर्गात दिलेल्या शिक्षकांसाठीच्या 'पुस्तकाविषयी' जरूर वाचावे.

SCERT TELANGANA

# Appendix


This additional maps are to be used wherever necessary.


World Political Map




SCERT TELANGANA

# India Physical Map






SCERT TELANGANA




SCERT TELANGANA

# Telangana Political Map



SCERT TELANGANA

# Telangana State Symbols

| Sl. No. | State Symbol | Common Name | Telugu Name |
|---|---|---|---|
| 1. | State Animal | Spotted Deer | Jinka |
| 2. | State Bird | Indian Roller | Pala Pitta |
| 3. | State Tree | Jammi Chettu | Jammi |
| 4. | State Flower | Tangedu | Tangedu |


State Animal


State Bird


State Tree


State Flower

State Logo

# National Symbols of India

**National Flag :** Designed by Sri Pingali Venkaiah



**National Symbol :** Lion Capital - Adopted from the Emperor Asoka's dharma stupa established at Saranath.





**National Tree :** Banyan tree

**National Flower :** Lotus



**National Language :** Hindi






**National Fruit :** Mango



**National River :** Ganges

**National Animal :** Royal Bengal Tiger



**National Anthem :** Written by Sri Ravindranath Tagore.

Jana gana mana...





**National Bird :** Peacock



**National Song :** Vande Mataram Written by Sri Bamkim Chandra Chaterji

**National Aquatic Animal :** Dolphin



**National Calendar :** Based on Shaka Samvatsara ( Chaitra masam to Phalguna masam). We follow the Gregorian Calendar officially.

Indian National Calendar (Saka calendar)

| S. No. | Month | Length | Start date (Gregorian calendar) | Ritu | Season |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Chaitra | 30/31 | March 22 | Vasanta | Spring |
| 2 | Vaishākh | 31 | April 21 | | |
| 3 | Jyaishtha | 31 | May 22 | Grishma | Summer |
| 4 | Āshādha | 31 | June 22 | | |
| 5 | Shrāvana | 31 | July 23 | Varsha | Monsoon |
| 6 | Bhādrapad | 31 | August 23 | | |
| 7 | Āshwin | 30 | September 23 | Sharat | Autumn |
| 8 | Kārtik | 30 | October 23 | | |
| 9 | Agrahayana | 30 | November 22 | Hemant | Winter |
| 10 | Paush | 30 | December 22 | | |
| 11 | Māgh | 30 | January 21 | Sishira | Cold & dewy season |
| 12 | Phālgun | 30 | February 20 | | |



**National Heritage Animal :** Elephant

**Indian Standard Time (IST) :** Based on 82 1/2 degrees East Longitude. Our local time is 5hrs.30min. ahead of Greenwich mean time(GMT).



SCERT TELANGANA

SCERT TELANGANA